म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. क. १८

१६८
विष्णूशास्त्री चिपळूणकर
निबंध

नं १६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
जिल्हा वाचनालय)  वाचनालय/नौपाडा.
ग्रंथ – विष्णुशास्त्री चिपळूणकर
ले – स्व. भि. बेलसरे
विषय – निबंध २५२

वा.नि : १२८/१

नि ३८

अनु - १६७

विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांच्या

# किरकोळ लेखांचा संग्रह.

भाग १ ला.

कैलासवासी

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांच्या

# किरकोळ लेखांचा संग्रह.

संपादक

## खंडेराव भिकाजी बेलसरे.

" This excellent liquor of knowledge would soon perish and vanish to oblivion, if it were not preserved in books."

*Bacon's Advancement of Learning.*

## भाग १ ला.

कैलासवासी
...आराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ
...राठी ग्रंथसंग्रहालयास

मुंबई,-इंडियन प्रिंटिंग प्रेसांत छापला.

किंमत रु. १.

# समर्पण.

दिवाणबहादूर मणिभाई जसभाई
यांचे सेवेशीं.

महाराज,

सन्मान्य पुरुषांचा सन्मान करणें हें खरोखर मोठें उत्साहदायक काम आहे; आणि तें आज माझ्या वांट्यास आल्यामुळें मला किती आनंद होत आहे ह्मणून सांगावा! आपली विद्येची आवड प्रसिद्धच आहे; आणि विद्वानांची व गुणिजनांची बूज ठेवून, त्यांस उत्साह देण्याची आपली अलौकिक, विरळ हातोटी, आपल्या इतर राज्यधोरणी गुणांसह, सर्वांच्याच प्रशंसेस पात्र आहे. तथापि, प्राचीन मराठी राज्यवैभवाचा खांबच असें जें बडोदसरकारचें राज्य, त्यास, कांहीं वर्षें दिवाणपद स्वीकारून, आपण नेकीनें हात देऊन, सावरून धरलें आणि दृढमूळ केलें, याबद्दल विशेषें करून सकल मराठमंडल आपलें ऋणी आहे असें मला वाटतें. आणि ही माझी बुद्धि व्यक्त करण्याच्या हेतूनें, कांहीं संस्कृत कविता ज्या अर्थासहित या पुढें जोडल्या आहेत त्यांसह, हा ग्रंथ आपल्यास नम्रपणें अर्पण करीत आहें. त्याचा स्वीकार आपण केल्यामुळें मी आपला अत्यंत आभारी आहें. हे विनंति.

मुंबई, ता. २५ जुलै सन १८९६. } खंडेराव भिकाजी बेलसरे.

# गुणमणि-मालाऽर्पण-पत्रिका.

यस्य प्रसादे कमलाऽमला भृशं
स्थितश्च शश्वज्जय एव कर्मणि ।
शिखामणिर्नीतिविदां करोत्यसौ
न मानसं कस्य नु दर्शनोत्सुकम् ॥ १ ॥

कृत्वा हेतुं कमपि मनसि प्रश्रयेणाऽऽगतोऽहं
सिद्धिस्तत्राऽद्य भवतु न वा श्रोतुमेवाऽर्हसीह ।
ज्ञातौदार्यः फलकृपणतामावहेद्यद्रसालः
छायासौख्यं कथमथ हरेत्सोऽपि नो मार्गगानाम् ॥ २ ॥

उद्योगरत्या समयेषु धृत्या
प्रीत्या निजस्वामिपदेषु नित्यम् ।
ऋजुप्रकृत्या शुभशिष्टरीत्या
नीत्या सुगूढांतरभावया च ॥ ३ ॥

---

१ ज्याच्या प्रसादाच्या ठिकाणीं लक्ष्मी, कर्तृत्वांत जय आणि जो नीतिमानांत श्रेष्ठ अशा पुरुषाचें दर्शन कोणास उत्सुक करीत नाहीं?

२. मनांत कांहीं हेतु धरून मी आलों आहें. तो हेतु सिद्ध होवो किंवा न होवो, तथापि आपण ऐकून घ्यावा हें योग्य आहे. आम्रवृक्ष उदार असतांही कदाचित् फळ न देईल तर न देवो, तरी आमच्यासारख्या मार्गस्थांस छायेचें सुख न देऊं ह्मणेल तर त्यास तसें कसें करतां येईल?

३।४. उद्योगाभिरुचि, धैर्य, स्वामिनिष्ठा, सरळस्वभाव, संभावितपणा, गुप्तनीति, औदार्य, कीर्ति, अभेदबुद्धि, दया इत्यादि गुणांनीं आपण मंडित असल्यामुळें सर्व प्रकारें वंदनीय आहां.

उदारमत्या जनगीतकीर्त्या
सत्याश्रयान्निर्गतभेदबुद्ध्या ।
ख्यातो भवानेव दयैकशीलः
विशालधीः कस्य न वंदनीयः ॥ ४ ॥

त्वद्राज्यकार्यपटुतां प्रकृतीनामनेकधा ।
जातां फलवतीं स्नेहात्स्मरत्यद्यापि कच्छपः ॥ ५ ॥
वटगर्भपुरीराज्यतंत्रभारो महत्तरः ।
स्वबुद्ध्या निगृहीतो यन्महतां किंनु दुष्करम् ॥ ६ ॥
स्मारं स्मारं गुणानेतान् पूज्यभावः समुद्गतः ।
तत्प्रयुक्तोऽहमत्यर्थं न जाने व्यक्तिपद्धतिम् ॥ ७ ॥
क्व ते यशोऽब्धिर्गभीरः क्व चाल्पा मतिरेव मे ।
नाव्यतः पद्यरूपायां त्वां कृत्वा पदमागतः ॥ ८ ॥
ग्रंथोपायनहस्तेन मया ग्रंथः समर्पितः ।
विद्वत्समाजमान्योऽयं प्रीतिं ते तनुतां ध्रुवम् ॥ ९ ॥

---

५.६. प्रजेचें कल्याण झाल्यामुळें कच्छाधिपति अझूनही तु[illegible] च्या राज्यकारभारपद्धतीची आठवण काढितो. याहूनही ब[illegible] येथील राज्यकारभाराचें काम कठिण होतें तरी त्यालाही आ[illegible] आळा घातला; त्यापेक्षां थोर लोकांस कांहीं दुष्कर नाहीं हेंच [illegible]

७।८।९. ह्या सर्व कृतींचें स्मरण होऊन माझे मनांत पूज्य[illegible] उत्पन्न होतो, तो व्यक्त करावा असें वाटतें; तरी कसा करावा [illegible] बरोबर कळेना. कारण आपलें गंभीर यश कोठें आणि माझी अ[illegible] मति कोठें? ह्मणून या पद्यरूप नौकेंत पाय ठेवून तुमचे प[illegible] आलों आहें आणि उपायनरूप हा ग्रंथ आपल्यास समर्पण के[illegible] आहे. तो विद्वन्मान्य असून आपल्याही प्रीतीस पात्र होवो.

# अनुक्रमणिका.


| शालापत्रकांतील. | पृष्ठ. |
|---|---|
| १ प्रवास. .... .... .... .... .... | ३ |
| २ शिक्षकाचें काम. .... .... .... .... | ९ |
| ३ कविता. ( इंग्रेजी ) .... .... .... | २९ |
| ४ समुद्र. .... .... .... .... .... | ६२ |
| ५ मिसिप्सा राजाचें जुगार्था याशीं भाषण .... | ६५ |
| ६ अधरबाल याचें भाषण .... .... .... | ६८ |
| ७ विद्याधनप्रशंसा ( अभिप्राय ) .... .... | ७५ |
| ८ नौकानयनाचा इतिहास ( अभिप्राय ) .... | ८१ |
| ९ कुमारसंभवाचें मराठी भाषांतर (अभिप्राय) .... | ८८ |
| १० मनुष्याचें अटोकाट ज्ञान. .... .... .... | ९४ |
| ११ मुंबई येथील बडा दरबार .... .... .... | ९८ |
| १२ चंद्र आणि तारे. .... .... .... .... | ११० |
| १३ कवितेचा निबंध ( मराठी ).... .... .... | ११६ |
| १४ शिक्षा आणि शिक्षण .... .... .... | १३५ |
| १५ बाळाजी विश्वनाथ पेशवे याचा इतिहास .... | १८२ |
| १६ साहित्य शास्त्र ( अभिप्राय ) .... .... | १८३ |

१७ पत्रें पाठविणारांस सूचना उत्तरें वगैरे .... १८८
१८ शेवट .... .... .... .... .... १९७

## ज्ञानप्रकाशांतील.

19 A Poet Turned a Philosphor ... ... 201
20 Chûtakâ ... ... ... ... ... ... 212
21 The old and new systems of Education ... ... ... ... ... 213
२२ सभा व मंडळीची चिकित्सा .... .... २२१
२३ पुणें चित्रशाळा .... .... .... .... २३६

# प्रस्तावना.

हा ग्रंथ कित्येक कारणांस्तव मराठी वाचकांस विशेष धीसारखा आहे असें आह्मांस वाटतें. एक तर, कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे नांव सर्वविश्रुत असून, त्यांचे लेख, ते जीवमान असतांच, लोकांस फार प्रिय होऊन गेले होते त्यांची भाषासरणी एवढी मोहक होती कीं त्यांच्या हातचे लेख पुनःपुनः वाचण्याची उत्सुकता होऊन, वाचावयास एकदा हातीं घेतलेला लेख पुरा केल्यावांचून खालीं ठेववत नाहीं असा वाचकांचा अनुभव आहे. तेव्हां या त्यांच्या "किरकोळ लेखांच्या संग्रहा" विषयीं साधरणपणेंच वाचकांच्या मनांत आवड उत्पन्न होईल हें उघड आहे.

दुसरें, प्रकृत ग्रंथाचेंच अपूर्वत्व. विष्णुशास्त्री यांचे प्रसिद्ध निबंध बहुतेक छापून निघाले आहेत. तथापि मा पुस्तकांतुन, वर्तमानपत्रांतुन वगैरे जे वेळेविळीं पुष्कळ किरकोळ निबंध व इतर लहान लहान लेख येऊन गेले ते आजवर स्वतंत्र पुस्तकरूपानें समग्र छापून निघाले नाहींत, आणि कालांतरानें ते नष्ट होण्याचीही भीति आहे. अशा सर्वांचा संग्रह प्रस्तुतच्या पुस्तकांत केला आहे; तसेंच, त्यांच्या हातचीं पत्रें, कागद वगैरे जीं कांहीं आमच्या हातीं आलीं आहेत व ज्यांचा सार्वजनिक कृत्यांशीं संबंध आहे त्यांचाही यांत समावेश होणार आहे. यावरून उघड दिसून येईल कीं, अशा तऱ्हेचा ग्रंथ मराठीमध्यें यापूर्वीं झालेला नसल्यामुळे त्यास एका प्रकारें स्वतःसिद्धच अपूर्वत्व आलें आहे असेंही ह्मणावयास चिंता नाहीं.

तिसरें, या संग्रहांतील लेखांची योग्यता. विष्णुशास्त्री, यांच्या मोठमोठ्या निबंधांपेक्षां यांतील लेखांची योग्यता थोडी निराळी आहे व यामुळेंच ते विशेष उपयोगाचेही आहेत हें मार्मिक वाच·

कांच्या सहज लक्षांत येईल. या किरकोळ लेखांपैकीं का
चांगले मनन करण्यासारखे असून मराठी ग्रंथसंग्रहांत का
स्थान देण्यास सर्वथा पात्र आहेत. तथापि एथें आणखी ए
विशेष ध्यानांत ठेवली पाहिजे, ती ही कीं हे सर्व लेख
राळया वेळीं प्रसंगानुरोधानें फुटकळ लिहिले गेले असल्या
णानें लिहिणाराच्या मनाचा विकास कसकसा होत गेला, त्याचीं खरीं मतें कोणतीं होतीं, तीं आरंभीं कशीं होतीं व पुढें कसकशीं बनत गेलीं वगैरे गोष्टींचा बराच खुलासा त्यांजवरून होण्यासारखा आहे. तसेंच, विद्यालयाची स्थिति, आधुनिक विद्वानांचीं स्वदेशहितार्थ कर्तव्यकर्में, समाजस्थिति, देशस्थिति इत्यादिकांच्या संबंधानें जे विचार निबंधमालादिकांत येऊं शकले नाहींत असे कांहीं विचार यांत विस्तारानें येऊन गेले आहेत, त्यांचें महत्व किती आहे हें कोणासही सांगणें नलगे.

याशिवाय चौथें शेवटलें कारण तर विशेष महत्वाचें आहे, व त्यावरून प्रकृत संग्रह आतांच प्रसिद्ध करण्याची किती आवश्यकता आहे हेंही लक्षांत येईल. पहा कीं कोणाही प्रसिद्ध मनुष्यासंबंधीं ज्या गोष्टींचें आधीं फारसें वाटत नाहीं त्याच गोष्टी कांहीं काळानें दुर्मिळ झाल्यावर, लोकांस अगत्याच्या वाटूं लागतात. तेव्हां अशा गोष्टी जोंवर आठवणीच्या बाहेर गेल्या नाहींत तोंच चिरस्थायी करण्याची तजवीज झाली तर किती बरें होईल? होमर व शेक्सपीयर किंवा कालीदास व भवभूति ज्या काळीं होऊन गेले त्याच काळीं जर त्यांचा वृत्तांत कोणी लिहून ठेवला असता तर आज त्याचा केवढा उपयोग झाला असता? पण त्यांच्या संबंधाचें एखादें टिपणही करून ठेवण्याचें तेव्हां कोणास अगत्य वाटलें नसेल. पण आज काय मौज दृष्टीस पडते पहा! ज्या खुर्चीवर शेक्सपीयर बसत असे ह्मणून सांगतात व ज्या तुतीच्या झाडाखालीं बसून तो आपले लेख लिहीत असे अशी वदंता चालत आली आहे त्या खुर्चीचें व त्या झाडाचें आज

विलायतेंत केवढें तर म माजलें आहे! प्रतिवर्षी शेकडों लोक त्या महाकवीच्या सं प्रमच्चें ीं पवित्र झालेल्या वस्तूंच्या दर्शनार्थ, त्याचें जन्मस्थान जें क गोष्ट –आन–अव्हान नामक गांव तेथें जातात व आपल्या निरनि- नेत्रांचें पारणें फेडून घेतात! ही जर त्यांच्या संबंधाच्या -कार- ार्थिव वस्तूंची गोष्ट, तर त्यांची अविनाशी व अपार्थिव बुद्धि ज्यांत प्रतिबिंबित झाली आहे व जे त्यांच्या ईश्वरप्रेरित बुद्धिसर्वस्वाचीं साक्षात् फळेंच होत असे सर्व जगास आल्हाद देणारे, व नीतिबोधानें लोकोपकार करणारे जे अलौकिक ग्रंथ त्यांनीं रचले, त्यांजविषयीं आपल्या मनांत केवढें कौतुक उत्पन्न व्हावें ? पण वरील कवीश्वरांनीं रचलेले सर्व ग्रंथ तरी आपल्या हातीं आले आहेत काय? असें मुळींच ह्मणतां येत नाहीं आपल्या देशाच्या संबंधानेंच पाहिलें तरी कालीदासानें दोन काव्यें तीन नाटकें व खरीं खोटीं त्याच्या नांवावर विकणारीं सटर फटर प्रकरणें एवढींच लिहिलीं असतील, व भवभूतीची प्रतिभा एवढी उज्वल असतां त्यानेंही तीनच नाटकें रचलीं असतील हें संभवत नाहीं. सुभाषितावली इत्यादि ग्रंथांत त्याच्या नांवावर जी पद्यें आढळतात त्यांवरून त्याचे आणखीही कित्येक ग्रंथ असावे असें शाबीत होतें. पण ते सर्व आज कोठें आहेत ? तत्समकालीन जनांच्या अज्ञानानें किंवा हयगयीनें काळाच्या दाढेखालीं ते केव्हांच रगडून गेले असावे! एका कवीनें ह्मटलें आहे–"काळ हा मोठा अट्टल चोर आहे; तो केवळ सर्व जगास वंद्य अशा नररत्नांसच चोरतो असें नाहीं तर त्यांचें स्मरण देणाऱ्या ज्या त्यांच्या कृति त्यांसही, परकी राष्ट्रास पादाक्रांत करणाऱ्या क्रूर व हेवेखोर राजाप्रमाणें, तो पार नायनाट करून टाकतो." या त्याच्या रीतीस अनुसरून त्यानें कित्येक कल्पक विद्वानांचे मोठे परिश्रम करून रचलेले मौल्यवान ग्रंथ विस्मृतिरूप गर्तेंत फेकून देऊन, त्यांचा आज मागमूसही उरूं दिला नसेल ! मग सामान्य व किरकोळ ग्रंथांची व लेखांची कथा काय ? असो तर, याप्रमाणें आजवर जी हानि झाली ती

झाली तींस उपाय नाहीं असें समजून यापुढें तरी आपण सावध राहावें व या महातस्कर काळाच्या तावडींतून स्वसमकालीन महाशय ग्रंथकारांच्या कृतींचा बचाव करण्याचा यत्न करावा हें योग्य आहे.

आतां कोणी ह्मणतील-हें सर्व खरें, पण यास उपाय काय? तर यास उपाय एकच, आणि त्याची दिशाही जगन्नाथराय कवीनें तीनशें वर्षांपूर्वींच पुढील श्लोकांत दाखवून दिली आहे.

> दुर्वृत्ता जारजन्मानो हरिष्यंतीति शंकया ।
> मदीय पद्यरत्नानां मंजूषैषा मया कृता ॥
>
> भामिनीविलास । ४

म्हणजे "लबाड लोकांच्या अपहारापासून आपल्या स्फुट कवितांचें रक्षण व्हावें ह्मणून त्यानें एक पेटी तयार केली व तींत त्या कवितांस अडकवून टाकलें!" ही युक्ति जगन्नाथानें लबाड लोकांसाठीं योजली आहे खरी तरी तीच पर्यायानें आपल्यास काळाच्या प्रतीकारार्थ उपयोगी आहे असें आम्हास वाटतें. प्रस्तुत काळांत मुद्रणकलेची उत्कृष्ट सोय असल्यामुळें ती अमलांत येण्यासही मोठे प्रयास पडतील असें नाहीं. कल्पक व गुणी ग्रंथकारांचे मोठे मोठे व नांवाजलेले ग्रंथ तर स्वतंत्र छापले जाऊन वाचकांच्या सुंदर कपाटांतील फळीवर स्थान मिळवून विराजमान होतातच; त्याचप्रमाणें त्यांचे लहान लहान ग्रंथ, त्यांचे किरकोळ लेख, त्यांचे वृत्तांत व त्यांच्या संबंधाच्या संस्मरणीय गोष्टी जोंवर आपल्या नजरेच्या व आठवणीच्या अटाक्यांत आहेत तोंच एकत्र करून त्यांचा संग्रह करून ठेवण्याची तजवीज करावी ह्मणजे झालें. या योगें काळापहाराचें भय बरेंच कमी होऊन आपलें कर्तव्य आपण केलें असेंही होईल. प्रकृत पुस्तक प्रसिद्ध करण्यांतही आमचा हाच हेतु आहे हेंही एथें सांगावयास पाहिजे असें नाहीं. कै. विष्णुशास्त्री यांचे लेख जर आपल्यास एवढे प्रिय आहेत,

त्यांची योग्यता जर खरोखर आपल्या नजरेस आली आहे व त्यांच्या संबंधाच्या लहान मोठ्या इतर गोष्टींविषयीं जर आपल्यास कौतुक वाटत आहे तर त्यांच्या "किरकोळ लेखांचा संग्रह" करण्याचा जो हा यत्न आम्ही केला आहे तोही आतांच करणें इष्ट आहे. कारण यांपैकीं बहुतेक लेख, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें यांच्या सारख्या अल्पकाळ टिकणाऱ्या दप्तरांत ग्रथित होऊन गेल्याकारणानें, आतांच दुर्मिळ होऊं लागले आहेत; त्यांस एकत्र करून चिरस्थायी करण्याची आतांच तजवीज न झाली तर त्यांस आचवण्याचीच आपल्यावर पाळी येण्याचा संभव आहे.

प्रकृत ग्रंथ याच वेळीं प्रसिद्ध करण्याच्या कारणांविषयीं वर बराच मजकूर लिहिला आहे; तरी, या मुद्याच्या संबंधानें पुष्कळांच्या मनांत कांहीं विलक्षणच कल्पना वास करीत असल्याचें आढळून येतें, त्यांचे या लिहिण्यानें जर निर्मूलन होईल तर मोठें काम झालें असें आम्ही समजून, त्याबद्दल यत्किंचितही विषाद मानणार नाहीं. या प्रमाणें प्रकृत ग्रंथाच्या आवश्यकतेबद्दल व कोणत्या कारणांस्तव मराठी वाचकांस तो आवडण्यासारखा आहे या बद्दल लिहून आतां त्याच्या स्वरूपाकडे वळतों.

लोकप्रिय कै. विष्णुशास्त्री यांच्या या किरकोळ लेखांच्या संग्रहाचे दोन भाग केले आहेत. आहे. यांत शाल... आज
वाचकां... व किरकोळ असे तीन खण आहेत. पहिल्या
ज्ञानप्र... लेखांचेही चार प्रकार आहेत—बहुश्रुतपणाचे निबंध,
खणां... र अभिप्राय, शालोपयोगी इंग्रजी निबंधांचीं भाषांतरें;
पु... सूचना वगैरे. दुसऱ्या खणांत ज्ञानप्रकाशांतील इंग्रजी
... असून तिसऱ्यांत रत्नागिरी एथील स्नेहसंवर्धक
...पुढें वाचलेला निबंध, जो सत्यशोधक पत्रांत छापला होता
एक, व चित्रशाळेच्या कारखान्यासंबंधें तसविरींच्या यादीस

जोडलेली प्रस्तावना वगैरे किरकोळ लेख येतात, त्याप्रमाणें या भागांतील लेखांची व्यवस्था आहे.

या ग्रंथाचा दुसरा भाग बाहेर पडून एकंदर लेख वाचकांच्या हातीं पडल्यावर शास्त्रीबोवांच्या लेखनसरणीविषयीं व त्यांच्या विचारांविषयीं जें आह्मास लिहिणें आहे, तें उपोद्घातादाखल दुसऱ्या भागास जोडण्याचा विचार आहे. त्यांतच प्रस्तुत भागांतील लेखासंबंधानेंही ऊहापोह करण्यांत येईल असें अभिवचन देऊन ही प्रस्तावना पुरी करितों.

कैलासवासी
सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
६-१०-१२.

# शालापत्रक.

डिसेंबर सन १८७१—डिसेंबर सन १८७५.

लोकांस धारिष्ट नाहीं, ज्यांचे विचार आपलें कुटुंब व आपला देश यांहून पलीकडे कधीं धजावतच नाहींत, त्यांच्या मनांत इतर देशीं प्रवास करण्याची बुद्धि येईल कोठून ? जगाच्या इतिहासांत पाहिलें असतां असें आढळतें, कीं ज्या लोकांत धारिष्ट विशेष तेच संपत्तिमान व ज्ञानसंपन्न असे झाले. इसवी शकाच्या पूर्वी सुमारें हजार वर्षांमागें एशियामैनर देशांत फिनिशियन ह्मणून मोठे धारिष्टवान लोक होते; त्या लोकांनीं, त्यावेळेस जेवढा जगाचा भाग माहीत होता, तेवढ्याशीं व्यापार ठेविला होता. त्यावेळेस नाविक कला फार अपूर्ण दशेंत असतांही, ते लोक, सर्व भूमध्यसमुद्र धुंडाळून, ज्या अटलांटिक महासागरास त्यावेळेस लोक पृथ्वीची सीमा समजून त्यांत फार लांबपर्यंत जाण्यास भीत असत, त्या महासागरांत देखील संचार करूं लागले. त्यांनीं ब्रिटिश बेटें–जीं त्या वेळच्या लोकांस फारशीं ठाऊक देखील नव्हतीं–व अफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचीं बेटें, यांशीं बराच व्यापार चालविला होता. सारांश ते लोक धारिष्ठवान असल्यामुळें त्यावेळीं सर्व राष्ट्र धनाढ्य व विद्यासंपन्न ह्मणून गाजत होतें. त्यांनींच कार्थेज, टायर इत्यादि नामांकित शहरें वसविलीं. त्यांच्या मागें कार्थेजच्या लोकांनींही त्यांचा धारिष्टाचा कित्ता बराच उचलला होता. पण पुढें ते लोक राज्याचे चुरशीस लागल्यामुळें त्यांचे पहिलें तेज कमी होऊन, शेवटीं त्यांचा अगदीं मोड झाला. त्याही पुढें जीं ग्रीसचीं अनेक संस्थानें एकामागून एक अशीं वैभवास चढलीं व पुढें रोमन लोकांचे सर्व जगावर

जें स्वामित्व झालें त्या सर्वांचें तरी बीज धारिष्ट होय. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे,–

अव्यवसायिनमलसं दैवपरं साहसाच परिहीनम् ।
प्रमदेव न वृद्धपतिं वांछत्युपगूहितुं लक्ष्मीः ॥

हें अगदीं यथार्थ आहे. साहस, उद्योग वगैरे गुणांचा जसजसा लोकांत ऱ्हास होऊं लागतो तसतशी त्या लोकांची बुडती कळा आलीशी समजावी. असो; हल्लींही इंग्रज लोकांच्या उत्कर्षास हेंच साहस मुख्य कारण झालें आहे. सन १४९२ यावर्षी कोलंबसानें मोठया अडचणी सोसून अमेरिका खंडाचा शोध लावला, तेव्हांपासून युरोपामध्यें साहसाचा आवेश सर्व लोकांचे मनांत भरला. पुढें लौकरच पोर्टुगीज लोकांनीं हिंदुस्थानाशीं व्यापार करण्यास व तेथील मुलूख काबीज करण्यास आरंभ केला. त्यांच्या मागोमागच डच, इंग्रज, फ्रेंच वगैरेही लोक आले. पुढें दैवशात् इंग्रज लोकांसच फार आयास न पडतां येथचें सार्वभौमत्व प्राप्त झालें. या प्रमाणें युरोपांतील लोकांचा उत्कर्ष, त्यांचें प्रवास करण्याचें जें साहस, त्यामुळें झाला; व अझूनही किती होईल हें सांगवत नाहीं. कांकीं, त्यांचे नवे नवे शोध प्रतिवर्षी चाललेच आहेत. या वर्षी कोणी जाहाजें घेऊन आर्टिक महासागरांत ध्रुवाजवळचे प्रदेश पहावयास गेला, पुढल्या वर्षी कोणी मंगोपार्कासारखा धैर्यवान पुरुष निर्जन व भयाण अशा अफ्रिकेच्या मध्यभागच्या प्रदेशांत गेला, कोणी नवीं बेटें शोधून काढण्याकरितां अफाट अशा पासिफिक महासागरांत गेला, अशा गोष्टी दरवर्षास प्रत्यक्ष होत आहेत. तेव्हां अशा साहसी पुरुषांचें ठिकाण जें युरो-

पखंड तें हल्लीं संपत्तीचें व विद्येचें भांडार झालें आहे यांत नवल काय ?

वरील गोष्टी, मोठमोठ्या राष्ट्रांची स्थिति एकंदरींत पाहतां झाल्या. पण नुसत्या मनुष्याविषयीं पाहिलें तरी प्रवासापासून केवढे नफे होतात ! सर्वांस अनुभवावरून हें तर ठाऊकच आहे, कीं पुष्कळ फिरलेला मनुष्य प्रवासामुळें मोठा हुशार होतो. त्यानें अनेक प्रकारचे प्रसंग काढलले असतात, हजारों गोष्टी स्वतः पाहिलेल्या असतात, व तशा-च पुष्कळ ऐकिलेल्याही असतात, यामुळें तो मनुष्य हरएक कामांत वाकबगार होतो. हें तर केवळ व्यावहारिक नफे झाले. पण जो तत्ववेत्ता आहे, किंवा तशा प्रकारची केवळ स्फूर्ति ह्मणून ज्याला आहे, सहृदय कवि—कीं ज्यास सर्व सृष्टि चमत्कारमय व आनंदमय भासते,—त्यांस तर देशाट-नापासून मोठे अमूल्य लाभ आहेत. प्राचीन ग्रीक लोकां-तील पुष्कळ मोठमोठ्या विद्वानांनीं पुष्कळ देश हिंडले होते. त्यांचा पहिला जो इतिहासकार हिराडोटस तो एशि-यामैनर, मिसरदेश वगैरे मोठमोठे देश हिंडला होता; व त्या योगानें त्यानें जें ज्ञान संपादलें त्याच्यामुळें तो येवढा विख्यात ग्रंथकार झाला. त्याप्रमाणेंच सोलन, लैकर्गस ह्मणून जे राज्यव्यवस्थापक झाले त्यांनीं देखील आपलें ज्ञानाचें कोठार प्रवासांतच साठविलें. लैकर्गस तर हिंदुस्था-नापर्यंत देखील आला होता असें कितीएक इतिहासकार ह्मणतात. त्याप्रमाणेंच आमच्या हिंदुलोकांतही जे मोठमोठे विद्वान होऊन गेले तेही फार प्रवास केलेले असावे यांत संशय नाहीं. सर्व कवींचा मुकुटमणि जो कालिदास तोही

मोठा प्रवासी होता असें ह्मणतात; व या गोष्टीस हें एक मोठें प्रमाण आहे कीं ज्यावेळीं आतांप्रमाणें नकाशे वगैरे साधनें नव्हतीं, त्यावेळेस त्यानें आपल्या मेघदूत नामक अति सुंदर काव्यांत मेघास जो मार्ग रामागिरीपासून तों थेट अलकापुरी ह्मणजे हिमालयपर्वताचें कैलास शिखर तेथपर्यंत सांगितला आहे, तो अगदीं बेचूक आहे. शिवाय ह्या काव्यामधील पर्वतांचें, नद्यांचें वगैरे जें सर्व वर्णन दिलें आहे, तें तरी, तीं स्थलें कवीनें स्वतः पाहिल्यावांचून इतकें उत्कृष्ट लिहिलें असेल, हें ह्मणणें नीट दिसत नाहीं. अर्वाचीन कालांत जर्मनी देशांत एक हंबोल्ट ह्मणून महापंडित होऊन गेला, हा तर पृथ्वींतील चारी खंडें हिंडला, व ज्या हिमालयपर्वताच्या शिखरांची आह्मांस येथल्या येथें देखील पुरती माहिती नाहीं, त्यावर स्वतः जाऊन त्यानें तेथील सृष्टिचमत्कार आपल्या "कासमस" नांवाच्या प्रख्यात ग्रंथांत लिहून ठेवले आहेत. यावरून त्या पंडिताची जिज्ञासा व प्रवासाविषयींचें साहस हीं स्पष्ट दिसून येतात.

हे गुण प्राचीन हिंदुलोकांत मुळींच नव्हते असें जरी ह्मणतां येत नाहीं, तरी कालांतरीं त्यांचा लोप झाला हें स्पष्ट आहे. भर्तृहरीनें आपल्या एका शतकांत ह्मटलें आहे, कीं "किं सुखमप्रवासगमनं" सुख काय ?-तर प्रवासास न जाणें. आणि हाच अर्वाचीन हिंदुलोकांच्या एकंदर मनाचा रोख दिसतो. यापासून देशाचें किती अहित झालें आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यावर विस्तार करावा असें नाहीं. हल्लीं तर प्रवासाचे श्रम ह्मटले ह्मणजे नाहींसेच झाल्यासारखे झाले आहेत; तरी प्रवासापासून मनावर होणारे जे

सद्विकार ते तरी निदान होण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं. स-द्यां हिंदुस्थानाभर व सर्व पृथ्वीवर हवें तिकडे जाण्यास लोखंडी सडका व आगगाड्या झाल्या आहेत. तर अशी प्रवास करण्याची अत्युत्कृष्ट संधी तरी न गमावतां जे आमचे लोक यापासून आपला नफा करून घेऊं पाहतील त्यांस तो पुष्कळ होण्यासारखा आहे.

---

[शालापत्रक पुस्तक ११ अंक ९; जानेवारी सन १८७२.]

## शिक्षकाचें काम.

अलीकडे या देशांत विद्येचीं साधनें दिवसांदिवस वाढत जाऊन, तिचा चोहोंकडे फैलावा होत चालला आहे, ही गोष्ट मोठ्या आनंदाची आहे. हल्लीं तर जिकडे पाहावें तिकडे नव्या नव्या शाळा स्थापन होताहेत, नवीं नवीं वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें निघूं लागलीं आहेत व अनेक विषयांवर नवे नवे ग्रंथ तयार होताहेत. सुमारें आठ दाहा वर्षांपूर्वीची व आतांची स्थिति ताडून पाहिली तर फार मोठा फरक झालेला दृष्टीस पडतो. विद्यापर्वताच्या शिखरावर चढलें असतां त्यावेळीं लोक आपण मिळवली ह्मणून समजत व आपण माथ्यावर पोचलों ह्मणून मानीत, त्याची तर आत कोणास कांहींच प्रतिष्ठा वाटत नाहींशी झाली आहे. तें आतां एखाद्या लहानशा टेपाडासारखें होऊन, हवें त्यानें जावें असें झालें आहे. ह्या पुढचीं जीं उंच उंच शिखरें त्यां-पर्यंत एकंदरींत पाहातां थोडेच लोक पोचतात हें खरें, पण दिवसांदिवस त्यांचीही मातब्बरी कमीच होत चालली आहे. मोठे कष्ट काढून, कमरा बांधून, लोक तेथपर्यंतही येतच

आहेत. असे विलक्षण चमत्कार कालगतीनें घडून आले आहेत व आजूनही पुढें हाच क्रम कोठवर चालेल याचें अनुमान करणें कठीण दिसतें. असो, याप्रमाणें सकृत् दर्शनीं विद्येचा मोठा फैलाव झालेला दिसतो व विद्येची अभिरुचि लोकांस फार लागली आहे असें वाटतें, पण अंमळ विचार केला असतां कळून येईल कीं ही केवळ व्यर्थ भ्रांति आहे. तो समय केव्हां येईल तो येवो, पण अझून तर खास आला नाहीं. अज्ञान व तज्जन्य दुराचरणप्रीति या रोगानीं पीडिलेल्या लोकांच्या मनांस आरोग्य होऊं लागल्याची देखील चिन्हें दृष्टीस पडत नाहींत. कारण तसें असतें तर ज्ञानामृतसेवनाची इच्छा सहज रीत्या उद्भवून तें त्याकडे मोठ्या लोभानें धावतें; त्यापासून तिरस्कारानें मुरडतें ना; पण अझून तर दुसराच प्रकार नजरेस येत आहे. विद्या शिकावयाची ती केवळ सरकारी चाकरीच्या लोभानेंच लोक शिकतात; तीविषयीं व्यसन तर काय?—पण साधारण आवड देखील बहुतेकांस नसते. जसें शिरावर ओझें वागवावयाचें त्याप्रमाणें विद्याभ्यासाचें मोठें संकट मानून त्यापासून सुटून एकदा मोकळे केव्हां होऊं असें बहुधा सर्वांस होऊन गेलें असतें. सरकाराचा तर येवढा खटाटोप करण्याचा स्तुत्य हेतु असा, कीं तरुण विद्वानांच्या हातीं एकदा विद्याभांडाराच्या किल्ल्या पडल्या ह्मणजे ते तें सर्व भांडार धुंडाळून, आपल्या देशबांधवांस त्यांतील अमूल्य रत्नें अर्पण करतील. पण हा हेतु कोठवर सिद्धीस गेला आहे हें सांगणें नलगे. आपण आपल्या सुदैवानें केवढ्या निधीचे मालक झालों आहों व अंमळ श्रम केले असतां आपणास

होतें यांत नवल तें कोणतें ? पण हल्लीं तर चोहोंकडे ज्ञानाचा व समंजसपणाचा जय होत चालला आहेना ? असें असतांही "पंतोजी" किंवा "स्कूलमास्तर" या शब्दांला पहिल्यापेक्षा विशेष मान आला आहे असें मुळींच वाटत नाहीं. याचें कारण काय असावें बरें ? साधारण दृष्टया असें वाटतें, कीं विद्येचें खरें स्वरूप व खरी योग्यता अझून आमच्या लोकांस चांगली समजूं लागली नाहीं. जर शिक्षकासच आपल्या कामाची थोरवी वाटत नाहीं तर ती विद्यार्थ्यांस व इतरांस तरी कशी वाटावी ? जर शिक्षकाचीच मुळीं अशी समजूत असली कीं, उपाय नाहीं ह्मणून हें काम करावयाचें, बाकी यांत आहे काय ?–तर मग अर्थात मुलेंही तशींच, उपाय नाहीं, घरीं आईबाप बसूं देत नाहींत ह्मणून शाळेंत जावयाचें, असें समजतात. पण जर शिक्षक आपल्या कामाची योग्यता व जबाबदारी पक्केपणीं जाणत असला, व आपणास ज्या विद्याभ्यासानें अशी सुखाची व समाधानाची स्थिति प्राप्त झाली, ती आपल्या विद्यार्थ्यांसही प्राप्त व्हावी ह्मणून जर तो कळकळ बाळगीत असला, तर सहजच त्यांच्या मनांत त्यांजविषयीं पुज्यबुद्धि उत्पन्न होईल, व विद्येंत खरें सुख व खरी प्रतिष्ठा आहे असें तींही समजूं लागतील. पण हेंच मुख्य आमच्या शिक्षकांच्या अंगीं कमी असतें; ह्मणूनच केवळ पोकळ पांडित्य करणें व चोहोंकडे शेखी मिरविणें हेंच काय तें विद्येचें फळ अशी आमच्या नवीन विद्वानांची समजूत सामान्यतः झालेली दिसते. कोणत्याही गोष्टीची खरी योग्यता व खरा उपयोग सुज्ञ लोकांवांचून इतरांस कळत नसतोच. विद्या काय, धन

काय, बल काय, सर्वांची हीच गोष्ट होय. अज्ञ व उद्दाम मनुष्य जर दैववशात् धनवान झाला, तर त्याचा सद्व्यय त्याच्या हातून कधींही होणें नाहीं. तो लागलाच मदोन्मत्त होऊन कोणास विचारीनासा होईल, अनान्वित कर्मे करूं लागेल. तसेंच ज्यांस ईश्वरकृपेनें शरीर सामर्थ्य चांगलें आहे पण ज्ञान ह्मणून काडीमात्र नाहीं, तोही आपल्या बलाचा विनियोग दुसऱ्यास पीडा देण्यांतच करील, त्याशिवाय कोठेंही करणार नाहीं. या शेवटल्या गोष्टीविषयींचीं उदाहरणें, तैमुरलंग, झेंजिसखान इत्यादि मानव जातींत जे साक्षात् राक्षस उत्पन्न झाले त्यांचीं, इतिहासांत पुष्कळ आहेत. एका संकृत कवीनें ह्मटलें आहे,

विद्या विवादाय धनं मदाय,
शक्तिः परेषां परिपीडनाय ।
खलस्य साधो र्विपरीतमेतत्,
ज्ञानाय दानाय च रक्षणाय ॥

या श्लोकांत कवीनें विद्येचा खरा व थोर उपयोग सांगितला आहे; तो कोणता ?—तर ज्ञान. विवाद ह्मणजे गर्वानें फुगून जाऊन ज्याशीं त्याशीं वाद करणें हा नव्हे.

प्राचीनकाळाशीं ताडून पाहतां अर्वाचीनकाळीं विद्या फार वाढली हें खरें आहे, पण त्यावेळचें विद्येचें माहात्म्य अलीकडे पुष्कळअंशीं कमी झालें आहे, यांत अगदीं संशय नाहीं. असें होण्याचीं कारणें पाहूं गेलें असतां अनेक आहेत. त्यांतील मुख्य कारण, आपण ज्यास हल्लींची सुधारणा ह्मणतों तें होय. हें ह्मणणें पुष्कळांस असमंजस व विरोधग्रस्त वाटेल. पण वस्तुतः पाहिलें तर असेंच आहे. हल्लीं

सर्व देशांत सुधारणा झाल्यामुळें परस्परांचें दळणवळण वाढलें, त्यामुळें व्यापारही अतिशय वाढून संपत्ति व उपभोगाचे पदार्थ यांची एकंदरीनें पाहतां फारच समृद्धि झाली. आतां हें प्रत्यक्ष अनुभवावरून सर्वांस माहीत आहेच कीं, लहानपणीं मुलांची जिज्ञासा जशी जागृत असते व ती तृप्त झाली असतां जसा उद्दाम हर्ष होतो, तसें मनुष्य मोठा झाल्यावर त्यास कांहींच होत नाहीं. व येवढ्याकरितां मुलांस लहानपणीं विद्याभ्यासास लावावें लागतें. मुलांस लहानपणीं ज्ञानाची अभिरुचि अत्युत्कट असते, व त्यांस जे शिकवावें तें तीं मोठ्या हौसेनें शिकतात. विद्येपासून आपणांस पुढें पैसा मिळेल वगैरे जे क्षुद्र विचार ते कधीं त्यांच्या मनांत चुकून देखील येत नाहींत; कारण नव्या नव्या गोष्टी समजल्यापासून जो त्यांस आनंद होतो त्यांतच तीं अगदीं गर्क होऊन जातात, व शिकण्यास जे श्रम लागतात त्यांचें साफल्य तो आनंदच करतो, तें करण्यास त्याशिवाय इतर कांहींही लागत नाहीं. पण ज्ञानाचा सहज प्रवेश होण्यास अत्यंत अनुकूल जी ही उत्कृष्ट मनाची स्थिति ती पुढेंही तशीच राहत नाहीं. मनुष्य मोठा होऊं लागला ह्मणजे जगाचा व त्याचा संबंध अधिकाधिक निकट होऊं लागतो व त्याबरोबर हळू हळू वर सांगितलेले मनाचे उत्कृष्ट गुण व लहानपणची कोंवळी बुद्धि ह्या दोहोंचा ऱ्हास होऊं लागतो. असें होतां होतां व शेवटीं शारीर उपभोगाची मनुष्यास एकदां चटक लागली ह्मणजे विद्याभ्यासापासून होणारें जें काल्पनिक सुख तें त्यास भासवत वाटूं लागतें. त्या विषयींचा त्याचा पूर्वींचा जो हव्यास तो

आतां अगदीं नाहींसा होऊन तो त्या अप्रतिम सुखाचा अव्हेर करतो. याप्रमाणें प्रकार मनुष्यांत दृष्टीस पडतो; व हीच गोष्ट राष्ट्रास व एकंदर सर्व जगासही अगदीं बरोबर लागू पडते. पहा कीं जेव्हां एखादें राष्ट्र ज्ञानसंपन्न होऊं लागतें व त्यास विद्येची अभिरुचि अधिकाधिक लागते त्यावेळेस तें हजारों अडचणी मागें सारून आपला हेतु सिद्धीस नेतें. जेव्हां ग्रीक लोकांत प्रथमतः ज्ञानाची उत्कंठा वाढत चालली व त्याची योग्यता कळूं लागली, तेव्हां त्या देशांतील पंडित देशोदेशीं हिंडूं लागले, व त्यामुळें त्यांस जगाचा अत्युत्कृष्ट अनुभव, व तत्वज्ञानाच्या वगैरे पुष्कळ गोष्टी समजल्या. पुढें त्या पंडितांनीं स्वस्वमतप्रतिपादक अशा अनेक विद्याशाखा स्थापिल्या. नंतर त्यांस जे शिष्य मिळाले ते तरी तसेच विद्येचे एकनिष्ठ उपासक होते. त्यांनीं दूर दूरच्या देशांहून घरें दारें सोडून वर्षेच्या वर्षे त्याजपाशीं रहावें. अरिस्टाटल नामक जो शिकंदर बादशाहाचा अति विख्यात गुरु तत्ववेत्ता होऊन गेला, तो विद्याभ्यास करण्याकरितां आपलें गांव सोडून, कित्येक कोस दूर असें जें अथेन्स शहर तेथें येऊन प्लेटोच्या विद्यालयांत राहिला होता. युक्लिड जो प्रख्यात भूमितिशास्त्रप्रवर्तक तो मेगारा प्रांतांत रहात असे. व त्या राष्ट्राची व अथेनियन लोकांची चुरस असल्यामुळें असा ठराव झाला होता कीं, जर एका संस्थानांतील मनुष्य दुसऱ्या संस्थानांत आढळला तर त्यास जिवें मारावें. पण असा भयंकर प्रतिबंध असतांही युक्लिड हा रात्र पडतांच बायकोचा वेष करून आपला गुरु जो साक्रेटीस याचेकडे प्रतिदिवशीं जात असे व उजेडण्याचा समय

येतो आहे तों पुनः आपल्या संस्थानांत परत जाई. रोमन लोकांतही अशीं उदाहरणें कमी आहेत असें नाहीं. त्यांचा विख्यात वक्ता जो सिसरो तो केवळ ग्रीक विद्या शिकण्याकरितां बारा वर्षें ग्रीस देशांत राहिला होता, व वक्तृत्वाचीं जीं प्रख्यात विद्यालयें होड्सवेट वगैरे ठिकाणीं होतीं तेथेंही तो जाऊन आला. रोमन प्रजासत्ताकराज्याचा अतिशय अभिमान बाळगणारा जो केटो तो वृद्ध होईपर्यंत ग्रीक विद्यांचा व सुधारणेचा अतिशय तिरस्कार करीत असे; पण शेवटीं त्याच्या विलक्षण हेकटपणावर ज्ञानाभिरूचीचा जय होऊन वयाच्या साठाव्या वर्षीं ग्रीक विद्येचा त्यास अतोनात छंद लागला. याप्रमाणें प्रत्येक राष्ट्रांतील हजारों उदाहरणें देतां येतील. आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाचा कांहींच थांग लागत नाहीं, तरी फार प्राचीनकाळीं हिंदुस्थान हें सर्व विद्येचें माहेर होतें ही गोष्ट सर्व इतिहासकार कबूल करितात. व्याकरण, न्याय, जोतिष इत्यादि शास्त्रांचा ज्यावेळीं या देशांत उत्कर्ष झाला व कविता ही मोठ्या प्रौढ दशेस आली त्यावेळीं आपल्या लोकांत विद्या केवळ साक्षात् अवतरलीच होती असें ह्मणण्यास चिंता नाहीं. इसवी शकाचे पूर्वीं सुमारें ३२५ वर्षांपूर्वीं जेव्हां शिकंदरबादशहा हिंदुस्थानावर चाल करून आला होता, तेव्हां येथील विद्वानांचें चातुर्य पाहून तो फार चकित झाला, व त्यानें कित्येकांस येथून आपणाबरोबर नेलें. त्यांस ग्रीकलोक “ जिम्नीसोफिस्त ” ह्मणत. या इतिहासप्रसिद्ध गोष्टीवरून त्यावेळची हिंदुस्थानाची स्थिति लक्षांत येते. व भारतादि ग्रंथांवरून

पाहतांही आपणास कळतें कीं, प्राचीन काळीं या देशांतील लोकांस विद्येची अभिरुचि फार होती. राजपुत्र देखील गुरूच्या घरीं सेवकाप्रमाणें कित्येक वर्षें राहून विद्याभ्यास करीत, व विद्या पूर्ण झाल्यानंतर राजपुत्रास राज्याभिषेक होत असे. ब्राह्मणाच्या मुलांची विद्या तर बारा वर्षें गुरूनां जवळ राहिल्यावांचून होतच नसे. असो; या सर्व गोष्टींवरून स्पष्ट दिसतें कीं, राष्ट्रें विद्यासंपन्न होऊं लागलीं ह्मणजे आरंभीं त्यांस विद्येचा मोठा हव्यास असतो. पण त्याच राष्ट्रांचा पुढचा इतिहास पाहूं लागावें तों ती ज्ञानप्राप्तीची, उत्कंठा हळूहळू कमी होऊं लागते, व शेवटीं विद्येचा अगदीं लय झाल्यासारखा होतो. या विद्येच्या व्हासास मुख्य कारण ह्मटलें तर व्यापाराची वृद्धि होऊन ऐषआरामाची जी वृद्धि होऊं लागते ती होय; कारण तीमुळें मनुष्याचे विचार तत्वज्ञानापासून निघून जगांतील व्यवहारांकडे लागतात. आतां हे सर्व प्रकार ज्या अर्थीं सर्व राष्ट्रांत घडून येतात त्या अर्थीं एकंदर जगाच्या मानानें पाहतांही वर जें ह्मटलें आहे तेंच लागू पडतें.

येथवर पहिलें कारण जी हल्लींची सुधारणा त्याविषयीं विचार झाला. विद्येचें माहात्म्य कमी होण्याचें दुसरें कारण, तिचा जो हल्लीं फारच फैलाव झाला आहे, तो होय. कोणत्याही वस्तूचा प्रचार जोंपर्यंत नियमित असतो तोंपर्यंत तिची मातब्बरी लोकांत विशेष असते. याप्रमाणें प्राचीन काळीं युरोपांत अथेन्स, रोम, व्होड्स वगैरे ठिकाणींच काय तीं विद्यालयें असत. आतांसारख्या त्यावेळे विद्याभ्यासाच्या सोयी मुळींच नसल्यामुळें ज्यास विद्यासपा

करावयाचें त्यांस बहुधा सर्व आयुष्य तिकडेच घालवावें जेव्हां लागत असे, त्यावेळेस विद्येस अतिशय मान असे. पण आतां तसें आहे काय? कागदाची कृति व छापण्याची कला ही अलीकडे माहीत झाल्यामुळें पुस्तकांचें जें मागें दारिद्र्य असे तें तर आतां अगदीं नाहींसें होऊन गेलेंच, पण आणखी असेंही झालें कीं, जिकडे तिकडे ग्रंथांचा जसा काय सुकाळ होऊन गेला आहे. शिवाय दुसऱ्याही हजारों सोयी हल्लीं नवीनच झाल्यामुळें, विद्यासंपादन हें अगदीं सहज होण्यासारखें झालें आहे. त्यामुळें जो पाहावा तो विद्वान असें सामान्यतः दृष्टीस पडतें. कौले ह्मणून एक प्रख्यात इंग्लीश कवि होऊन गेला त्यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं "जी विद्या मागें कुमारिका असे व जिला अनेक वर वरायास पाहत असत, ती आतां वेश्येप्रमाणें घरोघरीं व दारोदारीं झाली आहे." आतां हें खरें आहे कीं विद्येची खरी योग्यता तिच्या प्रचारावर नाहीं, व तिजपासून होणारें जें अप्रतिम सुख तें तिच्या उपासकांस नेहेमी होणारच आहे; परंतु लोकदृष्ट्या तरी तिचें माहात्म्य कमी होतें यांत संशय नाहीं. विद्येचे अत्यंत रसज्ञ कोणत्याही काळीं पाहिले तरी थोडेच असतात. कारण कोठेंही पाहिलें तरी प्रायः बुद्धीचें मांद्यच फार दृष्टीस पडतें; विशाल व सूक्ष्म बुद्धीचे पुरुष फारच विरळा; त्यांतूनही तशा पुरुषास आळस, व्यसनें वगैरे अगदीं उपयोगाचीं नाहींत; कारण हीं असल्यास त्याची बुद्धि केवळ पंगूसारखी मात्र होईल. शिवाय अशा पुरुषाचे गुण जेणेंकरून परिपक्व दशेस पावतील अशा अनकूल स्थितीचें त्यास साहित्यही पाहिजे.

कारण तसें नसल्यास त्याचे गुण आपल्या ठायींच मुरू जाऊन, त्यांचा विकास कधींच होणार नाहीं. तेव्हां असे कपिलाषष्ठीचे योग एकत्र जमून येणें ह्मणजे क्वचितच असो; याप्रमाणें विद्येचें स्वरूप वस्तुतः जाणणारे फार थोड असतात. व त्यांच्या दृष्टीनें विद्येचा थोरपणा कधींही कमी होत नाहीं. पण बाकीचें जें अज्ञानग्रस्त जग त्यास विद्येची खरी थोरवी कशानें समजणार ? तें विद्येस मान तर देते खरें; पग सोनें, रुपें, रत्नें इत्यादि जड द्रव्याप्रमाणेंच तीस मानून तिच्या केवळ प्रचारावरूनच थोरपणा लेखितें. त्या वरून पहातां हल्लींचा अतिशय फैलाव विद्येचें माहात्म्य बरेंच कमी होण्यास कारणभूत झाला हें स्पष्ट आहे.

पण या दोहों कारणांपेक्षां एक मोठें कारण सांगावयाचें राहीलें आहे; व त्याचा प्रस्तुतच्या विषयाशीं विशेष संबंध आहे. तें हें कीं, पूर्वींच्या विद्वानांची आपल्या विद्यार्थ्यां-विषयींची आस्था व शिकविण्याविषयीं प्रीतियुक्त उत्साह हीं आतां कोठेंही फारशीं दृष्टीस पडत नाहींत. प्राचीन काळ जे महापंडित होऊन गेले त्यांचा शिष्यपरिवार बहुधा मोठा असे, व परस्परांची भक्तिही केवळ अप्रतीम असे. ग्रीक, रोमन वगैरे ग्रंथकारांनीं जें साक्रेतिसाचें चरित्र लिहिलें आहे त्यांत त्या लोकोत्तर पंडिताची आपल्या शिष्यांवर किती ममता होती, व अथेन्स शहरांतील मुलें त्याच्या भाषणाच्या अपूर्व-रसानें लोभावून जाऊन सदा सर्वकाळ त्यास कशीं चिकटून असत, आपल्या गुरूसारखा ज्ञानी सर्व जगांत कोणी नाहीं-असा त्यांस केवढा अभिमान असे, व त्याच्या अंतकाळी अतिशय दुःख होऊन सर्वजण किती हळहळले, इत्यादि गोष्टीं-

या जें त्यांनीं वर्णन केलें आहे तें वाचून कोणाचें अंतःकरण ...वत नाहीं ! साक्रेतिसाच्या पुढेंही जे अति विख्यात विद्वान ...ाले त्या सर्वांसही तीच गोष्ट लागू होती. डन्स स्कोटस ...णून एक महापंडित ख्रिस्ती शकाच्या चवदाव्या शत... ...ंत होऊन गेला, त्याचें वक्तृत्व व विद्वत्ता हीं इतकीं होतीं ...कीं त्यांचा लौकिक ऐकून तीस हजार विद्यार्थी त्यापाशीं ...ऊन राहिले होते !

याप्रमाणें वरील गोष्टीच्या दाखल्यास पुष्कळ उदाहरणें ...तां येतील. बरें, पण अलिकडील शिक्षकांची व विद्यार्थ्यां... ...ी स्थिति पाहिली, तर वर सांगितल्यासारखा प्रकार कां... ...ंच दृष्टीस पडत नाहीं याचें कारण काय बरें असावें ? ...णी कदाचित् ह्मणतील कीं, त्यावेळची व आतांची स्थिति ...र भिन्न आहे, तेव्हां त्या गोष्टी आतां होणें अशक्य होय. ...ग हें ह्मणणें अगदीं सयुक्तिक दिसत नाहीं. कारण हजारों ...तर गोष्टींत जरी जगाची स्थिति एकंदर बदलली आहे ...री शिष्यशिक्षकांचा संबंध वस्तुतः बदलला ह्मणतां येत ...हीं, व कधींही बदलणार नाहीं. उलटें विद्या फार वाढ... ...ल्यामुळें अलिकडे तो संबंध विशेष दृढ झाला आहे, ...सें ह्मटलें पाहिजे. यास्तव केवळ स्थित्यंतरासच दोष ...ऊन चालणार नाहीं; त्याशिवाय दुसरीं कारणें कोणतीं आहेत तीं पाहिलीं पाहिजेत. त्यावेळचे पंडित विद्येस साक्षात् देवतेप्रमाणें मानीत असत, व आतांचा भ्रष्टाकार जर यांस दिसता तर त्यांच्या अंगावर कांटा उभा राहिला असता. त्या वेळेस 'सोफिस्त' ह्मणून जे लोक असत ते पैसा घेऊन आपलें पांडित्य लोकांस शिकवीत, यास्तव साक्रेटि-

सासारखे केवळ परोपकारार्थ विद्या दान करणारे पंडित त्यांस हलकट मानीत. आणि हीच थोर समजूत अलिकडच्या कालापर्यंत चोहोंकडे होती. पण हल्लीं ती समजूत अगदीं नाहींशी झाल्यासारखी दिसते. विद्या ह्मणजे पैसा मिळविण्याचें एक साधन ह्मणूनच अगोदर संपादन केलेली असते, मग अर्थातच जो जास्त देऊं करील त्यासच तिचा विक्रय करावयाचा. याप्रमाणें पूर्वींची निःस्पृहता हल्लींच्या काळांत अगदीं नाहींशी झाली आहे, व अमूल्य जें ज्ञान त्याचा केवळ विक्रय करणें, कीं जें प्राचीन काळचे पंडित महापातक मानीत, तें आतां कोणासही बहुधा लज्जास्पद वाटत नाहीं. असो, अशी त्याकाळची स्थिति असे तेव्हां अर्थातच गुरुविषयीं शिष्यांची अतिशय पूज्यबुद्धि असे. दुसरें असें होतें कीं, ज्यास विद्येचा स्वभावतःच अतोनात नाद असे तेच कायते विद्वान होत; कारण त्यावेळेस विद्या संपादन करण्यास किती अडचणी होत्या हें मागें सांगितलेंच आहे. ज्या आमच्या नवीन विद्वानांस पांच सहा वर्षें विद्यालयांत घालवावयाचीं ह्मणजे दुर्घट संकट होतें त्यांचा तशाकाळीं निभाव लागण्याची गोष्ट कशास पाहिजे? ज्यास ज्ञानप्राप्तीविषयीं केवळ छंदच, त्या उद्योगाशिवाय ज्यांस चैनच पडावयाचें नाहीं, अशाच प्रकारचे गुरु व शिष्य त्या काळीं असत. हल्लींहि विद्येचे निःसीम भक्त पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ सांपडतील. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, वगैरे विद्यासंपन्न देशांत व आपल्या हिंदुस्थानांत देखील कोठें कोठें तसे आहेत. डाक्तर हौग साहेब—जो हल्लींचा विख्यात इतिहासज्ञ व भाषाशास्त्रवेत्ता व जो नुकताच

या देशांतून आपल्या देशीं निघून गेला,-त्यास नुसता रस्त्यानें जातांना ज्यानीं पाहिलें असेल त्यांस वर जें ह्मटलें आहे त्याचा उत्कृष्ट प्रत्यय आला असेल.तर तसे शिक्षक व शिष्य असल्यास त्यांची परस्परांवर भक्ति कां बसणार नाहीं ? हल्लीं तसें कांहींच नाहीं. गुरुशिष्यांचा संबंध फारच नियमित असतो, व असतो तोही बहुधा उभयपक्षीं केवळ स्वार्थाचा असतो. शिवाय शिकविण्याचे विषय तेही तसेच बांधलेले, त्यांच्या पलकिडे शिक्षकानें कधींही जातां कामा नये. प्राचीन काळीं धर्म, नीति, लोकव्यवहार इत्यादि अत्यंत महत्वाच्या विषयांवर नेहमीं व्याख्यानें देऊन शिक्षक आपल्या शिष्यांस स्वदेशाचे अधिकार दक्षतेनें चालविण्यास तरबेज करून ठेवीत व ह्मणूनच पेरीक्लीज, आल्कीबैडीज, शिकंदरबादशाहा वगैरे पुरुषांनीं आपआपल्या देशाच्या उपयोगीं पडून अक्षय कीर्ति मिळविली. पण हल्लींची शिक्षणपद्धति स्थापणारांनीं तर असा बेतच करून टाकला आहे कीं, वर सांगितलेल्या धर्म, नीति इत्यादिकांचें नवीन विद्वानांस वारें देखील लागूं नये. त्यांतून धर्माची गोष्ट बोलायासच नको. ह्या विषयावर विचार करणें किंवा शिक्षण घेणें तें एखाद्या खुळ्या मनुष्यानें हवें तर करावें, तें एकोणिसाव्या शतकाच्या मनुष्यास व त्यांतून युनिवर्सिटीचे मोठे मोठे किताब घेतलेल्या मनुष्यास तर अत्यंत लांछनास्पद होय ! बरें नीतीविषयीं पाहिलें तर त्या विषयावर शिक्षण देण्याची अगदींच गरज नाहीं; कारण अशा शिक्षणाची अवश्यकता आहे असें ह्मणणें हेंच मुळीं मानवी स्वभावाला शुद्ध बट्टा लावणें आहे. तिसरा लोकव्यवहार; तो तर

त्वा तो करतो, व मागच्या अडाणी मराठी राज्य देखील लोक करित होते; अज्ञान नष्ट करून ज्यांच्या मनांत ज्ञानाचा उजेड फांकविला अशा इंग्लिश भाषा शि कलेल्या विद्वानांस काय तो शिकावयास पाहिजे ? तो त त्यांच्या हातांचा मळ आहे. असो, याप्रमाणेंच सध्यांच्या लोकशिक्षणाधिकाऱ्यांचे उद्देश आहेत कीं नाहींत हें स्प सांगतां येत नाहीं; परंतु अलिकडील पद्धतीचीं जीं फळे दृष्टीस पडत आहेत त्यांवरून पाहातां इतकें तरी ह्मण भाग येतें कीं, ही पद्धति अगदीं निर्दोष व उत्कृष्ट अ कोणीही ह्मणणार नाहीं. युनिवर्सिटीचा संस्कार होऊन जे लोक बाहेर निघतात ते आपल्या कामास बहुतेक तरी ला यक असतात असें ह्मणणें कठीण आहे. त्यांस जगांत कों वागावें वगैरे गोष्टींचा अनुभव तर मुळींच नसतो ह्मटला त चालेल; बाकी त्यांची नीति पाहिली तर येवढ्याशा थोड्या लोकांतही दुराचरणाची अशीं अशीं प्रसिद्ध उदाहरणें आहेत कीं त्यांचा उच्चार करण्यास शरम वाटते. बरें इतका खटाटोप करून जें विद्यारूप लेणें त्यांच्या गळ्यांत बांध तात, त्यांचा तरी त्यास कांहीं उपयोग होतो काय ? किती कांस होत असेल कोण जाणे ? पदार्थविज्ञानांत अस नियम आहे कीं, जे पदार्थ फार लवकर उष्णता घेतात त्यांची ती टाकण्याविषयींही जलदी तर्शी असते. हीच गोष्ट यांतील बहुतेकांस लागू पडते. ज्याप्रमाणें पराभर पाठांतर करून विषयावर विषय अशी गर्दी पहिल्यानें केली असते, त्याचप्रमाणें त्या गर्दीचा इष्ट हेतु एकदा सा धल्यावर त्यांच्यावर पाणी पडत जातें. असें होतां होतां

शेवटीं इंग्लिश भाषेचें ज्ञान मात्र जेम तेम करून तगून राहिलें असतें. ज्याप्रमाणें भटींत घालून तापविलेलें लोखंड थोडच्याच वेळांत उघडच्या हवेंत निवून जातें व पुनः तापविलें होतें कीं नव्हतें असें होऊन जातें, त्याप्रमाणेंच यांचीही अवस्था होते. याप्रमाणें शिक्षकांच्या तऱ्हेवाईक शिक्षणाच्या योगानें शिक्षणाचा मूळचा उद्देश कोणताच सिद्धीस जात नाहीं. पण जर हेंच शिकलगार लोखंड तापत असतां, भाता पुढेंही तसाच सतत चालू राहण्याची तजवीज ठेवितील ह्मणजे शिक्षण देत असतांच जर शिक्षक शिष्यांच्या मनांत विद्येची खरी थोरवी भरवून देऊन व तिच्या अभ्यासानें होणाऱ्या अनिर्वाच्य सुखाची त्यांस चट लावून तिजविषयीं त्याचें ठायीं उद्दाम उत्साह उत्पन्न करतील, तर जाळ तसाच पेटलेला राहून तें लोखंड आतांप्रमाणें पुनः निवून न जातां तसेंच तापत राहील. मग काळेंकरून तें खासें पोलाद बनेल. तें असें कीं, त्याच्या तलवारीच्या लकाकीसरसा अज्ञानरूप अंधकार नाहींसा होऊन, फार दिवस बिऱ्हाड करून ज्या अरिष्टरूप राक्षसांनीं या देशास जेरीस आणिलें त्यांचें त्या निर्दाळण करतील व तेणेंकरून त्यांचें व त्यांच्या कारागिरांचें दिव्य यश या भूमंडलावर मिरवेल !

आतां शिक्षकाच्या कामाचें महत्व, त्यापासून उभयपक्षीं ह्मणजे शिक्षकास व शिष्यास जे नफे होतात ते इत्यादि गोष्टींचा विचार करून हा विषय पुरा करूं. शिक्षकाच्या कामाच्या महत्वाविषयीं वर बरेंच लिहिलें आहे, तथापि कांहीं मुख्य मुख्य गोष्टी सांगावयाच्या राहिल्याच आहेत. त्या ह्या कीं, मनुष्याचें मन लहानपणीं फार कोवळें असतें.

यास्तव त्यावर जे बरे वाईट विकार व्हावयाचे त्यांस त्यावेळेस फारच जपावें लागतें; कारण तेच विकार पुढें बळावून, त्यांच्यावरच, त्या मनुष्याचें पुढें जें कल्याण अकल्याण व्हावयाचें, तें अवलंबून असतें. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं शिक्षकाचे स्वाधीन जीं मुलें विद्याभ्यासाकरितां केलीं असतात तींच पुढें मोठीं झाल्यावर देशाच्या हितास किंवा अनिष्टास पुष्कळ अंशीं कारण होतात. ह्मणून आपणावर केवढी मोठी जबाबदारी आहे हें शिक्षकांनीं सदासर्वकाळ ध्यानांत ठेवलें पाहिजे. आतां शिक्षणापासून शिक्षकांस व शिष्यांस कोणते नफे आहेत तेही बहुधा सर्वांस माहीत आहेतच; त्यांवर फार विस्तार करायास पाहिजे असें नाहीं. शिष्यांस जे नफे आहेत ते तर उघडच आहेत. मनुष्य कितीही बुद्धिवान असला तरी त्यास पहिल्यानें तरी शिक्षकाची गरज लागतेच. व शिवाय मनुष्यानें केवळ पुस्तकांवरूनच अभ्यास करण्यापेक्षां शिक्षकापाशीं शिकणें हेंच पुष्कळ अंशीं बरें. कारण नुस्तें पुस्तक वाचून त्याचा अर्थ मनावर तितका ठसत नाहीं. व शिवाय पुस्तकच यथास्थित समजून घेण्यास बहुधा चांगल्या शिक्षकावाचून चालतच नाहीं. पुस्तकावरून ज्यानें विद्याभ्यास केला असेल त्याच्या मनांत पुष्कळ खोटीं मतें व भलतेच हेकट ग्रह भरण्याचा संभव आहे. कारण त्याचा अनन्यभाव काय तो त्या पुस्तकावर. यास्तव तसें होऊं न देण्यासही शिक्षकाची फारच आवश्यकता आहे. आतां शिक्षकास जे स्वतः नफे होतात असेही पुष्कळ प्रकारचे आहेत. एका कवीनें ह्मटलें आहे.—

अपूर्वः कोऽपि कोशोऽयं विद्यते तव भारति ।
व्ययतो वृद्धिमायाति क्षयमायाति संचयात् ॥

ह्मणजे "हे सरस्वति, तुझा कोश फारच विचित्र आहे कारण त्याचा जों जों खर्च करावा तों तों तो उलटा वाढतच जातो, व जों जों राखून ठेवावा तों तों तो कमी होत जातो." याचा अनुभव बहुधा सर्वांस आहेच, व ज्यांनीं शिक्षणाचें काम केलें असेल त्यांस तर विशेषच असेल. कोणतीही गोष्ट आपणास समजलीशी जेव्हां वाटते तेव्हां ती नुस्ती आपल्या बुद्धीच्या आटोक्यांत मात्र आलेली असते. पण तीविषयींच कांहीं वेळ विचार केल्यावर आपणांस पुष्कळदा वाटतें कीं, ती गोष्ट आपणांस यथास्थित समजली नाहीं. मग तीविषयीं आपण आणखी बारकाईनें विचार करतों तेव्हां कदाचित् ती समजते. परंतु तीच गोष्ट जर अपणास विद्यार्थ्यांच्या मनांत भरवून द्यावयाची असली तर मग तिची अतिशय फोड व्हावीच लागते, कारण एरवीं ती विद्यार्थ्यांच्या मनांत ठसावयाचीच नाहीं. या प्रमाणें आपलें जें मूळचें ज्ञान असतें तें शिकविल्याच्या योगानें अधिक स्पष्ट व दृढ होतें, व ज्या कल्पना आपल्या मनांत पूर्वीं कधींही आलेल्या देखील नाहींत त्या अशा वेळीं येतात. त्यांतूनही जर विद्यार्थी सूक्ष्म बुद्धीचे असले तर मग प्रसंगविशेषीं त्याच्या बुद्धीच्या साहायानें अगदीं नवीन गोष्टीही कधीं कधीं उदयास येतात. असो, याशिवाय शिक्षकास दुसरा नफा असा होतो कीं, त्यास मानवी मनाचे व्यापार कसकसे चालतात, ह्मणजे, ज्या कल्पना मोठ्या वयांत मोठ्या मनुष्यांच्या असतात त्यांस मूळभूत अशा लहानपणच्या कल्पना कशा असतात, त्यांत कालेंकरून कसा फेरफार होत जातो, हें समजतें. अशी मनाची स्थिति

जाणणें हें शिक्षकास तर फारच उपयोगी आहे, कारण त्याचें काम ज्ञानाचा प्रवेश कोणत्या रीतीनें फार सुलभ होईल हें जाणणें होय. हेंच ज्ञान वक्त्यांसही तसेंच अत्यंत उपयोगी आहे. कां कीं, श्रोत्यांच्या समजुती व विचार कसे आहेत, हें तर त्यास अगोदर माहीत असलेंच पाहिजे. वर जसे शिक्षकास होणारे नफे सांगितले, तसेंच या कामापासून त्यास अत्यंत कौतुक व समाधान हींही होतात. कौतुक असें आहे कीं, ज्या बाल्यावस्थेंत त्यानें विद्येचें बीज आपल्या मनांत लावलें कीं, ज्याचीं उत्तम फळें तो आतां भोगीत आहे व जो आयुष्यांतला विलक्षण सुखाचा काळ त्यास विद्याभ्यासानें तर फारच रमणीय वाटला, त्याचे त्यास वरचेवर स्मरण होऊन त्याचे गेलेले दिवस तो जसे काय पुनः अनुभवूंच लागतो, व येणेंकरून त्याच्या मनास मोठ्या मौजेची विश्रांति होते. आणि त्यास समाधान होतें, तें असें कीं, जगाचे हजारों कुमार्ग मनुष्यास दुःखांत पाडण्यास तयार असतां ज्या अत्युत्कृष्ट व थोर विद्यामार्गानें त्यानें आपलें आयुष्य घालविलें व घालवीत आहे, त्याच मार्गास इतक्या विद्यार्थ्यांस लावणें हें माझ्या स्वाधीन आहे असा मनांत उत्साह बाळगून तो आपल्या श्लाघ्य उद्योगांत यत्किंचितही आळस करीत नाहीं.

---

[ शालापत्रक, पुस्तक ११; अंक १०. फेब्रुवारी १८७२ इसवी. ]

# कविता.

वरंतु कतिचिद्धठस्खफछठेति वर्णच्छटान्
घटः पट इतीतरे पटु रटंतु वाक्याटवान् ।
वयं बकुलमंजरीगलदलीनमाध्वीझरी-
धुरीणगणरीतिभिर्भणतिभिः प्रमोदामहे ॥

कवि म्हणतो, "जे कोणी खफछठ इत्यादि सूत्रपाठांची उरस्फोड करून घोष घेणार असतील ते घेवोत; व तसेंच घटः पटः इत्यादि वाक्यांत निपुण होऊन ज्यांस आपलें पांडित्य मिरवायाचें असेल, ते तसेंही करोत; पण आह्मी तर बकुल पुष्पांपासून गळणाऱ्या दाट मधुधारेप्रमाणें ज्यांची रसभरित रचना आहे अशा कवितांचें सेवन करून आनंद पावतों." हा कवीचा अभिप्राय जरी अंमळ एकपक्षी आहे तरी त्यांत तथ्य पुष्कळ आहे; कारण कवितेचा रसानुभव जसा सर्वांनीं सहज घेण्याजोगा असतो तसा, व्याकरण, न्याय, इत्यादि शास्त्रांचा नसतो. एक तर कविता प्रायः छंदोबद्ध असते; त्यामुळें वाचणाराचें किंवा ऐकणाराचें मन तत्क्षणीं मोहून जाऊन तल्लीन होतें. हा गुण कवितेंत इतका असतो कीं, तिजपासून मनोरंजन होण्यास अर्थ समजण्याची देखील कधीं कधीं गरज लागत नाहीं; केवळ वर्णरचनाच कानास गोड लागून मनास आल्हादप्रद होते. शिवाय, कवितेचा विषयही मनांत भरण्यासारखा व अगदीं सुबोध असतो; कारण संसारांत प्रत्यक्ष अनुभाविलेल्या गोष्टी, व त्यांचे मनावर कसकसे व्यापार घडतात, हाच तो विषय बहुधा असतो. परंतु शास्त्राची गोष्ट तशी मुळींच नसते.

तें नेहेमी गद्यरूपानेंच लिहिलें असतें; व त्यांतील विषय तर अत्यंत दुर्बोध असतो. तो असा कीं, तो समजून घेण्यास देखील शिक्षकाची गरज लागते; मग त्यांत सर्वत्र गति होऊन त्याचा रसानुभव घेणें या गोष्टी तर दूरच राहिल्या. त्या सिद्ध होण्यास फार काळ लागतो, व बुद्धिही सूक्ष्म असावी लागते. शास्त्रीय विषय यथास्थित समजण्यास व त्यांची गोडी लागण्यास बुद्धि ह्मणजे सत्यासत्य-विवेचक शक्ति हीच मुख्यतः लागते; पण ही मनुष्यांत फार विरळा असते, व त्यामुळें तसले विषय सामान्य मनुष्यांस गहन वाटून त्यांपासून त्यांचें मन फिरतें. परंतु कविता समजण्यास मुख्यतः कल्पकपणाच काय तो लागतो. आतां हाही गुण जरी सर्वांत पूर्णपणें नसतो तरी कांहींना कांहीं तरी असतोच, व अल्पवयांत तर तो सर्वांस असतो; तेव्हां अर्थातच कवितेची गोडी सर्वांस असते; व विशेषतः तरुणवयांत पुष्कळांस तिचाच छंद असतो. आतां हें खरें आहे कीं, वर जी व्याकरण व न्याय या शास्त्रांविषयीं गोष्ट सांगितली ती सर्व शास्त्रांस सारखी लागू पडत नाहीं. उदाहरणार्थ ज्योतिष घ्या. यांत जरी गणित करावें लागतें, वेध घ्यावे लागतात, व तशाच दुसऱ्या पुष्कळ गोष्टी समजण्यास जरी कठीण असतात; तरी त्यांत मौज वाटण्यासारखें पुष्कळ आहे. ग्रहमालेची चमत्कारिक रचना, ग्रहांची मनास थक्क करणारी गति, त्यांची परस्परांपासून विलक्षण अंतरें व पृथ्वीवर घडणाऱ्या अनेक अपूर्व चमत्कारांचें यथास्थित ज्ञान, इत्यादि गोष्टी अत्यंत मनोवेधक असल्यामुळें त्या शास्त्राचा अभ्यास करण्यास सर्वांस मोठी उमेद

येतें व हौस वाटते. तसेंच गायनशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादिकांचें आहे. त्याचें तरी कारण हेंच कीं, त्यांत बुद्धीचें काम तर आहेच, पण मनास चमत्कार वाटण्यासारख्या गोष्टीही आहेत. मग कवितेची तर गोष्ट काय सांगावी! ती अधींच रसमय. रस ह्मणजे तिचें केवळ तत्वच; याशिवाय अनेक तऱ्हेच्या अलंकारांचें, व मुख्यतः स्वरसंयोगांचेंही तिला साहित्य असतें. तेव्हां वरील श्लोकांत कवीनें तिचें जें वर्चस्व वर्णिलें आहे तें यथार्थ नाहीं असें कोण ह्मणेल ?

कोणत्याही राष्ट्रांत पाहूं गेलें असतां असें आढळतें कीं, तें राष्ट्र सज्ञान दशेस येऊं लागलें ह्मणजे त्याचे विचार कवितारूपानें पहिल्यानें बाहेर निघूं लागतात. ती कविता पहिल्यानें लावण्यासारख्या वृत्तांत असते, कारण तशा काळच्या उद्दाम कवितोद्गारांस तशींच वृत्तें अत्यंत अनुकूळ असतात. त्यांत बहुत करून वीरांचीं अद्भुत कृत्यें, व त्यांचीं चरित्रें हींच वर्णिलेलीं असतात. ग्रीक लोकांचा जो जुनाट व अतिप्रसिद्ध होमर कवि त्याचें काव्य सर्व वीररसमय आहे. त्याप्रमाणेंच इंग्लंड व स्काटलंड या देशांतही अगदीं मूळची कविता ह्मटली ह्मणजे अशाच प्रकारची आहे, तीस ते "ब्यालड्स" ह्मणतात. आपल्या देशांत तरी पेशव्यांच्या कारकीर्दीत होऊन गेलेल्या विख्यात पुरुषांवर केलेल्या ज्या लावण्या किंवा पवाडे आपण ऐकतों तेच वास्तविक पाहतां मराठी भाषेची आद्यकविता होत. कारण वामन पंडित, मोरोपंत वगैरे कवींनीं जरी मराठी भाषेंत आपली कविता लिहिली, तरी ती संस्कृत भाषेच्याच केवळ धाटणी-

वर असल्यामुळें तीस मराठी कविता ह्मणण्यापेक्षा संस्कृत कवितेचें रूपांतर ह्मणणें हें वाजवी आहे. असो; याप्रमाणें कवितेचें आद्यस्वरूप उद्दाम असतें. पुढें हळू हळू येणारे जे मार्दवादि गुण ते तिचे ठायीं पहिल्यानें नसतात हें खरें; पण त्या वेळेस तिचें वास्तविक स्वरूप जसें उदयास आलें असतें तसें पुढें कधींही दृष्टीस पडत नाहीं. याचीं कारणें अनेक आहेत; पण त्यांतलि मुख्य हें कीं, सृष्टींतील सुंदर किंवा भव्य पदार्थांचा, व संसारांतील नाना प्रकारच्या प्रसंगीं हृदयास जे विकार होतात, त्यांचा आधींच्या कवींवर जितका ठसा उठलेला असतो तितका पुढच्या कवींवर नसतो, व त्यामुळें पहिल्यांस त्या त्या गोष्टींचें जसें हुबेहुब वर्णन करतां येतें तसें पुढल्यांस येत नाहीं. व याप्रमाणेंच पाहतां असें प्रत्ययास येतें, कीं सर्व राष्ट्रांतील अगदीं जुनाट कविच सर्वोत्कृष्ट असतात. पुढल्या कवींच्या कवितेंत इतर अनेक गुण असतात खरे, पण पहिल्यांनीं मनोवि-कारांचें उद्भावन वगैरे जसें अगदीं सहज रीत्या केलें असतें तसें पुढल्यांस कोणत्याही प्रकारें करूं जातां साधत नाहीं. भर्तृहरीनें अशा जगद्वंद्य कवीचें फार सुंदर वर्णन केलें आहे. तो ह्मणतो—

जयंति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ।
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥

"रसिकतेचें केवळ आगरच किंवा जन्मतःच ज्यांच्या पुढें रसिकता केवळ हात जोडून उभीच राहिली अशा कवीश्वरांचें भाग्य काय वर्णावें? कां कीं, ज्यांस जरेची किंवा मरणाची वार्ता देखील पोंचायाची नाहीं अशा कीर्ति-

रूप देहांचें धारण करून ते या पृथ्वीवर अक्षयी राहणारे आहेत." हें सर्व वर्णन पहिल्या कवींचें झालें. आतां त्यापुढें जे कवि होऊं लागतात त्यांची स्थिति पहिल्यांपेक्षां बरीच निराळी होते. ती अशी कीं, एक तर त्यांस निराळे विषय अवश्य घ्यावे लागतात, कारण तेच विषय पुनः वर्णिल्यास वाचणाऱ्यांच्या किंवा ऐकणाऱ्यांच्या मनास कंटाळा येऊं लागतो. दुसरें असें असतें कीं, पहिल्या कवींस त्यांच्या बुद्धीशिवाय दुसरें कांहींच साधन नसल्यामुळें त्यांचें सर्व विचार केवळ मनःप्रेरितच असतात, तसें या दुसऱ्यांचें असत नाहीं. त्यांस पहिल्यांनीं केलेल्या काव्यांचा आधार असतो, ह्मणून त्यांच्या ग्रंथांत कांहीं प्रत्यक्ष अनुभविलेल्या गोष्टी व कांहीं पहिलीं काव्यें वाचून केवळ मनानेंच अनुभविलेल्या अशांचें वर्णन असतें. यास्तव मागून झालेल्या कवींचीं काव्यें पहिल्यांच्या काव्यांपेक्षां स्वाभाविक रसांत कमी उतरलेलीं असतात; परंतु ही न्यूनता पुढील कवि वर्णमार्दव, अर्थस्वारस्य, यमकें, प्रास इत्यादिकांची योजना करून झाकूं लागतात. आतां वर सांगितलेल्या चित्रविचित्र लेण्यांनीं कविता ज्यास्त खुलते खरी; पण तिला अंगचें सौंदर्य असलें तर यांची काय ती मौज; नाहीं तर कुरूप स्त्रीवर जडावाचे दागिने घातले असतां जसें केवळ हास्यास्पद होतें त्याप्रमाणें वाईट कवितेची दशा होते. पण कवितेची पहावें तों पुढें पुढें अशीच दशा होत जाते, आणि तिचें मूळचें स्वाभाविक सौंदर्य अगदीं नाहींसें होऊन केवळ बाह्यभूषणांचा थाटमाट व लकलकाट ह्मणजेच खरी कविता अशी लोकांची समजूत होऊन जाते. चित्रकलेचें मार्मिक ज्ञान

ज्यांस नसतें ते ज्याप्रमाणें त्या कामांतील बारीक खुब्या न जाणतां केवळ रंगाच्याच रेलचेलीवर तसबिरांचा उत्कृष्टपणा लेखितात, त्याच प्रमाणें सहृदय रसिकजन कवितेची पारख करण्यास नसले ह्मणजे वर सांगितलेल्या मार्दवादि गुणांवरच कवितेस मान मिळूं लागतो. ही अशी स्थिति ज्या काळीं लोकांत दिसूं लागते त्यावेळेस खऱ्या कवितेचा ऱ्हास होऊन ती अगदीं निकृष्ट दशेस येऊन पोंचली असें समजावें.

यावरून पाहतां कवितेच्या तीन स्थिति होतात. पहिली तिची जी अत्युत्तम अवस्था तींत केवळ अंतःकरणाचे स्वाभाविक उद्गार तेच असून शब्दाचे वगैरे बाह्यालंकार मुळींच नसतात, तरी तिचें साधें शुद्ध स्वरूप त्या वेळेस फारच रमणीय दिसतें. जेव्हां अंतःकरणस्फूर्ति असून कवितेस बाह्यालंकारांचेंही साहित्य असतें तेव्हां ती तिची दुसरी अवस्था समजावी. परंतु जेव्हां हृदयद्रावक गुण कांहींच नसून केवळ अलंकारादिकांचा मात्र भरणा कवितेंत केला असतो तेव्हां ती तिची तिसरी अवस्था होय. या तिसऱ्या प्रकारच्या कवींस वास्तविक पहातां कवि ही संज्ञा मुळींच शोभत नाहीं. कारण आवेशरूप वगैरे जे गुण कवीस अवश्य असावे ते यांत मुळींच दृष्टीस पडत नाहींत. या कवींचे विचार सर्व जुन्या कवींचीं काव्यें वाचून त्यांपासून घेतलेले असतात; त्यांत त्यांचें स्वतःचें कांहीं असलेंच तर फारच थोडें असतें. कधीं कधीं तर जुन्या कवींचें प्रौढ विचार त्यास चांगले न समजून त्यांचें अनुकरण करतांना किंवा जसेचे तसेच चोरतांना ते त्यांचा मूळचा

रस घालवून त्यांची माती मात्र करून टाकतात. आपल्या काव्यांत ते ज्या गोष्टी वर्णितात त्यांतून त्यांनीं प्रत्यक्ष अनुभविलेल्या अशा थोडयाच असतात, बाकीच्या सर्व केवळ मनानें कल्पूनच लिहिलेल्या असतात. यास्तव त्यांचें वर्णन जसें हुबेहूब असावें तसें मुळींच नसून अगदीं सरासरी, किंवा कधीं कधीं अगदीं अप्रयोजक देखील असतें. शिवाय अशीं वाईट काव्यें चोहोंकडे फार झालीं ह्मणजे त्यापासून भाषेची मोठी हानि देखील होते. ज्याप्रमाणें सोन्या रुप्यासारखे खोटे हुबेहूब दागिने फार झाले असतां सामान्य मनुष्यांस दोहोंमध्यें निवड करण्याची मोठी पंचाईत पडते, व नुसत्या झिलाईनें देखील पुष्कळ फसून जातात, त्याप्रमाणें काव्याचे खरे गुण नसतांही नुसत्या शब्दांच्या चमत्कारिक रचनेवरूनच कित्येक ग्रंथ काव्यांत गणले जातात व त्यामुळें शब्दांची अर्थबोध करण्याची शक्ति व मूळचें स्वारस्य हीं दोन्ही कमी होतात. तेच तेच अलंकार व तीच तीच शब्दरचना वारंवार आल्यानें त्यांची मूळची गोडी नाहींशी होऊन दोन्ही शेवटीं अगदीं निरर्थक देखील होतात. असो, याप्रमाणें अशा कवींच्या पायीं भाषेची दुर्दशा होते खरी, पण अशांचें माहात्म्य फार दिवस टिकत नाहीं ही अंमळ समाधानाचीच गोष्ट होय. लोक तरी अशा प्रकारच्या निरर्थक काव्यांनीं फार वेळ फसत नाहींत. कांहीं काळानें त्यांचा वीट येऊन त्यांस ते अप्रयोजक मानूं लागतात, व जगन्मान्य जे जुने कवि त्यांची पुनः चाह होऊं लागते.

[ शालापत्रक पुस्तक ११; अंक ११. मार्च १८७२ इसवी. ]

मागील खेपेस कवितेच्या तीन स्थिति सांगितल्या. आतां याविषयीं सकृत्दर्शनीं चमत्कार वाटण्याजोगी गोष्ट ही होय कीं, ते तिन्ही प्रकार सर्व परिपक्व भाषांत बहुधा आढळून येतात. वास्तविक पाहतां हा मुळींच चमत्कार नव्हे; कारण मनुष्यजाति सर्वत्र एकच असल्यानें एके ठिकाणचे ह्मणजे एका राष्ट्राचे मनोव्यापार त्यापासून फार दूर असणाऱ्या अगदीं भिन्न राष्ट्राच्या देखील मनोव्यापारांशीं कधीं कधीं अगदीं बरोबर मिळतात. याविषयीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील. जगांतील सर्व भाषांचीं व्याकरणें पाहिलीं तर त्या सर्वांत भाषाघटक मुख्य मुख्य नियम बहुत करून सारखेच सांपडतात; नीति अनीतीविषयीं कोणत्याही राष्ट्राची पाहिली तरी पुष्कळ अंशीं समजूत सारखीच असते; तसेंच सर्व देशांची राज्यरीतिही निदान आरंभीं तरी सारखीच असावी असें वाटतें. याप्रमाणें मनाचे सहज जे व्यापार ते सर्वत्र बहुधा सारखेच चालतात, आणि त्यांतील ठळक ठळक गोष्टी तर चोहोंकडे सारख्याच घडून येतात. या अशा गोष्टींपैकींच वर सांगितलेले कवितेचे तीन प्रकार होत. ते एकामागून एक कसकसे घडून येतात हें मागें सांगितलेंच आहे. आतां त्यांविषयींचीं उदाहरणें सांगतों.

इंग्लंड देशांतील लोकांची, हल्लीं मोठ्या परिपक्व दशेस आलेली, जी इंग्लिश भाषा—कीं जिचा सध्यां सर्व पृथ्वीवर इतका फैलाव होत चालला आहे, आणि कवींच्या विशाल व उज्वल कल्पना किंवा तत्वज्ञांचे अति सूक्ष्म व सखोल

विचार या दोहोंचा यथास्थित उल्लेख करून ते मनांत भरवून देण्याची शक्ति जिच्या ठायीं विलक्षण आल्यामुळें जी विद्यमान भाषांत अप्रतिम होऊन राहिली आहे,—तीच सुमारें सहाशें वर्षांपूर्वी अगदीं अडाणी अवस्थेंत होती. त्या वेळेस त्या देशावर **नार्मन** लोकांचें स्वामित्व नुकतेंच झालें असल्यामुळें आधींचे राहणारे जे **साक्सन** लोक त्यांचा व **नार्मनांचा** वैरभाव नुकता कांहीं कांहीं बुजूं लागला होता, व ज्या **साक्सन** भाषेचा मुळींच लोप करण्याचा प्रयत्न पहिल्या **नार्मन** राजांनीं मांडला होता तीसच पुढील राजांचा दुर्बळपणा पुष्कळ उपयोगीं पडला. तो असा कीं, पदाक्रांत केलेल्या **साक्सन** लोकांचें तेज दिवसें दिवस वाढून त्यांच्या नष्ट झालेल्या स्वतंत्रतेचें पुनरुज्जीवन अधिक अधिक होत चाललें, व त्याबरोबर त्यांच्या भाषेचाही उत्कर्ष होऊं लागून तिला बुडवून टाकण्याविषयींचा जो नार्मन राजांचा दुराग्रह तो त्यांस सोडावा लागला. नंतर **नार्मन** लोकांची जी फ्रेंच भाषा हिचाच **साक्सन** भाषेशीं मिलाफ होऊन सांप्रत जिला इंग्लिश भाषा ह्मणतात ती बनली. पुढें त्या भाषेंत ग्रंथ वगैरे होऊं लागून तिची उत्तरोत्तर वृद्धि होत चालली. नंतर चौदाव्या शतकांत चासर ह्मणून एक नामांकित कवि त्या देशांत झाला; यासच इंग्रजी ग्रंथकार आपल्या भाषेचा आद्यकवि ह्मणतात. या कवीस इंग्रज लोक जो इतका मान देतात तो दोन कारणांवरून; एक तर त्याची कविताशक्ति व हुबेहुब वर्णन करण्याची शैली; आणि दुसरें असें कीं, त्याच्या काव्यांवरून त्याच्या वेळची स्थिति अगदीं

रेखल्याप्रमाणें लक्षांत येते. या कवीच्या पुढें तसाच स्पेन्सर ह्मणून एक दुसरा विख्यात कवि झाला. या कवीच्या वेळेपर्यंत इंग्लिश भाषा बरीच बदलून जाऊन बोलण्या-लिहिण्याच्याही पद्धतींत बराच फेर झाला होता, तरी चासरचीच कवितेची हतोटी यानें उचलल्यावरून याचीही भाषा चासरच्या प्रमाणेंच जुनाट आहे. कवितेविषयीं पाहिलें तर याची ही कविता पहिल्याच्याच तोडीची आहे; किंब-हुना शब्दसौष्टवादि गुण याच्यांतच विशेष आहेत असेंही ह्मणतां येईल. या गुणावरून हा पुढील कवींच्या विशेष प्रशंसेस पात्र झाला, व पुष्कळांनीं आपल्या काव्यांत या संबंधें याचें अनुकरण करण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केलेला आढळतो. इतकें आहे तरी या दोघां कवींची सामान्य लोकांमध्यें फार थोडी प्रवृत्ति आहे; कारण यांची भाषा फार जुनाट असल्यामुळें तिचा स्वतंत्र अभ्यास केल्यावां-चून ती समजत नाहीं. मराठी भाषेंत ज्या वेळेस ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु वगैरे ग्रंथ झाले त्याच वेळेच्या सुमारास या कवींनीं आपलीं काव्यें लिहिलीं. यास्तव सांप्रतच्या मरा-ठींत व ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांच्या भाषेंत जितकी तफावत दृष्टीस पडते तितकीच सध्यांच्या इंग्लिश भाषेंत व त्या वेळच्या भाषेंतही आहे. असो; स्पेन्सर कवीच्या पुढें अति-विख्यात जो शेक्सपीयर नाटककार तो मोठा उत्कर्ष पावला. या कवीची हकीगत समजण्याविषयीं मोठमोठ्या ग्रंथकारांनीं पुष्कळ शोध केला, परंतु त्याविषयीं ह्मणण्या-सारखी माहिती मुळींच मिळाली नाहीं; व इतःपर मिळ-ण्याची तर आशा नकोच. पहिल्यापासून कर्णोपकर्णी ज्या

दंतकथा चालत आल्या आहेत त्यांच्या पलीकडे ह्मटलें तर त्याचा वृत्तांत उपलब्ध होण्याचें मुळींच साधन दिसत नाहीं. त्यांवरून पाहतां असें वाटतें कीं, शेक्सपीयर यानें विद्याभ्यास फारसा केला नव्हता; तरी याचीं नाटकें रसाचें केवळ आगर होऊन चिरकाळ जगन्मान्य झालीं आहेत व तशींच अक्षयींही राहतील. अंतःकरणाचे स्वाभाविक जे उद्गार, कीं ज्यांचें स्वरूप अनुभवून त्यांचा यथास्थित उल्लेख करणें हें सहृदय कवींवांचून इतरांस केवळ अशक्य होय, त्यांचें स्पष्ट वर्णन करण्याची खुबी, आणि जगांत मनुष्यांच्या स्वभावांत जें अपार वैचित्र्य दृष्टीस पडतें तें ढळढळीत रेखल्याप्रमाणें दाखविण्याची शैली, या दोहोंमध्यें या कवीनें अगदीं हद्दच करून टाकली आहे. शेक्सपीयर कवीचे ठायीं कवित्वाचा कळस झाला अशी त्याची ख्याति आतां सर्व जगभर पसरली आहे, व याच्या अप्रतिम नाटकांचा लोप झालाच तर तो इंग्लिश भाषेच्या लया बरोबरच होईल, एरवीं कधीं होणार नाहीं, असा खात्रीपूर्वक अभिप्राय महान् महान् ग्रंथकार आजपर्यंत देत आले आहेत. यावरून कोणास वाटेल कीं, शेक्सपीयर याची जिवंतपणीं ही मोठी कीर्ति झाली असेल; पण तसें फारसें झालें नाहीं. त्या वेळेस इंग्लंडावर राज्य करणारी जी प्रतापशाली एलिजाबेथ राणी तिणें व दुसऱ्या कित्येक थोर पदवीच्या लोकांनीं शेक्सपीयर यास बराच आश्रय दिला होता खरा, परंतु त्याची त्या वेळेस फार चहा झाली असेलशी वाटत नाहीं. त्याच्या पुढें तर लोकांची नाटकाविषयींची अभिरुचि अगदींच भ्रष्ट होऊन गेली; आणि ज्या बीभत्स व

विचकट नाटकांचें आता फारसें नांव देखील ऐकूं येत नाहीं, अशा नाटकांचें माहात्म्य त्यानंतर वाढलें. याप्रमाणेंच आणखीही पुष्कळ वर्षेपर्यंत, ह्मणजे त्याच्या मरणापासून सुमारें दीडशें वर्षेपर्यंत,हा कविमणि, तसाच कोनाकोपऱ्यांत पडून, त्याच्या अप्रतिम तेजाची लकेर कधीं झळके कधीं न झळके अशा रीतीनें, राहिला होता. पण शेवटीं त्याची खरी पारख करणारे त्यास भेटून, त्यांनीं त्यास प्रसिद्धीस आणिलें. पुष्कळ वर्षें लोटून गेल्यामुळें जो मळ त्यावर सांचला होता तो काढून टाकून त्यास उजळण्याचा प्रयत्न त्यांनीं मांडला. हा प्रयत्न जरी फारसा सिद्धीस गेला नाहीं तरी त्यानें कवीची खरी योग्यता लोकांस कळली. असो; याप्रमाणें शेक्सपीयर याची ख्याति पुनः होऊन ती दिवसानुदिवस वाढतच चालली. हल्लीं तर असें झालें आहे, कीं या कवीस त्याच्या जन्मदेशांतून काढून पृथ्वीवरील अनेक देशांनीं त्यास आपआपलासा करून टाकला आहे; ह्मणजे त्याच्या नाटकांचीं भाषांतरें करून स्वभाषेंतील ग्रंथांमध्यें त्यांसही गणतात. याप्रमाणें या कवीची अपूर्व कीर्ति होऊन 'न भूतो न भविष्यति' असा सर्व जग त्यास मान देत आहे. असो; यानंतर मिल्टन हा कवि प्रख्यात झाला. यानें शेक्सपीयर याचें वर्णन कांहीं स्थलीं केलें आहे, त्यावरून हा त्यास किती मान देत होता हें स्पष्ट दिसून येतें. या कवीमध्यें एक मोठा विशेष होता; तो हा कीं, हा फार व्यासंगी असून त्या काळीं त्यासारखा विद्वान इंग्लंड देशांत कोणीही नव्हता. याच्या व्यासंगाचें एक मोठें प्रमाण त्यास शेवटीं जें अंधत्व आलें तें होय. याच्या लेखांवरून असें

समजतें कीं, हा पूर्ववयीं रात्रीं फार जागत असे, व त्या जागरणाचा दंड त्यास शेवटीं सुमारें वीस वर्षें भोगावा लागला. त्यानें ग्रीक व विशेषतः लाटिन भाषेचा फार अभ्यास केला होता; तो इतका कीं, लाटिन भाषेंत कविता करणें किंवा गद्यात्मक ग्रंथ लिहिणें या कामांत त्याचा हात धरणारा त्या वेळेस कोणीही नव्हता. या गोष्टीवरून एक मोठ्या महत्वाची गोष्ट सिद्ध होते. ती ही, कीं स्वभावतः जरी बुद्धि विशाल असली, तरी अभ्यासानें संपादिलेल्या ज्ञानानें तिला साह्य होतेंच. असल्या ज्ञानाशिवाय देखील कदाचित् कोणी मोठे मोठे ग्रंथ केवळ बुद्धीच्याच बळानें करूं शकेल,—आणि असलीं उदाहरणेंही कोठें कोठें आढळतात पण फारच विरळा—परंतु असल्या ज्ञानानें मूळच्या बुद्धीस निकृष्टता येईल हें ह्मणणें मात्र अगदीं गैर आहे. या गोष्टीची सिद्धता करण्यास मिल्टन प्रमाणेंच व्हर्जिल, कालिदास , यांचीं उदाहरणें देतां येतील. सारांश, स्वाभाविक विशाल बुद्धि व प्रसक्त व्यासंग हीं जरी अल्प समजुतीच्या मनुष्यांस परस्पर विरुद्ध वाटतात, तरी तीं वस्तुतः तशीं नव्हत; व त्यांचा मिलाफ मिल्टन या कवीचे ठायीं पूर्णपणें होता. मिल्टन यानें पूर्ववयीं व डोळसपणीं बरींच काव्यें व गद्यात्मक ग्रंथ लिहिले होते; परंतु त्याचें सर्वोत्कृष्ठ जें "प्याराडाइज् लास्ट" ह्मणजे 'स्वर्ग गमावला' हें काव्य तें त्यानें उतार वयांत व आंधळा झाल्यांवर लिहिलें. याविषयीं असें सांगतात कीं, तो आपल्या मुलीकडून होमरकृत काव्य जें ईलिअड तें वाचवी व त्या भरांत जे विचार सुचत ते तो आपल्या मुलीस कविता-

रूपानें सांगे, व ते ती कागदावर उतरून घेई. या काव्यानें आपल्या भाषेस अलंकृत करण्याचा विचार फार वर्षांपासून त्याच्या मनांत घोळत होता, तो शेवटीं वर सांगितल्या रीतीनें शेवटास गेला. हा अति विख्यात ग्रंथ पृष्ठांच्या मानानें पाहतां फार मोठा आहे असें नाहीं, तरी हल्लीं मराठींत प्रसिद्ध झालेल्या कांहीं वीररसप्रधान काव्यांप्रमाणें कवित्वाची अपूर्व कर्तबगारी खर्चून वर्षा सहा महिन्यांत हा उभारलेला नव्हता; तर संपूर्ण होऊन लोकप्रसिद्ध होण्याची योग्यता त्यास येण्यास सात आठ वर्षें लागलीं. नंतर तो मिल्टन यानें एका पुस्तक विकणारास विकला; त्यानें त्या ग्रंथाबद्दल त्यास फक्त दीडशें रुपये दिले. यावरून त्या काळीं विद्येचा प्रचार लोकांत किती होता हें स्पष्ट दिसून येतें. याप्रमाणें हें काव्य जनप्रिय जरी झालें नाहीं, तरी त्या काळच्या पंडितांनीं त्याची योग्यता ओळखली नाहीं असें नाहीं. त्या वेळीं ड्रायडन् ह्मणून एक विख्यात नाटककार होता, त्यानें हें काव्य वाचतांच मिल्टन यास प्राचीन काळचे कविश्रेष्ठ जे होमर व व्हर्जिल् त्यांच्या मालिकेंत घातलें. त्यानें मिल्टन याविषयीं एक सुंदर चुटका रचिला आहे, व तो सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यांत तो ह्मणतो, "तीन मन्वंतरीं ग्रीस, रोम, व इंग्लंड या स्थलत्रयास भूषणभूत असे तीन कविमणि निर्माण झाले; त्यांत पहिल्यानें (होमर) कल्पनाविशालत्वांत हद्द केली, दुसऱ्यानें (व्हर्जिल्) अर्थगौरवांत, व तिसऱ्यानें (मिल्टन) दोहोंमध्यें; विधात्यास तिसरा निराळाच गुण न सापडल्यामुळें त्यानें पहिल्याच दोन्ही गुणांची एकत्र

योजना करून तिसऱ्या कवीस निर्माण केलें." पुढें किती एक वर्षांनीं इंग्लंडांत आडिसन् ह्मणून निबंधकर्ता ग्रंथकार झाला, त्यानें मिल्टन याच्या कीर्तीचा जीर्णोद्धार करून त्याच्या काव्यांची लोकांस गोडी लावली. तेव्हांपासून त्याची कीर्ति सारखी वाढत चालली आहे, व ती चिरकाळ अक्षय राहील यांत बिलकुल संशय नाहीं. कवींचा जो पहिला वर्ग सांगितला त्या वर्गांत इंग्लिश कवींच्या मालिकेंत हा शेवटला होय. याच्या वेळेसच कविता आद्य उत्तम स्थितीपासून भ्रष्ट होऊं लागली होती, व ह्मणूनच शेवटीं शेवटीं त्याच्या कवितेची चाहा न उरल्यामुळें मिल्टन असें ह्मणत असे कीं, मी यथायोग्य काळीं न जन्मतां अंमळ उशीरानें जन्मलों. असो; याप्रमाणें वर जितके कवि सांगितले त्यांच्याठायीं खरी कवित्वस्फूर्ति होती, व ज्याप्रमाणें एखादी सुंदर स्त्री मुग्धावस्थेंत असतां तिचें साधें रूप रमणीय वाटतें व तिचे सहजविलास चित्तास मोहून टाकतात, त्याप्रमाणेंच यांचीही कविता जात्याच मनोहर असून अलंकारादिकांच्या थाटमाटानें ती साजरी केलेली नाहीं.

इंग्लिश कवितेची मध्यम व निकृष्ट स्थिति सतराव्या शतकाचा उत्तरार्ध व अठरावें शतक इतका काळ होती. दुसरा चार्लस राजा हा इंग्लंडांतून पळून गेल्यावर फ्रान्स देशाची राजधानी पारीस शहर येथें कांहीं वर्षें जाऊन राहिला होता. तेथें बीभत्स व दुराचारप्रवर्तक अशीं नाटकें पाहून, त्यास तशाशिवाय दुसरें कांहींच दिसेनासें झालें. मग त्यास इंग्लंडाच्या राज्यपदावर पुनः बसवि-

त्यानंतर तसल्याच बीभत्स रुचीचा सर्वत्र प्रचार होऊन काव्यांत व नाटकांत चोहोंकडे चावटपणा व विचकटपणा माजला. एवढा मोठा विद्वान ड्रायडन् खरा, पण त्याचीं ही नाटकें बेशरम अशा चावटगिरीनें अगदीं परिपूर्ण आहेत. ड्रायडन् हा दुसऱ्या प्रतीच्या कवींत अग्रगण्य होय. याची बुद्धि फार विशाल होती; व परगुणग्राहित्व, अमानित्व वगैरे कांहीं अमोलिक गुण याच्या अंगीं होते. या कवीनें आपला धर्म एक दोन वेळां सोडून पुनः स्वीकारला; व त्या वेळेस प्राटेस्टंट व क्याथलिक पंथांचे जे वाद होत त्यासंबंधें हा कधीं कधीं कविता लिही. या काव्यांवरून याची कुशाग्र बुद्धि व चातुर्य हीं स्पष्ट दिसून येतात; व कोणत्याही पक्षाचें खंडन मंडन करण्याची याचे आंगीं अपूर्व शक्ति होती; इतकें सर्व होतें तरी याची कविताशक्ति नेमस्तपणाचीच होती. फार तर काय, पण मोठी प्रखर बुद्धि व कविताशक्ति यांचा परस्परनियमित संबंध मुळींच नाहीं, या सिद्धांताचा प्रत्यय पाहूं गेलें असतां तो ड्रायडन याच्यापेक्षां दुसऱ्या कोणाच्या उदाहरणांत अधिक स्पष्ट दिसून येईलसें वाटत नाहीं. या कवीनें एकंदर अठ्ठावीस नाटकें लिहिलीं, परंतु त्यांपैकीं फार प्रसिद्ध अशीं एक दोनच आहेत, व त्यांसही कवित्वसंबंधानें मोठासा मान आहे असें नाहीं. याच्या पूर्वीं टीका करण्याचे वगैरे नियम इंग्लिश भाषेंत कोणीही लिहिले नव्हते; ते हा प्रत्येक नाटकाच्या प्रस्तावनेंत लिहीत असे. या टीकेच्या निबंधांविषयीं मोठमोठ्या ग्रंथकारांनीं असा अभिप्राय दिला आहे, कीं हे जरी त्या नाटकांस पुरवणी

प्रमाणें जोडले आहेत तरी त्यांचीच योग्यता त्या नाटकांपेक्षां फार अधिक आहे, व नाटकें अप्रसिद्ध झाल्यावर हे निबंध मात्र राहण्याचा संभव आहे. ड्रायडन याचे ठायीं कविताशक्ति फारशी नव्हती, याचें दुसरेंही एक प्रसिद्ध प्रमाण आहे. तें हें कीं, त्यानें मिल्टन-कृत 'प्यारिडाईज् लास्ट' ह्मणून जें मागें काव्य सांगितलें तें यमकबद्ध करण्याचा बेत मांडला होता, पण तें अगदीं दुर्घट कृत्य ह्मणून त्यास सोडून द्यावें लागलें. मिल्टनच्या वेळेसच ड्रायडन हा होता, व याची कविता मिल्टन यानें पाहिली होती. तीवरून त्यानें असा अभिप्राय दिला कीं, ड्रायडन यास यमक मात्र साधतां येतात, हा कवि नव्हे. हें ह्मणणें जरी सर्वथैव खरें नाहीं, तरी यांत तथ्य पुष्कळ आहे; कारण कवीस मुख्य आवश्यक जें सहृदयत्व तें मला कमी आहे असें यानेंच एके ठिकाणीं कबूल केलें आहे. याच्या कवितेंत शब्दांची खुबीदार व प्रौढ रचना हाच काय तो एक मोठा गुण दृष्टीस पडतो, व हा महाकवींत गणला जाण्याचें हेंच मुख्य कारण होय. या पुढील कवि जो विख्यात पोप त्यानेंही याच गोष्टींत याचें अनुकरण केलें. त्याची बुद्धि ड्रायडन याच्या सारखी विशाल नव्हती, पण तो मोठा मेहेनती होता. त्यानें पदरचनेच्या प्रौढत्वाविषयींचा ड्रायडन याचा कित्ता चांगला उचलला; इतकेंच नव्हे, तर वर्णमृदुतादि गुणांची विशेष प्रवृत्ति त्यानें कवितेंत पाडली. पण ही सुधारणा त्यानें येथपर्यंत पोंचवली कीं, पुष्कळ क्षुद्र बुद्धीच्या मनुष्यांसही ती युक्ति पुरी साधून जाऊन कवित्वाचा पोकळ मान मिरवितां आला.

पोप याची या गुणांवरून फार प्रसिद्धि झाली, व त्याच्या वेळीं त्याच्या तोडीचा कवि कोणीही नव्हता. तरी याचे अंगीं खरी कविताशक्ति किती होती याचा मोठाच वाद आहे, व महान् महान् ग्रंथकारांनीं व साक्षात कवींनींही जरी याचा यासंबंधें पक्ष घेतला आहे, तरी हल्लीं साधारण मत असें ठरलें आहे कीं, यास कवित्वाची खरी स्फूर्ति नव्हती. हा शरीरप्रकृतीनें फारच अशक्त असून खुजा होता, व शिवाय याचा स्वभाव जात्याच फार रागीट असल्यामुळें मनाचा शांतपणा, आनंदवृत्ति वगैरे जे कवींचे आवश्यक गुण ते यांत नव्हते. यास सृष्टीचें सौंदर्य व भव्य स्वरूप यांचा साक्षात् अनुभव कधींच घडला नाहीं, व संसारांतील नानाविध प्रसंगीं जे उद्गार मनांत येतात त्यांसही शरीराच्या व्यंगास्तव हा अंतरला होता. यास्तव अशांचें वर्णन जें त्यानें कवितेंत केलें आहे तें अगदीं नीरस व कोठें कोठें अप्रयोजक देखील झालें आहे. याचा सर्वांत अतिप्रसिद्ध ग्रंथ म्हटला म्हणजे होमरकृत ईलियड नामक काव्याचें भाषांतर होय. या भाषांतराची मागें फारच चाहा असे, पण आतां ती तादृश नाहीं. याचें मोठें कारण हें कीं, त्याच्या वर्णरचनेस आतां लोक पहिल्यासारखे भुलत नाहींत, तर होमर कवीचें कल्पनाविशालत्व, उद्दाम कवित्वस्फूर्ति, व अनुपम विशदत्व हे गुण भाषांतरांत कितपत उतरले आहेत हेंच मुख्यतः पहातात. आतां वर सांगितलेल्या गोष्टींचा निर्णय करणें हें लहानसानांचें काम नव्हे हें खरें, पण पुष्कळ विद्वानांच्या मतें हे गुण पोप याच्या भाषांतरांत फार कमी आहेत. सारांश, पोप

याच्या कवितेची मजाल फार करून वर्णाच्या मृदु रच- नेवर व शानदार शब्दांनीं अर्थ खुलविण्यावर काय ती होय. ह्मणूनच, यानें जीं कांहीं नीतिपर काव्यें केलीं आहेत,—कीं जीं लिहिण्यास सृष्टींतील किंवा जगांतील अनु- भवाची फारशी गरज न लागतां बुद्धीचें व अभ्यासाचेंच प्रायः साहित्य लागतें—तींच त्यास उत्कृष्ट साधलीं आहेत, व त्यांवरच त्याची कीर्ति बहुधा पुढें राहील. पोप यानें जी कवितेची रचना प्रचारांत आणून लोकप्रिय करून टा- कली, तिची थेट धाटणी पुष्कळांनीं उचलली. त्या सर्वांत जानसन्, ह्मणजे जो पुढें डाक्तर जानसन या नांवानें वि- ख्यात झाला, याची फार प्रशंसा झाली. यानें आपल्या तरुणपणीं कांहीं लहान लहान काव्यें लिहून प्रसिद्ध केलीं, तीं इतकीं उत्कृष्ट होतीं कीं, त्यांस सर्व लोक पोप याच्या तोडीचा कवि ह्मणूं लागले. फार तर काय, पण पोप यानें- ही स्वतः तीं वाचून मान डोलविली. कविता लिहिण्याचा हा अभ्यास जर जानसन यानें पुढें ही तसाच चालविला असता, तर त्यानें पोप कवीवरही कडी केली असती असें ह्मणतात. तरी अशी गोष्ट घडून आली नाहीं ह्मणून कोणास ही वाईट वाटण्याचें कारण नाहीं. कारण ती घडली असती तर जगाचें कांहीं मोठें हित झालें असतें असें नाहीं. पोप याच्या कवितेचा तेव्हांही लोकांस कंटाळा येऊं लागला होता व हल्लींच्या काळीं तर तो कंटाळवाणा सूर ऐकतांच सर्वांच्या मस्तकास तिडीक चढते; तेव्हां जानसन यानें किं- वा त्याच्याही पेक्षां वरचढ अशा एकाद्या दुसऱ्या कवीनें जरी तशी कविता लिहिली असती तरी तिचीही अशीच

दुर्दशा होती, यांत बिलकुल संशय नाहीं. येवढें मात्र होतें कीं, त्या महा पंडिताच्या उत्कृष्ट गद्य ग्रंथांनीं व अपूर्व भाषणशक्तीनें जें इंग्लिश भाषेस पुष्कळ साह्य झालें तें तीस अंतरलें असतें. असो; हे जे वर तीन कवि सांगितले त्यांचे ठायीं कविताशक्ति कांहीं होती खरी, परंतु ती मिल्टन, स्पेन्सर वगैरे यांचे ठायीं जशी आढळते तशा प्रकारचीं नव्हती. यास्तव यांस दुसऱ्या प्रतीच्याच कवींत गणतात. याच्या वेळेस दुसऱ्याही शेकडों लहानसान कवींची प्रख्याति झाली होती; पण ज्याप्रमाणें रात्रीचे समयीं हजारों तुटणारे तारे क्षणभर उदयास येऊन व आपली क्षणिक प्रभा आकाशांत मिरवून तत्क्षणींच निजधामास जातात त्याप्रमाणेंच यांचीही अवस्था झाली. हे तोतये कवि पोप याच्या कवितेची भट्टी इतकी उत्कृष्ट उतरीत कीं, साक्षात् पोप कवीस देखील हीं पद्यें आपलींच नव्हत काय, असा भ्रम पडला असता. पण यांचें खरें स्वरूप मार्मिक वाचणारांच्या लक्षांत सहज येतें. पोप याची उज्वल कल्पनाशक्ति व मार्मिक अर्थ लिहिण्याची खुबी वगैरे गुण या कवींत मुळींच नसत असें ह्मटल्यास चालेल. हजारों वेळीं ज्या उपायांची योजना होऊन ज्यांतील रस अगदीं शुष्क होऊन गेला, ज्या विचारांचा उल्लेख गद्य पद्य ग्रंथांत पदोपदीं आढळतो, त्याच उपमा व तेच विचार लिहून त्यांनीं आपले ग्रंथ भरविले असत. इतकेंच नव्हे, पण जे विचार गद्यांतच लिहिले असतां शोभतात, ज्यांत कल्पना शक्तीस रंजविण्यासारखें कांहींच नाहीं, अशा अगदीं साध्या विचारांसही कवितेचा उपहास्यास्पद साज देऊन ते नटवूं पाहात.

याप्रमाणें आपलें बुद्धिसर्वस्व खर्चून इंग्लिश भाषा धुंडाळून, तींतील वाग्रत्नांचें लेणें कवितेस अर्पण केल्यानें जो पोप कवि सर्वांच्या कृतज्ञतेस वास्तविकपणें पात्र झाला होता व ज्यानें आपल्या मतें यावरूनच अक्षय कीर्ति जोडली, त्याची या पुढील क्षुद्र कवींनीं अगदीं दुर्दशा करून टाकली. कवितेची कला जशी काय अगदीं सुगम होऊन जाऊन, जो उठला तो कविता करूं लागला. याप्रमाणें कविता अगदीं निकृष्ट दशेस पोंचून, याजमुळें दुसरा असाही अनर्थ झाला कीं, कित्येकांचे ठायीं खरी कवित्वस्फूर्ति असूनही त्यांस, या दुसऱ्या कवींच्या पायीं, व्यर्थ बट्टा लागला. टामूसन, ग्रे, गोल्ड्स्मिथ, इत्यादि कवींचीं काव्यें वस्तुतः फार सुरस आहेत, परंतु लोकांचा सध्या असा समज होऊन गेला आहे कीं, अठराव्या शतकांतील कवि तितके सर्व कवडीचा माल; व यावरूनच या कवींचे गुण पुष्कळ असतांही त्यांस असावा तसा मान नाहीं. याप्रमाणें वाईट कवींच्या हातून कवितेची व भाषेची अनेक प्रकारें हानि होते.

येथवर इंग्लिश कवितेंत घडून आलेल्या तिन्ही स्थितींचें निरूपण झालें. पण त्या देशांत नवीनच एक चमत्कार झाला तो अजून सांगणें आहे. ज्याप्रमाणें एखादें झाड जुनें होऊन गेल्यावरही कांहीं काळानें त्यास नवे अंकुर येऊं लागावे त्याप्रमाणें इंग्लिश कवितेची स्थिति झाली. शेक्स्पीयर, मिल्टन इत्यादि कवींचा ऐन अस्सल बहार एकदा येऊन निघून गेल्यावर व सगळी वाढ होऊन जाऊन हा वृक्ष अगदीं मोडकळीस येऊं लागला इतक्यांत, विलक्षण कालगतीनें याचें पुनरुज्जीवन झालें, आणि पुनः

पहिल्याप्रमाणें रसभरित फलांचे घोस या वृक्षास लटकले. ही नवीन टवटवी या वृक्षास सुमारें या शतकाच्या आरंभापासून येऊं लागली, व हा नवीन बहार अजूनही संपला नाहीं. कवितेच्या इतिहासांत हा जो अपूर्व चमत्कार घडून आला त्याचें सविस्तर वर्णन व निरनिराळीं कारणें लिहिलीं असतां एक स्वतंत्र ग्रंथच होईल, व याप्रमाणें झालेही असतील. तूर्त तीं कारणें संक्षिप्त रीतीनें येथें सांगावीं इतकेंच इष्ट होय. अलीकडील इतिहासकारांनीं असा एक सिद्धांत काढला आहे कीं, ज्या काळीं मोठाल्या लढाया, राज्यक्रांति, वगैरे लौकिक महत्वाच्या गोष्टी घडून येऊन, राष्ट्रचें राष्ट्र जसें काय अगदीं खळबळून जातें, त्याच संधीस, ज्याप्रमाणें समुद्रमंथनकाळीं चंद्रलक्ष्म्यादि रत्नांचा प्रादुर्भाव झाला, तद्वतच, वक्तृत्व, कविता, इतिहास इत्यादिकांचा उदय होतो. या महासिद्धांताचा प्रत्यय आजपर्यंत अनेक वेळां घडून आला आहे. प्राचीन काळीं अप्रसिद्ध असा जो ग्रीक व ट्रोजन यांचा संग्राम झाला, त्याच्याच पुढें कांहीं काळानें होमर याची कविताशक्ति प्रगट झाली. हीच गोष्ट आपल्या रामायण व भारत या दोन्ही ग्रंथांसही अगदीं लागू पडते. पुढें ग्रीक व पारशी लोकांचें मोठें दारुण युद्ध माजलें, तें असें, कीं, तें अगदीं विझण्यास सुमारें दोनशें वर्षें लागलीं; त्याच वेळेस ग्रीक भाषेंत पहिल्यानें इतिहासाची प्रवृत्ति हिराडटस यानें केली, व अथेन्स येथें अनेक नाटककार होऊन रंगभूमीवर नाटकांचा समारंभ होऊं लागला. त्या नंतर अथेन्स व स्पार्टा या संस्थानांची लढाई चालू झाली; या वेळेस थूसिडेडीस यानें आपला अत्युत्कृष्ट इतिहास लिहिला.

आणि इतिहासच काय, पण एकंदर सर्व विद्या व सर्व कला या अतिविख्यात काळीं कळसास जाऊन पोंचल्या. पुढें फिलिप राजानें सर्व ग्रीस देश पदाक्रांत करण्याचा बेत मांडला, त्या वेळेस अथेन्स शहरांत बारा मोठमोठे वक्ते झाले व त्या सर्वांत डिमास्थेनीस हा अग्रगण्य झाला. ह्या महावक्त्यांचीं नांवें जगद्विश्रुत आहेत, व यांच्या सरासरी बरोबरीस येणारे असे यांच्या वेळेपासून आतां पर्यंत एक दोनच वक्ते निपजले. ही गोष्ट एकट्या ग्रीस देशाची झाली. आतां रोमन लोकांच्या इतिहासांत पाहिलें तरी असेंच आढळतें कीं, त्यांच्या कवितेचा जन्म, कार्थेज शहराशीं ज्या काळीं भयंकर युद्ध चाललें होतें, त्याच काळांत झाला; आणि प्रजासत्ताक राज्य अगदीं मोडकळीस आल्याच्या वेळीं जो मोठा दंगा इटाली देशांत उसळला होता, त्याच वेळेस विख्यात वक्ता सिसरो, व व्हर्जिल, होरेस वगैरे महाकवि, व कित्येक इतिहासकारही उदयास आले. इंग्लंडाच्या इतिहासांतही असेच प्रत्यय आढळतात. महान् ग्रंथकारांचीं अशीं वचनें आहेत कीं, शेक्सपीयर जो इतका लोकोत्तर कवि झाला, तो, त्याच्या आधीं ज्या ‘ रोझेस् ’ च्या ह्मणजे राजकीय घराण्यांतील भाऊबंदांच्या भयंकर लढाया इंग्लंडांत झाल्या, त्यांच्याच मुळें झाला. हें ह्मणणें तरी समजण्यास फार कठीण आहे असें नाहीं. वर सांगितलेल्या लढाया शेक्सपीयर याच्या जन्मभूमीच्या जवळ जवळच बहुतेक झाल्या असून त्या होऊन तेव्हां पुरतीं शंभर वर्षें ही झालीं नव्हतीं. शिवाय भाऊबंदकीच्या दाव्यास पेटून दोन्हीही पक्षांनीं अशीं घोर कृत्यें केलीं होतीं, कीं त्यांची आठवण या कवीच्या वेळेस तर अगदींच बुजाली नसेल. तेव्हां जें

स्थिल पहावें, जी गोष्ट ऐकावी, त्या सर्वांवरून झालेल्या भयंकर गोष्टी जशा काय डोळ्यांपुढें उभ्या राहाव्या असें अशा वेळेस असतें. मग ज्या अर्थीं कवि अत्यंत सहृदय असतात, त्या अर्थीं पाहिलेले पदार्थ व ऐकिलेल्या गोष्टी त्यांच्या मनांवर अगदीं पूर्णपणें ठसलेल्या राहतात. त्यांतूनही शेक्सपीयर कवीची कल्पनाशक्ति अत्यंत विशाल असल्यामुळें मागें झालेल्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्याप्रमाणें त्याच्या मनास भासत असतील. यावरून पाहतां हें स्पष्ट आहे, कीं मनुष्याची बुद्धि जात्या कितीही प्रखर असली तरी समयविशेषीं तीस अधिक तीव्रता येते. असो; मिल्टनही एका मोठ्या राज्यक्रांतीच्या समयींच होता, व त्या वेळेच्या वाईट स्थितीस अनुलक्षून लिहिलेले त्याच्या कवितेंत कोठें कोठें उल्लेखही आहेत. विलियम पिट ऊर्फ चाथाम या नांवाचा एक मोठा वक्ता इंग्लंडांत होऊन गेला, याच्याच वेळेस अमेरिकेंतील इंग्रेजी संस्थानांनीं इंग्लंडाशीं युद्ध करून आपलें स्वातंत्र्य संपादन केलें; आणि याच प्रसंगानें त्याच्या वक्तृत्वशक्तीस पुष्कळ उत्तेजन आलें. हीं जीं इतकीं निरनिराळ्या देशांतील उदाहरणें सांगितलीं यावरून आरंभीं सांगितलेल्या सिद्धांताची सत्यता अगदीं स्पष्ट होते. पण इतक्याहीपेक्षां जबरदस्त प्रमाण पाहिजे असल्यास तें हें होय कीं, उलटचा पक्षीं पाहिलें असतांही वरील सिद्धांताच्या उलटच प्रत्यय येतो. ग्रीस देशाचें स्वातंत्र्य नष्ट होऊन आज दोन हजारांवर वर्षें होऊन गेलीं, पण इतक्या काळांत एक तरी साफोक्लीज, डिमासथेनीज् किंवा हिराडटस् जन्मावयाचा होता. रोम येथें बादशाही झाल्यावर बहुतक सगळी झोटिंगपाच्छाईच माजली होती, पण मध्यें

मध्यें जेव्हां जेव्हां कोणी प्रतापशाली बादशाह झाले त्या त्या वेळीं मात्र लिव्ही, प्लुटार्क, वगैरे कोणी नामांकित इतिहासकार झाले. बाकी शेवटपर्यंत शून्याकारच. फार काय, पण आपल्या देशांतही वक्ते, इतिहासकार, मुळींच नसल्याचेंही तेंच कारण; व सध्या त्या न्यूनता पूर्ण करण्याविषयीं जे प्रयत्न चालले आहेत, ते कळकावर कळक घासून वणवा उत्पन्न करूं पाहण्यासारखे किंवा कृत्रिम योजनांनीं भूकंपाचा चमत्कार घडवून आणण्यासारखे प्रायः होत. हे प्रयत्न सर्वथा निष्फळ होतील असें आमचें ह्मणणें नाहीं. पण त्यांपासून जी सिद्धि होणार ती झाल्यास थोडीच होईल यांत अगदीं संदेह नाहीं.

---

[ शालापत्रक पुस्तक ११, अंक १२; एप्रिल १८७२ इसवी. ]

असो, रोमच्या पादशाहीची, उत्तरेकडील गाल जर्मन् वगैरे रानटी लोकांनीं अगदीं धूळधाणी करून सोडल्यावर, सुमारें दोन तीन शतकांनीं तेच लोक पुष्कळ योग्यतेस चढले, व इटालीच्या उत्तरेस व्हेनिस्, जिनोआ, पिसा, इत्यादि बरींच प्रजासत्ताक राज्यें उदत चाललीं. कालांतरें करून तर हीं संस्थानें हिंदुस्थान, आरबस्थान, या देशींच्या व्यापाऱ्यांच्या जोरावर फारच गब्बर झालीं. याप्रमाणें इटाली देशाच्या गतवैभवाची झुळूक पुनः त्यास लागूं लागली; पण सांगायाची विशेष गोष्ट ही कीं, या झुळकीबरोबरच त्या देशाचें विद्येसंबंधी वैभवही त्यास पुनः प्राप्त झालें. डांटे, पेट्रार्क, टासो, वगैरे महाकवि उत्पन्न होऊन शिवाय दुसरेही अनेक ग्रंथकार विख्यात झाले,

हा इतका विस्तार करण्याचा हेतु हा कीं, वर सांगितलेला महत्वाचा सिद्धांत वाचकांच्या पूर्णपणें लक्षांत यावा. इतक्या निरनिराळ्या प्रकारांनीं त्याचें स्वरूप दाखविल्यावर ही त्याच्या सत्यतेविषयीं संशय घेण्यास तिळमात्रही जागा राहिली असेलसें वाटत नाहीं. प्रस्तुतच्या विषयविवेचनाशीं त्याचा कोणता संबंध आहे हें अझून सांगावयाचेंच आहे. गेल्या शतकाच्या शेवटीं शेवटीं, सर्व युरोपखंड जिनें दणाणून दिलें व एकंदर जगाची स्थिति बदलून टाकली, अशी एक मोठी राज्यक्रांति फ्रान्स देशांत झाली. ह्या राज्यक्रांतीचीं राज्यव्यवस्थांगभूत अशीं अनेक कारणें बहुत काळपर्यंत धुमसत होतीं व शेवटीं त्यांचा एकदम भडका होऊन त्या आगीच्या लोळानें युरोपखंडाच्या थेट मर्यादा पाहिल्या. या महाप्रसंगीं इंग्लंड देश सर्व देशांत प्रमुख झाला होता, आणि त्याची खरी थोरवी व शौर्य हीं त्या समयीं जशीं कसास लागलीं त्याप्रमाणें कधींही पूर्वी लागलीं नव्हतीं. तसेंच या वेळीं मोठमोठे वक्तेही प्रसिद्धीस आले. बर्क, फाक्स, पिट, यानीं राज्यव्यवस्थेच्या प्रकरणीं निरनिराळे पक्ष घेऊन पार्लमेंट हौस आपल्या भाषणांच्या कडाक्यांनीं गर्जून टाकलें, व वक्तृत्वाविषयीं मोठी ख्याति मिळविली. तसेच महान महान कविही या समयीं इतके उदयास आले कीं, त्याप्रमाणें पूर्वी कधींही झालें नसेल. त्यांत कालानें व योग्यतेनेंही श्रेष्ठ वर्ड्स्वर्थ हा होय. याची कविता जरी पहिल्यानें केवळ उपहासास्पद अशी बहुतेकांस वाटली, तरी पुढें पुढें याची चहा होऊं लागून, सांप्रतच्या काळीं तर त्यास मान पुष्कळ देतात. दुसरा कवि स्काट होय. हा वर्ड्स्वर्थ याशीं

समवयस्क होता, पण स्काट्लंडदेशाच्या कांहीं भागांचें व विशेषतः क्याट्राइन या सरोवराचें वर्णन यानें इतकें उत्कृष्ट केलें आहे, कीं त्या वेळेस हजारों लोक तीं सुंदर वर्णिलेलीं स्थळें प्रत्यक्ष पाहण्यास त्या त्या ठिकाणीं गेले व अझूनही जातात. हा कवि कीर्तीच्या शिखरास पोचत होता, इतक्यांत बैरन् ह्मणून एक नवाच कवि एकदम प्रसिद्धीस आला. त्याची इतकी विलक्षण कीर्ति झाली, कीं स्काट् याचें त्यापुढें अगदीं मातेरें झालें. पण स्काट् याची बुद्धिच अचाट, त्यानें लागलीच कवितेचा पंथ सोडून दिला आणि 'नाव्हेल्स्' ह्मणजे कादंबऱ्या यांवरच झोड चालविली! या नव्या कृत्यांत तर त्याची पहिल्याहीपेक्षां फारच वाहवा झाली. ती इतकी, कीं मानवी स्वभावाचें ज्ञान व त्याचें रेखल्याप्रमाणें वर्णन करण्याची हातोटी या गुणांत त्यास शेक्सपीयर कवीच्या खालोखाल सर्व गणूं लागले. या नव्या कादंबऱ्यांचा लोकांस असा अवोनात छंद लागला, कीं कित्येक कादंबऱ्यांबद्दल स्काट् यास लाखो रुपये पैदा झाले, व त्यामुळें, व्यापारांत त्यास जी बारा लाख रुपयांची ठोकर लागली होती, ती पैसा न पैसा फेडतां आली. याप्रमाणें स्काट् याची कवि व कादंबरीकार अशा दोहों रीतींनें ख्याति झाली आहे. बैरन् ह्मणून जो कवि सांगितला त्याची कविता उत्कृष्ट तर आहे खरीच, परंतु तींत बीभत्सपणा वगैरे दुर्गुण पुष्कळ आहेत, यास्तव ती चिरकाल लोकप्रिय राहीलसें वाटत नाहीं. हा कवि पराकाष्ठेचा दुर्व्यसनी होता, व आपल्या बायकोपासून भांडून निघून, यानें इंग्लंडाहून निघतांना अशी शपथ वाहून घेतली, कीं पुनः या देशाचें तोंड पाहणार नाहीं. हा त्याचा निश्चय त्यानें शेवट पर्यंत राखिला. इटाली देशांत कांहीं दिवस राहून

तेथून तो ग्रीस देशांत गेला. सान्या जन्मांत अत्यंत स्तुत्य असें हें त्याचें शेवटलेंच कृत्य होय. तें हें कीं, त्यानें ग्रीक लोकांस आपलें हजारो वर्षें नष्ट झालेलें स्वातंत्र्य पुनः मिळवून देण्याच्या कामांत फार झटून मदत केली. पण हा हेतु सिद्धीस गेलेला बघण्यास बैरन् कवि वाचला नाहीं; सुमारें तीन वर्षें अगोदरच मरण पावला. बैरन् याचा मित्र व जोडीचा कवि शेली ह्मणून एक होता. याच्याही कवितेंत जरी बैरन् याच्या प्रमाणेंच बीभत्सतेचे वगैरे दोष आहेत, तरी वास्तविक जिला कवित्वस्फूर्ति ह्मणतां येईल अशी अपूर्व शक्ति याचे ठायीं दिसते, व यावरून आलीकडील प्रसिद्ध ग्रंथकार जे मेकाले साहेब त्यांनीं यास 'पोएट् आफ पोएट्स्' ह्मणजे 'कवींत कवि' असा किताब दिला आहे. याचे कवितेंत औदासीन्य व जगाचा त्रास हे गुण ढळढळीत दिसून येतात, व यामुळें असें वाटतें कीं, जरी भूमध्यसमुद्रांत होडींतून जातांना यास अपमृत्यु घडला नसता तरी हा फार वर्षें वांचताना. याचे अदल्या वर्षीच, दुसरा एक कीट्स ह्मणून कवि होता तो अगदीं अल्पवयी ह्मणजे पंचविसावे वर्षीच मृत्यु पावला. याचेही ग्रंथ बरेच प्रसिद्ध आहेत. पण याचेही अगोदर दुसऱ्या एका कवीची कविताशक्ति प्रकट झाली होती; त्याचें नांव कर्कव्हाइट. हा आपले वयाचे एकुणिसावे वर्षीच मरण पावला. याच्या अकालिक मृत्यूबद्दल मोठमोठ्या ग्रंथकारांनीं आपला खेद दाखविला आहे. प्रत्यक्ष बैरन् कवीनेंच काहीं सुंदर पद्यांत याचें करुणरसपर वर्णन केलें आहे. या शतकाच्या आरंभीं जो कविवृंद जन्मला ह्मणून मागें सांगितलें, त्यांतील अझूनही कित्येक सांगावयाचे राहिलेच आहेत.

पण स्थलसंकोचास्तव तसें करणें प्रशस्त दिसत नाहीं. आतां शेवटीं येवढेंच सांगतों कीं, हल्लीं ज्यांची कवित्वाची कीर्ति चोहोंकडे गाजते आहे, व ज्यांस आपल्या महाराणी साहेबांनीं 'पोएट् लारिएट्' (म्ह० राजकवि) हा किताब देऊन आपल्या आश्रयीं ठेविलें आहे, असे जे टेनिसन् कवि ते ह्या कविमणिमालेंतील शेवटले होत.

---

[शालापत्रक पुस्तक १२ अंक १. मे सन १८७२.]

गेल्या अंकांत इंग्लिश कवींचें थोडें बहुत वर्णन झालें. कवितेंत जे अनुक्रमें करून तीन प्रकार घडून येतात ह्मणून सांगितलें ते दाखविण्यास इंग्लिश कवितेचेंच उदाहरण पहिल्यानें घेण्याचें कारण इतकेंच कीं, ते प्रकार त्या भाषेंतील कवितेंत जसे स्पष्ट दिसून येतात तसे संस्कृतांत किंवा मराठींत येत नाहींत. असें होण्यास तरी मुख्यतः दोन गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत. त्यांतील पहिली ही कीं, इतिहास व विशेषतः चरित्रें लिहिण्याची चाल आपणांत पूर्वी पासून ही मुळींच नाहीं. तेव्हां महान् महान् कवींविषयीं देखील विशेष माहिती तर राहिलीच, पण ते कोणत्या काळीं झाले, कोठें झाले, येवढें देखील निश्चितपणें समजण्याची मोठीच मारामार पडते. फार लांब नको, प्रत्यक्ष कालिदासाचीच गोष्ट पहा. या कवीचें नांव व याच्या विषयींच्या दंतकथा या देशांत अजूनपर्यंत आबालवृद्धांस माहीत आहेत, व यावरून पाहतां असें वाटतें कीं, याची जिवंतपणीं तर फारच कीर्ति झाली असावी. शिवाय, आपणापेक्षां शोधकपणांत फारच वरिष्ठ असे जे इंग्रज लोक, त्यांच्या पैकीं देखील कित्येक पंडितांनीं याचा वृत्तांत मिळ-

विण्याविषयीं बरेच परिश्रम केले. पण इतक्याही गोष्टी अनुकूळ असून त्या बिचाऱ्या कवीचे हाल पहा! त्यास अझून निश्चित शतक देखील मिळत नाहीं! कोणी ह्मणतो कालिदास ख्रिस्ती शकाच्या पूर्वी पहिल्या शतकीं झाला; कोणी ह्मणतो, त्या शकाच्या पुढें दोन तीन शतकांनीं झाला; कित्येक तर त्यास आठव्या नवव्या शतकापर्यंत खेचतात. पण येवढ्यानेंच काय होतें? कोणी तर तीन निरनिराळे कालिदास कल्पितात, व त्यांचे तीन भिन्न भिन्न काळ मानतात. याप्रमाणें अनेकांचे अनेक तर्क चालले आहेत; पण अझून एक तरी बरें आहे. तें हें कीं, कोणीं एखादा नवीन व्लेजेल निघून त्यानें बिचाऱ्या होमर कवीप्रमाणें आपल्या कवीस मुळींच नाहींसा करून टाकला नाहीं! असो; कालिदासासारख्या कवीची देखील ही दुर्दशा, मग इतरांविषयीं तर काय सांगायाचें आहे! सारांश, या काल-रूप अफाट समुद्रावर आपल्या अनेक कवींनीं आपआपला माल कीर्तिरूप नौकेंत निरनिराळ्या बंदरीं भरून लोटून दिला, त्यांपैकीं, यवनाधिपत्य, विद्यालोप, वगैरे मोठमोठ्या कहरांतून निभावून जो या कडेपर्यंत येऊन पोंचला तो आपल्या हातीं आहे येवढीच गोष्ट, बाकी त्यावर नांव गांव वगैरे असेल ह्मटलें तर कांहीं नाहीं. साफोक्लीज, एस्-चिलस वगैरे ग्रीक नाटककारांनीं शंभर शंभर दीडशें दीडशें नाटकें लिहून, आपल्या कालिदास भवभूति इत्यादिकांनीं, दोन तीन ह्मणजे पराकाष्ठा, इतकींच रचिलीं असतील हें बुद्धीस विसंगत वाटत नाहीं काय? पण चमत्कार हा, कीं आपल्या कवींचे ग्रंथ मुळचेच इतके किंवा कांहीं बुडून इतके राहिले, येवढें देखील समजण्यास लेशमात्रही कोठें

आधार सापडत नाहीं. दुसरें कारण असें कीं, काव्याचें गुणदोषविवेचन करण्याचा प्रघात आपणांत पूर्वीपासूनही फार कमी. कवि प्रसिद्धीस येऊं लागल्यापासून तों त्याची कीर्ति एकदा स्थाईक होईपर्यंत त्याविषयीं त्या त्या वेळचे विद्वान पंडित काय चर्चा करीत असतील ती असतील; पण एकदा कवींच्या पटांत त्याचें नांव पडलें कीं पुरे; मग त्याविषयीं कोणी अक्षर देखील बोलावयाचें नाहीं! सुमारें तीनशें वर्षांपूर्वी युरोपखंडांत ज्याप्रमाणें अरिस्टाटल याच्या ग्रंथांचें प्राबल्य असे, व त्यांत यत्किंचितही दोष काढणें ह्मणजे केवळ पातकच असें लोक मानीत असत, त्याचप्रमाणें आपल्या देशांतील पंडितांची देखील कवि, शास्त्रकार इत्यादिकांविषयीं समजूत असावी असें दिसतें. मिल्टन, ड्रायडन, बेकन इत्यादि महान ग्रंथकारांविषयींही इंग्रेज ग्रंथकार अगदीं निर्भीडपणें जे अभिप्राय देतात ते वाचून आमच्या देशांतील पंडितांच्या तर अंगावर खरोखर कांटा उभा राहील! काव्यादिविवेचनविषयक असे, संस्कृत भाषेंत आजपर्यंत, व विशेषतः आलीकडे कर्नाटक वगैरे देशांत, बरेच ग्रंथ झाले आहेत, हें खरें आहे. तथापि त्यांत रस, अलंकार, इत्यादिकांचें केवळ निरूपण, किंवा नाटकादिकांत अंक किती असावे, पात्रें कशीं असावीं, याचाच काय तो विचार प्रायः आढळतो. कवित्वाचें खरें स्वरूप व मनाच्या निरनिराळ्या व्यापारांशीं त्याचा कसकसा संबंध असतो वगैरे मार्मिक विषयावर इंग्लिश भाषेंतील शेंकडों ग्रंथांत जसें यथास्थित उपपादन आहे तसें यांत नाहीं ह्मटल्यास चालेल. असो; याप्रमाणें कवींचा क्रम लावण्याची हीं दोन्ही साधनें आपणांमध्यें मुळींच नसल्याकारणानें तो

उद्योग आजपर्यंत कोणाच्याच हातून धड झाला नाहीं, व या पुढेंही होण्याचा संभव फारसा दिसत नाहीं. तेव्हां संस्कृत कवींचीं नांवें यापुढें ज्या क्रमानें येतील तो क्रम केवळ त्यांच्या प्रसिद्धीचा, त्यांचा शकक्रम नव्हे, हें सांगणें नलगे.

इंग्लिश कवींच्या वर्णनाच्या अगोदर त्या भाषेची उत्पत्ति कशी झाली वगैरे कांहीं गोष्टी सांगितल्या होत्या, तसें येथेंही करणें अवश्य होतें. पण निरुपायाची गोष्ट. ज्या भाषेचा उत्कर्ष होऊं लागल्यास अद्याप सहाशें देखील वर्षें पुरतीं लोटलीं नाहींत, व हल्लींही जिचा भर चालला आहे, ती भाषा कोणीकडे; व युरोपांतील अतिप्राचीन राष्ट्रें जीं ग्रीक व रोमन, तींही जेव्हां केवळ अज्ञानग्रस्त मात्र होतीं तेव्हांच—ह्मणजे ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं कित्येक शतकांमागें—जिचा भरभराट चालला होता, व जी नाहींशी झाल्यासच आज हजारांवर वर्षें होऊन गेलीं, ती कोणीकडे? आतां हें खरें कीं, वैदिककाळची स्थिति, निरनिराळ्या शास्त्रकारांचीं मतें इत्यादि गहन विषयांवर भरसभेंत दिलेलीं व्याख्यानें आपण पुष्कळ ऐकतों; परंतु तीं बहुधा सर्वज्ञतेचा आव घालण्याच्या आलीकडील संप्रदायासच अनुसरून असतात, ह्मणजे त्यांत तथ्यापेक्षां डौलच विशेष असतो. युरोपांत जे कोणी महान संस्कृतज्ञ आहेत त्यांच्याही ग्रंथांत या भाषेच्या मूलस्थितीविषयीं कोठें कोठें लिहिलेलें असतें, पण त्यावरही भरंवसा फारसा ठेववत नाहीं; कारण त्यांचें लिहिणें धर्मपुस्तकाच्या धोरणानें नेहमीं चालत असतें. वेदासारख्या अतिप्राचीन ग्रंथांसही ख्रिस्तीशतकाच्या फार पूर्वीं नेतां कामा नये, कारण तो शक चार हजारांवर गेला कीं पुरे, लागलीच भलतेंच होऊन जग उत्पन्न झाल्याच्या आ-

धींच ग्रंथ झाले असें युक्तिशून्य ह्मणणें त्यांच्याच गळ्यांत येऊं लागेल! याप्रमाणें संस्कृत भाषेचें आद्यस्वरूप समजण्याचे मार्ग बंद आहेत; आणि वास्तविकपणें पाहतां, तें शोधून काढण्याची हाव बांधणें आणि चंद्राच्या किंवा शनीच्या रचनेविषयीं येथून शोध करणें हीं दोन्ही सारखींच आहेत. या भाषेची रचना पाहिली तर तीविषयीं निर्णय करणें इतकें कठीण नाहीं. ज्याचा या भाषेशीं यत्किंचितही परिचय असेल त्यास देखील प्रौढता, अप्रतिम मधुरत्व इत्यादि जे तिचे केवळ अंगभूत गुण आहेत त्यांची चांगली पारख होईल. शिवाय या भाषेला शब्दांचाही भरणा भरपूर आहे, व त्यांचे समास करण्याच्याही तऱ्हा पुष्कळ व चमत्कारिक असल्यामुळें शब्दांची टुमदार व खुबीदार ठेवण या भाषेंत जशी साधते तशी जगांतील इतर कोणत्याही भाषेंत साधत नाहीं. या सर्व गोष्टींमुळें संस्कृत कवितेस फारच विचित्र शोभा आली आहे, व अनेक महाकवींच्या रसात्मक कृतींचें रमणीय शुद्ध स्वरूप या बाह्यालंकारांनीं तर फारच खुलतें आहे. जयदेव कवीनें ह्मटलें आहेः—

यस्याश्चोरश्चिकुरनिकरः कर्णपूरो मयूरो
भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः।
हर्षो हर्षो हृदयवसतिः पंचबाणस्तु बाणः
केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय॥

"ज्या कवितावधूचा चोर हा चिकुरनिकर (केशपाश), मयूर हा कर्णपूर (कर्णभूषण), भास हा हास (हास्य), कवि कुलाचा गुरु ह्मणजे कविश्रेष्ट जो कालिदास तो जिचा विलास, हर्ष हा हर्ष (चित्ताचा उल्हास), आणि बाण हा

जिच्या हृदयांत संचार करणारा साक्षात पंचबाण ( मदन ) च होय, ती कोणाच्या चित्तास मोहून टाकीत नाहीं?"

वरील श्लोकांत निरनिराळ्या कवींवर कवितावनितांगभूतत्वें करून जीं निरनिराळीं रूपकें केलीं आहेत तीं फारच मार्मिक व यथायोग्य आहेत असें कोण ह्मणणार नाहीं? तरीही या मालिकेंत दोन तीन मोठमोठींच रत्नें ओंवावयाचीं राहिलीं. त्यांतील एक भवभूति. वरील प्रत्येक कवीचे नांवाशीं जसे प्रास साधले आहेत तसा भवभूति या नांवाशीं साधतां न आल्यामुळें किंवा तें नांवच घालतां न आल्यामुळें तसें झालें असेलसें वाटतें. दुसरें वर्णनकर्ते स्वतः कविच. 'गीतगोविंद' या सारख्या अप्रतिम काव्याचा कर्ता कविमालेंत शोभला नसता असें नाहीं; पण आत्मश्लाघादोष न यावा ह्मणूनच जयदेवानें तसें केलें नाहीं हें उघड आहे. तिसरे जगन्नाथराय. हा कवि जयदेवानंतर पुष्कळ वर्षांनीं झाला. तेव्हां अर्थातच त्याचीही गणना वरील पद्यांत नाहीं.

आतां कविकुलाच्या गुरूपासूनच वर्णनास आरंभ करूं.

---

[ शालापत्रक पुस्तक १२ अंक १. मे सन १८७२ ]

## समुद्र.

हे सागरा! तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून जों जों विचार करूं लागावें तों तों नव्या नव्याच कल्पना मनांत येऊं लागून बुद्धीस अधिकाधिक चमत्कार भासतात, आणि आश्चर्यभरांत चित्त अगदीं थक्क होऊन जातें! ज्याप्रमाणें मनुष्यांच्या पिढ्या न पिढ्या एकामागून एक जन्मास येऊन कांहीं काळानें लागलींच विलयास जातात, त्याप्रमाणें

तुजवर हजारों लाटा एकावर एक येऊन भराभर बुजून नाहींशा होतात, आणि त्याच्याप्रमाणेंच यांच्या वास्तव्याची मागें खूण देखील रहात नाहीं! तुझ्या लाटा साऱ्या पृथ्वीच्या किनाऱ्यांवर आदळत आहेत, आणि, ज्यांचें निकट सानिध्य त्यांच्या अक्षय वैरास मात्र कारणभूत होतें, अशा देशांची तोंडातोंड करून तूं त्यांचें कलाकौशल्य व संपत्ति हीं परस्परांस देववितोस, व येणेंकरून सर्व जगास तुझ्यामुळें सुखाचा व समृद्धीचा लाभ होत आहे.

तुझे देखावे तरी निरनिराळ्या समयीं किती विचित्र असतात! त्यांची शोभा व भव्यपणा हीं कोठवर वर्णावीं!—कधीं वाऱ्याची हालचाल अगदीं बंद होऊन तुझा सर्व विस्तार अगदीं निश्चल दिसतो—कधीं नुकताच सूर्योदय झाला असल्यामुळें क्षितिजाची कड रुप्यानें जणों काय मढविलीच आहे अशी भासते—कधीं तोच सूर्य अस्तास जाऊं लागून संध्याकाळचें आकाश त्याच्या सोनेरी किरणांनीं देदीप्यमान झालें असतें, व अशा वेळेस आरशाप्रमाणें स्थिर अशा तुझ्या पाण्यावर जेव्हां आकाशाची कमानची कमान शाबूद उठलेली असते तेव्हां ती तर काय शोभा सांगावी!—पण हीं सर्व सौम्य रूपें टाकून जेव्हां तूं आपलें उग्र स्वरूप धारण करतोस—जेव्हां काळ्या दाट ढगांनीं आकाशांत गाढ अंधार होऊन तुफानाच्या वाऱ्याच्या सोसाटयांनीं तूं अगदीं खवळून जातोस, व तुझ्या प्रचंड लाटा उसळून मेघमंडळाशीं एकवट होऊं पाहतात—जेव्हां मृत्यु आपलें भयंकर आधिपत्य तुजवर चोहोंकडे चालवीत असतो—जेव्हां अशा तडाक्यांत सापडलेला बिचारा खलाशी भयानें गर्भगळित होऊन त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात,

व त्याचे इष्टमित्र त्याजकरितां जागच्या जागीं हळहळत असतात,—अशा भयंकर प्रसंगीं तुजकडे पाहण्याची कोणाची छाती आहे !

हे रत्नाकरा ! इतकें झालें तरी हे सर्व खेळ केवळ तुझ्या पृष्ठभागावरचे-तुझें आंत जें विस्तीर्ण राज्य आहे त्यांत तर काय काय चमत्कार असतील याची कल्पना तरी कोणीं करावी ! तेथें जे मोठमोठाले खडपे व विशाल दऱ्या असतील, त्यांत जे नाना प्रकारचे हजारो प्राणी व वनस्पती असतील, त्या पाहिलेला कोण मनुष्य आहे ? व तसेंच रत्नें वगैरे ज्या कोट्यावधि सुंदर वस्तु तुझ्या तळीं लोळत असतील त्यांचा तरी कोणास पत्ता लागेल काय ?

याप्रमाणें विचार पुढें चालविले असतां बुद्धि अगदीं कुंठित होऊन जाते. पण जेव्हां तुझ्या भरती-ओहोटीविषयीं विचार करावा-कीं ज्या जगाच्या आरंभापासून आज पर्यंत कधींही टळल्या नाहींत-तेव्हां, ज्यानें आपल्या अपार सामर्थ्यानें तुला निर्माण केलें, व तुझ्या मर्यादा अशा रेखून टाकल्या, कीं तूं येवढा उच्छृंखल खरा, परंतु त्यांचें उल्लंघन तुझ्यानें होऊंच नये, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष लागून विचारशक्ति गुंग होऊन जाते, व तिची गतिच पुढें होत नाहीं !!

[ शालापत्रक पुस्तक ११ अंक १२; एप्रील सन १८७२ ]

## मिसिप्साराजाचें जुगार्था याशीं भाषण.

प्राचीन काळीं रोमन व कार्थेजिनियन लोकांचें जें मोठें युद्ध झालें तें इतिहासप्रसिद्ध आहे. त्या युद्धांत न्युमिडिया प्रांताच्या राजानें रोमन लोकांचें फार साहाय्य केलें. हा प्रांत कार्थेज शहराजवळच कांहीं अंतरावर होता. पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत रोमन लोकांचें तेथच्या राजाशीं अत्यंत सख्य होतें. मिसिप्सा हा न्युमिडिया प्रांताचा राजा असून त्यानें जुगार्था यास आपणापाशीं लहानपणापासून बाळगिलें होतें; कारण कीं, त्यास पुत्रसंतान नव्हतें. पण पुढें दैववशात् त्यास दोन पुत्र झाल्यामुळें त्यास मोठी चिंता पडली. ती अशी कीं, जुगार्था हा मोठा उच्छृंखळ आहे, हा पुढें मागें आपल्याच मुलांचा घातपातही करण्यास मागें पुढें पाहावयाचा नाहीं. इतक्यांत न्युमान्शिया ( पोर्तुगाल ) देशांत रोमन लोकांशीं लढाई उपस्थित झाली तेव्हां त्यांच्या साहाय्यास ह्मणून मिसिप्सा राजानें जुगार्था यास पाठविलें, कीं त्या लढाईत तो खपला तर बरीच गोष्ट होईल. पण त्याप्रमाणें न होतां त्या लढाईत जुगार्था याची मोठी कीर्ति मात्र झाली. मग आपल्या अंतकाळीं मिसिप्सा राजानें त्यास जवळ बोलावून त्याशीं हें पुढील भाषण केलें. हें वास्तविक पाहतां त्याचें खुद्द भाषण नव्हे, तर सालस्ट नांवाच्या रोमन इतिहासकारानें रचिलेलें होय.

---

जुगार्था, तुला माहीतच आहे कीं, तुझीं आईबापें लहानपणींच मरून जाऊन जेव्हां सर्व जग तुला ओस झालें, व तुझ्या ममतेचें मनुष्य तुला कोणीच उरलें नाहीं, तेव्हां मीं

तुला पदरांत घेऊन आजपर्यंत तोंडचा घास देऊन वाढविलें. मीं आपल्या राज्यांतील मोठमोठे हुद्देही तुला देऊन लहानाचें मोठें केलें. असें करण्यांत पूर्वींपासून माझा असा उद्देश होता कीं, तूं माझ्या उपकारांचें स्मरण निरंतर मनांत बाळगावें; व मला कदाचित् औरस पुत्र झाल्यास माझ्या मागें त्यांचा सांभाळ तूं मजप्रमाणें करावा. तूं इतके दिवस माझ्या वचनाबाहेर कधींही वागला नाहींस व शिवाय अनेक प्रसंगीं राज्यकारभारांत मोठी दक्षता दाखवून मला फार संतोष दिलास. न्युमानाशिया देशांत नुकती जी लढाई झाली तींत तर खूपच तरवार गाजवून तूं मला व माझ्या राज्यास मोठेंच भूषण आणिलेंस; आणि रोमन लोकांचा जो आपणाशीं पूर्वींपासून स्नेहभाव चालत आला आहे तोही विशेष दृढ केलास. तसेंच स्पेन देशांतही माझ्या नांवाचा दरारा करून देऊन तूं तेथील लोकांत या राज्याचा मोठा लौकिक केलास. याप्रमाणें तूं आपल्या आंगच्या पराक्रमांनीं, ज्यांस तुझा बडिजाव सहन न होऊन तुझा मोठा मत्सर वाटत असे, त्यांस खालीं पाहावयास लाविलेंस व त्याचीं तोंडें बंद करून टाकिलींस. मी आतां काय दोन चार घटकांचा सोबती आहें! तर जिवलगा जुगार्था, माझी ही तुला आतां शेवटली प्रार्थना येवढीच आहे कीं, तूं माझ्या मुलांस आपल्या प्रत्यक्ष भावांप्रमाणें समजून त्यांस तिळमात्रही कधीं अंतर देऊं नकोस; तुला या माझ्या उजव्या हाताची, या सर्व राज्याची, व साक्षात देवांची शपथ आहे. तूं या दोघांस सोडून तिऱ्हाइताचा कोणाचाही सल्ला घेऊं नको, व तिघेही एका जुटीनें रहा, म्हणजे तुम्हांस कोणाचेंही भय नाहीं. राज्य जें अभंग राहतें तें लोक शूर असल्यामुळें किंवा

देशांत संपत्ति अपार असल्यानें, राहत नसतें; तर तसें होण्यास लोकांचा राज्यकर्त्यांशीं व राज्यकर्त्यांचा परास्परांशीं खरा स्नेहभाव असला पाहिजे. पण हा स्नेहभाव संपत्तीच्या लोभानें होत नाहीं, किंवा जबरदस्तीनें ठेवूं ह्मटल्यास राहत नाहीं; तो एकमेकांच्या कामीं पडून व परस्परांशीं सचोटीनें वागूनच काय तो जडायाचा. त्यांतून तुमचें तर परस्पर बंधुत्वाचें नातें आहे, तेव्हां अशा आर्धींच्या संबंधानें तर तो स्नेह किती दृढ होईल बरें! जर तुह्मांमध्यें असा उत्कृष्ट स्नेह न होईल तर तो आणखी कोठें होणार आहे? सध्या राज्याची व्यवस्था फार चांगली आहे, पण ती याहीपेक्षां उत्तम होणें किंवा अगदीं बिघडून जाणें हीं दोन्ही तुझ्यावर आहेत. आपआपसांत मिलाफ असल्यास लहानसान राज्यही वृद्धिंगत होऊन उत्तम दशेस पोचतें, पण तोच नसला ह्मणजे मोठमोठीं राज्यें देखील धुळीस मिळून जातात. तर जुगार्था, या विस्तीर्ण राज्याचा भार निरंतर मस्तकीं वाहून त्यास कोणत्याही प्रकारें अपाय होऊं न देण्याविषयीं तुलाच स्वतः जपलें पाहिजे; कां तर तूं आपल्या भावांपेक्षां वयानें व विचारानें पोक्त आहेस. यास्तव जर या पुढें कदाचित् तुझ्यांत व तुझ्या भावांमध्यें वैमनस्य पडलें,—देव करो व तसें कधींही न होवो—तर तुजकडे कांहीं दोष नसतांही लोक तुजवरच टपका ठेवितील, कीं यानेंच बळानें कुरापत उकरून काढिली. तर या सर्व गोष्टींचा चांगला विचार कर. हें सर्व तरी, तुजवर जो माझा अतिशय लोभ आहे, त्या लोभास्तव मी सांगितलें; एरवीं माझ्या मनास असा पूर्ण भरंवसा आहे, कीं तूं आपल्या भावांचें चांगलें प्रतिपालन करून त्यांच्या पूज्य बुद्धीस व कृतज्ञतेस पात्र होशील.

[ शालापत्रक पुस्तक १२ अंक २; जून १८७२ इसवी. ]

# रोमनलोकांच्या सेनेट सभेपुढें आधरबाल यानें केलेलें भाषण.

मागील एका अंकांत मिसिप्सा राजानें आपल्या अंतकाळीं जुगार्था याशीं जें भाषण केलें तें लिहिलें होतें; व त्याच्या आरंभीं असेंही सांगितलें होतें, कीं त्या राजास उतार वयीं दोन पुत्र झाले. त्यांतील एक हिंप्साल आणि दुसरा, हें पुढील भाषण करणारा, आधरबाल. यास रोमन लोकांच्या सभेपुढें भाषण करण्याचा प्रसंग कशामुळें आला असेल याचा तर्क वाचकांस सहज होईलच. तो वृद्ध राजा मरण पावून कांहीं काळ लोटतो आहे तोंच, ज्या गोष्टीचा मोठा धाक मानून तो निरंतर काळजी वाहत असे, त्या घडून आल्या. त्या अशा कीं, अधम व कृतघ्न जुगार्थानें राज्यांतील सर्व सत्ता बळकावली, व हिंप्सालास तर मृत्युपंथास लावून आधरबाल यास कोठें थारा नाहींसा केला. मग त्या राज्याचे मुकत्यार व कैवारी ह्मणविणारे जे रोमन लोक त्यांकडे हा फिर्याद गेला, आणि त्यांच्या सेनेट सभेपुढें त्यानें हें पुढील भाषण केलें.

---

हे सभासद हो ! तुह्मा सर्वांस माहीत आहे, कीं माझा बाप मिसिप्सा यानें आपल्या मरणसमयीं आह्मांस जवळ बोलावून न्युमिडिया देशाचा राज्याधिकार मी व परलोकवासी माझा बिचारा भाऊ हिंप्साल, आणि जुगार्था अशा तिघांस वाटून दिला. त्या वेळेस त्यानें आह्मांस बजावून

सांगितलें, कीं ' पुत्रांनो, तुम्ही या राज्याचे केवळ नांवाचे मालक आहां, त्याची खरी मुकत्यारी रोमन लोक व त्यांची सेनेट सभा यांकडे आहे; यास्तव युद्धप्रसंग असो किंवा शांतता असो, तुम्ही त्यांच्या सेवेंत कधीं तिळमात्रही अंतर करूं नका. मग तुम्हांस कोणाचेंही भय असणार नाहीं. रोमन लोकांचा एकटा प्रभावच तुम्हांस मोठमोठ्या सैन्यांच्या, किल्लेकोटांच्या व द्रव्यनिधींच्या जागीं होईल. '

याप्रमाणें बापाचा शेवटला उपदेश हृदयांत ठसवून घेऊन, त्याबाहेर कधींही चालायाचें नाहीं असे जों आमचे बेत चालले आहेत, तोंच जुगार्था आमच्या नाशास उद्युक्त झाला. माझ्या बापानें त्याजवर जे उपकार केले होते ते लेशही न स्मरतां तो दुष्ट आम्हांसच पाण्यांत पाहूं लागला; व दयेची तर अगदीं वार्ता सोडून देऊन, त्यानें माझ्या बिचाऱ्या भावाचा घात केला व मला स्वतःच्या राज्यांतून व देशांतून हाकून लाविलें. माझा आजा मासिनिसा, व बाप मिसिप्सा, यांनीं रोमन लोकांचे जे अनेक प्रसंगीं जिवास जीव देऊन साह्य केलें, त्यामुळें रोमन लोकांचा मजवर लोभ आहे व मला छळणाराचें पारिपत्य केल्याविना ते कधींही राहायाचे नाहींत, असें त्यास पक्कें माहीत असतांही त्याचें इतकें धारिष्ट व्हावें काय ?

सभासदहो ! जो मी नुकताच येवढें राजवैभव भोगीत होतों, त्या माझी या दुष्टाच्या हातून इतकी दुर्दशा व्हावी ही मोठ्या दुःखाची तर गोष्ट खरीच; पण या प्रसंगीं दुसरा एक विचार माझ्या मनांत येऊन तो माझ्या हृदयास फारच डाचत आहे. तो हा कीं, तुमचें साह्य मागावयास जो मी आलों आहें तो केवळ माझ्या पूर्वजांच्या बळावर;

आंगच्या पराक्रमानें एखाद्या आणिबाणीच्या प्रसंगीं तुमच्या उपयोगीं पडल्यानें नव्हे. पण काय उपाय ! जुगार्थानें मजवर जो कहर उसळविला आहे, त्यामुळें मलाच कोठें थारा नाहींसा झाला आहे, व मजपासून जो तुह्मास उपयोग घडणार तो होण्याच्या अगोदर मजकरितां तुह्मांस तसदी पडणार आहे. परंतु हा विचार सध्या राहो; सांप्रत जी विपत्ति मला बेनाहक प्राप्त झाली आहे तीवरून पाहतांही मी तुमच्या दयेस पात्र होत नाहीं काय ? अहो, नुकतीच माझ्या हातांत केवढी सत्ता होती ! ज्या विख्यात राजांच्या कुळांत मी निपजलों त्यांचें भूषण वाटून मी आपणास किती धन्य मानीत असें ! पण इतक्यांतच काय काळ फिरला पहा ! मजकडून यत्किंचितही वाकडें झालें नसून माझें राज्य व अधिकार शत्रूनें हिरावून घेऊन मला कोठेंही आसरा ठेवला नाहीं, व स्वराज्य हातीं येण्यासाठीं परराष्ट्राचें साह्य मागण्याची पाळी आणली. या प्रजासत्ताक राज्याचा दरारा चोहोंकडे असल्यामुळें न्यायाचा अभिमान बाळगणेंही याजकडेच आहे; यास्तव मजवर जीं दुःखें कोसळलीं आहेत, त्याबद्दल कीव येऊन माझा अंगीकार करून जो दुष्ट अधिकाराच्या मदानें अनाथास बेनाहक चिरडूं पाहत आहे त्यास यथायोग्य शासन करणें हें या राज्याच्या थोरपणास फार भूषणास्पद होईल. पण इतकेंच करून तरी जुगार्था राहिला आहे काय ! नाहीं; जें राज्य सेनेट सभेनें व रोमन लोकांनीं माझ्या पूर्वजांस दिलें, व ज्यापासून तुमच्या बळावर माझ्या आजानें व बापानें, सिफ्याक्स राजा व कार्थेजिनियन लोक अशा दोघांसही हाकून लाविलें, त्याच देशाच्या हद्दपार यानें मला करून

टाकलें आहे. महाराज, तुह्मीं आपल्याकडून जे आमच्या घराण्यावर उपकार करून ठेविले, त्यांवरच अशा प्रकारें हा विरजण घालीत आहे; आणि माझा छळ करण्यानें तो तुमच्या प्रतापास कस्पटाप्रमाणें लेखीत आहे, हें उघडच दिसतें.

हाय हाय ! काय दैवाचा फेरा ! काय अकांत हा ! ताता मिसिप्सा राजा ! तुझ्या उदारपणाचें शेवटीं फळ असें व्हावें काय,—कीं, ज्याचें आपल्या पोटच्या पुत्रांबरोबर संगोपन करून ज्यास तूं शेवटीं राज्याधिकारासही चढविलेंस त्यानेंच पुढें त्यांवर उलटून त्यांचा घात करावा? न्युमिडियाच्या राजवंशास स्वस्थता ह्मणून कशी ती ठाऊकच नसावी काय? व रक्तपात ह्मणजे नित्याची गोष्ट होऊन जावी काय? कार्थेज शहर जोंवर होतें, तोंवर युद्धप्रसंग वरचेवर चालत असल्यामुळें आह्मास स्वस्थतेचें वारें कधींही लागलें नाहीं, तें ठीकच होतें; कां तर आमचा शत्रु अगदीं सन्निध असून आमचे साह्यकारी जे बलाढ्य रोमन लोक ते दूर असत. त्या वेळेस आह्मास अनेक प्रकारचे प्रसंग काढावे लागले. पण ज्या वेळेस अफ्रिका देशाची ती व्याध समूळ नाहींशी झाली, त्यावेळेस मोठा आनंद होऊन आह्मास वाटलें, कीं आतां बरीक सदा सर्वकाळ येथें शांतता नांदेल. परंतु सध्याचा प्रकार पहा ! राजकुलाचा रक्तस्राव होऊन सर्व देश जणों काय न्हाला आहे, व त्यावर नुकतीच ज्याची सत्ता गाजत होती त्या राजाचा प्रत्यक्ष पुत्रच घरांत घेतलेल्या मारेकऱ्याच्या तडाक्यांतून मोठ्या शर्थीनें निभावून देशोधडीस लागला आहे, व त्यास स्वतःच्याच राज्यांत धडगत नाहींशी होऊन परराष्ट्राची करुणा भाकण्याचा प्रसंग आला आहे !

जिकडे जिकडे पहावें तिकडे तिकडे भय व घोर अनर्थ हींच माझ्या नजरेस येतात; निर्भय असें ठिकाण कोठेंही नाहीं. आपल्या पूर्वजांच्या राजधानीकडे जाईन ह्मटलें, तर माझ्या भावाचा मारेकरी माझ्या बापाचें तक्त बळकावून बसला आहे; मी जातांच, जे हात माझ्या भावाच्या रक्तानें लाल झाले आहेत, तेच माझ्याही रक्तानें भरविण्यास तो चुकेल काय? जर दुसऱ्या एखाद्या राजाचा आश्रय पहावा, किंवा त्यापाशीं साह्य मागावें, तर तेंही व्यर्थ; कां कीं, रोमन प्रजासत्ताक राज्यानेंही मला अंगाबाहेर टाकल्यावर मला आपलासा ह्मणणारा दुसरा कोण सांपडणार? माझीं ममतेचीं कुटुंबांतील माणसें किंवा इष्टमित्र यांची तर गोष्ट बोलायासच नको. माझा बाप केव्हांच लोकांतरास गेला,–तेथें त्यास शत्रूचा अपकार कधींही पोंचणार नाहीं, व दुःखांनीं गांजलेल्या त्याच्या पुत्राचा आक्रोशही त्याच्या कानीं कधींही जाणार नाहीं. माझा भाऊ जरी जिवंत असता, तरी परस्परांच्या कळवळ्यानें दोघांचें दुःख हलकें झालें असतें; पण काय सांगावें? न्युमिडिया देशाच्या राजकुळांतील मनुष्यावर ज्याचा हात कदापि वाहूं नये, त्यानेंच, कृतज्ञतेचें ओझें एकीकडे झुगारून देऊन, त्यास अल्प वयांतच संसारयात्रेंतून मुक्त केलें. शिवाय माझ्या पक्षाचे जे जे लोक त्यास वाटले त्यांचाही जुगार्था यानें एकदम सप्पा उडविला. कोणास सुळावर चढवून त्या घोर यातनांनीं त्यांचे प्राण घेतले. कित्येकांस सिंहादिक क्रूर पशूंकडून खाववून, त्यांहूनही क्रूर अशा मनुष्यांस त्यांचा तमाशा दाखविला. अजूनही त्या लोकां पैकीं जे कोणी जगते असतील त्यांस अंधारकोठड्यांत टाकून प्रत्यक्ष मरणाहूनही दुःसह असे त्यांचे हाल तो करवीत असेल!

सभासदहो ! जे तुह्मी रोमच्या राज्याचे मजबूद खात्र असून आज येवढ्या ऐश्वर्यास चढलां आहां, ते तुह्मी या दीन राजपुत्राकडे मेहेर नजर करा, कीं याचें राज्यपद त्या दुष्टानें जबरदस्तीनें हिसकावून घेऊन यास अनंत दुःखें भोगावयास लावलीं, व सांप्रत तर यास दाही दिशा उजाड करून टाकल्या आहेत ! ज्या नष्टानें आपल्या उपकारकर्त्याच्या कुलाचा उच्छेद करून टाकिला त्याच्या कानभरण्या गोष्टीकडे लक्ष देऊन तुह्मी आपल्या शुद्ध अंतःकरणास मळवूं नका. ज्या औदार्यशील राजानें प्रत्यक्ष आपल्या पुत्रांबरोबर त्यास राज्याचा भागीदार केला, त्याच्याच पुत्रांवर व आप्तवर्गावर उलटून त्यांचा विध्वंस करण्यासही जो कुलांगार चुकला नाहीं त्याचें एक अक्षरही ऐकूं नका. माझ्या कानावर असें आलें आहे, कीं आपल्या विरुद्ध आपल्यामागें सेनेट सभेचा कांहीं ठराव होऊं नये, ह्मणून त्यानें आपले कांहीं लोक येथें पाठविले आहेत, व त्यांकडून तो तुमचे मनांत असें भरवून देत आहे कीं, मी आपलीं दुःखें उगीच फुगवून सांगतों, व मी आपल्या राज्यांत स्वस्थ राहतों तर मला कोणत्याही प्रकारें त्याजकडून उपद्रव पोचताना. पण महाराज, जर एकदा असें होईल, कीं याच्या पापाचा घडा भरून ईश्वर यास यथान्याय भयंकर शासन करील, तर हाच त्या वेळेस मजप्रमाणें काकळूत करूं लागेल; आणि सध्यां पापास भिईनासा होऊन जो बेधडक दुर्व्यास चिरडीत आहे व मदानें धुंद होऊन गेला आहे, तोच दुर्दैवाच्या गरक्यांत सापडून दुःख करूं लागेल, आणि माझ्या बापाशीं जो

कृतघ्नपणा केला, व माझ्या भावाचा जो घात केला, त्यांब-
द्दल त्यास घोर पारिपत्य घडेल.

हर! हर! काय दुःखाचें मरण तें! हिंप्साल! तूं माझ्या
जिवास किती प्यारा होतास! तुझें दर्शन येवढ्यांतच या
नेत्रांस दुर्लभ व्हावें ना! पण त्याच्या मरणाबद्दल मीं शोक
कां करावा? ज्यानें मिसिप्साच्या कुलांतील कोणत्याही
मनुष्यावर संकट ओढवलें असतां त्या प्रसंगीं उडी घा-
लावी, आपल्या जिवाकडेही पाहूं नये, त्यानेंच त्याचें
राज्य बळकाविलें, त्याचा जीव घेतला, व त्यास संसारांतील
सुखास मुकविलें, हें खरें; पण सध्यांच्या माझ्या स्थिती-
वरून पाहतां तो नशीबाचा खरा, कारण मजवर जे भयंकर
प्रसंग गुदरले, देश सोडून जिवाच्या धास्तीनें जिकडे
वाट फुटेल तिकडे पळावें लागलें, व दुसऱ्या हजारों
तऱ्हांनीं जी माझी दुर्दशा झाली, अशी कीं, तीहून मरणही
बरें, तींतून तरी तो सुटला. त्याचीं गात्रें छिन्नभिन्न होऊन,
रक्तबंबाळ झालेला, तो जमिनींत खोल जागीं पडला आहे
खरा, पण त्यास आतां कोणताही घोर नाहीं. माझ्या का-
ळिजावर तर दुःखाचे घरे पडून, काय करावें हें न सुचल्यानें
मी अगदीं वेडा झालों आहे, आणि दैवानें माझा पिच्छा
पुरवून आपल्या चंचलतेचा जणों काय ध्वजच उभारला
आहे! माझ्या भावाचा प्राण ज्यानें घेतला त्याचा सूड
उगविण्याचें तर दूरच, पण स्वतःचा जीव बचावण्याची
देखील मला पंचाईत पडली आहे. ज्यानें जबरदस्तीनें माझें
राज्य बळकावलें त्यापासून तें माघारें हिसकून घेणें तर
राहिलेंच, पण आपल्या शरीराचें रक्षण करण्याचाही उपाय

न उरल्यामुळें मला परराष्ट्राची त्याबद्दल विनवणी करणें भाग आलें आहे.

आर्यजनहो ! जे तुह्मी या रोमन नगरींत अत्युच्चपदीं विराजमान असून संपूर्ण जगाचीं सूत्रें चाळवीत आहां त्या तुमच्या पायांशीं हा दीन राजपुत्र, जुगार्थानें दिलेल्या दुर्धर संतापानें पीडित होत्साता, शरण आला आहे, याचें रक्षण करा. तुह्मास तुमच्या मुलाबाळांची, तुमच्या देशाची, तुमच्या धर्माची, तुमच्या राज्याची, व ज्या ज्या वस्तु तुह्मास पूज्य किंवा प्रिय आहेत, त्या सर्वांची शपथ घालून, हात जोडून, येवढेंच मागतों कीं, मी कोणास यत्किंचितही दुखवलें नसून, जो दुःखाचा कहर मजवर विनाकारण लोटला आहे त्यापासून मला सोडवा, आणि, न्युमिडियाच्या राज्याची मालकी तुह्माकडे आहे, यास्तव त्यांत जो दंगा उसळा आहे व जीं अघोर कृत्यें होताहेत त्यांचा बंदोबस्त करून तेथें निरंतर स्वस्थता नांदेल असें करा.

---

[शालापत्रक; पुस्तक १२ अंक ३. जुलै १८७२. ]

## विद्याधनप्रशंसा.

### ( अभिप्राय )

ही कविता रा. शिवराम रामकृष्ण नित्सुरे यांनीं प्रसिद्ध करून आह्माकडे तिची एक प्रत पाठविल्यास बरेच दिवस झाले. या पुस्तकाविषयीं आमचें जें मत आहे तें या अंकांत आह्मी वाचकांस सादर करतों.

या पुस्तकाच्या नुसत्या नांवावरूनच प्रथमतः असें वाटतें

कीं, यांत विद्येचा महिमा वर्णिला असेल, पण तसें सर्वथैव नाहीं. विद्येची थोरवी दाखविण्याकरितां एक कल्पित कथा घेऊन ती कवितारूपानें येथें वर्णिली आहे इतकेंच. ती कथा ग्रंथकर्त्यानें एका जुन्या बखरींतून घेतली आहे. तिचा सारांश येणेंप्रमाणें.

कैलास पर्वतावर शिव व कुबेर हे कोण्या एका वेळीं भाषण करीत असतां, दोघांत, विद्या थोर कीं धन थोर याविषयीं वाद पडला. तेव्हां शिवानें आपल्या गळ्यांतील वासुकी नामक सर्पास आज्ञा केली, कीं भूलोकीं जाऊन विबुधनामक नगरास आपल्या विषानें जाळून टाक. सर्पानें तसें करून सर्व शहरच्या लोकांत मोठा आकांत करून दिला. शेवटीं राजानें आपलीही धडगत नाहींशी पाहून आपली सर्व संपत्ति बाहेर काढली; आणि त्या सर्पास जो जिंकील त्यास ती सर्व देऊं केली. तरीही कोणी धजावेना. शेवटीं त्या नगरांतील एका तपस्वी ब्राह्मणानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें त्या सर्पास दूर केलें. मग शिवानें आपल्या कृपेनें तें सर्व नगर पूर्ववत् केलें, व याप्रमाणें विद्येच्या श्रेष्ठत्वाविषयीं कुबेराची खात्री केली.

ही गोष्ट ह्मणण्यासारखी सुंदर किंवा समर्पक जरी नाहीं तरी कवितेचा विषय होण्यास केवळ अयोग्य असें ह्मणवत नाहीं. हिचा कांहीं भाग असंबभनीय आहे, यास्तव आलीकडील विद्वानांस तो बहुधा रुचणार नाहीं असें ग्रंथकर्त्यानें आपलें भय प्रदर्शित केलें आहे, पण ही अगदीं गैरसमजूत होय. कवितेचा वास्तविक उद्देश काय व मनाच्या कोणत्या व्यापारांशीं तिचा मुख्यत्वें संबंध आहे याचा अंमळ विचार

केला असतां, विद्वानांच्या प्रतिकूल मतास किंवा ग्रंथकाराच्या भयास कांहीं मोठासा आधार आहे असें वाटणार नाहीं. कवितेचा मुख्य संबंध कल्पनाशक्तीशीं आहे, ह्मणून मनास रंजवणें हेंच तिचें काम. इंग्लिश ग्रंथकारांनीं कवितेचीं जीं निरनिराळीं लक्षणें दिलीं आहेत त्या सर्वांतील आशय प्रायः हाच आहे, व आपल्या संस्कृत भाषेंतील साहित्यशास्त्रांचेंही काव्यलक्षण हेंच होय. 'रसात्मकं काव्यं'—रस ह्मणजे मनोरंजन हेंच काव्याचें तत्व. आतां हें मनोरंजन खऱ्याच गोष्टीनीं होतें, खोटयांनीं होत नाहीं, असें मुळींच नाहीं. उलटें विचाराअंतीं असेंच दिसून येईल, कीं सामान्यतः ज्या आपण अनेक गोष्टी पाहतों त्यांत चमत्कार वाटण्याजोगें कांहींच नसल्यामुळें त्या मनास कंटाळवाण्या मात्र वाटतात; व काव्यांचे विषय बहुधा कल्पित्तच लागतात त्याचें तरी हेंच कारण. यास्तव भारत, इलियड, किंवा प्याराडैज् लास्ट वाचतांना सत्यासत्यविवेचक शक्ति पुष्कळ अंशीं गुंडाळूनच ठेवली पाहिजे. रंगभूमीवर नटीचा नाट्याभिनय पाहत असतां, तिच्या स्त्रीत्वपुरुषत्वाविषयींचा विचार जसा केवळ बाह्य होय, व युक्तिडचे सिद्धांत सिद्ध करतांना जी बुद्धीची तीव्रता व सत्याविषयीं एकनिष्ठा असावी लागते तिचा वरील प्रसंगींही अवलंब करणें हें जसें अगदीं अप्रयोजक, त्याचप्रमाणें काव्याचा रसास्वाद घेत असतां त्याच्या कथानकाच्या असत्यतेकडे किंबहुना असंभाव्यतेकडे लक्ष पोचवणें हें अरसिकतेचें दर्शक होय. यावरूनच पाहतां स्पष्ट दिसून येईल, कीं आलीकडील विद्वानांचा पुराणादिकांवर जो येवढा

रोख आहे तो, व काव्यें नाटकें हीं ऐतिहासिक विषयावर असलीं तरच वाचण्यास योग्य, एरवीं नाहींत हें मत, हीं दोन्हीही अज्ञानमूलकच आहेत. असो; या गोष्टीवर इतका जो विस्तार केला तो तरी येवढ्यास्तव, कीं हा मोठाच मतिभ्रम असून त्यामुळें कवितेच्या अनिर्वाच्य सुखास, तें निर्दोष असतांही, आपण व्यर्थ अनेक वेळां अंतरतों.

ही कविता एकंदरींत पाहतां फार उत्कृष्ट साधली आहे. हींत ग्रंथकर्त्याचेंच नवें असें जरी फारच थोडें निघेल, किं-बहुना मुळींच निघायाचें नाहीं, तरी हिची रचना इतकी सुरस केली आहे, कीं ती साद्यंत वाचल्याविना राहवत नाहीं. याच शाळापत्रकांतून वगैरे जी नवी कविता कधीं कधीं पाठविलेली आढळते ती बहुधा फार हलक्या प्रतीची असते. तिचें मुख्य धोरण मोरोपंताप्रमाणें यमकें प्रास वगैरे साधण्याकडेच बहुधा असतें, व त्यामुळें अर्थाची ताणाताण होऊन दुर्बोधता व क्लिष्टत्व हे दोन दोष मात्र तींत येतात. पण तसें या कवितेंत मुळींच नाहीं. प्राचीन मराठी कवींशीं ग्रंथकर्त्याचा किती परिचय आहे व त्यांची विषयवर्णनाची प्रौढ सरणी त्यानें किती उचलली आहे, हें या ग्रंथावरून स्पष्ट दिसतें. तसेंच त्याच्या ग्रंथांत जे कांहीं दोष कोठें कोठें आढळून येतात ते टाकून त्याच्या गुणांचें मात्र ग्रहण के. ल्यानें त्याची सारासारविवेचनशक्तिही प्रशंसनीय होय. ते दोष दुर्बोधत्व, व्याकरणविरोध वगैरे होत. ते या पुस्त-कांत अगदीं नाहींत. भाषा ग्रंथकर्त्याच्या आटोक्यांत बरीच असल्यामुळें भाषणाचा किंवा वर्णनाचा ओघ जसा काय सहज चालून, यमकेंही बरींच मोठीं असतांही, त्यांत लेशमात्र

देखील क्लिष्टता दिसत नाहीं. ही शेवटली गोष्ट तर विशेष वाखाणण्यासारखी होय असें आह्मांस वाटतें. कारण कीं मोरोपंताच्या अनुयायी वर्गाप्रमाणें यमक ह्मणजे काव्यशिरोभाग असेंही केवळ न मानतां, किंवा त्यांच्या प्रतिपक्ष्यांचें जें यमकभीरुत्व व बाह्यालंकारांच्या सर्वपरित्यागाविषयींचें कडकडीत व्रत तेंही न धरितां, अर्थहानि व रसहानि न होऊन, जितकी साजरी करवेल तितकी आपली कविता त्यानें साजरी केली आहे. छंदें योजिलीं आहेत तींही कांहीं ठिकाणीं फारच शोभतात. तपस्वी ब्राह्मणाचें व नगरांतील शेवटल्या महोत्सवाचें जें वर्णन दिलें आहे तें अनुक्रमें करून ओंव्यांत व कटावांत जसें खुललें आहे तसें इतरांत शोभलें असतेंसें वाटत नाहीं.

आतां या काव्यांत जे कांहीं दोष दिसताहेत तेही सांगतों. यांत कांहीं शब्द अशुद्ध पडले आहेत, किंवा त्यांस अशुद्ध ह्मणण्यापेक्षां मूळच्या संस्कृत रीतीस ते अनुसरून नाहींत हेंच ह्मणणें ज्यास्त वाजवी आहे. 'नभांगण', 'नभचुंबित' हे शब्द मराठीच्या रीतीनें पाहतां निर्दोष आहेत. तरी मोरोपंतानें जो व्याकरणशुद्धतेचा बाणा एकदा घातला आहे तोच पुढील काव्य रचणारांनींही तसाच निर्बाध चालवावा हें चांगलें असें आह्मांस वाटतें. यास्तव हे शब्द 'नभोंगण', 'चुंबितनभ' असे असावे. 'जरठीं' (ह्मातारपणीं), 'वेदश्रुतीस' (वेदांस) या प्रयोगांस कोठें आधार असेल तर न कळे, परंतु आधार असला तरी तो मानूं नये हें बरें. कारण पहिला शब्द विशेषण आहे, व दुसऱ्याच्या दोन्ही समस्त पदांचा अर्थ अभिन्न होय. 'अनुपम्य', 'निर्धनिक'

हे शब्द तर अगदींच अशुद्ध. 'मा' धातूपासून 'य' प्रत्ययांत विशेषण करावयाचेंच तर तें 'मेय' असें होईल, 'म्य' कधीं व्हावयाचें नाहीं, परंतु 'गम्य' इत्यादि व्यंजनांत धातुसाधितांवरून हा भ्रम होतो. खरा शब्द 'अनुपम' हा होय; व हा 'अन्—उपमा' यांपासून बहुव्रीहि साधला आहे. 'निर्धनिक' हा नञ्तत्पुरुष केला आहे, पण त्या समासांत 'अ' (स्वर पुढें असल्यास 'अन्'), व क्वचित् 'न' (नपुंसक) हींच अव्ययें योजतात, 'निर्' उपसर्ग योजीत नाहींत. तो बहुव्रीहींत मात्र लागतो; यास्तव 'निर्धन' हें विशेषण शुद्ध होय. आलीकडच्या मराठींत 'निरुपद्रवी' वगैरे शब्द आढळतात, परंतु ते अगदीं बनाऊ आहेत असें वाटतें. बोलण्यांत तर ते येतच नाहींत, व जुन्या मराठी कवितेंत कोठेंही आढळतीलसें वाटत नाहीं. असो; याप्रमाणें आणखीही अशुद्ध शब्द कदाचित् या ग्रंथांत आढळतील, परंतु ते एकंदरींत थोडे आहेत.

या ग्रंथाचा मुख्य भाग ह्मटला ह्मणजे नगराच्या दहनाचें वर्णन होय. हें जितकें साधेल तितकें उत्तम करण्यास ग्रंथकर्त्यानें प्रयत्न केला आहे खरा, परंतु त्यांत मोठा दोष असा आहे, कीं दहनाचेंच सर्वथा वर्णन न करितां तज्जनित शोकादि अनर्थांचेंच विशेष वर्णन आलें आहे. तसेंच हें वर्णनही संस्कृत कवींच्या संप्रदायाप्रमाणेंच केवळ असल्यानें हृदयास जसें लागावें तसें लागत नाहीं. पण सर्वांत, आगींत सापडलेल्या पोराचे काकुळतीचे शब्द त्या प्रसंगास फारच अनुचित आहेत.

याप्रमाणें एकंदरींत पाहतां या ग्रंथांत गुण पुष्कळ आहेत,

व जे दोष आहेत ते थोडे असून निघण्यासारखेही आहेत. पण शेवटीं आह्मास एक विचार सुचला आहे, तोही येथें लिहिणें अवश्य वाटतें; तो हा, कीं कवियश संपादण्याची ज्यांस हौस असेल, त्यांनीं, ती शक्ति आपलेठायीं किती वसते आहे हें अगोदर नीट पाहून, नंतर जुन्या मराठी कवींचें, व सोय असल्यास संस्कृत कवींचेंही चांगलें अध्ययन करून, मग त्या कामास हात घालावा. नाहीं तर, आपली विद्वत्ता मोठी यास्तव सर्व गुण आपल्याठायीं अवश्यमेव आलेच या वेड्या भ्रमांत शिरून, कवित्वाच्या नव्या शाखा स्थापन करण्याच्या भरीस जे पडतील, ते फसतील, इतकेंच नव्हे, तर त्यांचा चोहोंकडे उपहास मात्र होईल.

---

( शालापत्रक; पुस्तक १२ अंक ५. सप्टेंबर १८७२ इसवी. )

## नौकानयनाचा इतिहास.

### ( अभिप्राय. )

हें लहानसें पुस्तक रा. रा. गोविंद शंकर बापट यांनीं इंग्रजी ग्रंथांच्या आधारें तयार केलें आहे. ऐतिहासिक विषयावर स्वतंत्र लिहिलेला असा हा बहुधा पहिलाच ग्रंथ आहे, यास्तव यासंबंधें अगोदर येथें कांहीं लिहिणें इष्ट होय.

सध्यां शाळांतून जे ऐतिहासिक ग्रंथ वाचतात ते सर्व इंग्रजी ग्रंथांचीं शुद्ध भाषांतरें आहेत. हिंदुस्थानाच्या मोठमोठ्या इतिहासांपासून तों लहानशा प्रश्नोत्तररूप टिपणापर्यंत देखील एक मासला. मूळ ग्रंथाच्या शब्दाशीं शब्द व वाक्याशीं वाक्य ठेवून दिलें कीं झालें भाषांतरकर्त्याचें काम; एक शब्दही अधिक उणा त्यास लिहितां कामा नये.

मग मूळच्या ग्रंथांत कांहीं कां असेना! ' हिंदु लोकांसारखे वेडगळ व रानटी लोक हिंदूच; त्यांच्यासारखा क्रूर व नीचतेस पोंचलेला धर्म, पासिफिक महासागरांतील बेटांत किंवा आफ्रिकेच्या मध्यभागीं जे रानटी लोक आहेत त्यांतही, सापडणें कठीण; सदा उघडें असणें, बोटांनीं जेवणें इत्यादि त्यांचे एकेक दुराचार तर ऐकवत सुद्धां नाहींत, अंगावर थरथरून कांटा उभा राहतो; महापुरुषांत शिवाजीची गणना करावी असा त्याचे ठायीं बिलकुल गुण दिसत नाहीं, तो केवळ पक्का भामटचा होता; ' इत्यादि साहेबप्रणीत इतिहासाची परमरहस्यें आमचे महापंडित भाषांतरकार अनन्यभावें करून शिरसावंद्य मानतात. ठीकच ! अहो, ज्यांची सत्ता आज साऱ्या भूमंडळावर गाजत आहे, अग्नीसारखीं महाभूतेंही ज्यांनीं अंकित करून टाकिलीं, सूर्यमालेंतील अत्यंत दूरच्या ग्रहांचेही शोध चाललेच आहेत येवढें ज्यांचें बुद्धिसामर्थ्य, त्यांच्या लिहिण्यांत चूक संभवेल तरी कशी ? त्यांचा दोष काढूं पाहणें यापरतें मूर्खपण व धाडस तें कोणतें ? उद्यां त्यांनीं सांगितलें, कीं सूक्ष्म विचाराअंतीं असें दिसून येईल, कीं हिंदूंस तीन कान असतात, तर नको ऐकायला ? असो; या लिहिण्यांत लेशमात्रही अत्युक्ति नाहीं हें फार विस्तारानें सांगण्याची गरज नाहीं. सामान्यतः कोणताही हिंदुस्थानाचा इतिहास पाहिला व विशेषतः पाद्री लोकांचे ग्रंथ उगीच चाळले, तर वरील गोष्टी सहज आढळण्यासारख्या आहेत. पण इतकेंही लांब जाणें नको. कोणत्याही गोष्टीस हलकेपणा किंवा थोरवी साहेबांच्या केवळ संबंधानेंच किती येते

याचा प्रत्यय पदोपदीं आहे. पोषाक, रिवाज वगैरे तर राहोतच, पण विशेष नवल करण्यासारखी गोष्ट ही, कीं ग्रंथकारांचीही योग्यता त्यांच्या शब्दांच्या मांत्रिक सामर्थ्यानें एकदम वाढते. सुमारें चार पांच वर्षांपूर्वींच इतर मराठी कवींप्रमाणें तुकारामही एक असून, वारकरी, कुणबी वगैरे अडाणी लोकांतच काय ती त्याची चहा असे. फारतर झालें तर, हरदासांच्या कीर्तनप्रसंगीं त्याचे अभंग निघत. याच्या पलीकडे त्यास कधींही मान नसे. पण भाग्य त्या कवीचें! सर आलेक्झांडर ग्रांट यांनीं त्याचे कांहीं अभंग वाचून आपल्या थोर व प्रांजल बुद्धीनें एका मासिक पुस्तकांत त्यांची फार प्रशंसा केली. पण एवढ्याशा लहान गोष्टीपासून चमत्कार केवढाले झाले! विठोबाचा वेडगळ भक्त होता तो एकदम जगद्गुरूची पदवी पावला, त्याच्या अभंगांस विद्वत्समाजांत खुशाल येण्यास मोकळीक झाली, वर्तमानपत्रांच्या व पुस्तकांच्या अग्रभागीं त्याचें नांव झळकूं लागलें, मराठी पुस्तक हातीं घेणें हें अत्यंत लांछन मानणारे जे फांकडे नवीन विद्वान् तेही तेवढ्यापुरता मात्र आपला नियम मोडून त्यावर मेहेर नजर करूं लागले, आणि मराठी भाषेंत ह्मणण्यासारखा कवि एक तुकारामच अशी चोहोंकडे प्रसिद्धि झाली. ग्रांट साहेब मराठी कवितेंत इतके मोठे निष्णात होते काय? किंवा पूर्वीं कोणासही न समजलेले असे तुकारामाचे कांहीं अपूर्व गुण त्यांनीं प्रगट केले, काय? कांहीं नाहीं; त्यांच्या नुसत्या मोतबाचा येवढा प्रताप! असो, हें परमताधीनत्व आपल्या लोकांस व विशेषतः विद्वान् ह्मणविणारांस तर अत्यंत लांछन होय, व हें जोंपर्यंत

आतांप्रमाणेंच बलवत्तर राहील तोंपर्यंत देशाच्या उत्कर्षाची वार्ताही कोणीं बोलूं नये; कां कीं, दुसऱ्याच्या बुंधावरच नेहमी टेकून कोणतें झाड कधीं वाढलें आहे? आतां हें खरें कीं, आपल्या देशाचा, सर्वमान्य होईल असा, स्वतंत्र इतिहास लिहिणें ह्मणजे लहानसान काम नव्हे. त्यास आंगचे पुष्कळ गुण असून, भाषेची शैली, अनेक ग्रंथांचें पूर्णज्ञान वगैरे गोष्टीही साध्य कराव्या लागतात. शिवाय जुने लेख, जुन्या गोष्टी, जुनीं पुस्तकें, वगैरे इतिहासाचीं साधनें मिळावयास, व देशाचें ज्ञान होण्यास, त्या मनुष्यानें पुष्कळ हिंडलेंही पाहिजे, व फारशी आदिकरून कित्येक भाषांची पुरी माहिती सुद्धां त्यास अगदीं जरूर आहे. पण इतक्याही गोष्टी आपणास केवळ दुर्घट आहेत असें ह्मणतां येणार नाहीं. परीक्षांच्या कशाही व कितीही अटी असल्या तरी त्या सर्व संभाळून जे पार पडतात, व प्रवासभीरु असतांही इंग्रेजी विद्येच्या ऐन अगरांत जाऊन तेथेंही जे नक्षा करून येतात, त्यांस स्वदेशच्याच भाषा शिकण्यास व इतिहासाची इतर सामग्री जमविण्यास विलक्षण आयास पडतीलसों वाटत नाहीं. पण ऐतिहासिक ग्रंथांस व सामान्यतः देशभाषांतील सर्व पुस्तकांस जो भिकारपणा आला आहे तो कोणत्याही प्रकारच्या उणिवेमुळें आला आहे असें नाहीं, तर लोकांच्या शुद्ध अनास्थेमुळेंच आला आहे. त्याविषयीं त्या पुस्तकांमधूनच एक मोठें प्रमाण दृष्टीस पडतें. तें कोणतें ह्मणाल?—तर धेडगुजरी भाषा! अमुक शब्द किंवा लिहिण्याची तऱ्हा मराठी आहे कीं नाहीं याचा निश्चय करणें हें तर मराठी दप्तर चाळण्यापेक्षां व हिंदुस्थान फिरण्यापेक्षां

फारच सोपेंना! पण चमत्कार पहा, कीं मुंबईच्या विद्वत्समाजानें जो इतिहास ग्रंथ * बी. ए. सारख्या वरच्या परीक्षेस मराठीकरितां तिगस्त सालपर्यंत नेमला असे, त्याची लिहिण्याची शैली इतकी विचित्र आहे, कीं इंग्रजी न शिकलेल्या एखाद्या मनुष्यापुढें जर त्याचें एक अर्धपृष्ठ वाचलें, तर तो भांबावून जाऊन, ही भाषा कोण ह्मणून वाचणारास विचारूं लागेल! हा प्रसाद मुंबईच्या वस्तीनें ग्रंथकर्त्यास दिला, किंवा अशा प्रकारच्या भाषेशिवाय मराठींत इतिहास शोभत नाहीं असें त्यास वाटलें कीं काय नकळे. पण याहूनही नवल वाटण्याजोगी गोष्ट नुकतीच घडून आली आहे; तीवरून पाहतां तर असेंच ह्मणावें लागतें, कीं इतिहासकारांवर कोणाचा शाप आहे कीं काय कोण जाणें! मनुष्य एरवीं कितीही निपुण असो, त्यानें इतिहासास हात घातला कीं घसरलाच! ज्यानें मराठी भाषेचा अभ्यास पंडितांच्या रीतीनें यथास्थित केला, इतकेंच नव्हे, तर लोकांच्या बोलण्याचालण्याकडे सतत लक्ष्य पुरवून तींत ज्यानें इतकें चमत्कारिक निपुणत्व संपादिलें, कीं महाविद्वान शास्त्र्याचें भाषण असो कीं अडाणी कुणब्याचें असो, स्त्रियांचें असो कीं विदूषकाचें असो, सर्व जेथल्या तेथें ज्यानें जसें काय ठेवून दिलें आहे; व यामुळें ज्याचे ग्रंथ इतके रम्य झाले आहेत कीं मंजुघोषादिक अप्रयोजक कादंबऱ्या व स्त्रैरसकेशादि भाषाकलंकभूत बीभत्स नाटकें सगळीं एकंदर केली तरीही तीं त्यांच्या पासंगासही पुरावयाचीं

* रा० सा० विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं केलेलें 'एल्फिन्स्तनच्या इतिहासाचें भाषांतर.'

नाहींत,-त्याच विद्वान् ग्रंथकारानें * 'माळवा प्रांताचा प्राचीन इतिहास अंधकारांत बुडाला आहे,' 'मल्हारराव होळकर पानपतच्या मैदानावर हजर होता' अशीं वाक्यें लिहावीं हा मोठाच चमत्कार नव्हे काय ? आह्मास तर या गोष्टीचें बिलकुल कारण समजत नाहीं. असो; शेवटीं आह्मास आमच्या नवीन विद्वानांस येवढेंच सांगणें आहे, कीं आजपर्यंत भाषांतररूपानेंच इतिहासाची माहिती लोकांस होण्याचा जो मार्ग होता तो ठीकच होता, पण यापुढेंही तोच मार्ग ठेवणें यासारखें मात्र हास्यास्पद कांहीं नाहीं. जोंपर्यंत मुलास उभें राहून चालण्याची शक्ति आली नाहीं तों पर्यंत पांगुळगाड्याची योजना नीटच आहे, किंबहुना अत्यंत समर्पकही होय; पण, तो मार्ग फार उपयोगी पडला ह्मणून मोठेपणींही त्यास अनन्यगतित्वानें भजणें या शहाणपणाची मात्र तारीफ करावी तितकी थोडी !

या रीतीनें पाहतां प्रस्तुत ग्रंथ आह्मास अत्यंत प्रिय होय. याचे तीन भाग असून, पहिल्यांत प्राचीन युरोपिअन राष्ट्रांचें नाविकविद्येचें ज्ञान, दुसऱ्यांत कोलंबसाची सफर, व तिसऱ्यांत वास्कोडिगामा याची, असे विषय घातले आहेत. यांतील सर्व माहिती इंग्रजी ग्रंथांवरूनच घेतली आहे खरी—ठीकच, कारण दुसरा मार्गच नाहीं—तरी हा ग्रंथ भाषांतररूप

* आमच्या रसिक वाचणारांपैकीं कोणासही 'थोरले माधवराव पेशवे यांचें नाटक' व 'जयपाळ' या सर्वमान्य ग्रंथांचे कर्ते रा० विनायक जनार्दन कीर्तने यांचें नांव सांगितलें पाहिजे असें नाहीं. यांणींच कांहीं महिन्यांपूर्वीं 'मालकम् साहेबांच्या मध्य हिंदुस्थानच्या इतिहासाचें भाषांतर' प्रसिद्ध केलें आहे.

नाहीं, तर प्रत्येक भागांतील वृत्तांत ग्रंथकारानें आपल्या स्वतंत्रबुद्धीनें लिहिला आहे. गोष्टींची जुळणी बरीच साधली असून लिहिण्याची धाटणीही बहुधा शुद्ध आहे, धेडगुजरी भाषेचा प्रकार नाहीं. तरी कांहीं शब्द चमत्कारिक दिसतात ते मात्र येथें सांगतों. 'पूर्वेकडील देश', 'पश्चिमेकडील देश' इत्यादि शब्दांचा प्रयोग वर्तमानपत्रांतून वगैरे देखील आढळतो पण तो अगदीं अप्रशस्त समजला पाहिजे. हे शब्द इंग्रजी भाषेंत रूढ होऊन गेल्यामुळें शोभतात, पण मराठींत त्यांच्या जागीं 'एशियाखंडांतील देश', 'युरोपांतील देश' हेच योजावे हें बरें. तसेंच, एके ठिकाणीं 'आलेक्झांड्रिया' या शहराचें नांव ग्रंथकारानें 'शिकंदर्या' असें लिहिलें आहे, हें तर अगदीं हास्यास्पद होय. याच्या जागीं 'शिकंदरपुर' किंवा त्याही पेक्षां 'शिकंदराबाद' हें नांव चांगलें साजलें असतें.

याप्रमाणें हा ग्रंथ बहुधा निर्दोष आहे, तरी हा लोकप्रिय होईलसें वाटत नाहीं. कोणत्याही विषयाची गोडी लागण्यास त्यांत वाचकाची गति चांगली होऊन बुद्धि विचारक्षम व्हावी लागते. पण आमच्या मराठी वाचकांस युरोपखंडाच्या इतिहासाचें ज्ञान ह्मणण्यासारखें तरी असेल कीं नाहीं याचीच शंका वाटते; मग कोलंबस, वास्कोडिगामा यांसारख्या महासाहसी पुरुषांच्या योगानें त्यांचे देश कसकसे वैभवास चढले इत्यादि लौकिकसंबंधाच्या गहन गोष्टींचा ऊहापोह करणें, व त्यांच्या चरित्राविषयीं जिज्ञासा उत्पन्न होऊन ती तृप्त करण्याचें साधन अनुकूळ असतां त्याचा परम उत्कंठेनें आदर करणें, ह्या गोष्टी तर दूरच राहिल्या.

यास्तव आह्मांस असें वाटतें कीं, आपल्या देशाचा इतिहास, आपणांमध्यें होऊन गेलेल्या थोर पुरुषांच्या गोष्टी, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रांतील चित्तवेधक विषय, वगैरे गोष्टींचा संग्रह करून जर अशाच तऱ्हेचीं पुस्तकें कोणी करतील तर लोकांत विद्येचा प्रसार होण्यास तीं फार उपयोगीं पडतील. सांप्रतच्या शतकाच्या आरंभापासून अशा प्रकारचीं पुस्तकें इंग्लंडांत हजारों निघूं लागलीं, व अजूनही तोच क्रम चालू आहे. याप्रमाणें विद्यामंदिर सर्वांस, जसें काय, खुलें करून दिल्यानें त्या देशांतील गरीबगुरीबांसही ज्ञानसंपादनाची उत्कृष्ट सोय होऊन शिवाय ती अगदीं साहजिक होऊन गेली आहे. यापासून अनेक रीतीनें त्या देशाचें हित होऊन त्यास मोठें भूषणही झालें आहे; कां कीं आजवर इतकीं राष्ट्रें उदयास आलीं, पण सांप्रतप्रमाणें विद्येचा प्रसार त्यांपैकीं एकांतही झाला नव्हता. असो; ही गोष्ट सर्व स्वदेशहितचिंतकांनीं विचार करण्याजोगी आहे, व वर्तमानपत्रांतून वगैरे मराठी भाषेची कळकळ बाळगणारे जे आलीकडे पुष्कळ दृष्टीस पडूं लागले आहेत त्यांनीं तर या गोष्टीचा अवश्य विचार करावा.

---

[ बालबोधक. पुस्तक १२. अंक ६. आक्टोबर १८७२ इसवी. ]

## कुमारसंभवाचें मराठी भाषांतर.

### ( अभिप्राय. )

आजवर संस्कृत भाषेंतील बहुतेक नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. त्यांतही शाकुंतलादि जीं कित्येक

अत्युत्कृष्ट आहेत त्यांचीं तर तीं दोन दोन तीन तीन प्रकारांनीं होऊन त्यांतील कांहीं विद्वन्मान्य झालीं आहेत. आतां सर्वच भाषांतरांत मूळच्या नाटकांतील रस पूर्णपणें उतरला आहे असें जरी ह्मणतां येत नाहीं, तरी इतक्या ग्रंथकारांनीं इकडेच आपली बुद्धि खर्चिली या गोष्टीवरून वाचकांच्या मनाच्या प्रवृत्तीचें साधारण अनुमान होतें. कल्पित कादंबऱ्या व नाटकें यांत अनेक रसांचें मिश्रण असल्यामुळें व तीं संवादरूप असून त्यांत संसारांतीलच निरनिराळ्या प्रसंगांचें चमत्कारिक वर्णन असल्यामुळें तरुण वाचकांस त्यांपासून फार करमणूक होते, व विद्येच्या आल्हादकारक स्वरूपाचा अनुभव साक्षात् घडून तिच्या व्यासंगाविषयीं मनांत उत्साह उत्पन्न करण्यास तीं फार उपयोगीं पडतात. याप्रमाणें वरील भाषांतरांचा देशास बराच उपयोग झाला असेल यांत संशय नाहीं. पण रघुवंशकिरातादि जीं संस्कृतांतील महाकाव्यें व दुसरेही शेंकडों लहान मोठे ग्रंथ, तसेंच सुभाषित, या सर्वांपैकीं कशाचेंही भाषांतर आजपर्यंत कोणींही * केलें नाहीं, हें मोठेंच आश्चर्य होय. आपल्या प्रौढ गीर्वाण भाषेची योग्यता व उपयोग जाणून युरोपांतील पंडितही आपआपल्या देशभाषांस हींतील ग्रंथांच्या भाषांतरांनीं अलंकृत करताहेत. लहानसान काव्यें वगैरे तर काय, पण रामायण भारत यांसारखे अतिविस्तृत, व वेदांसारखे दुर्बोध, अशा ग्रंथांवर ही त्यांचे परिश्रम सतत चाललेच आहेत. संस्कृत विद्येच्या प्रसारार्थही त्यांचे

---

* अशा प्रकारचा ग्रंथ एक मात्र पाहण्यांत येतोः—तो पद्यरत्नावली हा होय.

जे अचाट उद्योग चालले आहेत ते तरी तेच करूं जाणत ! धन्य त्यांची ! प्रोफेसर गोल्डस्टकर या नांवाचा एक संस्कृतज्ञ पंडित नुकताच कांहीं महिन्यांपूर्वीं मरण पावला. त्यानें एक मोठाच मोठा असा संस्कृत भाषेचा कोश इंग्रेजी भाषेंत लिहिण्यास आरंभ केला होता, पण वर्षांचीं वर्षें लोटलीं असतांही पहिलें अक्षर (अ) हेंही शेवटास पोंचलें नाहीं. असो; याप्रमाणें आपल्या भाषेच्या जीर्णोद्धारार्थ परद्वीपस्थ लोकांचे ही असे भगीरथ प्रयत्न चालले असतां, ज्यांचे ठायीं तिच्याविषयीं उत्साहपूर्वक अभिमान सर्वांहून अतिशयित असावा त्यांनींच तिजविषयीं पराकाष्ठेची अनास्था प्रकट करावी, व अत्यंत औदासीन्य धारण करावें, आणि सरासरी व्युत्पत्ति अथवा शास्त्रग्रंथांचें केवळ दिग्दर्शन झालें ह्मणजे पांडित्याची परमावधि झाली असें समजून कृतकृत्यता मानावी हें एकंदर लोकांस मोठें लज्जास्पद नव्हे काय ? त्यांतूनही मराठी भाषेच्या सांप्रत स्थितीकडे लक्ष्य दिलें तर फारच खेद होतो. जों पर्यंत आपल्या लोकांत इंग्रेजी भाषेचा प्रचार बेताचाच होता तोंपर्यंत मराठी भाषा बरीच शुद्ध राहिली होती, परंतु आलीकडे तर तिचा सर्व निर्बंध बहुतेक सुटल्यासारखाच झाला आहे. अवयवभूत जे तिचे शब्द ते तर काय, पण एकंदर सर्व रचनाही परभाषासंकररूप महादोषानें ग्रस्त होऊन, तिजवरची कळा दिवसांदिवस उडत चालली आहे, व हा अनर्थ निवारायाची वेळ आहे तोंवरही जर कोणीं कंबर बांधली नाहीं तर तिचा लय झाल्याविना खास राहणार नाहीं, असा सर्वांस मोठा धाक वाटूं लागला आहे. तेव्हां

अशा ऐन निकराच्या वेळीं जर संस्कृत भाषेनें आपल्या कन्येस हात दिला तर तिजवर एकेच काळीं तीन मोठे उपकार केलेसे होतील. एक तर परभाषेच्या पायीं तिची जी अनिवार विटंबना होत आहे ती बंद होईल; दुसरें, तिचा प्रचार बुडून सर्वथा लय होण्याचा रंग दिसत आहे, यास्तव तिचें पुनरुज्जीवन झाल्यासारखें होईल; आणि तिसरें असें कीं, तीस पुष्टता येऊन परिपक्कदशेस येण्याच्या मार्गास ती लागेल. आतां येवढें श्रेय एकट्यानें घेणें हें केवळ अशक्य होय हें येथें सांगावें असें नाहीं. कां कीं असें घडून येणें ह्मणजे मोठ्या बुद्धीचें, उद्योगाचें, व काळाचें काम आहे. तरी स्वशक्त्यनुसार कोणीं विद्वानांनीं हें कार्य मनावर घेतल्यास, या सत्कृत्यास निदान आरंभ केलासें तरी होईल. यास्तव अशांनीं, प्रस्तुत ग्रंथाचे कर्ते रा० कृष्णाजी लक्ष्मण दातार यांचा, या स्तुत्य कृत्याच्या संबंधें, कित्ता उचलल्यास, एकंदर देशावर व वरील ग्रंथकारावरही त्यांचे मोठेच उपकार होतील.

प्रस्तुत पद्यरूप भाषांतराचा मूळग्रंथ 'कुमारसंभव' कालिदासकृत काव्यांत प्रसिद्ध आहे. यांत कुमाराचा संभव ह्मणजे कार्तिकेयाचें जन्म, येथवर शैवपुराणांतील कथा काव्यरीतीनें वर्णिली आहे. भाषांतरकर्त्यानें पहिल्या तीन सर्गांत साकीवृत्त, चवथा व पांचवा यांत श्लोकवृत्त, व शेवटल्या दोहोंत आर्यावृत्त, अशीं योजलीं आहेत. ही छंदांची योजना बरीच समर्पक आहे, व मूळांतील अर्थ चांगला व्यक्त करतां येण्यास अशींच मोठीं वृत्तें धरलीं पाहिजेत. तरी दरएक सर्गास निरनिराळें वृत्त घातलें असतें

तर हें भाषांतर वाचण्यास याहूनही मजेदार होतें. संस्कृत काव्यांचीं भाषांतरें करणारांनीं मुख्यतः हें धोरण ठेवावें, कीं साधारण वाचकांसही तीं समजण्यास जितकीं सुलभ होतील तितकीं व्हावीं. यास्तव लांब लांब समास, कठीण संस्कृत शब्द वगैरे जितके न येतील तितकें चांगलें. तसेंच कोठें कोठें संस्कृतांत थोडेच शब्द असून त्यांत अर्थगांभीर्य फार असतें; अशा ठिकाणीं भाषांतरकर्त्यानें वाक्याच्या विस्ताराकडे लक्ष न देतां मूळांतील अर्थ मराठींत चांगला उतरण्यास जितके शब्द लागतील तितके अवश्य घालावे. प्रस्तुत भाषांतरांत या सर्व गोष्टींकडे चांगलें लक्ष्य दिलें आहे असें दिसतें. यांतील वाक्यांची रचना सरळ असून, शब्दही, साधारण वाचकांस जे माहीत असावे तेच बहुधा आहेत. जे अंमळ कठीणसे वाटले त्या सर्वांवर टिपा आहेत. मूळकाव्यांतील रसही यांत पुष्कळ उतरला आहे; आणि मराठी कवितेंत ज्यांची बरीच गति झाली आहे अशा रसिक वाचकांस हें भाषांतरच नुसतें वाचून कालिदासाच्या एकंदर कवितेच्या स्वरूपाची बरीच कल्पना बांधतां येईल असें आह्मांस खचीत वाटतें. तरी रचनेच्या संबंधें यांत कांहीं दोष आहेत ते येथें सांगतों. कोठें कोठें यतिभंग झाला आहे, व कांहीं शब्दांच्या ऱ्हस्वदीर्घत्वाविषयीं नियम सुटला आहे. पदलालित्यादि बाह्य गुण काव्यांत जरी केवळ प्रधानच मानतां येत नाहींत, तरी त्यांच्या योगानें काव्यास शोभा फार येते, व ह्मणूनच अभियुक्त कवींनींही तदर्थ यत्न केलेला आढळतो; पण त्यांकडे या भाषांतरांत कांहीं विशेष लक्ष्य दिलेलें दिसत नाहीं. तसेंच कित्येक

ठिकाणीं पद्यांची शब्दरचना अगदीं गद्याप्रमाणें व कोठें कोठें मूळच्या श्लोकाप्रमाणेंच आहे, ती तशी नसावी; कां कीं, पहिलीनें मनास आल्हाद होत नाहीं, व दुसरीनें अर्थास दुर्बोधता येते.

याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथाचें गुणदोषविवेचन झालें. आतां शेवटीं इतकेंच सांगतों, कीं काव्यादिकांच्या भाषांतराची योग्यता लोक सामान्यतः कमी मानतात, पण वास्तविक पाहतां तसें नव्हे. स्वतः नवीं काव्यें रचणेंही एक्या पक्षीं इतकें कठीण नाहीं, पण परभाषेंतील काव्यांचे सर्व गुण आपल्या भाषेंत हुबेहूब उतरणें ह्मणजे परम दुर्घट होय. या गोष्टीचा प्रत्यय संस्कृत व मराठी या भाषांत इतका चांगला येणारा नव्हे, कारण त्या लगत आहेत; पण अत्यंत भिन्न अशा जर दोन भाषा घेतल्या, तर एकींतील विचार दुसरींत अगदीं बरोबर उतरणें बहुधा अशक्यच ह्मटलें तरी चालेल. हेंच पहा, कीं ग्रीक भाषेंतील होमर कवीच्या काव्याचें इंग्रजी भाषेंत आजवर पुष्कळांनीं भाषांतर केलें, फार तर काय, पण पोप व कौपर या प्रख्यात कवीनींही आपली विशाल बुद्धि व कवित्वस्फूर्ति तिकडे खर्चिली; पण इतकें करूनही शेवटीं काय ?-ज्याप्रमाणें अनेक ग्रहांवर विभक्त झालें असतांही सूर्याचें तेज कायम तें कायमच, त्याप्रमाणें युरोपच्या आद्यकवीचे उद्दामस्फूर्त्यादि गुण केवळ अगम्यच होऊन राहिले आहेत. भाषांतरांत त्याचें कवित्व केवळ छायारूपानें दृष्टीस पडतें; ज्यास त्याचा पूर्ण अनुभव घेणें असेल त्यानें मूळाशींच गांठ घातली पाहिजे, दुसरी गति नाहीं. सारांश, उत्कृष्ट भाषांतर करणें

हें मोठ्याच बुद्धीचें काम आहे, व अशाच भाषांतरांनीं भाषेची अभिवृद्धि होऊन तीस शोभाही येते.

---

[ शालापत्रक, पुस्तक १२ अंक ७. नोव्हेंबर १८७२ इसवी. ]

## मनुष्याचें अटोकाट ज्ञान !

हा पुढील मनोरंजक लेख जेन टेलर नांवाच्या विद्वान् व चतुर ग्रंथकर्त्रीचा आहे. इंग्रज लोकांच्या स्त्रियांत विद्येचा प्रचार कितपत असतो याचा साक्षात् अनुभव आपणास घडणें अशक्य; यास्तव आमच्या जिज्ञासु व मर्मज्ञ वाचकांस पुढील मासला सादर केला आहे. त्यावरून त्यांच्या ज्ञानाची योग्यता त्यांस सहज कळून येईल. तसेंच स्त्रिया ज्ञानसंपन्न झाल्या असतां देशास केवढा उपयोग व केवढें भूषण होण्यासारखें असतें ही अत्यंत महत्वाची गोष्टही खालच्यासारख्या लेखांनीं जशी सुज्ञांच्या मनावर ठसेल तशी शुष्क पांडित्याच्या शंभर निबंधांनींही ठसणार नाहीं, हें खचीत.

आपलें सर्व वय विद्याभ्यासांत खर्चून जो परम ज्ञानी झाला असा कोणी एक अतिवृद्ध महापंडित हळहळून आपणाशीं ह्मणतोः—

"अहो ! मनुष्याचें ज्ञान फार फार झालें तरी तें किती अत्यल्प ! मीं आपला सारा जन्म ज्ञान संपादन करण्यांत घालविलाना ?—पण इतकें करूनही मला समजतें तें काय ? सृष्टीच्या रहस्यांचा खुलासा लावण्याची उमेद धरून मी खोल खोल विचारांत जों जों शिरूं लागतों, तों तों माझी

बुद्धि अगदींच गुंग होऊन मला कांहींच कळेनासें होतें. पहिल्या पहिल्यानें माझी मति कांहींशी चालते खरी, पण माझें निश्चित ज्ञान असें तेवढेंच; त्यापुढें नुसत्या कल्पनाच बांधाव्या लागतात. एकून अज्ञान दशेपेक्षां सज्ञान दशेंत मोठा विशेष ह्मटला ह्मणजे एवढाच, कीं सृष्टिकर्त्याच्या अपार योजनेचें आकलन होण्यास मनुष्याची बुद्धि किती पंगू याचा तींत असल्यानें पूर्णपणें सिद्धांत होतो !

"आतां, सूर्याचें परिमाण व ग्रहांचीं अंतरें हीं मला काढतां येतात, तसेंच त्यांचे वेध घेऊन त्यांच्या गति वर्तविणें, व मनास थक करणाऱ्या अशा त्यांच्या प्रदक्षिणांचे नियम सिद्ध करणें, ह्या गोष्टीही मला अगदीं सहज आहेत, हें सर्व खरें; परंतु त्यांची रचना कशी काय आहे, त्यांजवर प्राणी वास करितात कीं नाहीं, करीत असले तर त्यांची जीवनस्थिति व राहण्याच्या सोयी कोणत्या प्रकारच्या आहेत, इत्यादि विषयीं माहिती माझी व अडाण्या कुणब्याची सारखीच.—पण हें फार दूरच्या अशा अंतरालांतील गोलांविषयीं झालें. ज्या पृथ्वीवर मी खुद्द राहतों तिच्या सृ... व्यवस्थेविषयीं तरी मला कितपत माहिती आहे ? ज्या वायुजलादिकांस मूलद्रव्यें समजून 'पंचमहाभूतें' अशी संज्ञा पूर्वापारपासून लोक देत आले, त्यांचेंही पृथक्करण करून त्यांच्या घटकावयवांस मीं नावें दिलीं, हें खरें; पण अग्नीची दहनक्रिया कशी चालते, किंवा जलास प्रवाहित्वधर्म कशामुळें आला आहे, इत्यादि गोष्टींचें उपपादन माझ्यानें करवेल काय ? अग्नि व उदक हीं वस्तुतः काय आहेत हा विचार सुद्धां कधीं मनांत न आणतां सर्व जग त्यांचें सेवन

करितें, त्यांस वरील गोष्टींचा उलगडा पाडण्यास जशी मोठीच पंचाईत येऊन पडेल त्याचप्रमाणें मलाही होतें; माझी कुशाग्रबुद्धि व तत्वज्ञता यांची येथें यत्किंचित्ही गति न होतां, सारी माझी माझ्यापाशींच राहते. पदार्थ निराधार असला कीं तो जमिनीवर पडायाचाच हा नियम सर्वत्र मी पाहतों; व शास्त्रकारांच्या उपपत्तीवरून मला असें समजलें आहे, कीं हें गुरुत्वाकर्षणाचें फल होय. पण हें समजूनही मला नवीन तें काय कळलें ? ज्यास पूर्वी मी 'पतन' ह्मणत होतों त्यासच आतां 'आकर्षण' ह्मणतों, येवढाच काय तो फरक. अवघ्या पदार्थमात्राची ज्या अतर्क्य व अदृश्य सूत्राच्या योगानें एका केंद्राकडे गति होत आहे, त्याच्या स्वरूपाचा बोध वरील शब्दानें मला यत्किंचित् तरी होतो काय ?—सृष्टिविषयक शास्त्रांत निष्णात झाल्यामुळें प्राणिवर्ग, उद्भिजवर्ग, व खनिजवर्ग असे तीन मुख्य विभाग, तशाच अवांतर जाती व उपजाती, या सर्वांची निवडानिवड मला करतां येते; पण इतके परिश्रम करूनही हिरव्या गवताच्या एका पातेचा तरी पोषणप्रकार माझ्यानें सांगवेल काय ? मी फार फार सूक्ष्म विचार केला तरी सृष्टिकर्त्या चतुर कारागिरानें जें मारू कलम वनपुष्पांस चित्रविचित्र रंगांनीं रंगवितें त्याचा मला शोध लागेल काय ? तसेंच माणिकावर व पाचेवर जे रंग झळकतात, व तऱ्हेतऱ्हेच्या शिंपांवर ज्या लकेरी मारतात त्यांचें कारण तरी आजपर्यंत विचार करून मला काय उमगलें आहे ?—इतर प्राण्यांचें चातुर्य जें माझ्या नजरेस येतें त्यास मी उपजतबुद्धि ह्मणतों व मनुष्याच्या विचारशक्तीशीं ती कोणकोणत्या जनाव-

रांच्या ठायीं किती किती मिळूं पाहाते याविषयींही माझा तर्क चालतो; परंतु एकंदरींत पाहतां, पशूंस माझे मनोधर्म जितपत कळतात तितपतच त्यांचेही मला कळतात असें ह्मणणें भाग येतें. जेव्हां पक्ष्यांचा थवा आकाशांत घिरट्या घालतांना मी पाहतों, किंवा एखाद्या दूरच्या प्रदेशाकडे त्यांचे कळप निघालेले असतात, तेव्हांचे त्यांचे संकेत व शब्द, पंडितांच्या भाषा जशा एखाद्या अक्षरशून्य मजुराला, त्याप्रमाणेंच मलाही ते अत्यंत गूढ होत. धर्मशास्त्रावरील ग्रंथांत जितकी त्यांची गति तितकीच माझीही त्यांच्या वर्तननियमांत व व्यवस्थेंत होय.

"हर हर ! एकून ज्ञानाचा हव्यास धरून त्याच्या प्राप्तीस्तव सर्व जन्मभर जो मीं एवढा शीण केला, त्यासारखें त्याचें सार्थक तें मला काय झालें ?—माझी बुद्धि किती पंगू, अज्ञान केवढें थोर, या गोष्टीचा पूर्ण प्रत्यय माझ्या मनास येऊन माझें क्षुद्रत्व मला स्पष्टपणें भासूं लागलें, इतकेंच कीं नव्हे ? शिव शिव ! ! मनुष्याच्या अंगीं पराकाष्ठेची विद्वत्ता आली, तरी आपला ज्ञानगर्व मिरवण्यास त्यास किती अत्यल्प अवकाश असतो, त्याची बुद्धि वस्तुतः इतकी कोती असून व संपादिलेलें ज्ञानही तसेंच अपुरतें असून, नसत्या भूषणाचा त्यानें गर्व वाहावा व आपली योग्यता मोठी मानावी हा त्याचा केवढा मूर्खपणा ! ! "

[ शालापत्रक; पुस्तक १२ अंक ८. डिसेंबर १८७२ इसवी. ]

# मुंबई येथील वडा दरबार.

गेल्या महिन्याची तारीख २० रोज बुधवार हा दिवस अर्वाचीन काळच्या इतिहासांत घालण्यासारखा आहे. या दिवशीं मुंबई इलाख्यांतील सर्व व कांहीं बाहेरचे राजे रजवाडे लोक या सर्वांस एक ठिकाणीं लार्ड नार्थ ब्रुक गवरनर जनरल साहेब याणीं बोलावून वडा दरबार केला. असा समारंभ व इतके राजे एक ठिकाणीं एक वेळीं कितीएक वर्षांत जमले नव्हते असें इतिहासावरून स्पष्ट समजतें. या दिवशींचा सभेचा थाट अत्युत्तम व अवर्णनीय असल्यामुळें त्याचें इत्थंभूत वर्णन आह्मीं आमच्या वाचकांकरितां खालीं देतों.

तारीख १९ रोज मंगळवार पासून या सभेच्या तयारीस आरंभ झाला. मंगळवारीं दहा वाजल्यापासून दरबारास जाणाऱ्या बडे लोकांस तिकिटें वाटण्याची सुरुवात झाली. हें काम रा. रा. विनायकराव वासुदेवजी ओरियेंटल ट्रान्सलेटर यांजकडे सरकारानीं सोंपवून दिलें होतें. यामुळें सर्व लोकांस आपापल्या दरजाप्रमाणें तिकिटें मिळण्यास फारशी अडचण पडली नाहीं. विनायकरावजी यांच्या आफिसांत मंगळवार सकाळपासून तों बुधवारच्या बारा वाजे पावेतों तिकिटें मिळण्याकरतां लोकांची इतकी दाटी होऊन गेली होती कीं, आषाढी किंवा कार्तिकीच्या यात्रेंत पंढरपुरच्या विठोबाच्या देवालयाचीं द्वारें बंद करून तोबे उडतात त्याप्रमाणें विनायकरावजींच्या आफिसाचीं दारें बंद करून

थोडथोडीं मनुष्यें आफिसांत सोडणें भाग पडलें. इकडे दरबाराच्या तंबूंत थाटमाट करण्याचा झपाटा चालला होता.

तारीख ३० रोजीं सकाळपासून राजे लोकांकडे स्वारीची तयारी करण्याची गडबड चालू झाली. मानकरी, कारभारी, भालदार, चोपदार, हुजरे व कोचम्यान या सर्वांस कडेकोट ताकिदी झाल्या. ज्या ज्या लोकांची ज्या ज्याप्रमाणें योग्यता होती त्या त्याप्रमाणें कोणास दोन, कोणास तीन, कोणास चार याप्रमाणें दरबारांत येण्याच्या परवानगीचीं तिकिटें सरकारांतून मिळालीं होतीं. राजे लोक, जहागिरदार, संस्थानिक, इनामदार, व मुंबई येथील बडे लोक या सर्वांनीं तयार होऊन आपापल्या योग्यतेप्रमाणें स्वाऱ्यांचा थाट बारा वाजण्याच्या सुमारास दरबारास जाण्यास सर्व तयार झाला. रस्त्यानें पाणी शिंपून म्युनिसिपालिटीनें जिकडे तिकडे गार करून टाकिलें होतें. सरकारी कामदार लोक व हुद्देदार लोक ज्यांस तिकिटें मिळालीं होतीं त्याणीं बारा वाजतां हपिसास सुटचा देऊन डबल स्टाकिंग चढवून काळे व नवे करकरीत बूट घातले. तऱ्हे तऱ्हेदार कापडाच्या बंड्या व सदरे घालून वरती परीटघडीचे पांढरे सफेत, कोणी काळे व कोणी ठेवणीचे उत्तम प्रकारचे असतील ते आंगरखे घातले. गळ्यांत घड्याळांच्या सांखळ्या बाहेरून दिसत अशा अडकवून घड्याळें बंड्यांचे खिशांत ठेवून दिलीं. नंतर पागोटीं पट्टीदार घालून घेऱ्याच्या झोंकांत दरबाराच्या तंबूकडे साडेबारा वाजल्यापासून जाण्यास आरंभ झाला. ज्या ज्या लोकांस ज्या ज्याप्रमाणें अनुकूल होतें, त्या त्या प्रमाणें

त्यांनीं आपापला थाट केला. दरबारास कोणी सहा घोड्यांच्या गाडींतून, कोणी चार घोड्यांच्या गाडींतून, कोणी दोन घोड्यांच्या गाडींतून, कोणी फैटन मधून, कोणी ब्रूममधून, कोणी शिग्रामांतून, कोणी बग्यांतून आणि कोणी रेकल्यांतून बसून दरबाराच्या तंबूकडे जाऊं लागले. तमासगीर लोकांपैकीं कितीएक बडोदा लाईनीकडील आगगाडींतून, कितीएक आमनीबसांतून व कितीएक हातांत छत्र्या घेऊन, पायानेंच दरबार पाहावयास गेले. इकडे एक वाजेपर्यंत तंबूमध्यें खुर्च्या मांडून सर्व तयारी यथासांग झाली. दरबाराकरितां लोक तंबूत जाऊं लागले हें सांगण्याच्यापूर्वी आमच्या वाचकांस तंबूची रचना कशा प्रकारची होती हें सांगितलें पाहिजे. हा तंबू समुद्रकांठावर वर–कोटाच्या नैऋत्य कोनास नव्या सेक्रेटरीयटच्या व ब्याकबेच्या दक्षण टोकाच्या, मेयो रोड व व्हिक्टोरिआ रोड, ह्यांच्यामध्यें दिला होता. याची लांबी दक्षिणोत्तर व रुंदी पूर्वपश्चिम होती. सभोंवती कनाथा मारून भिंतीप्रमाणें उभ्या केल्या होत्या. दरबारास येणाऱ्या लोकांस तिकिटें दिलीं होतीं. त्या तिकिटांच्या मागल्या बाजूस तंबूचा नकाशा काढला होता. तंबूंत जाण्यास ठिकठिकाणीं मोठमोठे दरवाजे, पूर्वेच्या आंगास व पश्चिमेच्या आंगास, केले होते. व दरवाज्यावर मोठमोठ्या अक्षरांचीं निशाणें लावलीं होतीं. आपल्या तिकिटावर जें अक्षर तें अक्षर ज्या दरवाज्यावर दृष्टीस पडेल त्या दरवाज्यानें त्यानें तंबूत जावें. आणि तिकिटावर इंग्रजींत सूचना लिहिली होती, तेणेंकरून आंत जाणाऱ्या

लोकांची एकाच दरवाज्यांत दाटी न जमतां आपआपल्या वाटेनें तंबूंत जाण्यास त्यांस फार सोयस्कर झालें. या दरवाज्यांतून फक्त दरबार बघणाऱ्या लोकांनीं मात्र जावें असें ठरलें होतें. तंबूचें तोंड दक्षिणाभिमुख असून राजे रजवाडे वगैरे लोकांनीं मात्र त्या दरवाज्यांनीं तंबूंत जावें अशी तजवीज ठेविली होती. कनाथा ठोकून ही जी प्रशस्त जागा तयार केली होती त्या जाग्याच्या उत्तरेच्या आंगास मोठमोठे व सुशोभित पुष्कळ तंबू एकमेकांस जोडून दरबार बसण्यास रमणीय जागा तयार केली होती. ह्याच्या मध्यभागीं एक उंच करून त्याच्या चौंहो बाजूस चार नकशीदार रुपेरी खांब होते. त्याजवर अस्मानी रंगाचा सुंदर चांदवा दिलेला होता. व पुढच्या बाजूस सोनेरी रंगाचा सिंहाचा ठसा (बिल्ली पैशाच्या मागच्या बाजूस असतो त्याप्रमाणें) ढाली येवढा करून बसविलेला होता. अशा या शोभायमान मंदिरांत जडावाचें सिंहासन, खुर्चीच्या आकाराचें, दक्षिणाभिमुख मांडलें होतें. ह्या सिंहासनाच्या दोंहो बाजूस दोन सोनेरी रंगाचे सिंह करून बसविले होते, आणि पुढच्या बाजूस एक लहानसा टेबलाप्रमाणें नकशीदार व रंगीत चौरंग मांडला होता. ह्या अशा थाटाच्या सिंहासनावर आज कोण बसणार हें आम्हीं सांगण्याच्या अगोदरच आमच्या वाचकांनीं ठरवलें असेल. हें सिंहासन लार्ड नार्थब्रूक वाइसराय आणि गवरनर जनरल साहेब यांजकरितां तयार केलें होतें. या सिंहासनाच्या मागच्या बाजूस दर ओळीस १७ खुर्चीप्रमाणें पांच ओळी मांडल्या होत्या. आणि त्या खुर्च्यांच्या मागच्या बाजूस दर

ओळीस १८ खुर्च्याप्रमाणें सहा सात ओळी चढत्या खु-र्च्यांच्या मांडल्या होत्या. ह्मणजे मागच्या खुर्चीवरील मनुष्यास पुढची मौज सहज दृष्टीस पडावी. ह्या एकंदर खुर्च्या सुमारें २०० मांडल्या होत्या आणि ही जागा नेटिव लोकांच्या स्त्रिया बसण्याकरितां तयार केली होती. लाट साहेबांच्या ( गवरनर जनरल ) उजव्या बाजूस वीस वीस खुर्च्यांची एक ओळ याप्रमाणें सपाट जाग्यावर ज्या ओळी मांडल्या होत्या, त्यांत पुढच्या दोन ओळींच्या खुर्च्यांपैकीं पहिल्या ओळीच्या खुर्च्या फार उत्तम व नकशीदार असून खालीं बसावयास व मागें टेकावयास खुतनीच्या गाद्या होत्या, आणि त्या खुर्च्या मौल्यवान कापडानीं आच्छादित केलेल्या होत्या. ह्या खुर्च्या पहिल्या दरजाच्या राजे लोकां करितां तयार करून ठेविल्या होत्या. ह्या ओळीच्या मा-गल्या बाजूच्या दुसऱ्या ओळीच्या खुर्च्या ह्या राजे लोकां-बरोबर मानकरी व कारभारी येतील त्यांस बसण्याकरितां तयार करून ठेविल्या होत्या. ह्या दोन ओळींच्या मागें मुंबईतील बडे लोकांकरितां वगैरे आणखी तीन ओळी होत्या. व त्या मागें चढत्या खुर्च्या दर ओळीस ८० याप्रमाणें, बारा ओळी पाडल्या होत्या. लाट साहेबांच्या डावीकडच्या बाजूस उजवीकडच्या प्रमाणेंच सर्व खुर्च्यांचा थाट केला होता. परंतु पहिल्या ओळीच्या खुर्च्या मात्र राजे लोकांच्या खुर्च्यांप्रमाणें सुशोभित कापडानें आच्छाद-लेल्या नव्हत्या. डावीकडच्या बाजूच्या पहिल्या ओळीच्या खुर्च्या हायकोर्टाच्या न्यायाधिशांकरितां व कौन्सिलदार वगैरे मोठमोठ्या अधिकारी लोकांकरितां ठेविल्या होत्या.

हा तंबू सहा खांबी होता. व यांत एकंदर १३०० खुर्च्या मांडल्या होत्या. यास लागूनच दक्षिण बाजूस दुसरा एक छत्तीस खांबी विस्तीर्ण तंबू जोडलेला होता. यांतील उजव्या बाजूच्या पहिल्या ओळीच्या खुर्च्या खुतनीनें मढविलेल्या असून संस्थानिक व जहागिरदार यांजकरितां सिद्ध करून ठेविल्या होत्या. व ह्या खुर्च्या प्रत्येक ओळींत २८ याप्रमाणें ८ ओळी मांडल्या होत्या. याच्या समोर म्हणजे लाट साहेबांच्या उजवेकडील खुर्च्या अशाच थाटाच्या व इतक्या च मांडल्या असून पहिली ओळ सामान्य जहागिरदार व मुंबईचे बडे लोक यांनकरितां सिद्ध करून ठेविली होती. लाट साहेबांच्या डावेकडील व उजवेकडील पहिल्या ओळीच्या खुर्च्यांस त्या त्या लोकांच्या नांवांच्या चिठ्या आडकावून ठेविल्या होत्या. त्या दोहों बाजूच्या खुर्च्या ४०० होत्या. त्यांच्या मागच्या अंगास सामान्य लोकांस उभें राहून पाहतां यावें अशी जागा, बैठकी घालून, तयार केली होती. याप्रमाणें एकंदर सुमारें २८०० लोकांस दरबाराचा थाट यथास्थित पाहतां यावा अशी तजवीज करून ठेविली होती. खुर्च्यांच्या खालच्या बाजूस प्रथम मोठमोठ्या सतरंज्या व जाजमें हांतरून त्याजवर गालीचे घातले होते. आणि नंतर सखलादी पसरून त्याजवर खुर्च्या मांडल्या होत्या. ह्या ठिकाणापासून दक्षिणेकडील थोरल्या दरवाज्यापर्यंत सात आठ हात रुंदीच्या रस्त्यावर सखलाद पसरून दिली होती. व त्याच्या दोहों बाजूंस गोरे लोकांची पलटण उभी केली होती. आणि तंबूच्या सभोंवतालींही गोऱ्या लोकांचा गराडा दिला होता. दक्षिण दरवाज्याप्रमाणें-

च बसण्याच्या ठिकाणापासून पूर्व बाजूच्या व पश्चिम बाजूच्या दरवाज्यापर्यंत गालीच व सखलादी आंथरल्या होत्या. तंबूच्या बाहेरील अंगास पाणी शिंपून सर्व गारेगार करून टाकिलें होतें. प्रत्येक दरवाज्यांत तिकिटें पाहून आंत सोडण्याकरितां सात आठ शिपाई व एक साहेब याप्रमाणें उभे होते, अशा प्रकारचा हा तंबूचा सुंदर थाट बनविला होता.

साडेबारा वाजल्यापासून लोक तंबूकडे जाऊं लागले परंतु त्यांस आंत जाण्याची परवानगी मिळाली नाहीं. एक वाजताची तोफ धाडकन धडकल्याबरोबर तिकिटें दाखवून आंत जाऊं देण्यास सुरवात झाली. दोन वाजेपर्यंत दरबार पाहणारे लोक तिकिटें दाखवुन आपआपल्या जाग्यावर जाऊन बसले. स्त्रियांकरितां जागा करून ठेविली होती तेथें दोन स्त्रिया हिंदूंच्या, बाकी पार्शांच्या, येऊन बसल्या. नंतर राजे लोक, संस्थानिक, जहागिरदार, इनामदार वगैरे लहान मोठे सरदार एका मागून एक येण्यास आरंभ झाला. इकडे सलामीच्या तोफांचा तर धाड धाड धाड असा एकसारखा अवाज सुरू झाला. दक्षिणेंतील संस्थानिक लोकांस त्यांच्या त्यांच्या जाग्यावर बसविण्याकरितां महेरबान विन्हाम साहेब सरदारांचे एजंट व त्यांचे शिरस्तेदार रा० रा० दादा फटक या उभयतांनीं हातांत यादी घेऊन, न येणाऱ्या लोकांच्या खुर्च्यांच्या चिट्या फाडून काढल्या व जहागिरदार व संस्थानिक यांस त्यांच्या त्यांच्या खुर्च्यांवर नेऊन हे बसवीत असत. राजे लोक दोन वाजल्यापासून येण्यास आरंभ झाला. तीन वाजून दहा मिनिटें होईपर्यंत सर्व राजे, संस्थानिक, इनामदार, जहागिरदार, येऊन दाखल झाले,

आणि लाट साहेबांची वाट पहात बसले. मध्यें पंधरा मि-
निटें अवकाश गेला न गेला इतक्यांत तंबूच्या दरवाज्या-
पाशीं वाज्या सुरू झाला व सलामीच्या तोफा सुरू झाल्या.
आतां लाट साहेबांची स्वारी येते ह्मणून सर्वांचे डोळे दक्षिण
दरवाज्याकडे लागले, तों लाट साहेब पटकन पश्चिम दरवा-
ज्यानें तंबूंत शिरून सिंहासनाजवळ आले. लाट साहेब
सिंहासनाजवळ आल्या बरोबर सर्व लोक एकदम उभे
राहिले आणि ते सिंहासनारूढ झाल्या बरोबर लोकही
आपापल्या जागीं बसले. लाट साहेब त्या देदीप्यमान सिं-
हासनावर बसल्यावर, त्यांनीं एक वेळ सर्व लोकांकडे हास्य-
मुद्रेनें अवलोकन केलें, नंतर नजराणा सुरू झाला. कोल्हा-
पूरकर राजे महाराज, सर्व राजे लोकांत अग्रस्थानीं बसले
होते. त्यांस फारीन सेक्रेटरी यानीं लाट साहेबांजवळ नेलें.
राजे साहेबांनीं लाट साहेबांस मोठ्या आदरानें व अदबीनें
मुजरा करून नजराणा झाल्यावर, तसेच लाट साहेबांकडे
पाठ न करितां मागें सरत सरत आपल्या जाग्यावर जाऊन
बसले. याचप्रमाणें सर्व राजे, सरदार, संस्थानिक, जहा-
गिरदार, इनामदार व मोठमोठ्या पदव्या मिळालेले बडे
लोक, एका मागून एक आपापल्या अनुक्रमानें लाट साहे-
बांकडे पाठ न करितां, दहा वीस पावलें तसेंच मागें सरकून,
मग आपापल्या जागीं जाऊन बसले. याप्रमाणें सर्व लो-
कांचा नजराणा झाल्यावर लागलाच पोषाखास आरंभ
झाला. पहिल्याप्रमाणेंच एका मागून एक, राजे लोक, संस्था-
निक, जहागिरदार, इनामदार व बडे लोक यांस लाट साहे-
बांजवळ नेऊन, लाट साहेबांचा हात शेल्यास लावून तो

राजे लोकांस पांघरूं घालीत. अशा प्रकारें पूर्ववत
पोषाखाचा थाट झाला. नंतर लाट साहेब यांनीं सर्वांच
मुखश्रीकडे अवलोकन करून सिंहासनावरून खालीं उ
राहून सर्व लोकांस हितपर असें इंग्रजींत भाषण के
त्याचें भाषांतर इंदुप्रकाशांतून खालीं घेतलें आहेः—

"राजे रजवाडे व संस्थानिक हो, आपण या दरबार
आल्यानें, फार समाधान वाटलें. आपणांपैकीं पुष्कळ
खासगी गैरसोयी एकीकडे ठेवून, आपण सर्व खुषीनें मुंब
आलां आणि महाराणी साहेबांविषयीं प्रेम व राजनिष्ठा
चांगली दर्शविली, हें पाहून मला अत्यंत संतोष वाट
असें राणी साहेबांच्या तर्फे मी आपणास कळवितों. हिं
स्थानांतील राजे रजवाडे व संस्थानिक यांजशीं ज्या पद्धत
वागण्याविषयीं राणी साहेबांची आज्ञा झाली आहे व
पद्धति माझ्या पूर्वीचे अधिकारी माजी लार्ड मेयो य
यथार्थ रीतीनें चालविली, ती पद्धति चालविण्याचा मा
दृढ निश्चय आहे. आपली थोरवी, आपला मान आणि आ
स्वातंत्र्य हीं काळजीपूर्वक राखलीं जातील, आणि आपल
राज्यकारभाराच्या आंतील कामाकाजांत विनाकारण ह
घातला जाणार नाहीं. सर फिलिप वोडहौस यांजवर आ
पला पूर्ण भरंसा ठेवण्यासारखा त्यांचा आपल्या हितां
षयीं विचार व न्याय करण्याची इच्छा त्यांचे प्रत्यय आ
णास आतां आले असतीलच अशी माझी खात्री अ
आपल्या राज्यांत व मुलखांत राज्यकारभार चालविण्या
कामांत जेव्हां आपणास जरूर लागेल त्यावेळेस पोलि
कल खात्याकडील अंमलदार लोक आपणास सल्ला मस

व साह्य देण्यास खुषी होतील. नुक्तेच काठेवाडांतील संस्थानिकांनीं एकत्र जमून इंग्रज सरकारच्या अंमलदाराशीं मिळून काम केलें तें पाहून मला फार समाधान वाटलें आणि गिराशी लोकांच्या हक्काची पहाणी व ठराव केला व प्रधान लोकांचें कोर्ट स्थापन केलें. याजपासून पुष्कळ लाभ होईल असें मला वाटतें. रेवाकांठाच्या पोलिटिकल एजेंटाच्या देखरेखी खालच्या संस्थानांच्या हद्दींविषयीं निकाल लवकरच होईल हें ऐकून मला फार आनंद झाला. तसेंच आपणापैकीं पुष्कळांस राजकोटचें कालेज व दुसरीं विद्यालयें यांत अभ्यास करून इंग्रजी भाषेचें चांगलें ज्ञान प्राप्त झालें हें पाहून मला फार समाधान वाटलें.

राजे व संस्थानिकहो, राणी साहेबांच्या प्रतिनिधीनें मुंबई शहरांत हा पहिलाच दरबार केला आहे. गेल्या आठवड्यांत निरनिराळ्या प्रकारचे आनंदाचे समारंभ पाहण्याकरितां मोठा समाज येथें जमला. दुसरें आणि त्यांनीं प्रत्येक प्रसंगीं इंग्रज सरकाराविषयीं सद्बुद्धि व राणी साहेबांविषयीं राजनिष्ठा उत्तम प्रकारें अंतःकरणपूर्वक दर्शविली. राणीसाहेबांचा मी प्रतिनिधि म्हणून आपण जो अंतःकरणपूर्वक माझा आदर सत्कार केला याजबद्दल हकीकत मला कळवावी लागेलच. ती कळल्यावर त्यांस संतोष वाटेल. या मुंबईस येण्याच्या मोठ्या प्रसिद्ध प्रसंगीं या शहरांत जमलेल्या सर्व प्रकारच्या, योग्यतेच्या व जातींच्या लोकांचें इंग्रज सरकारच्या राज्याविषयीं जें प्रेम व राजनिष्ठा जीं आहेत त्यांजबद्दल राणी साहेबांचे आभार मी सर्वांस कळवितों."

नंतर दुसरे एका साहेबांनीं कांहीं इंग्रजींत वाचून दाखविलें. या नंतर लाट साहेब पुनः सिंहासनारूढ झाले. सिंहासनाच्या मागच्या बाजूस दोन कोपऱ्यांवर दोन असामी सुवर्णमय चामरें लाट साहेबांवर ढाळीत होते. इकडे लागलीच हारतुरे, गजरे, व उत्तम प्रकारचीं सुवासिक फुलें यांणीं भरलेलीं मोठमोठीं रुप्याचीं तबकें आणलीं. तशींच सोनेरी वर्खाच्या विडयांचीं तबकेंही भरून आलीं. आणि वाटण्यास आरंभ झाला. इतक्यांत कांहीं लोकांनीं अत्तर गुलाब आणलें व ते देऊं लागले. सर्वत्रांस पानसुपारी, हारतुरे, अत्तर गुलाब देऊन होईपर्यंत लाट साहेब हातांत एक कागद धरून लोकांकडे पाहत स्वस्थ बसले होते. लाट साहेबांचा पोषाख साधा असून गळ्यांत एक अस्मानी रंगाचा पट्टा अडकविलेला होता. व त्याच्या मध्यावर एक सोन्याचें पदक होतें. पानसुपारी सर्वांस देणें झाल्यावर दरबार बरखास्त झाला.

## पुण्यास आगमन.

गेले शुक्रवारपासून तों मंगळवार पावेतों या शहरांत चोहोंकडे बरीच धांदल उडाली होती. गेले शुक्रवारीं नेक नामदार गव्हरनर जनरल साहेबांची स्वारी मुंबईहून बरोबर पांच वाजतां येथील स्टेशनावर स्पेशल ट्रेनमधून आली. व येतांच २१ तोफांची सरबत्ती त्यांचे सन्मानार्थ झाली. आणि नंतर नामदार साहेब मोठ्या थाटानें गणेशखिंडीतील राजवाड्यांत गेले. व रात्रीं तिथें नामदार गवरनर साहेबांचा बाल झाला. दुसरे दिवशीं ह्मणजे शनवारीं प्रातः-

काळीं नामदार गवरनर जनरल साहेब येथील हायस्कूल, नार्मलस्कूल, फीमेल नार्मल स्कूल व सासून हास्पिटल पाहून परत गणेशखिंडींत सुमारें ११॥ वाजतां गेले. व त्याच दुपारीं "कौन्सिल हालांत" नामदार गवरनर जनरल साहेबांची स्वारी बरोबर चार वाजतां लेव्ही ( दरबार ) भरविण्याकरितां आली. व दरबार झाल्यावर येथील तोफखाना पाहण्यास गेली. तिसरे दिवशीं रविवार असल्यामुळें कांहीं लिहिण्यासारखें झालें नाहीं. सोमवारीं सुमारें ११ वाजतां येथील लोकांस नामदार साहेबांचे आगमनापासून फार आनंद झाला या भावार्थाचें मानपत्र येथील म्युनिसिपल कमिशनर व सरकारी कामगार लोक व सभ्य गृहस्थ हे लार्ड नार्थब्रूक साहेबांस देण्याकरितां गेले होते. व त्याचा त्यानीं स्वीकार करून आलेल्या मंडळीबरोबर कांहीं समर्पक भाषण केलें. व नंतर मंडळीनें नामदार साहेबांची परत जाण्यास रजा मागितली. दुपारीं चार वाजतां पुनः नामदार साहेब शर्यतीचे मैदानावर स्वी पाहण्यास गेले. व तेथें त्यांनीं तो समारंभ फार आनंदानें ६ वाजे पर्यंत पाहून स्वारी नंतर राजवाड्यांत परत गेली. मंगळवारीं सकाळीं खडकी येथील दारूगोळ्यांचा कारखाना पाहून लाट साहेबांची स्वारी स्पेशियल ट्रेनमधून नागपुराकडे रवाना झाली. नामदार साहेबांस मुंबईंत फार श्रम झाले असतां त्यांनीं येथें ही वरील गोष्टी मनःपूर्वक वेळचेवेळीं पाहिल्या. यावरून लार्ड नार्थब्रूक साहेब किती मेहनती आहेत हें आमचे वाचकांचे लक्षांत सहज आल्यावांचून राहणार नाहीं.

---

[ शाळापत्रक; पुस्तक १३. अंक ३. जुलई १८७३ इसवी. ]

# चंद्र आणि तारे.

सृष्टयुत्पत्तीच्या चवथ्या दिवशीं* संध्याकाळ होऊन सूर्य आपलें देदीप्यमान तेज मिरवीत सर्व आकाश एकटाच क्रमून अस्तास गेला असतां व मनुष्यपशुपक्ष्यादि प्राणिजात अद्याप निर्माण न झाल्यामुळें शून्य दिसणाऱ्या भूपृष्ठावर अंधकार जमत चालला असतां, एक-एकटाच सुंदर तारा पहिल्यानें आकाशांत उगवला. हें त्यास नवेंच जन्म लाधल्यामुळें तो आनंदाश्चर्यानें चकितचकित होत्साता कांहीं वेळ राहिला; मग चोहोंकडे पाहतो तों आपणासारखा सुंदर पदार्थ साऱ्या आकाशभर किंवा पृथ्वीवर कोणताही त्याच्या नजरेस येईना. परंतु फार वेळ लोटला नाहीं तों आधीं एक, मग दुसरा, मग तिसरा, असे एकामागून एक दुसरे तारे त्यास येऊन मिळाले. असें होतां होतां एका तासांत सर्व आकाशभर अचल तारे व ग्रह चमकूं लागले, आणि एक मोठा धूमकेतु मधोमध उगवून त्याची प्रभा चोहोंकडे फांकली.

हीं तेजें कांहीं वेळपर्यंत आपली व परस्परांची प्रभा पाहण्यांत गर्क होऊन राहिलीं होतीं. लहानापासून तों मोठ्यापर्यंत सर्वांस असें वाटत होतें कीं, सर्व विश्वांत प्रधान तेज काय तें मी, बाकीचा हा सारा माझा परिवार. सर्वांस आपणा एका खेरीज इतरांच्या तेजाचें मान स्पष्ट दिसे, स्वतःच्या

---

* ही गोष्ट एका अमेरिकन ग्रंथकारानें रचली आहे. यास्तव 'बैबल' च्या आरंभीं जो सृष्टयुत्पत्तीचा प्रकार वर्णिला आहे त्यास अनुलक्षून हिची संविधानक बांधलें आहे.

विषयीं मात्र यथार्थबुद्धि नव्हती. ( ठीकच ! इहलोकीं काय किंवा आकाशांत काय, स्वतःविषयींचें ज्ञान ह्मटलें ह्मणजे नेहेमी शेवटींच व्हावयाचें ! ) असो; ही प्रत्येकाची भ्रांति कांहीं वेळानें दूर झाली. ती अशी कीं, खालीं समुद्रांत सर्वांचीं प्रतिबिंबें यथास्थित व यथाकृति पडल्यामुळें आपआपल्या तेजाचें मान ज्यास त्यास वास्तविकपणें कळून आलें. याप्रमाणें त्या जलमय आरशानें प्रत्येकास त्याचें त्याचें खरें स्वरूप दाखवून सर्वांचा हळू हळू अहंपणा हरिला—नाहीं असा एका धूमकेतूचाच मात्र. त्याचा झोत पश्चिमेकडे भला लांबवर पसरला असल्यामुळें साऱ्या आकाशांत मजसारखें तेज माझेंच असा गर्व अजूनही तो वहात होता.

हीं सर्व तेजें आपआपणाविषयीं व परस्पराविषयीं याप्रमाणें विचार करीत आहेत तों एक लहानशी प्रकाशाची कोर सर्वांच्या दृष्टीस पडली. ही क्षितिजाच्या वर अंमळ प्रकाशते न प्रकाशते तों लागलींच मावळली. ही कोर प्रतिपदेचा चंद्र होय. चंद्रास त्यांचा तो लखलखाट पाहून आपणाविषयीं मोठा संकोच वाटला, व त्यांचा पूर्ण आकार बघून त्याच्या स्वतःच्या बारीकपणाची त्यास फार लाज झाली. पण समुद्रानें लवकरच त्यास आपल्या पोटांत ठाव दिल्यामुळें त्यांच्या दृष्टीआड त्यास होतां येऊन तो स्वस्थ झाला. तो दिसेनासा झाल्यावर सर्व तारे एकमेकाकडे टकटकां बघूं लागले, व त्यांच्या साश्चर्य मुद्रेवरून 'काय हो विचित्र रूप !' असें ते ह्मणतातच आहेत काय, असें दिसलें. नंतर चंद्राच्या वांकडेपणास व लाजाळूपणास सर्व हंसले,

व त्याचा उपहास करूं लागले, हा त्यांचा विनोद असा पुष्कळ वेळ चालला असतां त्यांस एकाएकीं असें वाटूं लागलें कीं, आपली प्रभा मंद पडत चालली. पहाटेची वेळ होऊन सर्व हळू हळू दिसतनासे होऊं लागले; व त्यांस असा धाक पडला कीं, आतां आपला अगदींच विलय होतो कीं काय कोण जाणें !

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं हीं मावळलेलीं तेजें पुनः हळू हळू उगवलीं, व डोळे उघडून पाहतात तों आदल्या रात्रींच्या मंडळीपैकीं एकही गळालें नाहींसें पाहून सर्वांस फार आनंद वाटला. आदल्या रात्रींची कोर ही पुनः उगवली होती, व त्या वेळेस पूर्वींच्यापेक्षां तिचें तेज अंमळ चढलेंसें दिसत होतें. पण मागल्याप्रमाणेंच ती त्या रात्रींही लवकरच मावळली; व तिच्यामागें धूमकेतु आपलें विस्तीर्ण व अप्रतिम तेज सर्व आकाशांत मिरवीत राहिला.

तिसऱ्या रात्रीं चंद्राचा आकार व तेज हीं इतकीं वाढलीं, व तो पहिल्यापेक्षां आतां इतका वर उगवला होता कीं, सर्वांचे डोळे त्याच्याकडे लागले. तो या रात्रींही लवकरच अस्तास गेला; पण त्याच्या वृद्धीचें सर्वांस इतकें आश्चर्य वाटलें होतें कीं, त्या सगळ्या रात्रभर आकाशगंगेच्या दोन्ही बाजूचे तारे त्याच्याचविषयीं बोलत होते. शेवटीं 'प्यारेदैज्' नामक वार्गेतील नव्या उत्पन्न केलेल्या मनुष्यास त्याच्या प्रथम निद्रेंतून जागीं करणारी पहाटच्या वाऱ्याची गार झुळूक सुटून तिनें ताऱ्यांस अंतर्धान पावण्याची सूचना केली. नंतर सूर्योदय होऊन जगाच्या पहिल्या विश्रामोत्साहाची सुरुवात झाली. या दिवशीं

सूर्याची उदयशोभा अशी कांहीं अपूर्व होती कीं, तसा थाट आलीकडील भ्रष्टाकाराच्या दिवसांत कधींही दृष्टीस पडत नाहीं. या रात्रींही चंद्र आणखी वर चढून पूर्वापेक्षां त्याचें तेज वाढलें होतें; तें इतकें कीं, त्याच्या शेजारचे कांहीं तारे मंदप्रभ होऊन कांहीं तर मुळींच दिसतनासे झाले. बाकीच्या ताऱ्यांस या गोष्टीचें कारण नीट समजेना; यास्तव त्यांचा असा तर्क सहज वाहिला कीं, जवळच्या ताऱ्यांचें तेज हिरावून घेऊन हा आपला प्रकाश वाढवीत आहे. मग काय विचारावें ! सर्वांस अशी धास्ती पडून गेली कीं, हा आपला गिळंकृत करण्याचा क्रम असाच पुढें चालवून हळू हळू सर्वांचा स्वाहा करण्यास चुकणार नाहीं.

याप्रमाणें दररात्रीं चंद्राचा आकार व सौंदर्य हीं वाढत चाललीं असतां त्यानें आपली मूळची सौम्य वृत्ति अगदीं सोडिली नव्हती. असें होतां होतां त्याचें बिंब अर्धाहून अधिक वाढलें. तेव्हांपासून मात्र त्याच्या वृत्तींत फेर पडून त्यास आपल्या थोरवीचा अभिमान वाटूं लागला. त्याचे किरण अधिकाधिक दुःप्रेक्ष्य होऊन त्याच्या जवळ तारे टिकतनासे झाले. फार काय, पण धूमकेतूचेंही तेज त्याच्या पुढें मालवलें. पौर्णिमेच्या रात्रीं तर त्याचें वैभव काय सांगावें ! आकाशाच्या मध्यभागीं झळकूं लागून त्यानें सर्व जगास शीतल असा प्रतिदिवसच भासविला. समुद्रांत त्याचें प्रतिबिंब पडलें होतें, त्याची अप्रतिम शोभा पाहतच राहून त्यास आपली मोठी धन्यता वाटली; आणि जे थोडे तारे अजूनही आकाशांत चमकत होते ते त्याच्या अफाट तेजास भिऊन अस्मान आकाशांत खोल खोल जागीं जाऊन दडाले.

[शालापत्रक, पुस्तक १३; अंक ६ अक्टोबर १८७३.]

चंद्रासही स्वतः आपला आकार व तेज अशींच आणखी कोठवर वाढत जाणार याचा कांहींच निश्चय होईना. त्यास असें वाटलें कीं, माझा आकार पूर्ण भरला खरा, पण याहूनही मला आणखी मोठें व्हायचें कशावरून नसेल? माझी अजून ही सतत वृद्धि होऊन, एडन् बागेंतील नव्या जोडप्यानें वर बघितलें असतां त्यास सर्व आकाश चंद्रमयच दिसावें असें कशावरून होणार नाहीं? पण याप्रमाणें आनंदाच्या भ्रमांत तो गर्क झाला असतां एकाएकीं अंधकाराची एक बारीक छटा त्याच्यावर चढूं लागली. ती चढतां चढतां तिनें कांहीं वेळानें सर्व बिंब व्यापलें; व चंद्राची पूर्वींची शोभा अगदीं नाहींशी होऊन तो आतां आकाशरूप फलकावर वाटोळ्या डागासारखा दिसूं लागला. हा कहर त्यावर गुदरत असतां, त्याच्या प्रभेंत लोपून गेलेले तारे त्याचा तेजोभंग पाहण्याकरितां पुनः हळूच पुढें सरसावले. पण हा त्यांचा हर्ष व चंद्राची विटंबना हीं फार वेळ टिकलीं नाहींत. ती छाया जशी हळू हळू त्याच्यावर आली होती तशीच ती हळू हळू चालतीही झाली; व ती गेल्या नंतर चंद्राची कांति पूर्वीपेक्षां फारच खुलूं लागली.

आणखी एक दिवस जाऊन दुसरी रात्र आली, व चंद्र नेहेमीप्रमाणें आदल्या रात्रीपेक्षां जरा उशीरानें उगवला. या रात्रीं जमिनीवरून आकाशक्रमण करीत असतां ही चंद्रास आपलें तेज अंमळ कमी झालेंसें भासतच होतें; मग समुद्रांत प्रतिबिंब दृष्टीस पडल्यावर तर त्याची खात्रीच झाली. त्या रात्रीं वादळाचा रंग दिसूं लागला; वारा एका-

एकीं सोसाटयाचा वाहूं लागून लाटा उसळल्या, व समुद्र फेंसाळून गेला. तसेंच त्यास भरती येऊन चंद्राविषयींचा स्नेह त्यानें त्याच वेळेस प्रथम प्रकट केला. असें होतां होतां मोठें तुफान झालें. आकाश विजांच्या गडगडाटांनीं दणाणून जाऊन पृथ्वी पावसाच्या धोंधाटयांनीं जलमय होऊन गेली. या संधींत ढगांच्या ऐन गर्दींत चंद्र लपून गेला, व त्याशीं स्पर्धा करून त्याच्या विपत्तींत हृष्ट होणारे जे तारे त्यांस ही कोठें तोंड बाहेर काढण्यास जागा राहिली नाहीं.

दुसऱ्या रात्रीं व त्या पुढील कित्येक रात्रीं चंद्र उशीरा उशीरानें उगवून त्याचें तेजही कमी कमी होत गेलें. तसेंच दररात्रीं त्यापुढें पूर्वीं दिपून गेलेले तारेही त्याचें मंद पडत चाललेलें तेज व विरूप झालेला आकार पाहण्यास अधिक अधिक उगवूं लागले पूर्वींच्या उत्कर्षानें तो चढून गेला होता, पण सध्यांच्या अपकर्षाच्या योगानें त्याची मूळची सौम्य वृत्ति पुनः प्रकट झाली; आणि त्याच्या गर्वामुळें त्यावरचा स्नेह जो सर्वांचा उडाला होता तो त्याच्या नम्रत्वानें त्यास पुनः प्राप्त झाला. तो शेवटला वर्तुलपाद क्रमण करीत असतां दररात्रीं त्याच्या बिंबाचा ऱ्हास होत जाऊन जेव्हां त्याची कोर पडत चालली, तेव्हां त्याची जी रमणीयता दिसली तशी पूर्वीं कधींच दिसली नव्हती.

असें होतां होतां शेवटीं अशी एक रात्र आली कीं, तींत चंद्र मुळींच उगवला नाहीं. धूमकेतु हा आधींच कोणीकडे नाहींसा झाला होता. त्या रात्रीं साऱ्या आकाशांत चोहोंकडे सामसूम होतें. एका महिन्याच्या महिन्यांत जे इतके विलक्षण फेरफार झाले त्यांविषयीं गंभीरतेनें विचार करीत

ताऱ्यांनीं सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत आकाश क्रमण केलें; आणि नुकत्या आलेल्या अनुभवानें शाहणें होऊन, जो तो आपल्या लहानथोर पदवींत सुखसमाधान मानून राहिला.

पुढील रात्रीं सर्वजण पाहतात तों चंद्राची कोर पुनः पश्चिमेस दृष्टीस पडली. तेव्हां सर्वांस अतिशयित विस्मय व आनंद वाटून त्याच्या पुनरुज्जीवनाचें सर्वांनीं एकदम अभिनंदन केलें. मग तो अस्तास जाऊं लागून त्याची कोर काळ्याजांभळ्या अशा क्षितिजावर टेंकलीशी दिसत होती तोंच, असें सांगतात कीं, त्याच्या दोन्ही टोंकांच्या मधोमध उभा राहिलेला एक देवदूत सर्वांच्या दृष्टीस पडला. त्यानें चोहोंकडे आपली नजर फेंकली, तों सूर्य त्याच्या पाठीमागें खूप खोल पाताळीं गेला होता, चंद्र त्याच्या पायांखालींच होता, पृथ्वी त्यास समोर दिसत होती, आणि आकाश नक्षत्रांच्या योगानें वर लकाकत होतें. ती अपूर्व शोभा पाहून तो क्षणभर आश्चर्यानें तटस्थ झाला; आणि नंतर ज्या भाषेंत "पहाटचे तारे गात असतां देवदूतांनीं आनंदानें जयजयकार केला" तींत त्याचा असा आनंदोद्गार निघाला: "हे जगदीशा! तुझी सृष्टि अतर्क्य व अद्भुत आहे! तींत तूं आपलें अपार चातुर्य प्रकट केलें आहेस!" असें ह्मणून तो उगाच राहिला;—व तेव्हांपासून आकाशांत सर्वांचा एक मिलाफ होऊन राहिला आहे.

---

[ शालापत्रक; पुस्तक १४ अंक ९. जानेवारी १८७९ इसवी. ]

## कवितेचा निबंध.

या निबंधांत आजपर्यंत इंग्लिश कवींविषयीं संक्षेपतः

निरूपण व संस्कृत कवींतून अत्यंत नामांकितांविषयीं पुष्कळ सविस्तर निरूपण असें देण्यांत आलें. हा निबंध ज्याकरितां आजपर्यंत लिहिण्यांत आला त्या आमच्या खेडेगांवांतील मास्तरांस, व इतर वाचकांस ही, बराच प्रिय झाला असें आह्मांस लेखनद्वारा व प्रत्यक्ष बोलण्यावरून ही समजलें आहे. यावरून पाहतां प्रस्तुत निबंध असाच पुढें चालवावा असें आजपर्यंत आमच्याही मनांत होतें. पण कित्येक कारणांवरून तो बेत आह्मीं सध्यां रहित केला आहे. एक तर हें कीं, हें पुस्तक मुख्यत: खेडेगांवांतील शाळांच्या मास्तरांच्या उपयोगार्थ असल्यामुळें येथून तेथून साऱ्या संस्कृत कवींचें वर्णन त्यांस विशेष इष्ट नाहीं. ज्यांनीं संस्कृताचें चांगलें अध्ययन केलें आहे व त्या भाषेंतील काव्यांचें समग्र ज्ञान ज्यांस करून घेणें असेल, त्यांसच तें उपयोगाचें. आमच्या मास्तरांची स्थिति अगदीं निराळी. यास्तव कालिदासप्रभृति जे जगद्वंद्य मुख्य मुख्य कवि त्यांविषयींचीच वरील माहिती त्यांस बस झाली. दुसरें असें कीं, संस्कृत कवींचें वर्णन अगदीं शेवटपर्यंत करावयाचें, असाच जर कृतनिश्चय केला, तर तें कधींही संपणें ह्मणजे बहुधा कठीणच! कारण, हजारों संस्कृत ग्रंथ आजपर्यंत कालगत्या यवनादिकांच्या तडाक्यानें जरी खास बुडाले असतील, तरी येवढ्या प्रलयांतून वांचलेले ही थोडे थोडके आहेत असें नाहीं. त्यांचें चांगलें अध्ययन करणें ह्मणजे एका मनुष्याच्या जन्माचें काम झालें! तर इकडून ही पाहतां सांप्रतचा बेतच आह्मांस प्रशस्त वाटतो. तिसरें अर्थातच असें कीं, हें काम सामान्य श्रमांचें नाहीं. तें जो हातीं धरील त्यास तें तडीस नेण्यास

पुष्कळ रिकामपण हवें, व त्या पाठीमागेंच सतत दृढ निश्चय धरून लागलें पाहिजे. शिवाय इतर ही सर्वांस अनुकूल नसणारीं कित्येक साधनें त्यास अवश्य हावींत.

पण या सर्वांहून ही प्रस्तुतचा निबंध येथेंच थांबवून ठेवण्याचें विशेष कारण असें कीं, या पुस्तकाच्या वाचकांस मराठी कवींविषयींची माहिती विशेषेंकरून उपयोगाची आहे. यास्तव आतां प्रस्तुत निबंधाच्या तिसऱ्या भागास आरंभ करावा असें आह्मांस वाटतें. आमच्या खेडेगांवांतील वाचकांस विशेष उपयुक्त असा हा तिसराच भाग; आणि निबंधास आरंभ होऊन पक्कीं तीन वर्षें लोटलीं, तरी त्याचीं अजून गांठही नाहीं. यास्तव या पुढें तोच हातीं घेण्याचा आमचा विचार आहे. शालापत्रकाच्या वाचकांचा मराठी कवितेशीं पुष्कळ प्रकारें संबंध असतो,—ती त्यांस शिकावी व शिकवावी लागते हें एक; व शिवाय ती वाचण्याचा पुष्कळांस छंद असून तिची स्वतः रचना करण्याचाही पुष्कळांचा उद्योग चालू असतो. शिवाय माहितीचा व मनोरंजनाचाही हा विषय होय. या महाराष्ट्रांत आजपर्यंत सुमारें सात आठशें वर्षांत जे कवि होऊन गेले त्यांविषयीं व विशेषतः त्यांच्या ग्रंथांविषयीं सविस्तर ह्मणण्यासारखा मजकूर आजपर्यंत कोणीं ही लिहिलेला नाहीं. या विषयाचा चांगल्या रीतीनें अभ्यास केलेले एक दोनच गृहस्थ होते; पण देशाच्या व भाषेच्या दुर्दैवानें त्यांच्या हातून हें कृत्य घडून येण्याचा योग कधींच आला नाहीं. असो; तरी ही येवढी उणीव काहीं अंशीं तरी नाहींशी करण्याचा आमचा विचार

आहे. तो या खेपेस आमच्या वाचकांस कळवून पुढील अंकापासून त्यास आरंभ करूं.

---

[ पुस्तक १४ अंक १०. फेब्रुवारी सन १८७५. ]

## ( उपोद्घात. )

हा प्रस्तुतच्या निबंधाचा तिसरा भाग होय. प्रकृत पुस्तकाच्या संबंधानें पाहतां यांत या तिसऱ्या भागाचेंच निरूपण मागील दोहोंहूनही सविस्तर असणें योग्य आहे. पण हें हवें तसें होईलसें आह्मास वाटत नाहीं. कारण ज्यावर लिहावयाचें तो विषय जरी योग्यतेच्या मानानें किंवा विस्ताराच्या मानानें पाहतां केवळ लहान आहेसें नाहीं, तरी त्यांत तादृश वैचित्र्य नसल्यामुळें व चरित्रें लिहून ठेवण्याची चाल आपल्या लोकांत मुळींच नसल्याकारणानें त्यावर विस्तारपूर्वक लिहिण्यास मुळींच अवकाश नाहीं. शिवाय यापूर्वी हा विषय कोणींच हातांत घेतलेलाही नाहीं. मराठी कवींविषयीं कांहीं माहिती ह्मटली ह्मणजे सध्यां दोन लेखांवरून मात्र मिळण्यासारखी आहे. एक नवनीताच्या कांहीं आवृत्तींस जोडलेला, कैलासवासी भास्कर दामोदर पाळंदे यांचा 'मराठी कवींचें वर्णन' या नांवाचा निबंध; आणि दुसरा त्याहून लहान व कमी योग्यतेचा असा डॉक्टर विल्सन् यांचा. हा दुसरा निबंध इंग्रेजींत लिहिला असून मोलस्वर्थकृत मराठी भाषेच्या कोशास प्रस्तावनेदाखल जोडलेला आहे. या दोहों लेखांत मराठी कवींविषयीं व कवितेविषयीं जी माहिती दिलेली आहे ती फारच थोडी आहे. ह्मणजे सुमारानें बसवलेले शक, कांहीं लोकप्रसिद्ध वृत्तांत

आणि एकंदर कवितेवर कांहीं उगीच थोडे स्तुतिनिंदात्मक विचार, याखेरीज त्यांत कांहीं सांपडणार नाहीं. असो; तरी येवढ्याबद्दल तरी वरील दोघां गृहस्थांचे मराठी कवितेच्या वाचकांनीं आभारच मानले पाहिजेत. कारण त्यांनीं पुढील लिहिणारास उपयोगी पडण्यासारखी येवढी तरी माहिती मिळवून ठेवली. येवढीही कालांतरानें नाहींशीच होण्याचा संभव होता.

असो; तर पुढें जो आह्मी प्रस्तुत विषयावर मजकूर लिहूं त्याला मुख्य आधारभूत वरील दोन निबंध होत. यांहून अधिक माहिती मिळविण्याचा उद्योग आजपर्यंत कोणींच केला नाहीं या गोष्टीचा फार खेद वाटतो;—तरी मोठेंसें आश्चर्य वाटत नाहीं. आमच्या लोकांस उद्योग करण्याची अगोदर केवढी हौस असते हें सर्वांस माहीत आहेच; आणि त्यांतून नवे शोध करायाची ! या दोहोंचा मक्ता आमचे धनी इंग्रेज लोक यांस आह्मी देऊन टाकला आहे. त्यांचा व्याप चोहोंकडे असून चोहोंकडे जसे त्यांचे शोध चालले आहेत, तसेच आमच्या देशाविषयीं, विद्येविषयीं, भाषांविषयीं वगैरेही चालले आहेत हें सांगायास नकोच. पण या संबंधें ते जें जें लिहितात तें तें सर्वथा खरेंच असतें असें नाहीं. त्यांस आपल्या भाषांचें, रीतरिवाजांचें वगैरे पूर्ण ज्ञान नसल्याच्या योगानें त्यांच्या लिहिण्यांत अनेक प्रकारच्या चुका पडतात. या, खरें ह्मटलें असतां, आमच्या तेव्हांच लक्षांत येऊन आह्मी खोडून टाकाव्या. पण आमच्या आळसानें ह्मणा, अज्ञानानें ह्मणा, अगर भयानें ह्मणा, हें आजपर्यंत कोठेंच झालेलें ऐकण्यांत नाहीं. उलटें असें मात्र चोहों-

कडे दृष्टीस पडतें कीं, साहेबांनीं असें असें ह्मटलें किंवा लिहिलें तेव्हां तें अवश्य खरें असलेंच पाहिजे; तें खोडण्याची कोणाचीही प्राज्ञा नाहीं ! असो; या आमच्या लिहिण्याचें प्रत्यंतर प्रस्तुत निबंधांत पुढें पुढें आमच्या वाचकांस येईलच.

वरच्याशिवाय आणखीही दोन निबंधांचा येथें उल्लेख केला पाहिजे. त्यांचा विषय सारी मराठी कविता नसून दोन मुख्य कवींविषयीं मात्र त्यांत मजकूर आहे. हे दोन लेख 'यशोदा पांडुरंगी' आणि 'तुकाराम महाराजांचा गाथा' या ग्रंथांच्या प्रस्तावना होत. पहिला ग्रंथ सुमारें दहा वर्षांपूर्वी रा० ब० दादोबा पांडुरंग यांनीं केलेली 'केकावली' वरील टीका होय. या ग्रंथास पूर्वापार चालत आलेल्या सांप्रदायाप्रमाणें एक इंग्रेजी व एक मराठी अशा दोन प्रस्तावना आहेत. या दोहोंत मोरोपंताचें थोडेंसें चरित्र आणि त्यांच्या ग्रंथांवर व तदनुषंगानें त्याच्या काळच्या स्थितीवर एकंदर व्याख्यान केलें आहे. सदर्हूप्रमाणेंच वर सांगितलेल्या दुसऱ्या ग्रंथाचीही गोष्ट आहे. त्यासही एक इंग्रजी व एक मराठी अशा दोन प्रस्तावना असून त्यांतील विषय वरच्यासारखाच कांहीं त्या कवीच्या चरित्राचा आणि कांहीं त्याच्या काळच्या लोकस्थितीचा वगैरे असा आहे. असो; या दोन्ही लेखांत मागें सांगितलेल्या दोहोंहून माहिती पुष्कळ भरपूर दिली आहे. शिवाय ती चांगला शोध करून व त्या त्या कवीचे ग्रंथ चांगले लक्षपूर्वक वाचून लिहिली आहेशी दिसते. याप्रमाणेंच वामन आदिकरून इतर कांहीं मोठमोठ्या कवींविषयींच्या माहितीचे ग्रंथ जर झाले असते तर त्यांपासून फार उपयोग होता.

या ठिकाणीं 'कविचरित्र' ह्मणून एक ग्रंथ सुमारें पंधरा वर्षांपूर्वीं झालेला आहे त्याचाही कांहीं उल्लेख करणें अवश्य आहे. या ग्रंथांत संस्कृत, प्राकृत, तेलंगी, तामिळ वगैरे बहुधा सर्व एतद्देशीय भाषांतील कवींची व त्यांचा ग्रंथांची थोडी बहुत माहिती दिलेली आहे. हा ग्रंथ बहुश्रुत वाचकांस विशेष उपयोगाचा होण्यासारखा आहे. याचा उद्देश उक्त कवींविषयींचा ऐतिहासिक वृत्तांत लिहावयाचा नाहीं, व त्यांच्या ग्रंथांचे गुणदोषविवेचन करण्याचा ही यांत घाट घातला नाहीं. तर फक्त एकंदर लोकांत कर्णपरंपरेनें ज्या दंतकथा ऐकूं येतात त्यांचा यांत संग्रह केला आहे. असो; तर महाराष्ट्र कवींविषयीं यांत जागोजाग कांहीं चमत्कारिक माहिती सांपडण्यासारखी आहे.

तर याप्रमाणें प्रस्तुत विषयावर जो लिहूं जाईल त्यास ग्रंथरचना करण्यास सामग्री सध्यां तयार आहे. ही फारच अपुरती आहे हें सांगायास नकोच. तरी याबद्दल आमच्या लोकांस मोठेंसें नांव ठेवतां येत नाहीं. कोणत्याही राष्ट्रांत पाहूं गेलें तरी ही उणीव पहिल्यानें आढळेलच. पहा कीं, प्रत्येक राष्ट्रांतील पहिले मोठे ग्रंथकार जे कवि त्यांपैकीं कोणाविषयीं ह्मणण्यासारखी माहिती लोकांस आहे? युरोपांतील कवि होमर, व्हर्जिल, चॉसर वगैरे विषयीं जशी थोडीच माहिती तिकडील लोकांस आहे; त्याप्रमाणेंच आमच्याही लोकांत कालिदास, भवभूति, किंवा ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर इत्यादि कवींविषयीं आहे. फार तर काय, शेक्सपीयर कवीस होऊन गेल्यास नुकतीं कोठें अडीचशें तीनशेंच वर्षें आज होताहेत ना! पण त्याच्याविषयींची माहिती

कोणा इंग्रजास विचारली तर येथला कोणी मनुष्य कालिदासाविषयीं जितकी सांगेल त्यापेक्षां त्याच्यानें ज्यास्त सांगवणार नाहीं ! त्यांतून इतिहास चरित्रें वगैरे लिहिण्याची त्या वेळेस इंग्लंडांत प्रवृत्ति नव्हतीशी नाहीं; तसेंच या कवीची ही ह्मणजे त्या वेळेस फारशी प्रसिद्धि झाली नव्हती असें ही पण नाहीं. त्या वेळची इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिची वरील कवीवर कृपा असून तिच्या आज्ञेवरून त्यानें एक नाटक रचिलें अशीहि वदंता आहे. असो; पण इतकें असूनही शेक्सपीयरचा वृत्तांत लोकांस कितीसा माहीत आहे ? कोणी ह्मणतो, तो खाटिकाचा मुलगा होता; कोणी ह्मणतो, तो पिंजाऱ्याचा होता. कोणी ह्मणतात, तो आपल्याच नाटकांचा प्रयोग करतांना स्वतः सोंग घेत असे; कोणी ह्मणतात, कीं मंडळी नाटकगृहांत गेली असतां हा दरवाज्याशीं त्यांचा घोडा धरून उभा राही, हेंच त्याचें काम होतें. कोणी ह्मणतात, ह्यानें हरण चोरल्यामुळें फिर्यादीच्या भयास्तव त्यास लंडनास पळावें लागलें; कोणी ह्मणतात, हा त्याजवर उगीच आरोप आहे. कोणाच्या मतें तो मोठा विद्वान पंडित होता; दुसऱ्यांच्या मतें तो सरासरी अर्धामुर्धा शिकलेला इतकाच होता. पण हेंचसें काय ? नुकता कोणी इंग्लंडांत असाही वाद काढला आहे कीं, शेक्सपीयरच्या नांवावर इतकीं नाटकें मोडतात ही सगळी निवळ लबाडी आहे. खरोखरी ह्मटलें तर तीं सर्व नाटकें बेकन ह्मणून जो मोठा तत्ववेत्ता त्याशीं समकालीन होता, त्यानेंच तीं सगळीं लिहून यानें आपलें नांव त्यांवर उगीच घुसडून दिलें. तो नुसता नाटक्या होता;—त्याला कोठलें

येवढें ज्ञान! झालें! आतां यापुढें काय राहिलें? एक मात्र अचाट कल्पना राहिली खरी, कीं कोणी जर्मन पंडितांनीं कांहीं काळामागें होमर कवीविषयीं जशी कल्पना काढिली होती, कीं होमर असा मनुष्यच नव्हता, त्याचप्रमाणें शेक्सपीयर मुळींच नव्हता इतकें मात्र आतां ह्मणावयाचें काय तें एक राहिलें आहे!! असो; तर याप्रमाणें सर्व विद्येचें माहेरघर जें इंग्लंड त्यांत फार नव्हे तर केवळ दोन तीनशें वर्षांपूर्वींच जो होऊन गेला त्या कवीची येवढी दुर्दशा!—त्यांतूनही हा कवि असा तसा सामान्य आहे काय, कीं जो कांहीं वेळ लोकप्रिय होऊन लागलीच लोकांच्या विस्मृतींत पडला! त्याची मानमान्यता त्याच्या जिवंतपणीं ही केवढी होती हें वर सांगितलेल्या राजसत्कारावरून व मिल्टन् कवीचे वगैरे जे त्याविषयीं लेख आहेत त्यावरून स्पष्ट दिसतें; आणि आजपर्यंत तो एकंदर इंग्रेज लोकांस किती प्रिय आहे हेंही विशेष सांगायास पाहिजे असें नाहीं. इतकेंच सांगतों कीं, ते लोक या कवीची मूर्ति देव्हाऱ्यांत बसवून तिची पूजा करीत नाहींत इतकेंच केवळ कमी आहे; बाकी सर्व प्रकारें ते त्यास सरासरी एकाद्या देवाप्रमाणें मान देतात असें ह्मटलें असतां चालेल. असो; तर एकंदर सांगायाचें काय, कीं हा कवि येवढा मोठा नामांकित असून व नुकता नुकता झाला असून ही त्याच्या विषयींची खरी माहिती ह्मटली तर दोन चार ओळींवर लिहितां येणार नाहीं. तेव्हां यावरून स्पष्ट दिसतें कीं, चरित्रें लिहिण्याची निखालस प्रवृत्तीच पडल्यावांचून मनुष्य केवढाही मोठा होऊन गेला तरी त्याजविषयींचा वृत्तांत

लिहून ठेवण्याचें कोणाच्याही मनांत येत नाहीं. असो; तर हीच गोष्ट आमच्या महाराष्ट्र कवींस लागते. त्यांविषयींची माहिती लोकांस फारच थोडी आहे, किंबहुना मुळींच नाहीं ह्मटलें असतां चालेल; तरी याविषयीं कोणास विशेष नवल वाटण्याचें बिलकुल कारण नाहीं.

---

मागील खेपेस प्रस्तुत विषयार लिहिण्यास साधनें कोणच्या प्रकारचीं आहेत, व तीं तशीं असण्याचीं कारणें कोणतीं याविषयीं थोडेंसें निरूपण केलें. आतां या विषयावर पहिल्यानें सामान्यतः जे कांहीं विचार सुचण्यासारखे आहेत त्यांचा कांहीं उल्लेख करून नंतर खुद्द विषयास आरंभ करूं.

या विचारांपैकीं पहिला मुख्य विचार प्रस्तुत विषयाची योग्यता होय. गेल्या अंकांत आरंभींच आह्मीं लिहिलें आहे कीं, 'हा विषय योग्यतेच्या किंवा विस्ताराच्या मानानें पाहतां केवळ लहान आहेसें नाहीं.' ही उक्ति वरील अंक वाचतांना वाचकांस गृहीत धरूनच चालावें लागलें असेल; कारण प्रस्तुत विषयाच्या 'विस्तारा' बद्दल जरी कोणास शंका असण्याचें संभवत नाहीं तरी त्याच्या 'योग्यते' बद्दल संशय घेणारे थोडे आहेतसें नाहीं. फार तर काय, पण प्रस्तुत विषयास मुळींच योग्यता नाहीं असें ह्मणतांनाही पुष्कळांस आमच्या वाचकांनीं ऐकिलें असेल. असो; तर या गोष्टीविषयीं अगोदर चांगला विचार अवश्य केला पाहिजे. कारण ज्यावर पुढील निबंधांत विस्तारपूर्वक विवेचन करायाचें तो विषयच जर मुळीं सामान्य प्रतीचा

किंवा अगदीं नादान असला तर वरील इमारत अर्थातच सगळी केवळ व्यर्थ झालीशी होईल! असो; तर पहिल्यानें या गोष्टीचाच अगोदर चांगला विचार केला पाहिजे.

आमच्या मराठी कवितेच्या प्रतिपक्ष्यांचे वर्ग केले असतां ते मुख्यतः तीन होतील. एक जुने शास्त्री, दुसरे नवीन विद्वान्, आणि तिसरे मिशनरी लोक. पहिल्यांचें ह्मणणें असें कीं, प्राकृत भाषा ह्मणजे काय अडाणी लोकांची, तेव्हां तींतील कवितेची योग्यता ती कितपत असायाची आहे? हीस संस्कृतांतल्या काव्यांची कधीं तरी बरोबरी येईल काय! दुसऱ्यांचें ह्मणणें असें कीं, आमच्या भिकार एत्तद्देशीय भाषांत जीव काय आहे? इंग्रेजी भाषेंत जसें मोठमोठ्या कवींनीं हजारों ग्रंथ लिहून ठेवले आहेत तसें मराठींत काय आहे? तिसरे आमचे पाद्री बंधु. यांच्या मतें तर आमच्या देशांत नांव घेण्यासारखें कांहींच कधीं आजपर्यंत सांपडलें नाहीं; मग कवितेसारख्या अमूल्य वस्तूची तर गोष्टही काढावयास नको! त्यांतून मराठी कवितेचा प्रसार त्यांच्या ईश्वरप्रणीत धर्माच्या प्रसारासही बाधक होणारा आहे; तेव्हां तो तर एतद्देशीय लोकांच्या आत्म्यास अत्यंत इजा करणारा समजून त्यास यथाशक्ति प्रतिबंध करण्याचाच वरील ज्ञानसंपन्न व धर्मशील पुरुषांचा सतत उद्योग सुरू आहे. तर याप्रमाणें पहिल्यांच्या विरोधास कारण गर्व, दुसऱ्यांच्या विरोधास अज्ञान, आणि तिसऱ्यांच्यास दुराग्रह असें होत.

आतां वरील त्रिवर्गास यथानुक्रम मराठी कवितेच्या तर्फेनें उत्तर देणें अवश्य आहे. पहिल्यानें प्राकृतास नाक

मुरडणारें शास्त्रिमंडळ. या मंडळाचें प्राबल्य हळूं हळूं मोडत जाऊन सध्यां तर तें देशाच्या दुर्दैवामुळें सरासरी शेवटल्याच अवस्थेस येऊन पोंचलें आहे, यास्तव यांच्या आक्षेपांस फार सविस्तर उत्तर देणें नलगे. एकंदर प्राकृत भाषांची, व त्यांतून प्राकृत कवितांची, त्यांच्या तोंडुन जी कधीं कधीं निंदा ऐकूं येते तीवर आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, संस्कृत भाषा ही मराठी वगैरे चालू भाषांहून सर्व प्रकारें अत्यंत श्रेष्ठ आहे ही गोष्ट सर्वांच्या मतें केवळ निर्विवाद आहे. यास्तव इतकेंच जर त्याचें ह्मणणें असेल तर वादाचें मूळच अर्थात् खुंटलें. पण संस्कृत भाषा सर्व प्रकारांनीं उत्कृष्ट असून सध्यांच्या प्राकृत भाषा सर्वथा तिरस्कारास्पद होत असें जर त्यांचें ह्मणणें असेल तर तें मात्र बरोबर नाहीं. सध्यांच्या स्थितींत पाहतांही मराठी व इतर प्राकृत भाषा बऱ्याच सुधारल्या असून त्यांत ग्रंथसंग्रहही थोडा आहेसें नाहीं, त्यांतून मराठींत तर विस्तार व योग्यता अशा दोहीं मानानीं पाहतांही तो मोठाच आहे. सारांश, ज्याप्रमाणें रुपें, तांबें वगैरे धातु सोन्याहून कमी मोलवान तर खरेच, पण त्यांचें स्वतःचें मोल त्यांस नाहींसें नाहीं, त्याप्रमाणें मराठी, हिंदुस्थानी वगैरे भाषांतील कवितांस जरी संस्कृत कवितेचीच निखालस बरोबरी झाली नाहीं, तरी त्यांची अंगभूत योग्यता ह्मणजे मुळींच शून्य असें कोणाच्यानेंही ह्मणवणार नाहीं.

दुसरे आक्षेपक आलीकडील विद्वान् लोक. यांच्यांतून बहुतेकांचीं मनें इंग्रेजी विद्येच्या अध्ययनानें अत्यंत दूषित झालेलीं दृष्टीस पडतात. इंग्लिश भाषेचें केवळ ज्ञान झालें

असतांही मनुष्याच्या अंगीं एकदम कांहीं अपूर्व शहाणपण येतें, किंवा दिव्यदृष्टीचा लाभ होतो, अशी त्यांची कांहीं विचित्र समजूत झालेली दृष्टीस पडते. या समजुतीस्तव ज्यास इंग्रेजी समजून नाहीं तो अज्ञान, मूढ; व जें इंग्रेजी नव्हे तें मूर्खपणाचें, दोषमय; असा एकंदरींत या लोकांनीं एक महासिद्धांत ठरवून ठेवला आहेसा दिसतो. हा त्यांच्या मनाचा कल ध्यानांत आणला असतां मराठी कवितेविषयीं त्यांचीं मतें कशीं असावीं हें सहजच ध्यानांत येणारें आहे. या नव्या लोकांस आपल्या देशभाषेचें ज्ञान कितपत असतें, एरवीं व्यवहारीत्या बोलायाचें असतांही त्यांच्या चुका कशा चमत्कारिक होतात, बोलण्यास उभे राहिले असतां किंवा चार ओळी लिहिण्याचा कोठें प्रसंग आला असतां धेडगुजरी भाषेचा कसा प्रकार होतो,—हें सर्वत्र प्रसिद्ध आहे. मग अशांची आपल्या देशभाषेंतील कवितेवर कितपतशी भक्ति असेल हें कोणीही सांगेल. या नव्या मंडळीपैकीं मराठी कविता ज्यांनीं कधींही लक्षपूर्वक वाचली आहे असे फारच थोडे निघतील. त्यांचा भर काय तो इंग्लिश भाषेवर व इंग्लिश कवितेवर; तेव्हां त्यांस जें कांहीं आवडणार तें तशा प्रकारचें असलें तरच उपयोगीं. पण आमच्या कवितेंत तसें कोठून असावें? मनुष्या मनुष्यांत अनेक प्रकारचा फरक जसा नेहेमी दृष्टीस पडतोच, तसाच राष्ट्राराष्ट्रांतही अवश्य असायाचाच. याच नियमास अनुसरून इंग्रेजी कवितेचे विषय निराळे, आमचे निराळे; त्यांची रचना निराळी, आमची निराळी; उपमा, रूपक इत्यादि अलंकार त्यांचे वेगळे, आमचे वेगळे. आतां या

निराळेपणांत अमुकच चांगलें आणि अमुकच वाईट अशी निवडानिवड करण्याचें जर कोणी पतकरील तर तें काम त्यास फार जड जाईल यांत संशय नाहीं. कारण कविता ही भूमितींतील प्रमेयांप्रमाणें तर्कशास्त्राचा विषय नव्हे तर केवळ हृदयवृत्तींचा व कल्पनाशक्तीचा आहे. यास्तवच अमुक अमुक उपमा सरस आहे कीं नाहीं, अमुक अमुक भाषणांत अमुक अमुक रस बरोबर उतरला कीं नाहीं, या गोष्टी सिद्ध करून दाखवितां येणाऱ्या नव्हेत, त्या मानानें केवळ अनुभविल्याच पाहिजेत. असो, तर याप्रमाणें इंग्रेजांच्या रुचिभेदानें एतद्देशीय भाषांतील कविता जरी त्यांस कदाचित् नापसंत ठरली, तरी येवढ्यावरूनच ती दोषास पात्र होईल असें कदापि होणार नाहीं. आणि त्याप्रमाणेंच इंग्रेजांच्या तऱ्हेचें जेवढें असेल तेवढेंच काय तें ज्यांस गोड वाटूं लागलें त्यांच्या तिरस्कारानेंही आमच्या भाषेंतील कवितेस वस्तुतः हीनत्व येणार आहे असेंही नाहीं.

आतां मराठी कवितेचे तिसरे प्रतिपक्षी जे मिशनरी लोक त्यांच्या ह्मणण्याचा विचार करूं. यांच्या आक्षेपावर उत्तर देणें हें वास्तविक पाहतां त्यांस फाजील मान देणेंच होय. कारण हे जे आक्षेप काढतात ते ह्मणजे मोठ्या प्रांजल बुद्धीनें किंवा समंजसपणानेंच नेहेमी काढलेले असतात असें नाहीं. त्यांच्या मंडळीचा एक जो मोठा उद्देश-कीं हिमालयापासून तों थेट कन्याकुमारी भूशिरापर्यंत सर्व देश ख्रिस्त प्रभूच्या भजनीं लागावा—त्यास कोणत्याही वेड्या वांकड्या रीतीनें जिकडून ह्मणून सहाय्य होईलसें त्यांस वाटतें तें करण्याविषयीं सारी मंडळी जशी काय एक्या

पायावर उभी आहे! मग आपण जें करतों तें वाजवी आहे कीं, गैर आहे, त्यांत शहाणपण आहे कीं मूर्खपण आहे, वगैरे गोष्टींकडे त्यांचें बिलकुल लक्ष असत नाहीं! तर याप्रमाणेंच मराठी कवितेविषयीं जें शत्रुत्व हे प्रकट करतात त्यांत वरच्या वेडगळ आशेशिवाय दुसरा कांहींएक हेतु नाहीं. मराठी कवितेंत प्रायः सगळा विषय हिंदुधर्माचा आहे, व तो धर्म लोकांत सतत जागृत ठेवण्यास ही कविताच पुष्कळ अंशांनीं कारण होते, हें पक्कें मनांत समजून वरील कवितेचा जितका ऱ्हास होईल तितका आपणास इष्टच होय असें वरील लोक मानतात. पण हें उघड कोणीं बोलून दाखवावें? तेव्हां अर्थातच पुढील कावे योजावे लागतात. कोणी ह्मणतात, मराठी कवितेंत आहे काय? उगीच कांहीं भाकड कथा आणि वेदांताचें चर्वित चर्वण हेंच काय तें तींत येथून तेथून भरलें आहे. दुसरे महापंडित आपलें पांडित्य मिरवितात:—'अहो! मराठी कविता ह्मणजे काय? संस्कृताचें शुद्ध भाषांतर आहे; तीस स्वतंत्र योग्यता ती कोणची आहे? तिसरे तर वरच्या दोहोंतून जास्ती आव घालून आमची कविता अत्यंत दुराचरणप्रवर्तक ह्मणून अंगावर शहारा आणतात, आणि ही जर बुडेल तर देशांतील अनीतीचें मूळच खणून टाकल्यासारखें होईल असें सुचवितात. पण चवथ्यांची ताण तर कांहीं पुसूंच नये! आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं अत्यंत भाविक अशा कित्येक ख्रिस्ती साधूंस हिंदुस्थानांतील वीसकोटि प्रजा जगाच्या खऱ्या तारकास न ओळखून खोट्या देवांस भजल्यामुळें अक्षय नरकाचें साधन करतांना पाहून मोठ्या कळव-

ळ्यानें रडतांना कदाचित् पाहिलें असेल, अथवा त्याच नाटकाचा अभिनय आमच्या देशांतील ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, किंवा येथील 'देवांस सोधणारी मंडळी' यांच्या पैकीं कोणीं हुबेहुब केलेलाही कदाचित् पाहिला असेल! तर त्या प्रकारावरून वरील भाविक ख्रिस्ती पंडितांस मराठी कवितेंतील खोट्या देवांचीं वर्णनें वाचून केवढी हळहळ वाटत असेल याचें आमच्या वाचकांस सहज अनुमान करतां येईल. आम्हांस कोणत्याशा एका पाद्री बुकांत वाचलेलें आठवतें,–त्या पुस्तकांत तुकारामाचे कांहीं सर्व प्रसिद्ध अभंग लिहून त्यांची मोठी तारीफ केली होती; पण शेवटीं ह्मटलें होतें कीं, अमृताच्या पेल्यांत जसा एक विषाचा थेंब टाकला असतां सगळें व्यर्थ होतें त्याप्रमाणें त्या अभंगांत 'विठोबा' चें नांव जें घातलें होतें त्यानें त्याचा सगळा रस जाऊन उलट तो आत्म्यास अपायकारक मात्र झाला! तर यावरून आमच्या बिचाऱ्या देवांवर ख्रिस्तांच्या प्रेषितांची केवढी कडक नजर आहे हें सहज दिसून येईल!

असो; आतां वरील चार आक्षेपांत तथ्य कितीसें आहे याचा विचार करूं. पहिला आक्षेप ह्मटला ह्मणजे आमच्या कवितेंतील विषयाच्या संबंधानें. हा विषय कोठें कोठें पौराणिक कथा व कोठें कोठें वेदांतास अनुसरून देहाच्या नश्वरतेच्या संबंधानें अथवा संसाराच्या मिथ्यत्वा संबंधानें वगैरे उपदेश असाच प्रायः असतो. या दोहोंतही आमच्या ख्रिस्ती बंधूंस येवढें दूषणास्पद काय वाटत असेल तें असो! आमच्या पुराणांतील गोष्टी अगदीं निवळ खो-

ट्या असें जरी घटकाभर धरलें, तरी कवितेचा विषय होण्यास त्यांस कोणता बाध आहे हें आम्हांस कळत नाहीं. आमचे ख्रिस्ती बंधु जेव्हां 'इलियड्', 'ईनियड्' वगैरे महाकाव्यें वाचून आनंदानें माना डोलवितात, तेव्हां त्यांतील सर्व वृत्तांताच्या खरेपणाबद्दल त्यांची खात्री झालेली असते काय? आम्हांला खचीत वाटत नाहीं. निदान आमची आम्हाला तरी पूर्ण खात्री आहे कीं, वरील दोन महाकाव्यांचें तिसरें अर्वाचीन भावंड जें 'प्याराडैज् लॉस्ट्' तें वाचतांना त्यांतील कथानकाच्या सत्यासत्यत्वाविषयीं आम्हीं केवळ उदासीन असतों. फार तर काय, पण आमच्या बंधूंची परवानगी असल्यास असेंही पण त्यांस आम्हांस निर्धास्तपणें सांगतां येईल कीं, त्यांच्या 'पवित्र शास्त्रा'वर आमची मोठीशी श्रद्धा आहे असें जरी नाहीं, तरी मिल्टनच्या वरील अप्रतिम काव्याचा स्वाद आमचा कधींही कमी झाला नाहीं. दुसरा विषय वेदांताचा. यावरील कविता रंगेल व अल्पमति लोकांस जर त्रासदायक वाटल्या तर त्यांत फारसें नवल नाहीं, पण धर्मपरायण व विरक्त वृत्तीच्या खऱ्या ख्रिस्ती लोकांस त्या कां नापसंत वाटाव्या कोण जाणे? सर्व देशांतील तत्वज्ञ लोकांनीं जे वैराग्यपर विचार जागोजाग प्रदर्शित केलेले आढळतात ते आमच्या महाराष्ट्र कवींनींही प्रगट केले असतां त्यांत काय बिघडलें? तर याप्रमाणें पहिला आक्षेप उडाला. आतां दुसरा असा कीं, मराठी भाषेंतील कविता शुद्ध भाषांतररूप आहे. यावर आमचें उत्तर थोडें आहे. तें इतकेंच कीं, वरील उक्ति शुद्ध अज्ञानाची आहे. मराठी पैकीं 'शुद्ध भाषांतर' कर-

णारा एकही कवि सांपडणार नाहीं. असें आह्मी येथें साफ लिहून ठेवतों. तें वरील आक्षेपकां पैकीं एकानें तरी खोडून टाकावें! * तिसरा आक्षेप आमच्या कवितेचा नीतिदृष्टचा भ्रष्टपणा. हा आक्षेप लागू पडण्यास आमच्या भाषेंतील लावण्या व प्रतिष्ठित काव्यांतलेही कोठले कोठले कांहीं भाग हीं बरींच कारणभूत होतील खरीं; पण वरील एकदेशावरून साऱ्या कवितेला नांव ठेवणें हें मिशनरी लोकांच्या मात्र सत्यनिष्ठेला व समंजसतेला साजण्यासारखें आहे. आमच्या लोकांपैकीं जे कोणी आमच्या कविताग्रंथांवर धाड घालण्याच्या बेतांत आहेत त्यांनीं आपल्या जवळच्या सोनामुखीच्या पुड्यांचा प्रयोग जर स्वभाषेंतील ग्रंथांवरच अगोदर पुरतेपणीं केला, तर तो त्यांच्या देशबांधवांस, एकंदर जगास, व आमच्या देशांतील तरुण विद्वानांसही जेवढा हितावह होणार आहे तेवढा बिचाऱ्या मराठी कवितेवर करून कांहींच व्हावयाचा नाहीं. आह्मांस खचीत वाटतें कीं, वरील पुड्यांचें कारण आमच्या कवितेंत जर एकपट पडलतर इंग्रेजी ग्रंथांत तें कांहीं नाहीं तरी निदान हजारपट तरी पडेल! आमच्या कविमालेंत जरासे फकड ह्मणण्यासारखे कवि फार तर रामजोशी, सगनभाऊ वगैरे अगदीं अलीकडचे कांहीं सांपडतील; व मागील कवींत मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत वगैरे कांहीं थोड्यांच्या ग्रंथांतून उगीच कोठें थोडेंसें अमर्याद शृंगारवर्णन सांपडेल; बाकी तुकाराममहाराज, ज्ञानेश्वरबोवा यांच्या काव्यांत तर गोष्ट ही बोलायाला नको.

---

* हा मुद्दा धरून बरेंच सविस्तर प्रतिपादन केलेलें पाहणें असल्यास 'निबंधमाला' अंक १२ च्या आरंभीं पाहावें.

पण हे आमचे मुखदुर्बळ कवि कोणीकडे आणि विलायतें-
तलीं जाडीं प्रकरणें कोणीकडे! आमच्या ज्ञानदेवाशीं
सरासरी समकालीन असणारे जे आद्यकवि चॉसर यांच्या
पासून जो इंग्लिश कवितेंत चावटपणाला आरंभ झाला
तो रामजोशाच्या वेळीं असणाऱ्या बायरन् कवीपर्यंत!
त्यांतून शेक्सपीयरच्या वेळीं व विशेषतः दुसऱ्या चार्ल
साच्या राज्यांत तर क्रियाद्वारा व लेखनद्वारा जो विचकट-
पणा माजला होता तो कांहीं पुसूं येये! सैतानाची व त्या-
च्या मंडळीची त्यावेळीं इंग्लंडांत जशी चंगळ चालली
होती तशी जगाच्या इतिहासांत इतर फारच थोड्या वेळीं
चालली असेल! पण हें फक्त कवितेविषयींच झालें. कादं-
बऱ्यांतून जो अनंगरंग ओतलेला आढळतो त्यास तर कांहीं
सीमाच नाहीं. आमचे पाद्री बंधु आमच्या मराठींतील कि-
येक कादंबऱ्यांतील कांहीं चावटगिरीचे प्रकार पाहून मोठा
हाहाकार करतात. पण फील्डिंग्, स्मॉलेट्, रेनॉल्ड्स,
बोकेशियो, येवढीं नांवेंच नुसतीं येथें लिहिणें पुरें आहे!
असो; या विषयावर सविस्तर लिहूं गेलें असतां एक भला
मोठा ग्रंथच होईल; व त्यांतील बहुतेक मजकूर आमच्या
प्रतिपक्ष्यांस मोठासा आवडेल असें आह्मांस वाटत नाहीं
यास्तव प्रस्तुत विषयाच्या तर्फेनें येथें शेवटीं इतकेंच लिहितों
कीं, आमची मराठी कविता इंग्रेजी कवितेशीं ताडून पा-
हिला असतां पुष्कळच शुद्ध ठरेल; आणि इतर सगळ्या
भाषांतील कविता जर पाहिल्या तर त्यांत हिच्या इतकी
अदूषित क्वचितच सांपडेल असेंही आह्मांस खास वाटतें.

आतां राहतांपैकीं एक शेवटला आक्षेप मात्र राहिला, तो

हा कीं आमच्या कवितेंत खऱ्या धर्मासअनुसरून मजकूर नसल्यामुळें तो वाचणारांच्या आत्म्यास अत्यंत घोर परिणामास नेणारा आहे. या आक्षेपास येथें सविस्तर उत्तर देणें केवळ अशक्य आहे. कारण तें उत्तर ह्मणजे हिंदु व ख्रिस्तीधर्म यांतून खरा कोणता या वादावर सर्वथा अवलंबून राहणारें आहे. पण या वादाचा निश्चयात्मक निर्णय अद्याप कोणींही केला नाहीं, व तो केव्हांही होईलसें वाटत नाहीं. यास्तव तो होईपर्यंत आमच्या कवितेचें पातकावहत्व सिद्ध झालेंसें मानतां येत नाहीं;-ह्मणजे तें मुळींच मानतां येत नाहीं असेंच झालें!

असो; याप्रमाणें मराठी कवितेवर निरनिराळे आक्षेपक जीं जीं दूषणें देऊं पाहतात त्यांच्या विषयीं वर बरेंच विवेचन झालें.

---

[ शालापत्रक; पुस्तक १५ अंक २. जून १८७९. इसवी. ]

## शाळेची व्यवस्था. *

## शिक्षा आणि शिक्षण.

### उपोद्घात.

या उपोद्घातांत शिक्षणपद्धतीचे ह्मणजे शाळा चालविण्याचे व शिकविण्याचे जे सामान्य नियम चोहोंकडे चालू

* फौलर साहेबांनीं शिक्षणपद्धतीवर केलेल्या सर्व प्रसिद्ध ग्रंथाचें हें भाषांतर आहे.

आहेत त्यांचें निरूपण करावयाचें आहे. शाळेची व्यवस्था ठेविण्याविषयींच्या हरएक बारीक गोष्टीविषयीं किंवा शिकवायाच्या प्रत्येक विषयाविषयीं येथें विचार करावयाचा नाहीं. शिक्षकास लागणाऱ्या हरएक गोष्टीविषयीं सर्व माहिती पूर्णपणें देण्याचा जर प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश असता, तर मात्र वरील सर्व कलमांचा विचार करणें जरूर होतें.

कोणत्याही विषयाच्या सर्व अंगाचा क्रमा क्रमानें सूक्ष्मपणें विचार करण्याच्या अगोदर त्या विषयाविषयीं एकंदरीनें सामान्यतः कांहीं निरूपण करणें हें नेहमी सोयीचें पडतें. आणि खरोखर पाहतां कोणत्याही कार्याच्या पद्धतीचे स्थलविशेषानें व कालविशेषानें वगैरे पाहतां कितीही अनेक प्रकार झाले असले तरी त्या सर्वांचें सामान्यतः निरूपण केलें असतां तें नेहमी थोडक्यांत होण्या सारखें असतें. हें निरूपण ज्याच्या चांगलें ध्यानांत येईल व त्याविषयीं जो चांगला विचार करील त्यास त्यावरून प्रसंगविशेषीं कशी योजना करावी हें सहज समजेल. आणि खरोखर हें ज्यास समजणार नाहीं त्याच्या हातून शिक्षकाचें काम चांगलें कधीं होणार नाहीं. वरील मनुष्यानें कितीही वाचलें असलें, किंवा शिक्षणाची पद्धति त्यास किती ही सविस्तर समजावून दिली असली, तरी वरचेवर असे प्रसंग येत जातील कीं, ज्या वेळीं वरील शिकलेलें ज्ञान त्यास अगदीं कामास पडायाचें नाहीं, आणि शिकलेल्या नियमांप्रमाणें जर तो चालू लागेल तर अनर्थ मात्र होईल.

इंग्रजी भाषेंतील ग्रंथांमध्यें उत्तमापैकीं मोडणाऱ्या एका ग्रंथांत * असें लिहिलें आहे:—

"कोणत्याही विषयाचीं मूलतत्वें ज्यास समजलीं आहेत त्यास त्याच्या विषयींचे नियम उपयोगी पडणारे असतात खरे, पण शिकणारास आपोआप ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य त्या नियमांचे अंगीं कधींही असत नाहीं; शिवाय ते नियम बहुधां अशा प्रकारचे असतात कीं, ज्या वेळेस आपणास त्यांची फार गरज असते त्यावेळेसच ते लागू पडेनासे होतात. ज्या ठिकाणीं सर्व स्पष्ट दिसत असतें तेथें वरील नियमही चांगले स्पष्ट असतात; पण जेथें कांहींच उमगत नाहीं अशा ठिकाणीं त्यांचा प्रकाश अंधक होत होत अगदीं नाहींसा होतो!"

तर याप्रमाणेंच शिक्षकांनीं प्रस्तुत शिक्षणपद्धतीचीं मूळतत्वें अगोदर चांगलीं समजून घेतलीं पाहिजेत, कीं तेणेंकरून तीविषयींचे नियम कोठें कोणचे लावावे याविषयीं ते घोटाळ्यांत पडणार नाहींत; आणि नियमांतील केवळ शब्दांसच धरून न चालतांना त्याचा मतलब कळण्याची त्यांजमध्यें शक्ति येऊन त्याप्रमाणें ते चालतील.

पण मूलतत्वें मुख्य आहेत असें जरी आह्मीं वर ह्मटलें आहे, तरी व्यवहारोपयोगी नियमांसही आह्मीं पुष्कळ महत्व देतों. अंकगणित व बीजगणित यांत उदाहरणें जशीं अवश्य दिलीं असतात त्याप्रमाणेंच प्रस्तुत विषयांतही उदाहरणांची मोठी आवश्यकता आहे. शिक्षक विद्यार्थ्यांस जेव्हां उदाहरणें चांगलीं समजावून देतो, व विद्यार्थी त्यांचें चांगलें

* 'गेसेस् एट् ट्रूथ्' (सत्याविषयीं अटकळी.)

मनन करतात, तेव्हां त्यांपासून विद्यार्थ्यांस फार चांगला उपयोग होतो. तो असा कीं, तीं उदाहरणें त्यांच्या हातून होऊन गेल्यामुळें पूर्वी जीं मूलतत्त्वें त्यांस नुसतीं माहीत मात्र होतीं त्यांचा साक्षात् उपयोग कसा करावा हें त्यांस समजूं लागतें. हें जर समजतें ना, तर मूलतत्त्वांचें नुसतें ज्ञान फारसें उपयोगीं न पडतें. मूलतत्त्वें शिकवण्याचा मुख्य उद्देश नेहेमी हाच असतो कीं, त्यांचें ज्ञान एकदां झालें ह्मणजे कितीही निरनिराळ्या तऱ्हेचीं उदाहरणें सोडवावयाचीं असतां अडचण पडूं नये. मग असें जर आहे, तर शिक्षकानें वरील मूलतत्त्वांची योजना कशी करावी हें जर विद्यार्थ्यांस चांगलें समजून दिलें नाहीं, तर त्यांचा मुख्य उद्देश सिद्धीस गेला नाहीं असें अर्थातच झालें.

बेकन्—नांवाच्या प्रख्यात इंग्रज ग्रंथकारानें, 'आड्वान्समेंत् आफ् लर्निंग्' ( विद्यावृद्धि ) या ग्रंथांत नुसत्या मूलतत्त्वांचें ज्ञान किती निरर्थक असतें हें दाखविलें आहे. तो ह्मणतो, "नुसत्या मूलतत्त्वांच्या योगानें जें व्यवहारास केवळ निरुपयोगी असणारें असें उगीच वरवरचें ज्ञान होतें तें केवळ व्यवहारांत पटाईत असणाऱ्या अशा शास्त्रानभिज्ञ लोकांच्या तिरस्कारास पात्र होतें;* आणि पृथ्वीच्या नकाशावरून ज्याप्रमाणें लंडनाहून यार्क शहरास जाण्याचा रस्ता सांपडणार नाहीं त्याप्रमाणेंच वरील मूलतत्त्वज्ञानाचा खुद्द व्यवहारांत काहीं उपयोग होणार नाहीं." पण सदरील

---

* याचा अर्थ असा कीं, वरील अशास्त्रज्ञ लोक शास्त्राची निंदा करतात ते ह्मणतात कीं, आह्मीं तें न शिकतांही व्यवहारांत कुशल आहों: तेव्हां शास्त्रज्ञान व्यर्थ नव्हे काय?

पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत केवळ व्यवहारच जाणाऱ्या शास्त्रशून्य मनुष्याचें ज्ञान किती कोतें असतें हेंही दर्शविलें आहे. तेथें वरील ग्रंथकार ह्मणतो. "माझी पक्की खात्री आहे, कीं ज्यांस अनुभव थोडा आहे पण जे शास्त्र जाणतात ते केवळ व्यावहारिक मनुष्यापेक्षां श्रेष्ठ होत, आणि त्यांच्याच कामांतही ते त्यांस पार हटवून टाकतील." याच अर्थानें त्यानें दुसऱ्या एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "ज्या ला वैद्यशास्त्र येत नाहीं आणि केवळ कांहीं थोडे गोड औषधोपचार मात्र जो जाणतो आणि त्यांवर घमंड मारतो त्याच्या स्वाधीन रोग्यानें आपलें शरीर करणें ही जर सर्व लोक मोठी चूक समजतात; तर त्याचप्रमाणें ज्यांनीं कायद्यांचा चांगला यथास्थितपणें अभ्यास केला नसून केवळ मोकद्दमे चालवण्यास मात्र जे वाकबगार झाले असतात त्यांकडे जाणें ही ही वरच्या सारखीच चुकी आहे. अशा लोकांस नेहेमीच्या धोपट मार्गाच्या बाहेरचें अंमळ इकडे तिकडे कांहीं आलें कीं लागलेच ते घोटाळून जातात, आणि हातीं घेतलेल्या दाव्याची नुकसानी होते..........एकाच मनुष्याच्या जन्मांत घडलेल्या प्रसंगांवरून एकाच्याच जन्मापुरते दाखले व उदाहरणें कधीं सांपडणार नाहींत."

वरील विचार जे कोणी अजून शिकविण्याच्या कामास लागले नाहींत त्यांसच उद्देशून प्रदर्शित केले आहेत, यास्तव प्रथमारंभींच शिक्षकानें काय करावें याचा यांत विचार करावा लागेल; व तसेंच पुढेंही त्यानें शिक्षणपद्धति कशी चालवावी याचाही करावा लागेल. याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथांत प्रस्तुत विषयाचा पूर्णपणें विचार होईल; आणि जे अगोद-

रच शिक्षणाच्या कामांत गुंतले असतील त्यांजविषयीं यांत पृथक् विवरण करण्याची गरज पडणार नाहीं. तसेंच शिक्षकांची कधीं कधीं एका शाळेवरून दुसऱ्या शाळेवर बदली झाली असतां त्यांस प्रत्येक खेपेस तेथपर्यंत त्याच्या अंगीं आलेला अनुभव त्यास पुढें उपयोगीं पडत जाईल; आणि मागें शिकलेल्या मूलतत्वांचा दर खेपेस पुढें उपयोग करण्यास त्यास सांपडेल.

ज्यानें शिक्षकाचा धंदा पतकरला त्याच्या आयुष्यामध्यें मोठी आणीबाणीची वेळ म्हटली म्हणजे ज्या वेळेस तो एकाद्या शाळेचा किंवा वर्गाचा चार्ज घेतो ती होय असें म्हटलें असतां अतिशयोक्तीचा दोष येणार नाहीं. त्यांतून ज्यानें नुकतेंच वरील काम हातीं घेतलें आहे अशा मनुष्यास तर ती वेळ तशीच खास असते. पुढें कित्येक वर्षे पर्यंत शिक्षणाच्या कामांत जें त्यांस यश किंवा अपयश येणार तें सर्व या पहिल्या वर्षाच्या यशावर किंवा अपयशावर अवलंबून असतें, आणि हें पहिल्या वर्षाचें फळ तरी पहिल्या आठवड्यांत जें काम त्याच्या हातून झालें असतें त्याच्यावर असतें. फार तर काय, पण शिक्षकाची व विद्यार्थ्यांची पहिल्या प्रथम गांठ पडली असतां शिष्यांच्या मनावर त्याच्या शिक्षणाचा जो ठसा उठेल त्यावरच त्याचें पुढील यश किंवा अपयश असतें असें म्हणण्यासही कांहीं चिंता नाहीं. हा पहिल्या प्रथम उमटलेला ठसा विचारी व पोक्त मनाच्या मनुष्यांवरही वजन पाडतें; मग पोरांवर तर त्याचें वजन सर्वथैवच पडल्यास कांहीं आश्चर्य नाहीं! तर मग, पहिल्या प्रथमच दुसऱ्यांच्या मनावर

आपली योग्यता चांगल्या रीतीनें ठसविणें, व अगोदर आरंभ चांगला करून ठेवणें, हें अत्यंत महत्वाचें होय. आतां हें खरें आहे कीं, एकाद्या मनुष्याविषयीं सकृद्दर्शनीं जो ग्रह होतो तो पुष्कळ वेळां उगीच क्षुल्लक कारणावरूनही होत असतो; पण असें होतें ह्मणून हा सकृद्दर्शनीं झालेला ग्रह व्यर्थ असतो, ह्मणजे त्याचें महत्व कांहींच नसतें, हें मानणें बरीक बरोबर नाहीं. तर उलटें असें आहे कीं, हा पहिला झालेला ग्रहच लोकांच्या मनावर सतत राहून वृद्धिंगतही होतो. यास्तव त्याकडे मनुष्यानें चांगलेंच लक्ष्य दिलें पाहिजे. वरील ग्रह एकाद्या शिक्षकाविषयीं मुलांचा बसला, कीं त्याचें आणि त्या पोरांचें मग कधीं जमायाचें नाहीं. शिक्षक जें जें करील त्याचा त्याचा ते भलभलताच उद्देश समजून त्यास नेहेमीं तीं त्रासच देतील. तेणेंकरून शिक्षकाचें काम त्यास फार जड जाऊं लागेल; आणि त्याचें चीजही कांहीं होणार नाहीं. यास्तव शिक्षकाचा आणि शिष्यांचा परस्पर प्रेमभाव असणें हें दोघांसही हितावह होय. त्याच्या योगानें शिक्षकास उमेद येऊन विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला चालतो. तर याप्रमाणें पुढील वाक्य हें शिक्षकाच्या वागणुकीचें एक मोठें कलम आहे:—

## शिक्षकानें विद्यार्थ्यांचा आपणाशीं समेट ठेवण्यास झटावें.

परंतु याविषयीं विवरण करण्यापूर्वी विद्यार्थ्यांवर शिक्षकाची छाप चांगली कोणत्या रीतीनें बसेल याविषयीं येथें थोडेंसें लिहिलें पाहिजे. आतां हें उघड आहे कीं, अशा

गोष्टीविषयीं विशेष अमुकच ह्मणून उपाय सांगणें हें फार कठीण आहे. कारण शिकवणाराच्या अंगीं तारतम्य ज्ञान, विचार, व पोक्तबुद्धि हे गुण जसे असतील त्या मानानें वरील गोष्ट सिद्ध होणार आहे. वरील गुण ज्याच्या अंगीं मुळींच नाहींत ते त्याच्यानें प्रगट करवणार नाहींत हें उघडच आहे; व कितीही उपदेश केला तरी ते त्याचे ठायीं येणार नाहींत. तरी शिक्षकानें पुढील गोष्टींकडे जितकें लक्ष्य देववेल तितकें द्यावें. अगोदर त्यानें मुलांशीं ममतेनें व उदारपणानें वागून त्यांच्या कल्याणाविषयीं आपणास कळकळ आहे हें भासवून द्यावें. तसेंच त्यानें त्यांच्या मनांत असेंही बिंबवून द्यावें कीं, आपला गुरु जरी आपणावर मेहेरबानी करतो, तरी आपण कांहीं गैर केलें असतां तें त्यास खपणार नाहीं, व त्याबद्दल तो आपली कधीं गय करायाचा नाहीं. शिक्षकाच्या कामाची हीच मोठी पंचाईत असते कीं, कडकपणा व सौम्यपणा हे दोन्ही गुण त्यास धारण करावे लागतात, व मोठ्या विचारानें त्यांचा उपयोग करावा लागतो. शिक्षकानें पहिला सौम्यपणाचाच गुण धारण करून मुलांस हवें तसें वर्तू द्यावें व त्यांचा आळस वाढवून शाळेची सगळी व्यवस्था मोडून टाकावी, हेंही बरोबर नाहीं; व दुसऱ्या पक्षीं अतिशय कडकपणा धरून त्यांशीं कठोरपणानें वागावें हेंही त्यास उपयोगी नाहीं. विद्यार्थ्यांविषयीं जर पाहिलें तर स्वच्छंद वृत्तिही जरी मनुष्यमात्रास प्रिय आहे तरी व्यवस्था व नियमितपणा हीं त्यांस अगदीं आवडत नाहींत असें नाहीं. जर त्यांच्याकडून तीं दोन्ही पाळविलीं तर त्यांची त्यांत नाखुषी नसते. माझा

स्वतःचा अनुभव तर असा आहे कीं जे जे वर्ग माझ्या आजपर्यंत पाहण्यांत आले त्यांत वरील दोन गोष्टींचा आनंद वाटून ज्यांतील विद्यार्थ्यांस मोठी हौस वाटली नाहीं असा मला एकही आढळला नाहीं. चांगल्या समंजस रीतीनें वर्गांत व्यवस्था सुरू केली असतां तीप्रमाणें चालण्यास जे झटत नाहींत असे विद्यार्थी फारच थोडे सांपडतील, किंबहुना मुळींच सांपडणार नाहींत. आतां हें खरें आहे कीं, वरील व्यवस्था व नियमितपणा हीं सुरू करतांना जर अतिशय कडकपणा व द्वाडपणा केला, तर मुलांचीं मनें विथरून जाऊन त्यांस वरील गोष्टींचा फार त्रास येऊन जाईल; पण ही गोष्ट मुलांसच मात्र लागते असें नाहीं. कोठेंही पाहिलें तरी वरील आचरणाचें असेंच फळ दृष्टोत्पत्तीस येणार. तर याविषयीं शिक्षकांनीं विशेष खबरदारी ठेविली पाहिजे. कारण कित्येक शिक्षक शिकविण्याच्या कामांत फार उत्तम असून त्यांच्या कडक स्वभावामुळें त्यांचें व मुलांचें कधीं पडत नाहीं, आणि त्यामुळें त्यांच्यापासून विद्यार्थ्यांस जसा नफा व्हावा तसा होत नाहीं. फार तर काय, पण त्यांच्या अंगचे जे उत्तम गुण ते सुद्धां याप्रसंगीं त्यांस प्रतिकूळ होतात. त्यांची हिंमत व धिमेपणा,—कीं जे दोन गुण उत्तम शिक्षकाचें मोठें चिन्ह होत, आणि ज्यांच्या योगानें शिक्षणाच्या कामांत त्याला जें काय यश मिळणार तें मिळावयाचें,—तेच त्यांस बद्धक होतात. कां कीं, यांचा यथायोग्य जसा उपयोग करावयाचा तसा त्यांच्या हातून न झाल्यामुळें विद्यार्थ्यांचें व त्यांचें वितुष्ट वाढण्यास मात्र ते कारण होतात.

ह्मणून मुलांवर शिकवणाराचा दाब बसून त्यांचीं मनें त्याच्याकडे वेधून जाण्यास सर्वांत अगदीं सोपा आणि उत्कृष्ट उपाय ह्मटला ह्मणजे हा होयः—"शिक्षकानें साध्या आणि सरळ रीतीनें वागावें." असें वागल्यानें शिक्षकाची निदान थट्टा तरी होणार नाहीं; आणि विद्यार्थी त्याचा बहुत करून चांगला मान ठेवीत जातील. पूर्ववयी व जगांत न वागल्यामुळें ज्यांस त्याचा अनुभव येऊन चुकला नाहीं अशा लोकांस रिकामी लभ्य प्रतिष्ठा मारण्याची संवय जी कित्येकांस लागून गेलेली असते ती फारच उपहासास्पद होय. तिच्या योगानें मुलांतच तर काय पण चोहोंकडे तशा मनुष्याचें हसें होतें. त्यास वाटत असतें कीं, माझा डौल पाहून सर्व माझी वाखाणणी करूं लागतील; पण तसें मुळींच न होऊन उलटें लोक त्याचा तिरस्कार मात्र करूं लागतात. आणि तो इतका कीं, त्याच्या अंगीं कांहीं खरे उत्कृष्ट गुण जरी असले तरी लोक ते मनांत आणीत नाहींत. त्याच्या मनाचा एकदां असा ग्रह बसून जातो कीं, हा मनुष्य जो येवढा डामडौल सगळ्या लोकांना दाखवितो, तेव्हां याच्या आंत कितपतसें असेल तें समजतेंच आहे !

येवढ्याकरतां शिक्षकानें अगदीं सरळ रीतीनें वागत असावें. तसें वागून आपली योग्यता जर तो दाखवील, तर त्यावर सर्वांचा लोभ जडेल. शिक्षकाच्या अंगीं भारदस्तपणा व निश्चयी पणा हे गुण असतां त्याचें वजन विद्यार्थ्यांवर कसें बसतें याचें पुढील एक मोठें उत्कृष्ट उदाहरण आहेः—

"न्यू इंग्लंदांत पुष्कळ वर्षांमागें एके समयीं असें झालें कीं, एका सरकारी शाळेची जागा रिकामी झाली. पुढें

त्या जागेवर एकाची नेमणूक होऊन ते दिवशीं मोठा समारंभ केला होता. शाळाव्यवस्थापक मंडळीच्या अध्यक्षानें एक मानपत्र वाचून नंतर नव्या आलेल्या शिक्षकानेंही थोडेंसें भाषण केलें. मग सभा विसर्जन झाल्यावर सगळी मंडळी जावयास निघाली असतां हा नवा शिक्षक सर्वांस दरवाज्यापर्यंत पोंचविण्यास गेला. इतक्यांत इकडे शाळेंतील पोरांनीं नेहमीप्रमाणें कल्ला करण्यास सुरवात केली. त्यांस तोंपर्यंत कोणीच चांगली शिक्षा लावली नसून हवा तितका दंगा करण्याची त्यांस संवय लागून गेली होती. यास्तव सभेस बसलीं असतांच सगळ्यांचा आपआपसांत बेत होऊन गेला होता कीं, मंडळी उठल्याबरोबर सगळ्यांनीं गोंगाट करायाचा. मग वर सांगितल्याप्रमाणें नवा आलेला शिक्षक आलेल्या मंडळीची बोळवणी करण्याकरतां तेथून उठून जातांच सर्वांनीं भुईवर जोडे आपटण्यास आरंभ केला; मनांत कीं, या नव्या मास्तरांत किती पाणी आहे तें पहावें! नंतर तो परत आल्यावर त्यानें वरील प्रकार पाहिला. पण मुलांशीं कसें वागलें पाहिजे हें तो चांगलें जाणत असल्यामुळें त्यानें वर्गांत येतांच तक्तपोशीवर जरा जोडा आपटला, आणि चेहेऱ्यावर रागाचें चिन्ह यत्किंचित्‌ही न दाखवतां "गंभीर मुद्रेनें" ह्मणाला, "मुलांनों, चीप!" हे शब्द त्याच्या तोंडावाटे निघतांच सगळीं मुलें एकदम गप्प झालीं; त्यांस तेव्हांच समजून आलें कीं, अशा गुरूशीं गडबड केलेली चालायाची नाहीं. तर याप्रमाणें त्या शिक्षकाचा "बळेंच ओढून न आणलेला असा सौम्यपणा आणि ज्या पुढें गडबड चालायाची नाहीं असा धिमे-

पणा " हे त्याचे दोन गुण विद्यार्थ्यांवर इतके ठसून गेले कीं, त्या सर्वांस तेव्हांच कळून आलें, कीं मागची बंडाळी झाली ती झालीच, ती इतःपर चालायाची नाहीं. "

वर जें उत्तम शिक्षकाचें वर्णन दिलें आहे त्यांचा वाचणारानीं चांगला विचार करावा; व अवतरणचिन्हांत जे शब्द घातले आहेत त्यांत मुलांवर दाब ठेवण्याची काय ती गुरुकिल्ली आहे असें समजावें.

शिक्षा आणि शिक्षण हे शाळेंतील कामाचे दोन मुख्य भाग आहेत असें समजून त्यांविषयीं प्रस्तुत ग्रंथांत पृथक पृथक विचार करूं. पहिल्या भागांत शाळेची व्यवस्था कशी ठेवावी व मुलांवर शिक्षकाचें वजन कोणत्या प्रकारचें असावें याविषयीं विवरण करूं; आणि दुसऱ्यांत शिकवावें कसें वगैरे याविषयीं लिहूं. या दोन्ही भागांचा परस्पर संबंध व्यवहारांतही आहे; यास्तव त्यांविषयीं ग्रंथांत विवेचन करतांना त्यांस केवळ पृथक मानतां येणार नाहीं.

---

विद्यार्थ्यांस चांगल्या तऱ्हेची शिक्षा लावतां येण्यास शिक्षकाच्या अंगीं पहिला आवश्यक गुण ह्मटला ह्मणजे हा असला पाहिजेः—

## दाब ठेवण्याचें सामर्थ्य.

हा गुण कित्येक मनुष्यांच्या ठायीं असा केवळ अंगभूत असतो, व इतरांच्या ठायीं त्याची अगदीं उणीव असून तो संपादन होणें हे त्यास इतकें अशक्य असतें कीं, इतक्या पुष्कळ मनुष्याच्या ठायीं सांपडण्यास कठीण असा जो वरील गुण तोच शिक्षकाचा मुख्य गुण होय हें ह्मणणें

आमच्या वाचकांस सकृद्दर्शनीं मोठें असमंजस वाटेल, पण यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, वरील गुण कांहीं मनुष्यांच्या अंगीं दुसऱ्यांहून अधिक असतो असें जरी कबूल केलें, तरी बाकीच्या लोकांस तो कांहीं अंशीं तरी संपादन करणें घडणारच नाहीं असें नाहीं. कोणी कोणी कदाचित् असे सांपडतील कीं, ज्यांस आपलें वजनच राखतां येत नसल्यामुळें वरील दाब त्यांचा मुळींच पडणार नाहीं; पण अशी गोष्ट सर्वांची खास असणार नाहीं. एरवींचीं कठीण कामें वहिवाटण्यास जसे आपण दृढ निश्चयाच्या योगानें शिकतों त्याप्रमाणेंच बहुतेकांस त्याच साधनानें हेंही साध्य होण्यासारखें आहे. आह्मी असें ह्मणत नाहीं कीं, दुसऱ्यांवर दाब पडण्यास जशा प्रकारचा स्वभाव लागतो तशा स्वभावाचें एकादें अंग ज्याच्यांत उणें आहे तो मनुष्य आपल्या हाताखालच्यांवर चांगलें वजन पाडूं शकेल; पण येवढें खरें आहे कीं, एकाद्या गुणाची आपणांत उणीव भासली ह्मणून ती नाहींशी करण्याचा बिलकुल उद्योग न करितां तो अमुक गुण आपणास कांहीं केल्या साध्य व्हावयाचाच नाहीं अशी मनास पक्की गांठ घालून बसणें हें अगदीं वाईट. असें करणें हें मनाच्या दुर्बलतेचें दर्शक असून अशा मनुष्याच्या हातून कधीं कांहींच व्हावयाचें नाहीं. यास्तव प्रस्तुत गुणाचा कमीपणा आपल्या अंगीं आहेसा ज्यास वाटत असेल त्यानें तो आपल्या ठायीं आणण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे. तो न केला तर त्यावांचून शिक्षकाचें काम कधीं चालणार नाहीं. विद्यार्थी त्याचा बोज मुळींच ठेवीनासे होऊन त्यास असा वरचेवर त्रास

देतील व पिसाळून सोडतील कीं, त्यास जीव नको असें होईल!

तर पहिल्यानें शिक्षकानें ही खोटी व अपायकारक समजूत मनांतून अगदीं दवडून टाकली पाहिजे. कोणती तर ही कीं, मुलांस धाकांत ठेवणें हें मला अगदीं साधणार नाहीं. आमच्या अनुभवांतली एक गोष्ट अशी आहे कीं, आह्मी एके समयीं एका शिक्षकास असें सांगितलें, कीं आमच्याकडे जर हे तुमचे विद्यार्थी असते तर असा दंगा आह्मी त्यांस करूं दिला नसता, मग तुह्मी कां देतां? त्यानें उत्तर केलें, "आपण ह्मणतां तें खरें; तुमच्याशीं तीं कधीं गडबड करायाचीं नाहींत; पण माझें तीं मुळीं ऐकतच नाहींत, त्यास मी काय करावें?" आतां या शिक्षकाच्यानें मुलांवर दाब ठेवणें किंवा तो जें शिकवील त्याकडे त्यांचें लक्ष लावविणें ह्या दोन गोष्टी कां बरें झाल्या नाहींत? कारण उघडच आहे कीं, त्या आपणास साध्य नाहींत असें समजून तो उगीच बसला ह्मणून. अशा प्रसंगीं शिक्षकानें वर्गांतला धडा एकदम बंद ठेऊन पोरांची गडबड नाहींशी होईपर्यंत एक शब्दही पुढें चालावया नाहीं असा जर निश्चय केला, तर लागलींच पोरांस धाक वाटून तीं गप्प राहतील, आणि त्याच्या सांगण्याकडे लक्ष देऊं लागतील. अमुक अमुक गोष्ट हजार वाटेनें त्याच्या हातून सिद्धीस जातेच; आणि शिवाय त्याच्या हाताखालच्या मंडळींत त्याचा हुकूम मोडण्याविषयीं जर कांहीं मनांत वागत असलें तर तेंही धाकानें दबून जातें. कोणाही मनुष्याचा अधिकार चालण्यास स्वतःच्या सामर्थ्याविषयीं खात्री नसणें—ह्मणजे मी अमुक

गोष्ट हातीं घेतली तर करीनच अशी अंगांत हिंमत न वागणें यासारखें दुसरें कांहीं अपायकारक नाहीं. अशा मनुष्याचा दुसऱ्यांवर दाब कधींही बसणार नाहीं; कां कीं, यांचीच स्वतःच्या विषयीं खात्री नाहीं, मग दुसऱ्यांचा याजवर विश्वास जडून त्यांच्या अंगीं हिंमत कशी यावी ? *

ऐझाक् टेलर हा ग्रंथकार 'होम एज्युकेशन' (गृहशिक्षण) नांवाच्या आपल्या ग्रंथांत असेंच ह्मणतोः—"ज्या मनुष्यापाशीं दुसऱ्यांवर वजन पाडण्याची हिकमत असते व आपण जें हातीं धरूं तें करूं अशी जो हिंमत बाळगतो, अशा मनुष्यास दुसऱ्यांस आपल्या तंत्रानें वागविणें अगदीं कठीण

* वरील वाक्यांचा वाचकांच्या मनांत भलताच अर्थ भरूं नये ह्मणून येथें इतकें सांगितलें पाहिजे कीं, वर जी स्वतःविषयींची खात्री शिक्षकास अवश्य असली पाहिजे ह्मणून सांगितलें, ती खात्री ह्मणजे कित्येक शिक्षकांच्या अंगीं जो गर्व व मीपणा असतो तो नव्हे. हे वरील दोन गुण फार वाईट असून त्याच्या योगानें मनुष्याचा इतरांस तिटकारा मात्र येतो. हे दुर्गुण एतद्देशीय लोकांत विशेष आहेत असें ह्मणतात; आणि तसें पुष्कळदां प्रत्ययासही येतें. असो; तर वरील ह्मणण्याचा अर्थ हा नाहीं. तर शिक्षकाच्या अंगीं आपल्या खऱ्याखुऱ्या योग्यतेची पूर्ण खात्री असून तीविषयीं त्याला अगदीं घमंडी नसावी. त्याप्रमाणेंच त्याच्या अंगीं असा धिमेपणा असावा कीं कांहीं झालें तरी त्यानें गडबडूं नये—कसलीही पंचाईत पडली तरी तींतून पार पडण्याची त्याची त्याला हिंमत वाटावी. वरील अमोलिक गुण अगदीं मुखदुर्बळ दिसणाऱ्या मनुष्याच्याही अंगीं असूं शकतील; आणि पुढें पुढें करणाऱ्या चवचाल मनुष्यास त्याची कदाचित् कल्पना ही असणार नाहीं !

पडत नाहीं. परंतु वरील कार्य जो पुस्तकांत लिहिलेल्या व शास्त्रोक्त अशा नियमांनींच साधूं जाईल त्यास तें कधीं साध्य होणार नाहीं व अतिशय त्रासदायक वाटेल.''........
''मुलांचीं मनें आपल्या स्वाधीन ठेवण्याची गुरुकिल्ली तीन शब्दांत आहे;—उमगणें, पुढें चालवणें, आणि वळवणें. ह्मणजे शिक्षकानें विद्यार्थ्यांच्या मनांतील कल्पनेचा रोख ओळखावा; नंतर तीच कल्पना पुढें पुढें चालवावी, आणि सरतें शेवटीं तिला नवें वळण द्यावें, ह्मणजे नेतां नेतां त्यांची कल्पना खऱ्या कल्पनेशीं आणून जोडावी.''

वर जें ह्मटलें आहे कीं, ज्यास आपण करूं तें होईलच होईल असा पक्का भरंवसा आहे त्यास दुसऱ्यांवर हुकमत चालवणें अगदीं कठीण नाहीं. तसेंच वरील खात्री स्वतःसच वाटत नाहीं त्याच्या हातून कांहींच सिद्धिस जाणार नाहीं. कारण वरील अनिश्चयाच्या योगानें त्याच्या हातून उद्योगच अगोदर चांगला होणार नाहीं. ज्याच्या मनानें असें घेतलें, कीं माझ्या हातून हें काम कसचें नेटतें; त्याच्या हातून तें खास कधींही झालें जाणार नाहीं. पण जर तीच मनुष्यानें कंबर बांधली कीं, मी हें करीनच करीन, तर तें झालेंच ह्मणून समजावें. याचें कारण उघडच आहे कीं, एकाद्या कार्याविषयीं आपला आपल्याला अतिशय भरंवसा वाटत असला, ह्मणजे तें कार्य जसें काय सिद्ध झालेंच असें आपणास वाटून अतिशय हुरूप येत असतो; आणि तें होणें जरी दूर असले तरी त्या कार्याची सिद्धि आपणाला जशी काय खरोखरीच झालेली भासत असते. हा प्रकार ज्याला वरील भरंवसा वाटत नाहीं त्यास

कधींही होत नाहीं. जगद्विख्यात कवि शेक्सपीयर यानें वरील सिद्धांत थोड्या पण मोठ्या आवेशयुक्त अशा शब्दांत सांगितला आहे. माक्बेथची* बायको त्याला कचरतांना पाहून धीटपणानें ह्मणतेः—"पण तूं आपलें धैर्य तितक्या नेटानें चालव, ह्मणजे आपण खास फसणार नाहीं." त्याप्रमाणें प्रख्यात ल्याटिन कवि व्हर्जिल यांचेंही वचन असेंच मार्मिक आहेः—"त्याच मनुष्याला सिद्धि प्राप्त होते, कीं ज्याला ती प्राप्त होईलसें वाटत असतें."

परंतु येथवर जें आह्मी सांगत आलों आहों, कीं शिक्षकानें आपलें काम यथास्थित बजावण्यास शाळेंत आपलें अगदीं तनमन घातलें पाहिजे, व अशा प्रकारची आस्था शिक्षकांच्या अंगीं असते असें जरी आह्मीं वर गृहीत धरलें आहे, तरी वरील मजकूर लिहितांना एक वाईट गोष्ट मनांत वरचेवर येते. ती ही कीं, एकदां पंतोजी—कीं ज्याला उगीच उगीच बसून राहण्यापेक्षां श्रम करीत असणें हें किती प्रतिष्ठादायक आहे हें कळत नाहीं, आणि त्यांतून पोरांस शिकविण्याच्या कामाची योग्यता तर जो मुळींच जाणत नाहीं—जो आपलें काम (तें आपलें कर्तव्य होय असें मुळींच न समजतां) केवळ डोईवर ठेवलेला बोजा महारकी असेंच मानून केवळ आपल्या मजुरीकडे नजर दे-

---

* 'म्याक्बेथ्' शेक्सपीयरच्या साऱ्या नाटकांत सर्वोत्कृष्ट धरलेलें नाटक आहे. यांतील नायक वरील म्याक्बेथ् हा होय. डंकन् नामक राजाचा खून करण्याची चांगली संधी असतां त्याचा अनिश्चय पाहून त्याची धाडशी बायको त्या क्रूर कर्माविषयीं त्यास वरील वाक्यानें प्रवृत्त करूं पाहते आहे.

ऊन निरुपायास्तव तें करतो, बाकी खरोखरी वरील कामाची त्यास आंतून लाज वाटते—ज्याला शाळेंतील पोरांशीं शाळेबाहेर आपण होऊन बोलणें किंवा त्यांनीं आपणाशीं बोलणें अगदीं आवडत नाहीं, आणि तसें बोलतांना जर आपणास कोणीं पाहिलें तर लोक ह्मणतील कीं, " तो पहा शाळेंतला पंतोजी " आहे अशी ज्याला मोठी शरम वाटते—आणि ज्याच्या योग्यतेप्रमाणें सर्वजण ज्यास कस्पटाप्रमाणें मानतात—तर अशा प्रकारचे मनुष्य पुष्कळ सांपडतील हें मनांत येऊन मला मोठें दुःख होतें, कीं अशांच्या पायीं विद्यार्थ्यांचें फार नुकसान होतें, आणि विद्यावृद्धीचें कामही फार मागें पडतें. असो; तर अशा प्रकारचा एकादा शिक्षक वरील मजकूर वाचतांना बहुधा असे उद्गार काढील:—" अहो ! हें पुस्तक वाचलें असतां एकाद्यास वाटेल कीं, हा ग्रंथकार एकाद्या कांहीं मोठ्या विषयाविषयीं लिहित आहे, कीं जो मनुष्यानें आपलासा केला असतां जगांत त्यानें मोठी धन्यता मिळविलीशी होईल ! पण हा विषय तर काय !—पोरांस शिकवण्याचा ! वाः ! या ग्रंथकारास वाटत असेल कीं, सगळेच याच्यासारखे वेडे असतील; कीं ज्या नादीं एकदां भरले तिकडेच भरले ! जीं पोरें शाळेंत दांडगाई करणारीं आणि बाहेर लोकांस उपद्रव देणारीं अशांच्या करतां येवढी उरस्फोड करा, आणि रात्रंदिवस त्यांचा धोशा बाळगा, यावांचून कोणाचें काय अडलें आहे ! येवढी रिकामी उठाठेव कोणीं तरी करील काय ?"

वर जे लिहिलें आहे कीं, चांगला शिक्षक होण्यास शिक्षकानें त्या कामाकरतां केवळ वेडें होऊन गेलें पाहिजे,

असें जरी आह्मीं ह्मणत नाहीं; तरी आमची पक्की खात्री आहे कीं, आस्था आणि आवड या दोन गोष्टी असल्याखेरीज उत्कृष्ट शिक्षण कधींही चालायाचें नाहीं. आतां वरील दोन्ही प्रकारांत तरी वस्तुतः मोठासा भेद आहे असें नाहीं. जो भेद आहे तो निराळेपणाचा नसून केवळ कमज्यास्तपणाचाच आहेः ह्मणजे वरील दोन्ही गुणांची जाति भिन्न भिन्न आहे असें नाहीं; तर फक्त इतकेंच आहे कीं, दुसऱ्या गुणाच्या अतिशयानें पहिला गुण होतो, पण वरील दोन गुणांच्या जागीं जेथें जेथें अनास्था आणि कंटाळा हे गुण असतील तेथें तेथें कार्याची सिद्धि कदापि व्हावयाची नाहीं. कोणाही मनुष्यास एकाद्या कामाची मनापासून आवड असून त्याविषयीं जेव्हां तो झटून पडतो तेव्हांच तें होत असतें. तर याचप्रमाणें "शिक्षकास आपल्या कामाची अतोनात हौस असायास पाहिजे; आणि तें काम त्यानें जुलमास्तव किंवा दुसरा उपायच नाहीं ह्मणून करतां उपयोगी नाहीं, तर यासारखें प्रतिष्ठादायक व आवडीचें काम दुसरें कोणतेंही नाहीं असें समजूनच त्यानें तें हातीं घेतलेलें पाहिजे."* तर याप्रमाणें शिक्षणाचें काम ज्यानें आपल्या अंगावर घेतलें, आणि तें आपलें इहलोकचें कर्तव्यकर्मच ह्मणूनच जो समजतो, तो आपलें अंगीं शिक्षकाचें कसब पूर्ण यावें याविषयीं मनांत मोठी हौस धरील यांत संशय

---

* एका प्रसिद्ध जर्मन ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, "तरुणपणच्या उत्साहानें शिक्षणाच्या थोर कृत्याकडे ज्यानें आपलें तनमन धन अर्पण केलें आहे अशा मनुष्याप्रमाणें अवघ्या दुनियेंत दुसरें कांहीं मला हर्षप्रद वाटत नाहीं."

नाहीं. आणि याशिवाय वरील हेतु सफळ होण्याकरितां त्यास कितीही श्रम पडले किंवा त्रास सोसावा लागला तरी तो सोसण्यास खचीत तयार असेल. पण शिक्षकांचा मुख्य दोष ह्मटला ह्मणजे हाच असतो कीं, त्यांस आपलें काम आपल्या आयुष्यांतील एक कर्तव्यच आहे असें कधींही वाटत नसतें. पण असें वाटल्याखेरीज त्यापासून विद्यार्थ्यांचें हित कधींही होणार नाहीं. इतर सर्व धंद्यांतील मनुष्य आपआपल्या कामाकडे आपापले जन्म घालवीत असतात तेव्हांच त्यांत त्यांस पूर्ण यश प्राप्त होतें. तर तसेंच शिक्षकानें केल्याविना त्याच्या श्रमाचें चीज कदापि होणार नाहीं. जें कांहीं ह्मणून करायाचें तें जर चांगल्या रीतीनें केलें तर तें केल्याचें फळ. पवित्र पुस्तकांत (बैबलांत) ह्मटलें आहे, "जें जें तुझ्या हातीं करण्याचें येईल तें तें आपलें बुद्धि सर्वस्व खर्चून करीत जा." हें वरील वचन मोठें वैभवकारक आहे; पण त्याप्रमाणें चालणारे फारच थोडे सांपडतात. हिंदुशास्त्रांतील जें वचन कीं, 'विश्रांतीसारखें परम सुख नाहीं' तें अगदीं वेडेपणाचें आहे. बेकन् यानें 'एड्वानूस्मेंत आफ लर्निंग्' नामक ग्रंथांत मोठ्या मार्मिक रीतीनें ह्मटलें आहेः—

"या संसाररूप रंगभूमीवर ईश्वर आणि देवदूत असे दोघेच काय ते प्रेक्षक असावे."

सारांश आमचें मत एकंदरींत आह्मी असेंच निक्षून सांगतों कीं, मनुष्याच्या अंगीं जेवढें ह्मणून बुद्धिसामर्थ्य असेल व हिंमत असेल, तेवढी सर्व त्यानें आपल्या कामास लावली पाहिजे. हें तर काय पण जे उत्तम शिक्षक ह्मणून

मोडले जातात त्यांच्या ठायीं हा गुण आढळतोच आढळतो; आणि तो असल्याखेरीज शिकवण्याच्या कामांत सुमाराचें यश येणें देखील अशक्य आहे. ज्या शिकवणारास आपलें काम मनापासून आवडून त्याकडे त्याचें पूर्ण लक्ष लागलेलें असतें त्यास आपल्या वर्गांत जसें काय स्फूरण येत असतें. त्याचा आणि त्याच्या विद्यार्थ्यांचा असा कांहीं मिलाफ झालेला असतो कीं तो जसा काय आपल्या शिष्यांपैकींच एक होतो! त्यांचें मनोगत यास अगदीं पूर्ण कळून त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचें व उत्तराचें मर्म यास कळतें; आणि त्यामुळें त्यांच्या शंकांचें समाधान यास पुरतेपणीं करतां येतें. या सामर्थ्याच्या योगानें शिक्षकाचें शिष्यांवर जें वजन बसतें तें कांहीं पुसूं नये! विद्यार्थ्यांची अशा गुरूवर अतिशय भक्ति जडते, आणि त्याची गांठ पडली असतां त्यांस नेहमी आनंद होतो. तो वर्गावर आला असतां सर्वांची प्रफुल्लित मुद्रा होते व शिकण्याविषयीं मोठा हुरूप येतो; तो इतका कीं ज्या मनुष्यास लेशमात्र ह्मणून सहृदयता आहे त्यास त्यांच्या योगानें मोठें समाधान झाल्याविना खास राहणार नाहीं; आणि शिकविण्याच्या वगैरे कामीं जे श्रम पडतात त्यांचें साफल्यही त्यास अवश्य झालेंसें वाटेल.

प्रोफेसर तिंडाल यानीं दिलेल्या एका व्याख्यानांत पुढील चित्तवेधक वाक्यें आहेत; तीं प्रकृत स्थलास फार उत्तम अनुलक्षून आहेत. वरील ग्रंथकार ह्मणतो, "इंग्लंडांत साऱ्या धंद्यांत अतिशय महत्वाचा धंदा जर एकादा असेल, तर तो पंतोजीचा होय असें मला वाटतें. वरील अधिकार असा आहे कीं, तो बजावणाराचे अंगीं आपमतलबीपणा

आणि गैरहुशारी हे जर दुर्गुण असले तर त्यांपासून फार नुकसान होतें. कां तर, शिक्षकाच्या आचरणानें वस्तुतः ह्मटलें ह्मणजे पूज्यबुद्धि आणि प्रामाणिकपणा हे गुण शिष्यांच्या ठायीं ठसावे; पण वरील दोन दुर्गुणांच्यामुळें जेव्हां वरील वृत्तींच्यावद्दल तिरस्कार आणि लवाडपणा हेच मात्र गुण शिष्यांच्या ठायीं उत्पन्न होतात, तेव्हां शिक्षकाच्या कामाची योग्यता अगदीं हलकी ठरते. तर याप्रमाणें शिक्षकाच्या गुणांवर सगळ्या लोकांचें कल्याण व अकल्याण हें अवलंबून असतें. असो; पण जेव्हां उदार अंतःकरणाच्या व विद्वत्तेनें ज्याचें मन सुप्रकाशित झालें आहे असा मनुष्य विद्यार्थ्यांस शिकविण्यास येतो, आणि जेव्हां तो आपलें तेज त्यांवर पाडून त्यांचीं अंतःकरणें व मनें आपल्यासारखीं होत जातांना त्याच्या दृष्टीस पडतात,—तेव्हां अशा मनुष्याचा अधिकार मोठा सन्मानदायक होय हें नुसतें ह्मणण्यांत कांहींच अर्थ नसतो. तो अत्यंत धन्यतेचा होय असेंच ह्मटलें पाहिजे. अशा अत्युत्तम स्थितींतला मनुष्य स्वतःस व इतरांस केवळ आनंदाचें स्थान होऊन जातो. या इंग्लंड देशांत असे मनुष्य आहेत अशी माझी समजूत आहे.

"मुलांस शिक्षण जें द्यावयाचें तें कोणत्याही तऱ्हेचें असो; ह्मणजे सृष्टीविषयक शास्त्रांच्या द्वारें असो, किंवा भाषाज्ञानाच्या द्वारें असो; येवढें खरें आहे कीं, शिक्षकास आपल्या कामांत यश जें यावयाचें तें त्याच्या स्वतःच्या हिमतीवर, आस्थेवर व हौसेवरच नेहेमी असेल." या शेवटल्या शब्दांकडे शिकवणारांचें पूर्ण लक्ष असावें अशी

आमची त्यांस विनंति आहे; कारण त्यांत एका मोठ्या तत्वाची फोड केली असल्यामुळें त्यांचा पूर्ण अर्थ त्यांनीं चांगला ध्यानांत आणला पाहिजे.

ज्या शिक्षकास आपल्या हाताखालच्या विद्यार्थ्यांची आवड नसते त्याच्या हातून शिकवण्याचें काम चांगलें चालणें अशक्य आहे; तसेंच ज्यास वरील आवड आहे तो वाईट शिक्षक असणें हेंही बहुधा संभवणार नाहीं. आतां वरील विद्यार्थ्यांची प्रीति ही संपादन करूं ह्मटल्यानें मिळणारी आहे असें आह्मांस वाटत नाहीं; पण येवढें खरें आहे कीं, प्रत्येक शिक्षकास ती अगदीं अवश्य आहे, आणि आपलें काम जें शिकविण्याचें त्यांत त्यानें आपलें मन पूर्णपणें घातलें असतां ती त्यास बरीच प्राप्त होईल.

मागें आह्मीं सांगितलें आहे कीं, मुलांवर दाब ठेवण्यास शिक्षकास आपल्या योग्यतेचा स्वतःला भरंवसा वाटला पाहिजे; आणि हा भरंवसा शिक्षकाचा त्याचा त्यास न वाटणें यासारखें त्याच्या कामास अनर्थकारक दुसरें कांहीं नाहीं. वरील दुबळपणा हाताखालच्या लोकांच्या नजरेस एका क्षणांत येतो, आणि त्याच्या योगानें त्याच्यावरचा भरंवसा तेव्हांच उडून जाऊन वरील लोक त्याचें ऐकेनासेहि होतात; कारण त्यांस समजून येतें कीं, स्वतःचे हुकूम आपणाकडून चालवून घेण्यापुरती याचे अंगांत हिंमत नाहीं. मागें एका उताऱ्यांत सांगितलें आहे कीं, "शिक्षकाचा स्वर असा असावा कीं त्या स्वरांतच त्याची हुकमत दिसून यावी व ती प्रत्येक मुलास भासावी." वरील स्वर हा 'मनाचा सूचक' होय, आणि त्यावरून शिक्षका-

च्या अंगचा निश्चयीपणा असा स्पष्ट दिसून यावा कीं, त्यास विद्यार्थ्यांनीं वचकतच रहावें. आतां वरील अधिकाराचा स्वर ह्मणजे मोठा स्वर असा अर्थ नाहीं. जो आपला अधिकार जाणतो त्यास तो बजावण्यास मोटयानें ओरडावेंच लागतें असें नाहीं; उलटें सौम्य शब्दांतच तो अधिक व्यक्त होतो. मोठमोठ्या धमकावण्यांनीं पुष्कळ वेळां इतकें मात्र सिद्ध होतें कीं, या धमकावणाराच्या अंगीं स्वतःच्या सामर्थ्याचा भरंवसा नसून तें दुसऱ्यास दाखवावें इतक्याच उद्देशानें तो रिकामा आविर्भाव दाखवीत आहे. रिकाम्या बढाया मारणारा मनुष्य बहुत करून भित्रा असतो. आणि ज्यास आपलें सामर्थ्य खरें खुरेंच भासत असतें तो मनुष्य बहुधा जें बोलणें तें शांतपणानें थोडक्यांतच बोलून दाखवीत असतो. यास्तव प्रसंग पडला असतां अशाचें थोडें व स्वस्थपणाचें बोलणें जितकें खरें मानावें तितकें रिकामी बडबड करणाराचें मुळींच मानूं नये.

तर मग शिक्षकाच्या अंगीं दृढनिश्चयीपणा ह्मणजे जें एकदां करायाचें ह्मटलें तें तडीस पोंचविल्याविना राहायाचेंच नाहीं असा स्वभाव पाहिजे. हा स्वभाव जर त्याच्या अंगीं मूळचा नसेल तर तो बऱ्याच अंशीं त्यास प्राप्त करून घेतां येईल. याविषयीं पुढें कांहीं नियम दाखल करतों. आतां हें खरें आहे कीं, हे नियम अमलांत आणण्यासही वरील गुण ह्मणजे दृढनिश्चयीपणा हा बराच अंगीं असला पाहिजे. कां कीं, कांहीं विवक्षित नियमांस अनुसरण्याचा निश्चय करणें यांतच वरील गुणाचा कांहींसा अंतर्भाव होतो. असो; तर वरच्यापुरता वरील गुण शिक्षकाच्या अंगीं

आहे असें गृहीत धरून चाललें असतां पुढील नियमांच्या योगानें तो गुण शिक्षकाच्या अंगीं येण्यास बरेंच साधन होईल असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मनुष्य कोणत्याही कामांत तो कचरतो व करूं कीं नको करूं कीं नको असें करते याचें कारण त्यास अमुक अमुक नियम घालून दिलेले नसतात हें होय; ते असतील तर त्यांवर सारखी नजर ठेवून त्यांच्याप्रमाणें त्यास वागतां येईल. तर याप्रमाणें पुढील नियमांनीं शिक्षकाच्या अंगीं दृढनिश्चयीपणा नवा उत्पन्न होईल असें जरी आमच्यानें ह्मणवत नाहीं, तरी हे नियम जर समंजस असले तर त्यांस अनुसरून चालण्यानें विवक्षित गुण पुष्कळ वाढेल यांत संशय नाहीं. हे नियम पुढें दिल्याप्रमाणें होत. त्यांतील प्रत्येकाविषयीं पुढें आणखी जें लिहिण्यांत येईल त्यांवरून त्यांचें स्वरूप वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल.

पहिला. कोणताही हुकूम फर्मावण्यापूर्वी चांगला विचार करावा; पण एकदां हुकूम फर्मावला ह्मणजे तो सक्तीनें चालविल्याखेरीज राहूं नये.

दुसरा. जो हुकूम पाळला नाहीं तरी चालणार आहे असा हुकूम कधीं देऊं नये.

तिसरा. जो हुकूम एकदां दिला तो कधीं विसरूं नये.

वरील तीन कलमें हीं एकंदर नियमास, शाळेंतील कायम हूकुमांस, आणि सर्व प्रकारच्या ठरावांस लागतात. तसेंच शाळेंत ज्या आज्ञा प्रति दिवशीं व प्रत्येक तासाला शिक्षकास द्याव्या लागतात त्यांत ही वरील तीन गोष्टींकडे त्यानें पूर्ण लक्ष अवश्य द्यावें. या शेवटल्या आज्ञांविषयीं

जशी त्यांची बहुतकरून जेथें तेथें हयगय दृष्टीस पडते तसा प्रकार बिलकुल नसावा.

आतां पहिला नियम—कीं "कोणताही हुकूम फर्मावण्यापूर्वी चांगला विचार करावा, पण तो एकदां फर्मावला कीं सक्तीनें तो अमलांत आणावा"—हा वरील तिहींत अत्यंत महत्वाचा होय. याचें महत्त्व इतकें आहे व हा इतका व्यापक आहे, कीं तो ज्यानें यथास्थित पाळला आहे त्याच्या हातून शाळेची व्यवस्था नीट चालली नाहीं किंवा मुलांवर त्याचा धाक बसला नाहीं, ही गोष्ट व्हावयाचीच नाहीं. पण तेंच उलट पक्षीं पहा. वरील उपयुक्त नियम न पाळतां जो शिक्षक विचार न करतां हवे ते हुकूम भराभर देत असतो तो नेहेमी दोन पंचाइतींत पडत असतो. एक ही कीं, आपला अविचारानें दिलेला हुकूम मुलांस त्यास मुकाटचानें मोडूं द्यावा तरी लागतो; किंवा हेकटपणा धरून अन्याय होत असतांही तो अमलांत आणावा लागतो. उदाहरणार्थ असें समजा कीं, एकाद्या वर्गातील मुलांनीं आपले धडे न केल्याबद्दल किंवा एकादी कुचाळी केल्याबद्दल त्यास त्यांचा संताप आला, तर तो फारसा विचार न करतां रागाच्या आवेशांत असें बोलून जाईल कीं, "पुनः जर तुह्मी असें केलें, तर सरसकट सगळ्यांस शिक्षा केली जाईल." आतां अशी एकादी अविचाराची गोष्ट एकदां तोंडावाटे निघून गेली आतां शिक्षक कसा गुंतून पडतो पहा! एका रीतीनें तर वरील कायदा त्यास अमलांत आणतां येत नाहीं, कां कीं, एकाच्या किंवा थोडयांच्या अपराधाबद्दल सर्वांस सरसकट शासन करणें हा मोठा घोर

अन्याय आहे. शिवाय दुसरें असें कीं, वरील कडक हुकूम अमलांत जरी आणला, तरी त्यापासून जें कार्य व्हावयाचें तें पुनः होत नाहींच. कोणत्याही प्रसंगीं सरसकट शिक्षा केल्यानें फायदा न होतां नेहेमी नुकसानच होतें. तें असें कीं, जे निरपराध असतात त्यांच्या मनांत शिक्षकाविषयीं द्वेशबुद्धि उत्पन्न होते; आणि ज्यांनीं खरोखर अपराध केलेला असतो त्यांस मोठा आनंद होतो कीं, आपणाबरोबर बाकीचेही सर्व हाताखालून निघाले! पण वरच्याहूनही आणखी एक मोठा अनर्थ अशा सरसकट शिक्षेमुळें असा होतो कीं, शिक्षकास मुख्य अवश्य गोष्ट जी मुलांवरची जबर तिला अशा योगानें धक्का पोंचतो. कां कीं, अपराधाशिवाय ज्यांस शिक्षा झालेली असते त्यांच्या मनांतील आपल्या गुरुविषयींची सन्मानबुद्धि अगदीं नाहींशी होते. पण यावर कोणी कदाचित् ह्मणतील कीं, मुलांस काय समजत असतें? त्यांची न्याय अन्यायाविषयीं कसली समजूत असते? तर असें नव्हे. आपणास अपराधाशिवाय गुरूनें शासन केलें अशी विद्यार्थ्याची समजूत झाली असतां शिक्षकानें या ठिकाणीं मोठा अन्याय केला असें त्यास खास वाटत असतें. मुलें झालीं तरी आपणाकडून अपराध झाला कीं नाहीं हें त्यांस अर्थात् कळतच असतें; आणि तो अपराध जरी त्यांनीं स्पष्टपणें बोलून दाखविला नाहीं, तरी त्याबद्दल त्यांस शिक्षा झाली असतां ती आपणास अन्यायानें झाली नाहीं असें त्यांचें त्यांस वाटत असतें. पण जेव्हां त्यांस एकादा शिक्षक विनाकारण शासन करतो—मग हें नुसतें त्यांच्या बुद्धीनें असो, अगर खरोखरीच असो;—

तेव्हां त्यांचा शिक्षकावरचा विश्वास व त्याच्या विषयींची त्यांची भक्ति व पूज्यबुद्धि यांचा ऱ्हास होऊं लागतो. तो असा कीं, वरील मनोवृत्ति मग पुनः उत्पन्न होणें मोठें दुरापास्त होतें. यास्तव एकाद्या मुलाचें कांहीं मागणें किंवा कांहीं गाऱ्हाणें असतां त्याच्या ह्मणण्याचा विचार करून मग त्यावरून काय करणें तें करावें हें शिक्षकास योग्य आहे; आणि असें केलें असतां विद्यार्थ्यांची कोणत्याही रीतीची तकरार रहात नाहीं.

मागें जो पहिला नियम सांगिला, कीं "कोणताही हुकूम फर्मावण्यापूर्वी चांगला विचार करावा, पण तो एकदां फर्माविला कीं तो सक्तीनें अमलांत आणावा" यांतच "जो हुकूम पाळतां येणार नाहीं असा देऊं नये" हेंही येतें. ही गोष्ट पुष्कळ मास्तरांच्या हातून घडली जात नाहीं. सकृद्दर्शनीं वरील नियमाचा भंग जितका होत असेलसा वाटतो त्यापेक्षा तो पुष्कळच अधिक होतो. यास उदाहरण. असें अनेक वेळां होतें कीं, पुष्कळ मुलें एकीला वगैरे जाण्यास एकदम विचारूं लागतात. अशा वेळेस शिक्षक त्रासून घाईनें ह्मणून जातो, "आतां सगळ्या दिवसभर आज कोणालाही वर्गांतून सोडायाचें नाहीं." असें तो ह्मणतो मात्र; पण लवकरच एका दोघा तिघांनीं विचारलें असतां निरुपायास्तव त्यास हो ह्मणावें लागतें. आणि याप्रमाणें एकदां सुरू झालें ह्मणजे नुकतां पूर्वी जो हुकूम दिला असतो तो शिक्षकानें आपला आपणच रद्द केला असें होतें. आतां वरील असमंजस कृत्याचें कारण जर पाहिलें, तर एक उगीच वरचेवर नाहीं ह्मणण्याचा त्रास सुटावा ह्मणून तसें

शिक्षकास करावें लागतें; किंवा आपण दिलेला हुकूम गैर होता असें विचाराअंतीं त्यास कळून येऊन तो हुकूम अमलांत आणतां येणार नाहीं असें त्यास वाटूं लागतें, हें होय. ह्मणून आह्मीं वर सांगितलें आहे कीं, "हुकूम फर्मावण्यापूर्वीं चांगला विचार करावा." तो विचार हाच कीं, मी जो हुकूम देणार तो रास्त असून तो पाळतां येईल किंवा नाहीं. असा हुकूम एकदां दिला ह्मणजे तो विद्यार्थ्यांनीं नाखुषी न दाखवतां त्याप्रमाणें तात्काळ वागलें पाहिजे.

या ठिकाणीं दुसरीही एक मोठी महत्वाची गोष्ट सांगितली पाहिजे. ती ही कीं, एकादा हुकूम दिला ह्मणजे तो वाजवी आहे कीं, नाहीं याविषयीं पोरांस तकरार करूं देणें ही मोठी भयंकर चूक आहे. हिजविषयीं शिक्षकांनीं फार जपलें पाहिजे. जो हुकूम एकदां फर्मावला त्याविषयीं सबब सांगणें किंवा कुरकूर करणें हें विद्यार्थ्यांस अगदीं करूं देतां कामा नये. कारण तशानें शिक्षणाचा बोज अगदीं राहणार नाहीं. जी आज्ञा एकदां केली ती त्यांनीं शिरसा मान्य करून तीप्रमाणें अवश्य वागलेंच पाहिजे. या नियमास बिलकुल अपवाद नाहीं; व तो संभवतही नाहीं. कां कीं, हुकूम फर्मावण्यापर्यंत एकदां गोष्ट येऊन ठेपली व हुकूम फर्मावला ह्मणजे मग तो बरोबर आहे कीं कसा आहे याविषयीं विचार करण्याची वेळ निघून गेली असेंच समजलें पाहिजे. तो विचार करायाचाच तर अगोदर करणें योग्य होतें. ह्मणून आह्मीं वर सांगितलें कीं, "हुकूम देण्याच्या 'पूर्वीं' चांगला विचार करावा." हा सिद्धांत अतिशय महत्वाचा आहे असें आह्मांस वाटतें. कारण हुकूम दिला

असतां तो मुलांनीं अगदीं निमूटपणें ऐकावा इतका दाब ठेवण्याचें सामर्थ्य फारच थोडक्या मास्तरांच्या अंगीं सांपडतें. पण वरील गोष्टीचें अगत्य तर इतकें आहे कीं, तसा अधिकार ज्यास चालवतां येत नाहीं तो कितीही उत्तम शिक्षक असला तरी त्याच्या हातून पंतोजीपणाचें काम चांगलें होणार नाहीं; ह्मणजे तो शिकविण्याचे विषय हवे तर चांगल्या रीतीनें शिकवील, पण शाळेंत व्यवस्था करण्याचें किंवा पोरांस धाक लावण्याचें काम त्याच्या हातून होणार नाहीं. तसेंच वर सांगितलें आहे कीं, आपण पहिल्यानें दिलेला अन्यायाचा हुकूम चालत नाहींसा पाहून तो मोडण्याचें मास्तराच्या मनांत येतें, कीं तसें केल्यानें पोरांनीं वरचेवर आपणास त्रास देऊं नये. पण हीही वरच्या सारखीच मोठी चूक आहे. अशी संवय एकदां लावून घेतली ह्मणजे मग मुलांवरचा दाब सहजच उडून जातो. पण इतकेंच नव्हे. त्रास कमी होण्याच्या आशेनें जें करायाला जावें तेंच तो अधिक वाढण्यास मात्र कारण होतें असें शिक्षकाच्या प्रत्ययास आल्यावांचून कधीं राहायाचें नाहीं. कारण उघडच आहे कीं, जेव्हां मुलांस एकदां कळून येतें कीं, आपला शिक्षक जे हुकूम करतो ते सर्वदा मान्यच करावे लागतात असें नाहीं, ते टाळले असतांही चालतात; तेव्हां अर्थातच तसें करण्यास त्यांस उत्तेजन येतें आणि असें झाल्यामुळें पहिल्याहून पुष्कळपट अधिक त्रास शिक्षकास पडतो. सारांश, व्यवस्थेच्या कामांत जो सर्व साधारण नियम आहे कीं,——जो श्रम घेईल त्यास थोडा त्रास सोसावा लागतो; आणि जो मुळींच घेत नाहीं त्यास तो

पुष्कळ पडतो,-तोच या ठिकाणीं ही अगदीं बरोबर लागू पडतो. आतां अशा वाईट तऱ्हेच्या व्यवस्थेनें मुलांचें केवढें अकल्याण होतें हें सर्वांस उघड दिसणारें आहे; यास्तव त्याविषयीं येथें आणखी ज्यास्त लिहिण्याचें अगदीं प्रयोजन नाहीं.

जो शिक्षक व्यवस्थेकडे आळसामुळें लक्ष देत नाहीं त्यास शेवटीं किती त्रास सोसावा लागतो हें पुढील उदाहरणावरून वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल.

एका गृहस्थाचा असा लेख आहेः-"मी एकदां घोड्यावर बसून बाहेर फिरावयास निघालों असतां असें झालें कीं, एकाएकीं पावसाची मोठी सर येऊन मी जवळच एका खोपटींत शिरलों. तेथें पांच सात पोरांचा धुमाकूळ चालला होता, व एके बाजूस त्यांचा बाप शेकोटीशीं शेकत बसला होता. मी त्याच्याकडे गेलों, पण पोरांचा धांगडधिंगा असा कांहीं चालला होता कीं, आमचें बोलणें त्याच्यामुळें एकमेकांस ऐकूं येईना. तेव्हां बाप त्यांवर रागें भरून त्यांस चीप करूं लागलाः-ह्मणाला, "ऐकारे! काय गडबड चालविली आहे ही!"

"पण ऐकतो कोण! पोरांनीं बापाच्या ओरडण्याकडे बिलकुल लक्ष न देतां पहिल्यासारखाच दंगा पुनः चालविला. शेवटीं तो मनुष्य कातावून पुनः मोठ्यानें ओरडला, "काय आहेरे! तुह्मी ऐकत नाहीं का, थांबा चाबूक आणून तुमची खोड मोडतों!" पण मुलांना ही सर्व धमकावणी नेहेमींची माहीतच, तेव्हां पुनः त्यांनीं आपला क्रम पूर्ववतच सारखा पुढें चालवला.

"सरते शेवटीं तो बाप माझ्याकडे वळून मला ह्मणाला, "खरोखर अशीं द्वाड पोरें कोठेंही नसतील. मी कितीही ओरडलों तरी कारटीं ऐकतच नाहींत! करावें काय?"

आतां वरील गोष्टींतला तथ्यार्थ पाहिला तर वरील द्वाडपणाचा दोष मुलांचा बिलकुल नसून तो सर्व प्रकारें त्या बापाचाच होता. पोरांस वागवावें कसें हें त्यास कसें तें बिलकुल माहीत नसल्यामुळें आपली आज्ञा कशी मोडावी हें तो त्यांस अगदीं उत्तम व रामबाण रीतीनें शिकवीत होता असें ह्मटलें असतां चालेल. ती रीत कोणती ह्मणाल, तर हीचः-"तो त्यांस अशा आज्ञा देई व अशा धमकावण्या दाखवी, कीं ज्या न मानल्या तरी चालत."

वरील उदाहरण ह्मणजे आज्ञा मोडण्याची अगदीं शेवटली पायरी झाली, असा प्रकार शाळेंत बहुधा कोठेंही आढळणार नाहीं हें खरें. परंतु वर जें सांगितलें कीं, शिक्षकानें किंवा कोणत्याही अधिकाऱ्यानें आपले हुकूम सक्त अमलांत आणल्याखेरीज कधींही राहूं नये, या गोष्टीचें अगत्य किती आहे हें वरच्यावरून स्पष्ट दिसतें. आणि वरील नियमाप्रमाणें न चाललें ह्मणजे शिक्षकाची अवज्ञा होऊन त्यास किती अनोनात त्रास होतो, व खेरीज विद्यार्थी किती बिघडतात, हेंही वरील उदाहरणावरून सर्वांस दिसून येईल.

दुसरा नियमः—

जो हुकूम पाळला नाहीं तरी चालणार आहे असा हुकूम कधीं देऊं नये."

वरील नियम वाचून शिक्षकास बहुधा असें वाटेल कीं, "हा नियम कशाला घातला? आह्मी जेव्हां मुलांस एकादें

कांहीं करायास सांगतों, तेव्हां तें त्यांनीं करावें ह्मणूनच सांगतों; तें करूं नये अशा उद्देशानें कधीं सांगत नाहीं. " पण अंमळ विचार केला असतां कळून येईल कीं, वरील नियम जरी येवढा सोपा दिसतो, व नुसता लिहिला असतां अगदीं निरर्थक वाटतो, तरी तो अंमलांत आणण्यास पुष्कळ शिक्षक विसरतात. आह्मांस स्वतः या कामाचा जो पुष्कळ दिवसांचा अनुभव आहे त्यावरून आह्मी सांगतों कीं, वरील नियमाचा भंग ज्या दिवशीं झाला नाहीं असा एकही दिवस गेलेला आह्मांस आठवत नाहीं. पहा कीं, शिक्षक ह्मणतो, "बुकें झाका," आणि तो हुकूम न ऐकून दोन तीन मुलांचीं बुकें तशींच उघडीं राहून मास्तराचें त्यांच्याकडे लक्ष नसून तीं तशींच बुकाकडे पाहतात व वाचीत असतात तसेंच एकादे वेळेस शिक्षक सांगत असतो, "उदाहरण बंद ठेवा, आणि इकडे फळ्याकडे बघा." पण असें ह्मटलें असतांही मास्तर फळ्यावर जी उदाहरणाची समजूत देत असतो तिकडे कित्येकांचें लक्ष नसतें. अर्धा वर्ग मात्र फळ्याकडे पाहत असून बाकीचीं मुलें दुसरेंच कांहीं करीत असतात, किंवा बोलत असतात. अशी पद्धति असली ह्मणजे मास्तराचा धाक पोरांस मुळींच न वाटण्यास ती कारण होते, आणि ज्याला खरोखर 'शिक्षण' हें नांव देतां येईल असें चांगल्या रीतीचें शिकणेंही अर्थातच चालत नाहीं. आतां असें होऊं न देण्यास उपाय काय असें जर कोणी विचारील, तर त्याचें उत्तर सोपें आहे. वरील गोष्टीस तजवीज करण्याचें सारें शिक्षकाच्याच हातांत आहे. वरील प्रकार आढळल्याबरोबर त्यानें हात खोळंबून उगीच

उभें राहावें, आणि सगळ्या विद्यार्थ्यांचें लक्ष फळ्याकडे आहे असें पाहिल्याखेरीज पुढें एक शब्दही बोलूं नये. मागें जसें सांगण्यांत आलें आहे कीं, मुलांचें वर्गांत लक्ष नसलें तर लागलीच धडा बंद ठेवून सर्व लक्ष देत तोंपर्यंत पुढें कांहीं चालवूं नये. तीच युक्ति वरील प्रसंगीं. हे सर्व नियम किती सोपे आहेत बरें! आणि ते जितके सोपे आहेत तितकेच कार्यसाधकही आहेत! त्यांस जो अमलांत आणील त्याचा उद्देश सिद्धीस गेल्याखेरीज कधीं राहणार नाहीं. आतां इतकें खरें कीं, जो मनुष्य अगदींच निर्माल्य असेल त्यास मात्र त्यांचा उपयोग होणार नाहीं. पण अशांच्या करतां हें पुस्तक मुळींच लिहिलें नाहीं असें समजावें.

वर जीं उदाहरणें सांगितलीं त्यांत शिक्षकानें आपल्या आज्ञा मुलांनीं ऐकाव्या ह्मणून दिल्या असें कोणालाही वाटणार नाहीं. त्या त्यानें उगीच द्यावयाच्या ह्मणून दिल्या असेंच ह्मटलें पाहिजे. यास्तव वर जें आह्मी सांगितलें, कीं वरील दुसरा नियम शिक्षक वरचेवर विसरत असतात तो प्रकार वरील उदाहरणांत दृष्टीस पडतो. असें पुष्कळ वेळां होतें कीं, मुख्य कामाखेरीज इतर कांहीं कामाच्या संबंधानेंही शिक्षकास हुकूम द्यावे लागतात; आणि असेल हुकूम आळसानें व फारसा विचार न करतां दिले असल्यामुळें ते विद्यार्थ्यांनीं मानले काय आणि न मानले काय सारखेच असें समजून शिक्षकही त्याविषयीं बेफिकीर असतो. बरें आतां असें समजा कीं, एकाद्या वेळेस त्यानेंच दुसऱ्या तऱ्हेचा हुकूम दिला; ह्मणजे असा कीं, जो मोठा अगत्याचा असून अवश्य मानलाच पाहिजे. अशा वेळेस विद्यार्थी

अर्थातच आपल्या नेहमीच्या वळणावर जाऊन कोणी तो ऐकला, कोणी न ऐकला, असेंच करतील. आणि असें केलें असतां त्यांच्याकडेहि बिलकुल दोष येत नाहीं; कारण तशी-च संवय शिक्षकानें त्यांस लावलेली; आणि हुकूम महत्वा-चा कोणता आणि नाहीं कोणता हें तरी त्यांस कसें समजावें? असो; पण असें असतांही जर शिक्षक मुलांवर रागावला आणि आपला हुकूम तोडल्याबद्दल त्यांस शिक्षा करूं ला-गला; तर त्याजविषयीं त्यांची कोणत्या प्रकारची बुद्धि होईल बरें? अर्थातच त्याजवरील त्यांचा विश्वास अगदीं उडून जाऊन तीं त्यास ऐकेनाशीं होतील; आणि साधारण रीतीची व्यवस्थाही राहणार नाहीं. मग मुलांवर त्याचें वजन पडून त्यांस चांगली शिक्षा लावणें आणि अशा गु-रूची आज्ञा मोडणें अगदीं अयोग्य आहे अशाच केवळ समजुतीवर त्यांवर त्याचा दाब राहणें, वगैरे गोष्टी तर दूरच! यास्तव दृढनिश्चयीपणापासून उत्पन्न होणारा जो गुण, कीं सर्व प्रसंगीं सारखें वागावयाचें, तो मास्तरानें आपल्या अंगीं धारण केला पाहिजे. हा गुण मुलांस योग्य रीतीचें शिक्षण मिळण्यास व शाळा नीट चालण्यास अशा दोहीं कामास अगदीं आवश्यक आहे.

वर सांगितलेला नियम मोठ्या महत्वाच्या कामांत जि-तका मोडला जातो त्याहीपेक्षां नित्याच्या लहानसान गोष्टींत त्याकडे शिक्षकांचें पुष्कळ दुर्लक्ष होतें. उदाहरणार्थ, व-र्गाची व्यवस्था ठेवण्यांत किंवा एकादा धडा चालवीत अ-सतांना, कांहीं शिक्षक तर प्रस्तुत नियम जणों काय बुध्याच मोडीत असतात. पुढील गोष्टीस फार दिवस झाले नाहींत.

एकदां आम्ही असें पाहिलें कीं, एक शिक्षक अंकगणित शिकवीत असतां त्यानें पोरांस सांगितलें कीं, ज्याचें उदाहरण संपेल त्यानें वर जाऊन बसावें. हा हुकूम चांगला आहे; कारण त्याच्या योगानें उदाहरण लवकर करण्यास पोरांस उमेद येते, आणि कोणते मुलगे चलाख आहेत आणि कोणते मंद आहेत हें तेव्हांच उमगतें. शिवाय झालेलीं उदाहरणें मागून पहावयास सांपडतात. असो; वरील शिक्षकानें पुनः दुसऱ्यानें असें सांगितलें कीं, जे वर गेले असतील त्यांनीं आपल्या पाटच्या दाखवाव्या. त्याप्रमाणें मुलांनीं केलें असतां सगळ्या पाटच्या मास्तरानें पाहिल्या. येथवर सर्व ठीक झालें. पण पुढें मास्तरानेंच आपला नियम मोडला. तो असा कीं, जीं मुलें त्याच्या पहिल्या आज्ञेप्रमाणें वर सरकलीं होतीं तीं संपतांच तेथें न थांबतां, बाकीच्यापैकीं ज्यांनीं ज्यांनीं आपापल्या पाटच्या दाखविल्या त्यांच्याही तो पहात तसाच पुढें शेवटपर्यंत गेला. अशानें झालें काय, कीं त्यानें आपण स्वतः दिलेले दोन्ही हुकूम आपणच मोडले. एक तर जे वर सरकले असतील त्यांनीं आपापल्या पाटच्या दाखवाव्या असा हुकूम केला असत ज्यांनीं दाखविल्या नाहींत त्यांच्या सुद्धां त्यानें पाहिल्या आणि दुसरें असें कीं, ज्यांनीं उदारण केलें नव्हतें त्यांच्याही पाटच्या पाहिल्यानें त्यानें पहिला जो हुकूम केला होता, कीं ज्यांचें उदाहरण झालें असेल त्यांनीं वर जावें, तोही त्यानें मोडला.

वर सांगितलेली गोष्ट वाचकांस कदाचित् क्षुल्लक वाटेल, आणि तींत फारसें महत्व नाहीं अशी त्यांची समजूत होईल;

परंतु ही गोष्ट आपण नेहमी ध्यानांत ठेवीत जावी कीं, एखादी गोष्ट क्षुल्लक झाली म्हणून तिजकडे दुर्लक्ष केलें तरी कांहीं चिंता नाहीं असें मानणें रास्त नाहीं. हा नियम साधारणपणें जसा लागू पडतो तसाच प्रस्तुत विषयीं, म्हणजे शिकविण्याच्या कामींही पडतो. तो असा कीं, वरील गोष्ट दिसण्यांत जरी अगदीं क्षुल्लक वाटली, तरी एकदा घालून दिलेली शिस्त तिजमुळें मोडते, आणि शाळेंत राहिल्यानें मुलांस चांगली शिक्षा जी लागावी ती न लागतां उलटा बेबंदपणा त्यांस शिकवलासा होतो. वर ज्याचें वचन घेतलें आहे तो नामांकित ग्रंथकार, कोणतेंही काम व्यवस्थेनें करण्यास कोणकोणत्या गोष्टी अवश्यक आहेत त्या सांगिल्यानंतर, त्यांविषयीं म्हणतोः—

"या गोष्टी क्षुल्लक वाटतात; आणि त्या खरोखरच तशा आहेत; पण केव्हां? तर जेव्हां त्यांप्रमाणें वागावें तेव्हां." म्हणजे त्यांप्रमाणें जर चाललें तर त्यांपासून मोठासा नफा होतो असें नाहीं खरें; पण जर कां त्यांकडे दुर्लक्ष केलें, तर मात्र त्या अनर्थ करतात! वरील शब्द मोठे मार्मिक आहेत; आणि शाळेंतील शिक्षणास तर ते अगदीं बरोबर लागू पडतात. कारण चांगला आणि वाईट शिक्षक या दोघांतील अंतर पुष्कळ वेळां बारीक गोष्टींवरून जसें दिसून येतें तसें मोठ्यांवरून येत नाहीं. आम्हांस खचीत वाटतें कीं जो शिक्षक मोठा विद्वान् व मोठा बुद्धिमान आहे, पण जो बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष्य पुरवीत नाहीं अशापेक्षां जो सामान्य प्रतीचाच आहे, पण जो सर्व लहान मोठ्या गोष्टींकडे अगदीं सारखें लक्ष पुरवितो, तो

शाळा अधिक चांगल्या रीतीनें चालवील. शिवाय या दुसऱ्या शिक्षकास पहिल्यापेक्षां तें काम फार सोपें जाईल व तितका त्रास पडणार नाहीं, ही दुसरी गोष्ट तर आहेच. असो; पण याशिवाय वरील जी बारीकसारीक गोष्टींविषयीं बेफिकीर असण्याची संवय तीवरून इंग्रेजी भाषेंतील प्रसिद्ध ह्मण "वारा कोणत्या दिशेला वाहतो आहे हें गवताच्या काडीवरून समजतें" हीप्रमाणें वरील मनुष्याचा स्वभाव व नेहेमींचें वर्तन यांचाही छडा नेहेमी लागेल असें ह्मणण्यास चिंता नाहीं. तसेंच वरील मनुष्याच्या अंगीं दृढनिश्चयीपणाचा गुण नाहीं, व त्यामुळें आपल्या हाताखालच्या लोकांवर पूर्ण दाब ठेवण्याचें सामर्थ्य त्यास कधीं येणार नाहीं हेंही वरच्या गोष्टीवरून सहज दिसेल.

असो; आतां वर ज्या गोष्टींचें प्रतिपादन केलें त्यांचें येथें पुनः संक्षेपतः निरूपण करतों. पहिली गोष्ट ही कीं, शिक्षकाच्या अंगीं दृढनिश्चयीपणा पाहिजे;—दुसरी ही कीं, हा गुण बऱ्याच अंशीं हव्या त्या मनुष्याच्या अंगीं प्रयत्नांतीं येणारा आहेः—तिसरी ही कीं, वरील गुण साध्य झाला असतां विद्यार्थ्यांवर शिक्षकाचा दाब अगदीं पुरतेपणीं बसेल;-आणि सरते शेवटची चौथी गोष्ट ही कीं, वर सांगितलेला दाब असल्याखेरीज शाळेची व्यवस्था आणि मुलांस चांगली शिक्षा लावणें या गोष्टी कधींही होणार नाहींत.

शाळेंत मुलांवर पूर्ण दाब ठेवण्याचें काम करीत असतां जो सुज्ञ शिक्षक असेल तो होईल तितका मुलांशीं अतिप्रसंग करण्याचें टाळील हें उघड आहे. ह्मणजे एकादा मुलगा आडदांड भेटला असतां त्याशीं तो बेतानेंच वागून त्या-

त्याशीं साक्षात् प्रसंग कधीं घालणार नाहीं. यास उदाहरण समजा कीं, कोणी विद्यार्थ्यानें कांहीं अपराध केल्याबद्दल त्याच्या हातावर छड्या देण्याचें भाग पडलें असतां त्यास असें वाटलें कीं, हा मुकाट्यानें छड्या घेणार नाहीं, तर तकरार करायाला लागेल; तर अशा समयीं शिक्षकानें काय तजवीज करावी ? त्यास उत्तम तोड ह्मटली ह्मणजे हीच कीं, त्या पोरास हातावर छड्या न देतां कांहीं निराळ्या तऱ्हेनें त्यास शिक्षा द्यावी. पण तसें करूनही जर तो नच ऐकेल, आणि उलटा ज्यास्ती हट्टास पेटला, तर मग त्याहून ही दुसऱ्या तऱ्हेनें त्याचें पारिपत्य करावें. तें असें कीं, त्याचा हेका चालूं न देतां तो शिक्षकाची आज्ञा पुनः मोडण्यास धजणार नाहीं. पण इतके सर्व प्रकार केले असतांही तो अगदीं ऐकेनासाच झाला, तर मग त्यास शाळेंतून हांकून देण्याखेरीज दुसरा उपाय उरला नाहीं. कारण शिक्षकाची वरच्याप्रमाणें अवज्ञा झाली ह्मणजे मग त्याची आज्ञा कोठेंही चालणार नाहीं, आणि जो विद्यार्थी गुरूचा आज्ञाभंग करूनही शिक्षा न पावतां तशीच दंडेली पुढें करीत गेला त्याचें कल्याण होणेंही दुरापास्तच आहे.

एका शाळेंत दीडशें मुलें होतीं, आणि शिकवणारे आठ असामी होते. तेथें वरच्या सारखाच प्रकार मी प्रत्यक्ष पाहिला. एका पोरास मास्तरानें हात पुढें करण्यास सांगितलें. तो ह्मणाला, 'मी करीत नाहीं.' तो गुन्हा लहानसान नव्हता; आणि त्या आज्ञा मोडणाऱ्या मुलास शिक्षा द्यावयाची होती ह्मणून सगळी शाळा अगदीं स्तब्ध झाली. यास्तव वरील दांडगें उत्तर जेव्हां त्या मुलानें केलें तेव्हां ती शिक्ष-

काची अवज्ञा शाळेंतील सगळ्यां विद्यार्थ्यांच्या देखत झाली. तो शिक्षक थंडा आणि गंभीर होता. त्यानें त्या पोरास पुनः पुढें हात करण्यास सांगितलें; कीं, पुनः तरी त्यानें ताळ्यावर येऊन हट्ट सोडावा. पण हा दुसरा हुकूम पहिल्यापेक्षां विशेष खणखणीत रीतीनें केला असतांही, तें द्वाड पोर मुळींच भय न पावतां व मुळींच न चांचरतां हात पुढें करीचना. नंतर शिक्षकानें त्यास खालीं बसण्यास सांगितलें; आणि पोरांस पटांगणावर खेळण्यास अर्ध्या घटकेची सुट्टी देण्याची त्या शाळेंतील चाल असे तीवर्हुकूम सर्वांस मास्तरानें सोडून दिलें. या पोराला मात्र तेथेंच बसवून ठेवून मास्तरानें त्यास दर्डावून सांगितलें कीं, तुला चांगली शिक्षा केली पाहिजे. असें ह्मणून त्यानें तसें केलें आणि नंतर त्यास पुनः बसायास सांगितलें. हें झाल्यानंतर कांहीं वेळ जातो तों पोरें खेळायाला गेलीं होतीं तीं वेळ संपतांच पुनः शाळेंत आलीं. मग चोहोंकडे गडबड बंद होऊन सारीं पोरें आपापल्या जागेवर बसलीं असतां शिक्षकानें त्या पोरास पुनः हाक मारून जवळ येण्यास सांगितलें, आणि पुनः पहिल्याप्रमाणें हात पुढें कर ह्मणून हुकूम केला. या वेळेस मात्र त्या पोराचा हट्ट जाऊन त्यानें पुढें हात केला, आणि पहिल्यानें जी शिक्षा त्यास द्यावयाची होती ती दिली. तर पहा, इतकें झाल्यानें मास्तराचा व त्या पोराचा तंटा मिटला; एक शब्दही बोलण्याची गरज पडली नाहीं; शाळेंतील काम पहिल्याप्रमाणें पुनः चालू झालें, इतकेंच कीं पूर्वीपेक्षां पोरांस नुकत्या झालेल्या शिक्षेमुळें मास्तराचा अधिक धाक वाटून तीं अधिक स्तब्ध

झाली. पण वरील धडा जो पोरांना एकदां दिला तो पुनः त्यांस देण्याची गरज पडली नाहीं. त्याच्या योगानें मास्तरास, शिक्षकांस, आणि विद्यार्थ्यांस जो एकदा मार्ग दाखविला गेला तो मग कोणीही विसरले नाहींत; आणि पुनः बहुत करून कधींही विसरणार नाहींत.

तर याप्रमाणें जोंपर्यंत मुलांशीं तंटा करण्याचा प्रसंग येणार नाहीं तोंपर्यंत तो आणूं नये; पण जेथें ह्यावांचून इलाजच चालत नाहीं, तेथें वरच्याप्रमाणेंच कडकडीतपणा मास्तरानें धरल्यावांचून परिणाम नाहीं.

वर दृढनिश्चयीपणाच्या गुणाबद्दल आह्मीं इतकें लिहिलें याचें कारण असें कीं, तो गुण अंगीं असतां शिक्षक हवें तें करूं शकेल; आणि तो जर कां नाहीं, तर त्याच्या हातून कांहींएक होणार नाहीं. तर वर जें सविस्तर प्रतिपादन केलें आहे त्यावरून प्रस्तुत गुणाची योग्यता किती आहे हें आमच्या वाचकांस दर्शविल्यानंतर जिच्यामुळें या विषयास आरंभ झाला त्या गोष्टीविषयीं विचार करूं. हा विषयः—

शिक्षा ( शासन )

होय. या विषयावर जे आपण आलों ते अगदीं सहज रीतीनेंच आलों. कारण कोणीं दृढ निश्चयानें आपला बेत केला कीं, अपराध्यांस शासन करणें हें पुढें अवश्य येतेंच. वरील ह्मणण्याचा असा अर्थ नाहीं, कीं वरील गुण अंगीं धारण केला असतां वरील उपायाचें अवलंबन वरचेवर अवश्य करणें लागतेंच; उलटें असें मात्र आहे कीं, वरच्या उलटच नेहेमी परिणाम होतो. ह्मणजे अंगीं दृढता धरली असतां शासन करण्याचे प्रसंग एरवींपेक्षां पुष्कळ कमी

येतात. कारण आपणास शिक्षा होईल याचें भय जें मनांत वागत असतें त्याच्या योगानें धाक वाटून अपराध करण्यास मनुष्य जसें भितें तसें दुसरें कशानें भिणार नाहीं. यास्तव जो मनुष्य कांहीं मनुष्यांची बिलकुल गय न करतां त्यांस कडक शासन करतो त्यास सगळे वचकून राहून पुढें अपराध करीनातसे होतात. आणि त्यामुळें पुष्कळांस शासन करण्याचा जो एरवीं प्रसंग यावयाचा तो टळला जातो. महत्वाच्या मूलतत्वाचें स्पष्टीकरण पुढील गोष्टीवरून चांगलें होईल हें जाणून ती येथें दाखल करतों. ती प्रकृत विषयास अनुसरूनच आहे.

"फ्लांडर्स देशीं ड्यूक आफ मार्लबरो आणि प्रिन्स यूजीन हे जेव्हां संयुक्त सैन्याच्या कामावर होते, तेव्हां प्रिन्स यूजीन याच्या फौजेंतला एक शिपाई दरवडा घातल्याच्या गुन्ह्यांत सांपडून त्याच्या सरदारानें त्यास फांशीची शिक्षा नेमली. हा शिपाई आपल्या अधिकाऱ्यांचा मोठा आवडता होता; ह्मणून त्यांनीं त्याची शिक्षा महकूब करण्याविषयीं प्रिन्स यूजीन याजपाशीं पुष्कळ रदबदली केली. पण ती तो बिलकूल ऐकेना. त्यानें त्यास फांशीची शिक्षा देण्याचाच आपला आग्रह धरला. शेवटीं ते सर्व अधिकारी एक जूट होऊन ड्यूक आफ मार्लबरोकडे गेले, आणि आमच्याबद्दल येवढी तसदी घ्या अशी विनंती करूं लागले. ती विनंती ऐकून सदहू ड्यूक, प्रिन्स यूजीन याजकडे गेला. प्रिन्स यूजीन ह्मणाला, "मी आजपर्यंत दरवडेखोरास कधींही माफी दिली नाहीं, आणि आतांही देणार नाहीं." ड्यूक ह्मणाला, "तर मग, असें केल्यानें अर्धें सैन्य आप-

त्याला फांशीं चढवावें लागेल." प्रिन्सानें उत्तर केलें, "असें कधीं होणार नाहीं; तुमच्या सैन्यातील शिपाई इतका दंगा करतात, आणि इतक्या लोकांस तुम्हास शासन करावें लागतें, याचें कारण हेंच आहे. मी कधीं कोणाची गय करीत नाहीं; आणि म्हणून मला फार थोडच्या लोकांस शिक्षा करणें येतें." याप्रमाणें यूजीन यानें आपला मतलब त्यास सांगितला, तरी ड्यूक आपला आग्रह सोडीना. शेवटीं यूजीन म्हणाला, " बरें, आतां येवढें आपण करूं कीं, आपआपल्या सैन्यांत जास्त शिक्षा कोणाकडे झाल्या आहेत तें पाहूं; आणि जर तुमच्या सैन्यांत मजपेक्षां जास्त लोकांस देहांत शिक्षा तुम्हांस द्यावी लागली नसेल, तर या शिपायास माफी देण्यास मी कबूल आहें." असा ठराव झाल्यावर चौकशी सुरू झाली; आणि तिच्या अंतीं असें स्पष्ट दिसून आलें कीं, यूजीनच्या कडेच कमी लोक फाशीं गेले. तेव्हां तो मार्लबरो यास म्हणाला, "लॉर्डसाहेब; पहा, तुम्ही पुष्कळांचा गुन्हा माफ करतां. मी एकाचाही करीत नाहीं. तरी माझ्याच कडचे लोक गुन्हा थोडाच करतात, आणि त्यामुळें थोडच्यांसच शिक्षा मिळते."

तर पुढील दोन महत्त्वाचीं मूलतत्वें आतां स्थापित झालींशीं मानण्यास हरकत दिसत नाहीं. तरी त्यांचें स्पष्टीकरण वरच्याहूनही पुष्कळ भ्याप करणें आहे.

पहिलें-शिक्षकाचा चांगला दाब मुलांवर असला पाहिजे.

दुसरें-शारीर शिक्षा देण्यास कांहीं हरकत नाहीं.

आतां दोन्ह कलमांपैकीं पहिल्याविषयीं कांहीं विशेष लिहिण्याची अगदीं गरज नाहीं; कारण त्यांत सांगितलेली

गोष्ट अगदीं उघडी असल्यामुळें तिच्या खरेपणाविषयीं कोणासही शंका येणार नाहीं. येवढें खरें कीं, वरील दाब पहिल्यानें कसा पडावा आणि पुढें सारखा कसा ठेवावा याविषयीं पुष्कळ मतभेद पडण्याचा संभव आहे. आमचें मत आह्मीं थोडक्यांत सांगतों कीं, वरील दाब पहिल्यानें पोरांवर उत्पन्न करण्यास शिक्षकानें मागें सांगितलेला दृढपणा अंगीं धरला पाहिजे. आणि तो एकदा पोरांवर बसला ह्मणजे तो तसाच सतत राखण्यास शिकविणारानें कृपाळूपणा आणि न्यायित्व यांचें अवलंबन केलें पाहिजे. याविषयीं मागें एके ठिकाणीं प्रसंगोपात्त लिहिलें आहेच; आणि यापुढें डॉक्टर जॉन्सन् याचा एक उतारा यावयाचा आहे त्यावरूनही वरील गोष्टीविषयीं आमच्या वाचकांची खात्री होईल. तर आतां दुसऱ्या कलमाविषयींच सविस्तर विचार करूं.

आह्मांस खचित वाटतें कीं, कोणत्याच प्रकारची शिक्षा शाळेंत अमलांत आणूं नये असें कोणीही मत प्रतिपादन करीत नाहीं, यास्तव कोणत्या तरी तऱ्हेची शिक्षा शाळेंत असलीच पाहिजे हें गृहित धरून त्याविषयीं येथें आह्मी वाद करीत नाहीं. पण वरील मत जरी आह्मी खरें धरतों, कीं शिक्षा ही शाळेंत अवश्य असलीच पाहिजे; तरी तिचा उपयोग शाळेंत वारंवार अवश्य केलाच पाहिजे, व तीशिवाय शिक्षकाचा दाब पोरांवर कधींही बसणार नाहीं असें आमचें बिलकुल मत नाहीं. शिक्षकाच्या हातीं अशा पुष्कळ गोष्टी आहेत, कीं ज्यांच्या योगानें पोरांवर त्याचा धाक शिक्षा केल्याखेरीज बसेल, आणि असे मार्ग अगदीं निर्दोष आहेत. ते ज्या शिक्षकाच्या जवळ नाहींत त्यास

आपलें काम बिलकुल समजत नाहीं असें ह्मटलें पाहिजे. जो मनुष्य अंगानें चांगला खंबीर व धष्टपुष्ट आहे त्याचा पोरांस धाक वाटेल खरा; पण खरा शिक्षक ह्मटला ह्मणजे तोच होय कीं, ज्यास पोरांचीं मर्मै ध्यानांत येऊन त्यांच्या योगानें वागतो कीं, त्याशीं कांहीं खोडी करावी असें मुलांच्या मनांतच येत नाहीं. कां कीं, त्याच्या सहवासानें त्यांची मनेंच बदलून जाऊन त्यांस नवाच कल प्राप्त होतो. तर याप्रमाणें बाह्यात्कारी ह्मणजे शारीरिक शिक्षा देणें हें नेहमींच उपयोगी आहे असें नाहीं. त्याच्या योगानें वेळेनुसार इतकें मात्र होतें कीं, पोरांचा हट्ट बळावतो; व हा, मास्तरानें आपल्या विद्यार्थ्यांस चांगलें वळण दिलें असतें तर मुळींच नाहींसा झाला असता.

## शारीर शिक्षा.

पोरांस शिक्षेच्या योगानें धाकांत ठेवूं पाहणें हा मार्ग पाहतां मुळींच वाईट; त्यांतून शारीर शिक्षा (या शब्दांचा अर्थ सध्यां बहुत करून छड्या मारणें हाच समजतात) तर फारच अप्रशस्त. प्रत्येक चांगला मास्तर शारीर शिक्षा देणें हा अगदीं शेवटला नाइलाजाचा उपाय ह्मणून हातांत घेईल असें आह्मांस वाटतें. खरोखरच जर त्यास असें वाटणार नाहीं, तर त्यास चांगला शिक्षक ह्मणणेंही भारी कठीणच पडेल. पण असें जरी आमचें मत आहे तरी कांहीं वर्षांपासून अलीकडे जें एक चमत्कारिक मत चोहोंकडे पसरत चाललें आहे कीं, मुलांच्या शरीरास इजा करणें या सारखें निंदास्पद व वाईट कांहीं नाहीं,—हें ही पण आह्मांस मान्य नाहीं. शारीर शिक्षा देणें हेंही केव्हां केव्हां फार हि-

तावह होतें, आम्हांस अशीं पुष्कळ उदाहरणें माहीत आहेत कीं, शाळेंतील कांहीं कांहीं मुलांस जर चांगला मजबूत ठोक न बसता, तर तीं अगदीं नादान झालीं असतीं. अशा- वर जर वरील प्रयोग केला नसता तर तीं कशानेंही सुधारतीं ना !

या वादावर कित्येक मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांची प्रसिद्ध वचनें आहेत. तर सदई प्रमाणाबद्दल मुद्दे दाखल करण्यापूर्वी वरील वचनें येथें उतरून घेणें वाजवी दिसतें. तेणेंकरून याविषयीं पुढें जे नियम द्यावयाचे आहेत ते चांगले समजतील.

आर्नोल्ड साहेबाचें मत एकंदरींत पाहतां सदर शिक्षे- च्या विरुद्धच होतें; तरीसुद्धां ती त्यास अवश्य वाटली. हा त्याचा अभिप्राय पुढील लेखावरून स्पष्ट दिसून येईल. शिक्षा करण्याच्या साऱ्या नियमांत त्यानें एक मोठा फेर- फार करून टाकला. तो असा कीं, 'मुलांस शिक्षा देणें हा केवळ गौण पक्ष करून त्यांशीं गोडीगुलाबीनें व ममताळूप- णानें वागून त्यांचीं मनें त्यानें आपणाकडे ओढून घेतलीं !'

शाळेंतील लहान मुलांस कोणत्या प्रकारची शिक्षा ला- वणें उत्तम याविषयीं जर विचार केला, तर माझ्या बुद्धीस असें वाटतें कीं, शारीर शिक्षा तर ठेवावीच; कां कीं, मु- लांची स्थिति त्या वेळेस तशीच असते यास्तव त्यांस तशी शिक्षाच योग्य आहे; आणि तशी केल्यानें त्यांस आपला अपमान झालासें समजूं लागलें नसतें. तर याप्रमाणें सदरील शिक्षाही शाळेंत कायम राखून जीं मुलें चांगल्या रीतीची नेहमीं वर्तणूक ठेवून तीस आपणास अपात्र करण्याचा प्र-

यत्न सतत ठेवीत जातील त्यांस सारखें उत्तेजन देणें हें चांगल्या शिक्षकाचें नेहमीचें काम आहे.

जे कोणी असें प्रतिपादन करतात कीं, कसलेही अपराध असले, व मुलें कितीही लहान असलीं, तरी त्यांच्या अंगाला हात लावीत जाऊं नये, कारण शारीर शिक्षा ही सर्वथैव अगदीं अयोग्य होय, त्यांस वरील ग्रंथकार असें स्वस्वभावानुरूप खडखडीत उत्तर देतो:-

"वरील वृत्ति कशापासून उद्भवते हें मला पक्कें माहीत आहे. तिचा प्रादुर्भाव मनाचें सगर्व स्वातंत्र्य, कीं जें शहाणपणाचेंही नाहीं, व ख्रिस्ती धर्मासही अनुकूळ नाहीं,-तर केवळ नुसता दांडगेपणा होय..........ज्या वयांत अपराध केला असतां त्याच्या योगानें अंगीं येणारें हीनत्व हें यत्किंचितही भासत सुद्धां नसतें, अशा लहानपणाच्या वेळीं वरील जी गर्विष्टपणाची वृत्ति तीस उत्तेजन देणें हें शहाणपण आहे काय? वास्तविकपणें पहातां साधेपणा, सालसपणा, आणि नम्रत्व हेच गुण लहान वयास शोभतात; व हे अंगीं असले म्हणजेच पुढें मनुष्य खऱ्या थोरवीस चढेल असें अनुमान होत असतें;-मग अशांच्या जागीं वरील विरुद्ध गुण उत्पन्न करूं पाहणें हें किती वाईट कृत्य आहे?"

[ शालापत्रक; पुस्तक १३. अंक ३. जुलई १८७३ इसवी. ]

# बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा इतिहास, भाग १.

## ( अभिप्राय. )

अशा ग्रंथावर अभिप्राय देणें अंमळ विचाराचेंच काम आहे. जो नव्यानें ग्रंथकार होऊं लागतो त्याच्या संबंधानें जें मत देणें तें फार कडक रीतीनें दिल्यापासून प्रसंगविशेषीं फार वाईट परिणाम घडतात. लिहिणारांची उमेद खचून ते कधीं कधीं मुळींच उद्योग सोडून देतात, व त्यांच्या हातून जितकें होण्यासारखें असतें तितक्याविषयीं प्रयत्न करण्यासही त्यांचें मन घेत नाहीं. यास्तव वरील लेख ज्यानें आह्मांकडे पाठविला आहे त्यास ज्या सूचना करणें अवश्य वाटतात त्या आह्मी हितबुद्धीनें करून त्यांचा त्यानें नीट विचार करावा अशी त्यास शिफारस करतों.

हा ग्रंथ आह्मीं समग्र वाचला, व आह्मांस कांहीं ठिकाणीं बरा वाटला. तथापि हा छापण्याच्या भरीस ग्रंथकर्त्यानें पडूं नये असें आह्मीं त्यास निक्षून सांगतों. कां तर ग्रंथकारांत जे गुण अवश्य पाहिजेत ते अजून त्याच्यांत आले नाहींत. अशुद्ध व मधून मधून अस्पष्ट लिहिलेलें, विषयांतर करणें, वगैरे मोठमोठे दोष या ग्रंथांत आहेत. शिवाय प्रस्तुतच्या भागांत 'इतिहास' हें नांव ज्यास शोभणार नाहीं असाही मजकूर पुष्कळ आहे. इतिहास लिहावयाचा किंवा कादंबरी लिहावयाची याचा अगोदर निश्चय करून

मग त्याप्रमाणें लिहिण्यास या ग्रंथकर्त्यानें आरंभ केला असता तर बरें होतें.

---

[ शालापत्रक, पुस्तक १३. अंक ४. आगस्ट १८७३ इसवी. ]

## साहित्यशास्त्र.

### ( अभिप्राय. )

हें पुस्तक गणेश सदाशिव शास्त्री लेले यांनीं रचिलें आहे. हा ग्रंथकार आमच्या मराठी वाचकांस सर्वथा अज्ञात असेल असें वाटत नाहीं. 'जानकीपरिणय' व 'मालविकाग्निमित्र' या संस्कृत नाटकांचीं मराठींत भाषांतरें केल्याबद्दल यास दक्षिणा प्रैज कमिटीकडून चांगलें बक्षिस मिळून तीं छापलींही गेलीं आहेत. यास्तव अशा गृहस्थानें आपण अध्ययन केलेल्या उपयुक्त विषयावर मराठींत नवा ग्रंथ केला ही गोष्ट अभिनंदनीय होय.

मराठीस उपयुक्त व मनोरंजक ग्रंथांची जिकडून समृद्धि होईल तिकडून हावीच आहे. यास्तव इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें किंवा त्यांच्या धर्तीवर केलेलीं पुस्तकें जशीं आपल्यास इष्ट आहेत तशीं तीं संस्कृताच्या आधारानें केलेलीं ही होत. पण इतकेंच नव्हे, या दुसऱ्या द्वारानें झालेला लाभ केवळ इष्टच आहे असें नाहीं, तर तसाच तो अत्यंत प्रियही होय. कां कीं, तो फार दिवस गहाण पडलेल्या मालाप्रमाणें खुद्द आपणापाशीं नव्हता इतकेंच; तरी आपलें त्यावरचें स्वामित्व उडालें नाहीं, व ओळखही अगदींच बुजून गेली असें नाहीं. पण अशा प्रका-

रचे ग्रंथ व्हावे कसे? सध्यां जितपत संस्कृताचा अभ्यास युनिव्हर्सिटीच्या परीक्षांमुळें आपणामध्यें सुरू आहे तितका त्या भाषेंत केवळ व्युत्पत्ति मात्र सरासरी होण्यास उपयोगी पडतो, याच्या पलीकडे कांहीं नाहीं. यास्तव येवढ्याच्या योगानें फार फार झालें तर काव्यादिकांचीं भाषांतरें मात्र मराठींत झालीं तर होतील. पण यांहून वरचढ जे गहन शास्त्रीय ग्रंथ त्यांकडचा मार्गच आतां बहुत करून खुंटून मोठमोठ्या पुस्तकालयांत त्यांनीं कपाटें भूषित करावीं इतकेंच इतःपर त्यांचें नशीब दिसतें. 'चतुःशास्त्री,' 'षट्शास्त्री,' इत्यादि शब्द हळूहळू कोशांतच शिरूं लागले आहेत, व थोड्याच काळांत त्यांचा प्रयोग करण्याचें कोठेंच कारण पडणार नाहीं. असो; याप्रमाणें एकंदरींत शास्त्रविद्येचा लय अपरिहार्य होय. तथापि काव्याच्या लगतीनें साहित्य व तदंतर्गत अलंकार आणि छंदःशास्त्र, तसेंच व्याकरण यांचा बराच निभाव निघेल असा सुमार दिसतो. यास्तव यांत जे पारंगत आहेत त्यांनीं त्यांत प्रवेश करण्याचा मार्ग अधिक सुगम करून ठेविला असतां त्यांचा लोकांत प्रसार होण्याचा विशेष संभव आहे.

ग्रंथ लिहिणें ही तरी एक कलाच आहे, यास्तव बाकीच्या सर्व कलांप्रमाणें हीही अभ्यासावांचून साध्य होत नाहीं. आरंभ कसा करावा; विषयाचे विभाग किती व कसे करावे; त्यांतून अगोदर कोणता घ्यावा, मागून कोणता घ्यावा; विषयांतर कोठें चालेल, व किती चालेल; शेवट कसा करावा; इत्यादि गोष्टींचा नीट विचार करून विषयाची मांडणी यथास्थित केली असतां ग्रंथकर्त्यास व वाचकास

दोघांसही सोपें पडतें. त्यांतून विद्यार्थ्याकरितां वगैरे लहान संक्षिप्त ग्रंथ रचणें ह्मणजे तर त्याहूनही विचाराचें काम आहे. विद्वत्ता व शिकविण्याची शैली हीं फार निरानिराळीं आहेत असें पुष्कळांच्या तोंडून आपण ऐकतों; व हें अगदीं यथार्थ आहे. जो दुसऱ्यास शिकवायास निघतो त्यास त्यांच्या धारणाशक्तीचें मान अगदीं बरोबर माहीत पाहिजे; व सांगितलेली गोष्ट त्यांच्या मनांत कोणत्या मार्गानें अत्यंत सुलभ रीतीनें जाईल, व जाऊन पक्की ठसेल, याचा त्यानें सूक्ष्म विचार केला पाहिजे. नाहीं तर ज्यास धार नाहीं असें भांडें केवढेंही मोठें असलें व कितीही भरलें असलें, तरी लहानशा भांड्यांत ओतण्याच्या कामास तें जसें अगदीं नादान, त्याप्रमाणें शिक्षकाची विटंबना होते; किंवा 'पालथ्या घागरीवर पाणी' असें ह्मणून त्रासण्याचा त्यास प्रसंग येतो. ग्रंथकार हा एक प्रकारचा शिक्षकच आहे; किंबहुना त्यास शिकविण्याच्या ज्या अनेक सोयी आहेत त्या शिक्षकास नाहींत. ह्मणून त्यानें हें शिक्षण जितक्या उत्कृष्ट रीतीनें देववेल तितकें देण्यास फारच झटलें पाहिजे. असो, आतां ह्या सर्व गोष्टींकडे प्रस्तुत ग्रंथांत कितीसें लक्ष दिलें आहे तें पाहूं.

या ग्रंथकाराचा मराठी लिहिण्याचा हा पहिलाच यत्न नव्हे, व आलीकडील शिकण्याची पद्धतिही त्यास चांगली माहीत आहे, यास्तव हें पुस्तक त्यानें सुबोध व बेतवार असें लिहिलें आहे. आमच्या नव्या इंग्रजी शिकलेल्या विद्वानांपैकीं एकाद्यानें असें लिहिलें असतें तर ही गोष्ट विशेषतः सांगण्यासारखी नव्हती. पण जुन्या शास्त्री लोकांची

बोलण्याची व लिहिण्याची रीत किती दांभिकपणाची व खोटाळ्याची असते हें ज्यानें ज्यानें पाहिलें असेल त्यास वरील प्रशंसा यथार्थ वाटेल. तसेंच कित्येक ग्रंथकारांत हा मोठा दोष दृष्टीस पडतो, कीं ते आपल्या ग्रंथास आपलें ज्ञान जगासमोर प्रगट करण्याचें साधन करतात, व शिकणारास जितकें द्यावें तितकेंच न देतां वेडयावांकडया रीतीनें कसें तरी आपलें ज्ञानभांडार वाचकांपुढें मिरवितात. तसाही प्रकार प्रस्तुत ग्रंथांत बिलकुल नाहीं. यांतील मजकूर व याची रचना शास्त्रीय विषयाच्या मानानें जितकी सहज मनांत भरेशी करवेल तितकी केली आहे. आतां कोणी ह्मणतील कीं, हें पुस्तक मोठमोठया व सामान्य लोकांस न कळणाऱ्या अशा शब्दांनीं भरलें असतां यास सुबोध कसें ह्मणतां येईल? यावर आह्मास इतकेंच सांगणें आहे कीं, पारिभाषिक शब्द व अशा विषयाच्या उपपादनास अत्यंत अवश्यक असे कित्येक संस्कृत शब्द—कीं ज्या दोघांवांचून गत्यंतरच नाहीं—त्या शिवाय इतर शब्द जर यांत असतील तरच त्यांचा आक्षेप लागू पडेल; नाहीं तर तो व्यर्थ होय. अगदीं रानटी खेरीज करून बाकी सर्व राष्ट्रांतील मनुष्यांस निरनिराळ्या प्रसंगीं जसे निरनिराळे पोषाक लागतात, त्यावांचून होतच नाहीं; त्याचप्रमाणें सर्व अभियुक्त भाषांची प्रसंगविशेषानुरोधानें तऱ्हेतऱ्हेचीं रूपें झालेलीं असतात. कामकाजाची भाषा निराळी, कवितेची निराळी, शास्त्रीय विषयांची निराळी; यांपैकीं एकच चोहोंकडे चालवूं ह्मणणें ह्मणजे चिखल वाहणाऱ्या मजुराच्या रकटयानेंच पंडितानीं ही राजसभेस यावें, त्यास काय हरकत

आहे? असें ह्मणणें होय. पहिले दोन प्रकार मराठी भाषेंत आधींचे सिद्धच आहेत. तिसरा मात्र करणें आहे, व तो केला पाहिजे, आणि संस्कृतावांचून तो करण्यास तर मार्गच नाहीं. यास्तव सांप्रतच्या प्रमाणें पुस्तकांत संस्कृत शब्द फार फार आले अशी कुरकूर करण्यांत कांहीं जीव नाहीं.

यापूर्वीं 'अलंकारविवेक' व 'वृत्तदर्पण' हीं पुस्तकें मात्र अलंकारांचें व वृत्तांचें ज्ञान होण्यास शिकणारांस अनुकूळ होतीं. सध्यांच्या ग्रंथांत मुख्य विषय जो काव्यांतील गुणदोष, रस इत्यादिकांचें विवेचन त्याखेरीज वरील दोन विषयांचाही संग्रह केला आहे. यांत एकंदर आठ प्रकरणें आहेत, व प्रत्येकांत या शास्त्राच्या एकेक विभागाविषयींची माहिती संक्षेपानें दिली आहे. विषय सुलभ रीतीनें समजण्याकरितां बहुतेक ठिकाणीं प्रश्नोत्तरांची योजना केली आहे. तशीच मधून मधून रस, स्थायीभाव इत्यादिकांचीं कोष्टकें घातलीं आहेत, तेणेंकरून ग्रंथाची जागा व शिकणारांचा वेळ वाचून अभ्यास करण्यास अधिक सोय झाली आहे. सारांश, या ग्रंथानिमित्तें जो ज्ञानेच्छु थोडक्याशा पैशाचा व वेळेचा खर्च करील त्यास वाचनांतीं आपली भरपाई होऊन केव्हांच चुकली असें वाटल्यावांचून खास राहणार नाहीं.

आतां या ग्रंथांत जे कांहीं दोष व न्यूनता दिसताहेत त्या सांगतों. पहिल्या प्रकरणांत काव्याचें स्वरूप सांगितल्यानंतर वाक्य, पदें, व उद्देश्यविधेयभाव यांविषयीं विवरण केलें आहे. त्याचा प्रस्तुत विषयांशीं कांहीं वास्तविक संबंध नाहीं. तसेंच नायिकांविषयीं लिहितांना त्यांचे वयःपरत्वें व इतर

प्रकारचे कामशास्त्रप्रसिद्ध भेद सांगितले आहेत, तेही अप्रस्तुत होत. पण यांहून ही एक मोठा फेरफार सांप्रत पुस्तकांत करणें इष्ट आहे, तो केला असतां तें वाचणारांस ज्यास्त पसंत होऊन अभ्यास करण्यास विशेष योग्य होईल. हा फेरफार यांतील उदाहरणांविषयीं होय. सध्यां जीं आहेत तीं सर्वथा वाईट आहेत किंवा समर्पक नाहींत असा ह्मणण्याचा अर्थ नाहीं. इतकेंच कीं, तीं जितकीं उत्तम घालवतील तितकीं घालण्याविषयीं ग्रंथकर्त्यानें विशेष परिश्रम केले आहेतसें दिसत नाहीं. बहुतेक तर पूर्वींच्याच ग्रंथांतून—ह्मणजे 'अलंकारविवेक,' 'अनेकविद्यामूलतत्वसंग्रह,' 'नवनीतास जोडलेला लेख,' यांतूनच घेऊन कांहीं नवीं करून घातलीं आहेत. यांपैकीं बहुतेक सरासरी तेव्हांच जोडून घातलेलीं दिसतात.

---

[ शालापत्रक; पुस्तक १२. अंक १०. फेब्रुवारी १८७३ इसवी. ]

## आमच्याकडे पत्रें पाठविणारांस सूचना.

या पुस्तकांत पहिल्या पहिल्यानें 'पत्रें पाठविणारांस उत्तरें' असें एक सदर नेहेमी ठेवलें असे, व त्यांत पाठविलेलीं पत्रें न छापल्याचीं कारणें लिहिलीं असत. पुढें होतां होतां तें सदर अगदीं नाहींसें झालें; व आलीकडे तर पत्र पोंचलेंच नाहीं किंवा पोंचलें असून छापलें नाहीं वगैरे कांहींच समजण्याचा मार्ग नाहीं. यामुळें पत्रें पाठविणारांपैकीं पुष्कळ संदेहांत पडत असतील; व ज्या थोड्यांस आपला लेख, व विशेषतः आपलें नांव, सुंदर ठशांनीं छापलेलें पाहून

आनंद होत असेल, त्यांपेक्षां दुप्पट किंवा अधिक ही लोकांचा आमच्याकडून हिरमोड होऊन त्यांस वाईट वाटत असेल; हें आह्मी पक्कें जाणतों. पण उपाय काय? सध्यांचा क्रम सोडून कनवाळूपणानें पूर्वींची रीत जर पुनः धरली, तर त्यांत आमचेंही बरें होणार नाहीं, व कोणाचें ही होणार नाहीं. एक तर या उत्तरांखालींच केव्हां केव्हां एक एक दोन दोन पृष्टांचीही जागा आटेल; व शिवाय 'तुमच्या पत्रांत हंशील दिसत नाहीं' वगैरेच उत्तरें पुष्कळांस देण्याची पाळी येऊन त्यांचीं मनें विशेष दुखविण्याचा मात्र प्रसंग! आह्माकडे जे पत्रें पाठवितात त्यांच्या संबंधें पाहतां ही सांप्रतची रीत सोडणें इष्ट दिसत नाहीं. सध्यां आमच्याकडे पत्रें येऊन जितक्यांचीं छापलीं जातात त्यांचा अर्थात असाच समज होतो कीं, आलेलीं पत्रें सर्व आह्मी छापतों,—मग असा आनंदाचा भ्रम दवडून दुःखदायक खरी गोष्ट प्रगट करण्यांत शहाणपणा कोणता? ज्यांचीं पत्रें छापण्यांत येत नाहींत, त्यांचें तरी मुकाट्याच्या उत्तरापेक्षां लेखी उत्तरानें अधिक समाधान होईल असें वाटत नाहीं. पण येवढेंच नव्हे, आणखीही एक विचार राहिला आहे. तो हा कीं, आमच्या वाचकांची इतराजी न होतां जर पत्रें पाठविणारांची व मास्तरांची हौस आह्मास पुरवितां येती, तर तसें करण्यास आमच्याकडून कांहींएक हरकत न होती. पण येवढ्याशा लहान पुस्तकाचीं कित्येक पत्रें थोड्यांच्याच संतोषाकरतां भरणें हें अगदीं गैर असून जें काम आह्मीं पत्करलें आहे तें योग्य रीतीनें न बजाविल्याचाही दोष आह्माकडे त्यामुळें येणारा आहे. तेव्हां इतकीं

सर्व अनिष्टें एका थोडक्याशा सोप्या उपायानें जर टळत असलीं, तर त्याचें अवलंबन कां करूं नये !

आतां हें खरें कीं, हा उपाय आवश्यक असला तरी अत्यंत निष्ठुर होय. व आम्हास ही तो खरोखर तसाच वाटतो. कागद, लेखणी, शाई, लिहिणाराचे श्रम आणि डाकेचा खर्च, इतक्या सर्वांचा निकाल पत्र फोडतांच एका अर्ध्या क्षणांत होऊन त्याची गणना भिकार चिटोऱ्यांत व्हावी, ही मोठ्या दुःखाची गोष्ट खरी ! व आम्ही आमच्या पत्रें पाठविणारांस असें मनोभावानें कळवितों कीं, वाईट व गैदी अक्षर, अशुद्धपणा, अप्रयोजक मजकूर इत्यादि अनेक गुणांनीं युक्त असल्यामुळें वरील दुःखाची गति प्राप्त होण्यास पत्रांची योग्यता कितीही उत्कृष्ट व परिपूर्ण असली, तरी चिटोऱ्यांच्या पेटीकडे आमचा हात मोठ्या संकटानें वाहतो ! यास्तव आम्हास जे पत्रें लिहितात त्यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, या थरास गोष्ट पोंचूं न देण्याची तजवीज त्यांनींच अगोदर करावी, एरवीं दुसरा उपायच नाहीं.

या पत्रांपैकीं बहुतेकांतून अगदीं एकसारखा मजकूर असतो. तो, शाळेची परीक्षा, बक्षिसांचा समारंभ, मास्तरांची शिफारस वगैरे कित्येक ठरीव गोष्टींखेरीज कधींही असत नाहीं. गांवढ्या गांवांत वर सांगितलेले हेच कायते मोठे समारंभ, यास्तव असा झाला न झाला कीं पत्रद्वारें तो सर्वांस कळविण्याविषयीं विद्यार्थ्यांस कदाचित् मोठी उत्कंठा वाटत असेल, हें खरें आहे; तथापि मास्तरांच्या बढतीविषयीं वगैरे जो मजकूर अशा पत्रांत नेहमी शेवटीं

असतोच, तो विद्यार्थीच केवळ कृतज्ञतेच्या भरात येऊन लिहित असतीलसें फारसें वाटत नाहीं. बरें, अशीं पत्रें छापलीं तरी त्यांपासून उपयोग तो कोणता? पत्रांत लिहिल्याप्रमाणें मास्तर जरी सर्व गुणांनीं संपन्न असले, तरी विद्यार्थ्यांनीं लिहिलेल्या शिफारशी वरिष्ठ अधिकारी अगोदर वांचून त्यांबद्दल मोठासा विचार करीत असतील, हें थोडेंच आहे. आणि जे मास्तर खरोखरीच 'सुधारणुकेच्या कामास झटणारे,' 'लोकांस विद्यामृत पाजणारे,' 'मनमिळाऊ' असे असतील, त्यांची लोकांचें अज्ञान दूर करण्याविषयींची कळकळ व उत्तम स्वभाव हीं कांहीं थोड्या रुपयांनीं कां वाढावीं व कां कमी व्हावीं, हें आह्मास समजत नाहीं! शिवाय कांहीं थोड्या दिवसांतच ज्यांनीं आपल्या विद्यार्थ्यांच्या स्थितींत इतका फरक करून टाकिला, कीं त्यांची ज्ञानावरील अरुचि काढून टाकून त्याची रुचि त्यांच्या मनांत अशी अनिवार उत्पन्न केली कीं, त्यांच्या स्तुत्य परिश्रमांची तारीफ सर्व लोकांसमोर केल्यावांचून त्यांच्यानें राहवेचना—त्या मास्तरांस आपल्या विद्यार्थ्यांची आपणावरची येवढी अपार भक्ति हेंच आधीं मोठें बक्षीस नव्हे काय? आतां हें खरें कीं, केवळ चाकरीच्या लोभानें आपल्या इष्टमित्रांपासून दूर एकाद्या भिकार खेड्यांत जाऊन पडल्यानें, व तेथेंही हव्या तशा सोयी नसल्यानें, कित्येक सुशील मेहनती अशा मास्तरांचे फार हाल होत असतील, व त्यांस दिलगिरी वाटत असेल. अशांची स्थिति फार दुःखाची खरी, व त्यांचा आह्मांसही अतिशयित कळवळा येतो. पण उपयोग काय? आपल्या एकंदर देशाची

स्थिति जर लक्षांत आणली, व विशेषतः विद्याखात्यांत दिवसांदिवस कसकसे फेरफार होताहेत याचा जर विचार केला, तर आमच्या मास्तरांस दुःखाचा वांटा आमच्याच कपाळास काय तो आला आहे असें ह्मणण्यास फारशी जागा राहील असें आह्मास वाटत नाहीं. निदान इतकें तरी खचित, कीं जी छापील शिफारस सगळ्याच मास्तरांविषयीं सारखी, तिजपासून आशा धरणें अगदीं व्यर्थ !

पत्रांस उत्तरें कधींही न लिहिण्याचा आमचा नेहेमीचा शिरस्ता असतां ही आजची सूचना तरी लिहिण्याचें आमच्या मनांत कशावरून आलें? असें आह्मास पत्रें पाठविणारांचे मनांत सहज विचारणें येईल. यास्तव त्याची येथें परिस्फुटता करतों. आमच्या वाचकांस बहुधा आठवतच असेल कीं, शालापत्रक पुस्तक १२ अंक ३ यांत मोरोपंताच्या दोन आर्यांचा अर्थ विचारला होता. त्यांवर पहिलें उत्तर केशव नारायण देशपांडे यांनीं दिलें होतें. तें अंक ५ यांत आहे. पुढें अंक ७ यांत शिवराम नारायण जोशी यांनीं त्याच अर्थावर दिलेलें उत्तर छापलें आहे. हें छापण्याचा आमचा उद्देश केवळ इतकाच होता कीं, तें पहिल्याहून अधिक परिस्फुट असून ज्यास्त खुलासेवारही होतें. तरी यावरून पहिलें उत्तर चुकलें होतें किंवा तें अगदीं न समजण्यासारखें होतें असा आमचा आशय नव्हता. उलटें आह्मास असें वाटतें कीं, केशव नारायण देशपांडे यांस त्या आर्यांचा अर्थ चांगला समजला होता, पण तो संक्षिप्त रीतीनें लिहावा येवढ्याच करितां त्यांनीं थोडक्यांत उत्तर लिहिलें होतें. तथापि वरील आर्या समजून घेण्यास दुसरें

उत्तर पहिल्याहून अधिक उपयोगीं पडेल हें कोणीही सांगेल; फार तर काय, पण रा० देशपांडे यांसही तसें कबूल केलें पाहिजे. असें असतां या दुसऱ्या गृहस्थांकडून नुकतेंच आह्मास एक पत्र आलें. तें पाहून आह्मास चमत्कार वाटला, व दुसरें उत्तर पाठविणाराचा त्यांस राग आला हेंही त्यांच्या पत्रावरून स्पष्ट दिसत आहे. हें पत्र वाचून आह्मास मोठी पंचाईत पडली. छापावें, तर उगीच निरर्थक वाद माजणार; न छापावें, तर दुसरें उत्तर छापल्यामुळें ज्यांची आह्मी आधींच अंमळ मानखंडना केली, व तीबद्दल त्यांचे जबाबदार झालों, त्यांच्या दुसऱ्याही पत्राचा अव्हेर करण्यानें तर अधिकच दोषास पात्र होऊं. याप्रमाणें दोहोंकडून संकट येऊन त्यांच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें फार वर्षें धरलेलें मौन आह्मास एकाएकीं सोडणें आलें !

याप्रमाणें रा० देशपांडे यांच्या पहिल्या पत्रावर त्याच संबंधाचें रा० जोशी यांचें पत्र आह्मीं छापल्याचीं कारणें दर्शविलीं. आतां रा० देशपांडे यांचें दुसरें आलेलें पत्र न छापल्याबद्दल त्यांची माफी मागून आमच्याकडे पत्रें पाठविणारांस एकंदर कांहीं सांगणें आहे तें कळवितों. खेडेगांवांतले मोठे टोलेजंग समारंभ खरे, पण शहरांतील व एकंदर सर्व ठिकाणच्या वाचकांस ज्यांचा तपशील समजून फारशी मौज वाटणारी नव्हे, अशा शाळागृहांत झालेल्या, बक्षिसें, परीक्षा इत्यादिकांच्या प्रसंगांवरून जे आह्माकडे पत्रें पाठवितात, त्यांचा स्वीकार आमच्याकडून कोणत्या तऱ्हेचा होतो हें पुष्कळांस स्वतःच्या अनुभवावरून आधीं कळलेंच असेल, व बाकीच्यांस नुकतेंच वर जें लिहिलें आहे त्या-

वरून सहज समजण्यासारखें आहे. येथें त्याविषयीं पुनः आणखी इतकेंच सांगणें आहे कीं, जरी गरज लागल्यास तशा पत्रांपैकीं कांहीं आह्मी छापवितों, तरी तसें त्यांतील कांहीं अपूर्व गुण पाहून आह्मी करतों असें कोणीं समजूं नये. सर्वांत जें लहान, सुवाच्य अक्षरांनीं लिहिलेलें, असें एकादें सहजरीत्या सांपडेल तें छापण्यास पाठवून देतों. यास्तव अशीं पत्रें ज्यांचीं छापलीं नाहींत त्यांस वाईट वाटण्याचें विशेष कारण नाहीं. हें आमच्याकडे येणाऱ्या पत्रांतील एका प्रकाराविषयीं झालें. दुसरा अशाच जातीचा प्रकार ह्मटला ह्मणजे कोडीं, कूटें इत्यादिका विषयींचे प्रश्न व त्यांचीं उत्तरें. अशा प्रकारचीं पत्रें मागें मागें फार येत असत. पण आतांशा तशीं येत नाहींत ही गोष्ट संतोषाचीच समजली पाहिजे. कोडीं व कूटें ह्मणजे जे जे प्रश्न सुटण्यास अवघड वाटतील ते सर्व नव्हेत. जे प्रश्न सोडविण्यास बुद्धि खर्चावी लागते खरी, पण ते सोडविल्यापासून कांहीं उपयोगाची किंवा मनोरंजनाची गोष्ट समजत नाहीं, त्यांसच वरील संज्ञा लागते. संस्कृतांत असे पुष्कळ श्लोक आहेत कीं, ज्यांची रचना फारच बिकट असल्यामुळें अनभ्यस्ताचा त्यांत मुळींच शिरकाव होत नाहीं. त्यांत कोशांतील अप्रसिद्ध शब्द व व्याकरणाचीं सामान्यतः न येणारीं रूपें अशीं घालून व अतिशयित श्रम घेऊन पद्याची जुळणी अशी चमत्कारिक केली असते कीं, ती दिसण्यास फार मौजेची असते; पण त्यांतील अर्थ पाहूं गेलें असतां बहुध ओढून ताणून आणलेला असून तो अर्थातच फारसा सुंदर असतो असें नाहीं. अशींच गणितांतील वगैरे कोडींही होत

यापासून अगदींच उपयोग नसतो असें आमचें म्हणणें नाहीं. पण तो उपयोग रिकाम्या वेळीं—कीं जेव्हां दुसरे अधिक उपयोगाचें काम करावयाचें नसतें, त्यावेळेस—एके प्रकारची कर्मणूक त्यांच्या योगानें मनास होते इतकाच होय. जशी जेवणानंतर मुक्षुध, तसें उपयुक्त विद्येचें अध्ययन झाल्यावर बुद्धीस तीव्रता देण्यास अशा कर्मणुकीचा कांहीं उपयोग असतो. परंतु जे अप्रबुद्ध असतात, व ज्यांच्या बुद्धीस प्रौढता आली नसते, त्यांस हीं कोडीं व कूटें म्हणजेच विद्येची सीमा वाटून, लहान मुलांस जसा बाजारांतील नकली जिनसांचा अतोनात शोक असतो, त्याप्रमाणेंच त्यांसही वरील अनुपयुक्त गोष्टी अमोलिक चिजा वाटतात. असो; तर अशांत ही आमच्या पत्रें पाठविणारांनीं आपल्या बुद्धीचा व पैशाचा फारसा खर्च करूं नये.

वरील दोन सूचना ध्यानांत ठेवल्या असतां आमच्याकडे पत्रें पाठविणारांस आशाभंगाचा प्रसंग बहुधा येणार नाहीं असें आम्ही त्यांस खात्रीनें सांगतों. ज्या विषयांवर पत्रें आलीं असतां आम्ही तीं मोठ्या आनंदानें छापूं असे विषय व्याकरण, इतिहास, गणित, ग्रंथाचें गुणदोषविवेचन इत्यादि होत. असेच प्रश्न व अशींच उत्तरें छापणें किती रास्त आहे, व त्यांपासून सर्वांस किती उपयोग होणारा आहे, याविषयीं येथें कांहींही लिहिण्याची गरज नाहीं. तें हवें त्यास सहज समजण्यासारखें आहे. आतां शेवटीं इतकेंच सांगतों कीं, याशिवाय दुसऱ्या प्रकारचीं जीं पत्रें तीं पाठविणारांनीं पाठविल्यास आमच्याकडून कांहीं हरकत नाहीं. इतकेंच मात्र कीं, आम्ही इतके श्रम घेतले व इतका खर्च

केला यास्तव पत्रककर्त्यांवर तीं छापण्याविषयीं आमचा हक्क झाला असें बरीक कोणीं समजूं नये. आह्मास सवड दिसल्यास तीं छापूं; नाहीं तर त्यांची गति सिद्धच आहे!

ही सूचना लांबतां लांबतां बरीच लांब झाली. तरी ज्या अर्थी पाठविलेल्या पत्रांची व्यवस्था आज कित्येक वर्षें कोणत्या प्रकारें झाली व पुढेंही ती कशी होणार हें सर्व यांत एकवार कांहीं पृष्ठें खर्चून सुचविलें आहे, कीं तेणेंकरून आह्माकडे पत्रें पाठविणारांस त्यांचीं पत्रें कां न छापलीं हें स्पष्ट कळावें, व ज्या अर्थी या खेपेस पत्रें ही फार छापलीं नाहींत, त्या अर्थी हा मजकूर फारच लांब झाला असें कदाचित् ह्मणतां येणार नाहीं.

---

जिज्ञासु–तुमचें २३ जूनचें पत्र पोंचलें. तुह्मी कांहीं महिन्यांपूर्वी दोन तीन पत्रें पाठविलीं होतीं ह्मणून लिहितां, पण तीं आमच्यापर्यंत खास आलीं नाहींत. तुमच्या सारखीं जीं समंजस व बेताचीं पत्रें आमच्याकडे येतील त्यांचा अव्हेर आह्माकडून कधींही होणार नाहीं असें आह्मी सर्वांस खात्रीनें कळवितों. गेल्या फेब्रुआरीच्या अंकांत ज्यांचा आह्मी निषेध केला तीं पत्रें फार वेगळीं; व तशीं तेव्हांपासून अगदीं आलीं नाहींत या गोष्टीचा आह्मास फार संतोष वाटतो. खेडेगांवांतील पत्रव्यवहार अगदींच बंद करावा अशी आमची मुळींच इच्छा नाहीं; व अशाविषयींचा अभिप्राय आह्मीं गेल्या अंकांत प्रगटही केलाच आहे. इतकेंच कीं, ज्यापासून लोकांस व पत्रें पाठविणारांस कांहीं तरी उपयोग होईल अशा प्रकारचा तो असावा. यास्तव आह्मी

सर्वांस येथें एकवार स्पष्टपणें कळवितों कीं, कोणत्याही उपयुक्त विषयावर समंजसपणानें व बेतवार लिहिलेलीं पत्रें आह्माकडे आल्यास तीं आमच्या पत्रकास भूषणरूप समजून आह्मीं फार आनंदानें छापूं.

---

## शेवट.

हा अंक प्रस्तुत मासिक पुस्तकाचा शेवटचा असणार हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् माहीत असेल. तर आतां या शेवटल्या प्रसंगीं आपल्या देशांत नुकतेच येऊन गेलेले जे युवराज आलबर्त प्रिन्स् आफ् वेल्स् यांच्या निमित्त झालेल्या महोत्सवाचें वर्णन आमच्या प्रिय वाचकांकरितां दिलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें आह्मांस खचित वाटतें. तर तें सदरील अंकांत घालून ज्या आमच्या ग्रामस्थ शिक्षकांस युवराजदर्शनाचा महालाभ साक्षात् घडला नाहीं त्यांस तो असा प्रकारांतरानें आह्मी घडवितों. शिवाय प्रकृत लेखानें आमच्या आज पंधरा वर्षें चाललेल्या 'शाळापत्रका' चा शेवटही गोड झालासा होईल !

या पुस्तकांत छापण्याकरतां पत्रें पाठविणाऱ्या आमच्या प्रिय मास्तरांची व आमची ही शेवटचीच भेट. यास्तव या खेपेस त्यांच्या पत्रव्यवहाराकडे दोषदृष्टीनें तादृश न पाहतां तो यथावकाश सगळा छापण्याचा आमचा हेतु आहे. याबद्दल 'इंदुप्रकाश' दि पत्रांशीं पत्रव्यवहार करणाऱ्या मार्मिकांची आह्मावर इतराजी न व्हावी !

त्याप्रमाणेंच आजपर्यंत पत्रें पाठविलीं असून न छापल्यामुळें, किंवा प्रसंगवशात् यांत विरुद्ध मजकूर आल्यामुळें, ज्यांची प्रस्तुत पुस्तकाविषयीं अप्रीति झाली असेल त्यांचीही आह्मी सरते शेवटची क्षमा मागतों. सदरील पुस्तकाचा खेडेगांवांतील मास्तरांस, व एकंदर मराठी वाचकांस, जर कांहीं थोडा बहुत उपयोग घडला असेल, तर त्याकडे नजर देऊन आमच्या प्रार्थनेस वरील लोक विमुख होणार नाहींत अशी आशा आहे.

# ज्ञानप्रकाश.

सन १८७२.

# A POET TURNED A PHILOSOPHOR.

[ज्ञानप्रकाश, ता॰ १ आगष्ट १८७२.]

The present is an age of wonders. The last generation witnessed with amazement the wonders of modern science and the powerful material agents that were brought to minister to human comfort It seems reserved for this to behold yet mightier achievements and those too in a sphere, where one should always least expect them. Some powerful forces have recently, it would appear, been discovered in the immaterial world whose potency to judge from results, is altogether astonishing. The University strikes off annually, in thick profusion, statesmen orators, poets, novelists, while the number of scholars may well nigh defy computation! The powers of genius, which, till but lately, were found to be of such tardy growth, mature and unfold themselves in these happier times, with a readiness all their own. What wonder, then, if a great man who has already enriched his language with some of his choicest productions, should have taken a fresh occasion to add to its glory, likewise his own, by a new effort of his genius?

Our readers, we fear, have already anticipated us; and yet, how could we, if not by flourishes and trumpets, announce so high a potentate? It is, then, the illustrious author of the great epic, Raja Shiwaji, that we have this time summoned before our tribunal. Dare any of our readers ask whom we mean?

It cannot be, it is impossible, that any should at all stand in need of *our* help on this important point, when the great poet himself, with a delicacy as singular as his genins, has well nigh stunned the ears of the whole Presidency with his stentorian voice, all but too feebly echoed by his few Boswells. Mr. Kunte, (to unmuffle at last the hero of our panegyric) who has already shone in various walks of literature, now comes forth with a fresh emanation from his effulgent mind! Avaunt! ye worthless race of old pretenders! Begone! ye Wamans, Moropants, and Mukteshwars, the all-honoured idols of ages of poetic sterility! ye, that palmed upon an undiscerning nation with a false *translated* light, not your own! For shame, "hide your diminished heads," for a peerless luminary, with "the vision and faculty divine" (to quote words particularly dear to our poet as being those of his illustrious prototype) rises upon you! But this is the least arduous of our hero's Herculean feats. Within half a dozen of years—nearly the time that took Milton to compose only his Paradise Lost, of which, by-the-by, the English nation need no longer be particularly proud—our matchless Kunte has shone conspicuous in the ranks of epic poets, statesmen, reformers, orators, philosophors and linguists: a career of splendour unparalelled in the annals of authorship. After these rapid transitions from eminence to eminence, the author at last settles into philosophy, and now behold the intellectual prodigy in the last stage of greatness; not indeed brandishing the Marhatha spear, and rousing the flagging energy of his countrymen against the insolent Mussulmans, nor denouncing priest-craft

with the firy outburst of a patriot—they were but the half frantic products of a by-gone period of hot impetuous youth—but with a sagelike *kaupin* and a beard full of wisdom; meditating profoundly to the skies :

देहांत या चालक कोण आहे ?
अभ्यंतरीं कोण विचार वाहे ?

This is sagely enough and, what is more to the purpose, sufficiently comprehensible by *ordinary* minds? But woe to him that would venture further. The very next step plunges him deep into mud, and he has not to struggle on in this miserable plight long, before he gives up the attempt in utter despair, concluding the rest to be one interminable slough, which he, that toils on through with no ordinary stoutness, finds at last to be but too just a surmise. To do justice, however, to Mr. Kunte's admirers, he has, indeed, what they so strangely mistake for "clear thinking," but they are only the lucid intervals of a mind rioting wilfully or otherwise in madness. Take our author's second stanza on "abstraction,"

हा वृक्ष आहे बहु धर्म यांत
उंचीहि, रुंदीहि, नसेच अंत.
उंची कसी ? हे मन, मुख्य पाहीं
लांबी किती लक्ष ? निमग्न राहीं.

We hope this stanza is no unfair specimen of the clear thinking of him, who has by his transcenden powers rendered such signal "honour to his University, and to his country," in whose defence his zealous

Boswells drag Wallers and Rochefocaults from their happy obscurity, and whose equality with Milton is so confidently asserted by his satellites, catching doubtless some of the wild enthusiasm of their central luminary. Of course, we are to expect little of the *external* graces of softness, harmony, rhymes or aliterations in this piece, it being the first grand article of this new School of Poetry, to be as plain as possible even to wretchedness. But let us dive into its internal. To speak of the इंदी of a tree sounds something like absurd. But let it pass. नसेच्चि अंत; does Mr. Kunte think that the known properties of a tree are really *innumerable?* But this, too, is the sphere of a *philosophor*, which we dare not plunge in too far. We can, however, suggest a reason for this assertion, by no means very creditable to the poetic genius of our author; and it cannot fail in being readily discerned by any one who reads the two lines together. That this suspecion, so fatal to poetic inspiration, is but too well founded, we shall undertake amply to prove, if called upon. But to pass on. The third line is the least happy of the stanza. What does कसी mean? It is not only purely redundent but as unreasonable intruders often do, involves the whole in one common ruin; for, if इंची be in itself a property what can again be "the nature of this property?" But our poet is not perhaps for such rude and uncivil dissections. Let us, then, take him all-in-all, and see what the result is; which, we fear much, will be little else than "poisonous juice," Everybody knows and the Plato of Maharashtra certainly must, that the very idea of Abstraction implies a plurality of objects, and yet his mind,

endued with miraculous powers "remains plunged" in abstractions (to use our poet's peculiarly expressive language) when it contemplates the height of an *individual* tree standing in view.

---

(ज्ञानप्रकाश, ता० १२ आगष्ट १८७२.]

We dismissed our hero, the last time, a little too abruptly. We have not yet done with the passage. We shall take our final leave of it after noticing a most distinctive feature of our author's character which manifests itself therein. It is that presumptuous audacity and that usurpation of dictatorial authority, which pass with the ignorant and the credulous for confidence and merit; but which, full often, only denote the daring up-start, and cannot be too severly reprehended. When we first glanced over the book and saw the magnificent array of headings rendered still more so by the sacred light of their English renderings (for the wits of the whole world set together would not be able to find any better reason, we dare say, for them), we were, be it freely confessed, as much dazzled as any *Observer* or *Herald* may be presumed to be. We concluded that the orator of Arian Rationalism had conferred a lasting benefit on the language by making valuable additions to its philosophical vocabulary, and with eager joy did we proceed to welcome these strangers to our language. But what was our surprise and mortification, when, on a closer view, these grand creatures of a vain mind drooped their imposing aspect, and appeared to shrink from a more critical scrutiny!

Take the heading of the paragraph we have been examining. It is स्वनिवर्तन. Now this word, if words had ever any meaning, must signify "turning upon self." Will Mr. Kunte help the poor understanding of his readers by explaining to them, how the mind may be "turned upon itself" in contemplating an *external* object like a tree?

But to proceed more systematically, the book opens with अंतर्गोल, a highly philosophic term indeed? If the nature of the mind is past finding out, as the very first verse teaches, it is not easy to see by what means it was discovered to be "globular." Can it be that Mr. Kunte has eclipsed the glory of Magellan or Cook by circomnavigating the "inner globe"! If so it is an important discovery, indeed, that a mind is not a square or a triangle, but a "globe"! But the real explanation of this ludicrous error, is, we fear, that our author has never learned to translate properly English words and phrases into Marathi. Next comes अनुव्यवसाय (self-consciousness). We doubt whether this word exists in the Sanskrit language, and strongly suspect it, as well as the word अनुमति (conscience) to be fresh from Mr. Kunte's own self-licensed mint. One more instance of what would look very much like imposture—अणिमादि अष्टविभूति आणि अंतर्मुखता (the powers of the mind and turning it on itself). The first is a gross misunderstanding and the second purely meaningless fabrication. The अष्टविभूतिस are not "the powers of the mind" but are eight fabulous faculties believed by the superstitious to be obtainable by propitiating Siva and Durga.

In the Malati Madhav of Bhavbhuti, we have an exemplification of these superstitious beliefs in the characters of कपालकुंडला and सौदामिनी. अंतर्मुखता (the state of one with the face inward) is an awkward expression and can never express action; स्वनिवर्तन, so absurdly used above, would have been something in place here.

Thus two-fold is the solemn garb in which Mr. Kunte has tried to look exceedingly philosophic. For those, who know only English, but would never-the-less pronounce judgements on Marathi books, he has the mouth-filling sounds like "inner world" and "self-consciousness," and for those whose knowledge of Marathi would tempt them to pry into the inside, he has the entrance of each of his paragraphs carefully guarded by high Sanskrit phrases, equally awful though hollow. And eminently successful has been this clever trick. At the hands of the former he has received laurels as bright as those of Milton himself; while the latter, though but too plainly seeing the wretchedness of the piece, have been yet over-awed into silence by his अष्टविभूति.

---

(ज्ञानप्रकाश, ता० १९ आगष्ट १८७२.)

The charm of these enchanted portals being now dissolved, let us sally in. And what a wild prospect meets our view on every side?—a vast chaos of misty thought unredeemed by even a single passage (we had almost said a line) which any mind except the author's may dwell with pleasure upon. Mr. Kunte knew that the old Marathi poets had something

about them that was not satisfactory; he, therefore, very wisely judged that a road, diametrically opposite to theirs, was necessarily the one, and the only one, to true poetic excellence. In his zeal to found a new School of Marathi Poetry, he has unhinged the whole system of the language, and waged a frantic war against sense and style, grammar and idiom—a very Robespierre of Marathi Poetry. Who but the Bard of Kolhapur and his poetic Apostles sprinkled over various parts of Maharashtra (if indeed lunacy has been more than usually prevalent of late in these parts and the number of satallites be not another ecstatic vision of our Don Quixote) would ever dream of foisting upon the language such ungenial expressions as कोमल अंधकार, रंग डोले, बांधी जगा कोण? using such strange compounds as जगत्पसारा, मनचक्र; such ungrammatical verbs as भजी for भजे, राहीं for राहे, and the like? Add to these a multitude of words such as विच्चित्र, सत्र, कौंदे &c. which have been torn up from their fixed places in the language and condemned to move in eternal hyperbolas through this mistic world of chaos. But we hear hosts of words and expressions crying out at the gross injustice that is being done to them and urging their own claims to a like distinction. All that we can do, however, in their behalf, is to recommend them to the charity of the more curious of our readears, heartily wishing that *we* may be no longer pestered by them.

Only a few specimen of the characteristic elegance of our author and we shall have done.

प्रार्थना—हे वृक्ष, हें रान, विचित्र डौल !
हीं पृथ्वी, हा सुंदर काय गोल ! ६६
ह्या डोंगरीं थोर नदी निघाली !
कैसे अलंकार सुरेख घाली !
पाण्यामधें हे उठती तरंग !
त्यांच्यामध्यें सुंदर काय रंग ! ६७

शृंगार—डोळे किती भव्य ! कटाक्ष गोड.
चित्तास लावील सुरूप वेड.
वेणींत, भांगांत, अवर्ण्य डौल.
ती हास्य मुद्रा खुलतात गाल १६१
चोळीस उत्कृष्ट जरीकिनारी.
वर्णू किती रूप ? सुरेख नारी.
गाण्यास लागे रममाण रूप
तों पाझरे हें जणु चित्तरूप

A description in the characteristic style of our author:—

पुणें गांव आहे, नदी कांठ आहे,
मढीं जाळती लोक तें पात्र वाहे.
उभें उंच जोतें वरी रान माजे,
जिथें रम्य वाडाच पूर्वी विराजे.

We dare not comment on these awful passages, but would refer our readers to *the Herald* or *the Observer*, the sole privileged interpretters of these oracles.

It would be unjust, indeed, to say that this book has absolutely nothing to repay the troubles of peru-

sal. We mean not, however, the paragraph illustrative of, or rather meant to illustrate, the various Rasas (emotions); for they too are only of a piece with the rest of the book and are read with little or no emotion. If any Rasa in this book is richer than the rest, it is emphatically that of हास्य. The exquisitely commic turn of some of its passages surpasses all description; and although these do not appear contiguously, still they do, to a great degree, relieve the pervading dullness.

Take a few specimens of the richest imagery :—

स्फुर मना ! चल, गायन मांडतों !
तुज बघूनच तांडव नाचतों.

What a picture of poetic ecstacy !

हे शुद्ध बिंबा ! जगदीश राया !
आलों तुला मी भजनीं नमाया.
देवा अरे थांब, जगन्निवासा
पाण्याविना हा मरतोच मासा !

But we must stop; and we take this excellent opportunity to do so, leaving our Philosophor in the congenial occupation of a prayer to his God. If Mr. Kunte's poem has not quite satisfied us, we must not make that an excuse to take the same liberties with our reader's patience.

And now we take a formal leave of our author. We found him soaring high with Milton and Plato, and hope to have left him, at least in the estimation of our impartial readers, in the sphere of mediocrity. We dare not hope, of course, that our poet will much

relish the rude way. in which his head has been stripped of its laurels and exposed to public examination in its poor reality. The happy dream and delusion of years cannot, indeed, be dispelled in a few minutes; yet our author will do well, if he takes a warning from hence, to trust no longer too implicitely to the fertility of his genius, consoling himself if he choose, by the reflection that "he is not for these times but for posterity." If, however, in the natural vanity of the human heart, he be yet loath to resign his high pretentions, we shall be the last to urge him to do so. He has every right to enjoy an undisturbed empire over letters to his heart's content,—only that he enjoy it quietly.

A few parting words with our Boswells too. We assure them that we bear them no enmity whatsoever, but that we shall delay our conversion to their views till we see some better title established to Mr. Kunte's poetical merit than the merest dubbing received at the hands of critics even though in common with Milton himself. Till then, we shall withhold our insense from the shrine of their idol.

Also a word to the poor students of Poona. We shall be very sorry, indeed, if our criticism should, in any way, interfere with their interest. But we feel ourselves thoroughly innocent in this matter. If their fond expectations founded on the success of this book, should fail to be realised, who is to blame? Of course, they that dreamed of crops to be rised on rock. Let them therefore, wake up and banish all wild hopes in time; or else they shall have to wait for ever.

## CHUTAKA

[ ज्ञानप्रकाश ता. २६ आगष्ट १८७९ ]

Somebody has sent us the first number of a newly started English paper, very prettily called the "*Chutaka.*" It is published at Bombay and can be bought for 4 annas per annum. But dear reader, do not buy it for the only reason that it is very cheap; for its contents, judged from the first number, are not worth even a pie. To tell the truth, we have never seen anything more "shabby" or "detestable"—we would rather say—abominable. If Puna sells "mounds" (this we suppose means "maunds") of scandal at the cheap rate of one Rupee and a half per annum we must say Bombay has out-done Puna by offering to sell "khandies" of that same precious commodity at the still cheaper rate of four annas a year. We however ask the young men of our city not to be deterred by such impudent, mean and miserable attacks which *the chutaka* is pleased to revel at them. Let them expose incompetent proffessors and unworthy school masters in a fearless but dignified manner and they will do an amount of public good which a thousand *chutakas* will not find it in their power to undo. The unfortunate inhabitants of places far away in the mofussil and of the benighted native states such as Miraj, Jat, Kolapur and others, may, of course, "learn a great deal from any professor"; but the proverbially intelligent and advanced residents of places' like Puna and Ratnagiri can not learn much from professors and teachers unworthy of their names. Poona is not a place

where shams can ever prosper. Even cart-loads of *chutakas* will not avail much. Let the authors of the *chutakas*, therefore, understand that though their artful flattery of the Educational Authorities may do good to certain individuals, their mean libels against the Puna young men will one day bring them into troubles from which they would find it difficult to extricate themselves. That is, however, their concern and we will leave them to their prudence. We would advise our educated young men of Poona always to read this paper with the object of seeing what great a pitch human recklessness and impudence can go to.

---

## THE OLD AND NEW SYSTEMS OF EDUCATION.

[ज्ञानप्रकाश ता० २१ नोव्हेंम्बर १८७२.]

The above is a subject of no limited range. To do it the fullest justice is a task that would tax all the powers of a profound thinker and a consummate scholar. It may not be unprofitable, however, to present here to the general reader some broad facts relative to both, which must readily suggest themselves to the mind of an ordinary observer.

It must be remembered, in the first place, that the distinction conveyed in the heading of the present article, holds good in the case of no particular land, but of the whole civilized world. The arts and inventions of modern times, which have so materially changed the aspect of the human life as to render it, in

the eloquent language of a great speaker, "a theatre of wonders," have equally affected the condition of the student. They have, in fact, completely altered it all the world over. Numberless conveniences and facilities, to have predicted which, only a few centuries ago, would have set one among the highest of prophets, and the very idea of which would certainly have been ridiculed by the multitude, have now become the commonest thing of the day and do no more excite wonder than the rising or setting of the sun. A self-educated Faraday or Cobbett would have been not only a miracle but almost an impossibility in those days. It will readily be seen, that the student of modern days has numerous advantages over the ancient.

And yet, does not this very fact exhibit the notorious inferiority of the moderns in a more striking light? Has the world yet produced another Aristotle, Thucidides, Demosthenes or Phidias? Or to take instances nearer home, with what supreme contempt, would one of the giant race of the *Shastris* of old, were one to rise from the dead, look down upon the modern nurselings of the University, who can boast of high *Sanskrit* scholarship so cheaply? Let us therefore try to solve this important question,—To what cause is the secret of the strength of the ancients and to what cause is the weakness of the moderns to be mainly traced in respect of mental culture?

The very first thing that strikes one in comparing the ancient with modern learning, is the extreme limitedness of the former and likewise of the resources

to which the student had access in those days. Beyond a few physical sciences, such as astronomy, geometry,physics and the like,the Greeks never advanced and their progress in them, too, was but inconsiderable. Their chief excellence lay in the astonishing rapidity with which they carried all the fine arts to their highest perfection. They were left again, amidst such a diversity of excellence, to their own undirected taste and inclination in making a choice of their pursuit in life. Their application to study could not be, therefore, other than voluntary. No one ever dreamed of repairing to the Academic grove with the hope of future bread to crown his endeavours ; for no pursuit was then so barren in point of physical reward as philosophical learning. Every one being thus directed to his own favourite occupation, and the materials of study, too, being necessarily few, the result might easily be imagined. The same holds good even still more forcibly in the case of our old *Shastris.* Their sphere of learning being still more circumscribed, comprising in fact little beyond the six systems of Philosophy and Poetry with its minor adjuncts like Rhetoric, they could concentrate their energy to one or more branches of their antiquated lore. It was thus that every one could achieve a distinguished eminence in his own chosen sphere.

---

[ ज्ञानप्रकाश. ता. २९ नोव्हेंबर १८७२. ]

Behold, on the other hand, the sad picture of the state of a modern student! He has scarcely mastered the alphabet before a systematic course of

cramming begins and a mere infant in knowledge is hurried on, from month to month and year to year, over a vast tract of learning, most of which escapes clean from under his young feet; and this, too, not seldom with the help of persons, who are themselves perfect strangers to it. And now issues forth, in the pride of his gay wings, the wonderous butterfly out of his cell. No height in the heavens is too difficult for his sublime flight! One soars in the Homeric empyrean; another attempts the heights of Shakespear; a third that of Scott; while others, by far the greatest number, more proud,—perhaps more wise,—disdaining to court the public favour themselves, assume the more easy and comfortable office of a critic. The great object of the educational authorities in giving them liberal education, as it is called, was to initiate them into all branches of learning, so as at once to cultivate and refine their minds. But this glorious end, so generously contemplated, is far from being realised at least at present. The student does, indeed, learn a great deal, but this variety of attainments is generally had at the expense of depth and soundness. The student of the old system knew, it is true, but very little; but he knew it thorouhly and was master of his own province. The student of the new has a great number of facts at his command; but, not being properly systematised, they serve only to run him perpetually into fallacies and misconceptions; thus rather hindering than furthering the refinement of his mind. Like the cat in the old fable, the former is master of a single expedient, and is safe; while the latter, trusting implicitly

to the variety of his knowledge, is only confounded and perplexed at the critical moment like the fox.

Neither of the two methods is altogether as inexceptionable as might be. Each has its own evil inseparable from it. If the former makes a man strong in his own branch, he is so in that one alone. It was no uncommon thing, as may be seen even at present, to behold a *Pandit* who is a master of *Panini* and all the wonderous commentaries on his works, and yet all but an absolute fool everywhere else. On the other hand, it would not be very difficult to find a conspicuous disciple of Gautama and a first rate logical wrangler, but never the less, committing the most ridiculous mistakes in grammar, which even a common tyro in *Sanskrit* may now correct. The evil of the opposite course has been already dwealt upon above. A union of the two, therefore, in due proportions, is alone the safest and the most profitable course.

Lastly, the evil shown above is one, not so much of systems as of individuals. We have already had no few instances in our own country of *Pandits*, who, by the force of genius and industry united, had rendered themselves eminent in more spheres than one; and why may we not have the same now and hereafter? Let our young hopefuls but cast off their concept and lethargy, and honestly strive and persevere; and we have no hesitation in prophesying that ere long the land shall re-assert its native dignity and fill a space as much in the envy of the rest of the world, as it does now in its contempt.

# किरकोळ.

[ सत्यशोधक ता. २ मार्च सन १८७९ ].

# एतद्देशीय सभांचें रोगनिदान.

[ हा निबंध रा. रा. विष्णु कृष्ण चिपळूणकर यांनीं रत्नागिरी एथें नूतन स्थापन झालेल्या ' ऐक्यसंवर्धक सभे ' पुढें वाचला होता तो सदरहू सभेनें सत्यशोधकांत छापण्यास पाठवून दिला. ]

आज आपल्या सभेपुढें निघालेला विषय असा आहे कीं, आपल्या देशांत सभा व मंडळ्या ह्या अनेक निघत असून त्यांची प्रायः लवकरच पडती कळा दिसूं लागते, व त्यांचा फार दिवस टिकाव न निघुन बहुधा लौकरच समूळ लय होतो; तर असें कां व्हावें? अनेक स्तुत्य हेतूंनीं काढलेल्या निरनिराळ्या सभा व मंडळ्या आपल्या देशांत चालत नाहींत याचें कारण काय? या विषयाचा प्रस्तुत काळीं विचार होणें किती अगत्याचें आहे हें कोणासही सांगावयास नकोच. कां कीं हल्लीं आमच्या देशाच्या उन्नत्यर्थ शेंकडों जगांचे शेंकडों प्रयत्न चालले आहेत, आणि या प्रयत्नांत ह्मणावें तसें यश तर मुळींच येत नाहीं. तेव्हां अशा प्रसंगीं हा विचार करणें अगदीं अवश्य आहे, कीं इतक्या वैद्यांचे उपचार थकून रोग्यास जर मुळींच गुण पडत नाहीं; तर रोग्याचा रोग दुःसाध्य आहे ह्मणावा, किंवा वैद्याच्या रोगनिदानांत किंवा चिकित्सेंत तरी कांहीं मोठी चूक आहे असें ह्मटलें पाहिजे.

तर आपल्या सभेनें प्रस्तुत विषयाचें प्रथमतः उद्घाटन

करण्याचें मनांत आणलें हें यथायोग्यच आहे. आतां हें काम मजवर सोंपविल्याबद्दल तिचे आभार मानून, प्रकृत विषयाच्या विवेचनास आरंभ करतों. अगोदर एवढी मात्र विनंति करून ठेवितों कीं, ' एतद्देशीय सभांचें रोगनिदान ' करण्याचें काम ज्यापक्षीं मजकडे आलें आहे त्यापक्षीं वरील परीक्षेस अत्यावश्यक जो स्पष्टोक्तीचा अधिकार तोही सभाजनांनीं मला द्यावा. एके ठिकाणीं ह्मटलें आहे—

ह्मणिजे वैद्यें दिली सुधा कांजी ।

वैद्यानें कांजी दिली तरी तिला अमृत ह्मटलें पाहिजे. असो; आतां प्रस्तुत विषयाचे दोन विभाग कोणते होण्यासारखे आहेत ते प्रथम सांगितले पाहिजेत. पहिला विभाग आपल्या देशाचीच स्थिति हा होय. ह्मणजे आपल्या देशाची स्थिति अशी आहे काय, कीं कोणत्याही प्रकारच्या सभा स्थापल्या तरी त्यानीं जीव धरूंच नये ? याविषयीं प्रथमतः विचार केला पाहिजे. या गोष्टीविषयीं सामान्यतः पाहतां अशीच समजूत दृष्टीस पडते, कीं आमचा देश सर्व प्रकारें टेंकीस आला आहे, यास्तव त्याचे स्वोन्नत्यर्थक सर्व प्रयत्न हे मरणाऱ्या मनुष्याच्या पाय झाडण्याप्रमाणेंच केवळ होत, त्यांपासून कांहीं कार्य निष्पन्न व्हावयाचें नाहीं. सभा काढा, मंडळ्या स्थापा, कांहीं करा,—सरडयाची धाव कुंपणापर्यंत ! त्यांतून या आमच्या महाराष्ट्र देशाविषयीं तर बोलूंच नका. त्याच्यावर एक जबरदस्त शेरा कधींच पडला आहे,—" आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः " हा शेरा कोणीं केव्हां देऊन ठेविला असेल याचें कांहींच अनुमान होत नाहीं. दाक्षिणात्यांवर एवढ्या विशेषणाचा

उपयोग करणारा कोणी औदीच्य असावा असें वाटतें; बाकीं मद्रास तर मुळीं Benighted Presidency 'काळोखांत बुडालेला इलाखा,' तेव्हां तिकडून वरील ध्वनि निघण्याचा संभव बहुधा मुळींच नाहीं. आतां आमच्या आरंभशूरत्वाचें विधान कोणी औदीच्यानें जें केलें तें कोणत्या काळीं केलें असेल याचाही चांगलासा तर्क होत नाहीं. इंग्रजी कारकीर्दीच्या पूर्वीं तर वरील विधान करणें परम दुर्घटच होतें; कां कीं या आरंभशूर लोकांच्या नौबती त्रिचाऱ्या बाबूंच्या मुलखांत तर काय, पण रजपुतांच्या, रोहिल्यांच्या वगैरे मुलखांतही दणाणत होत्या. इंग्रेजी कारकीर्दींतलाच प्रकार पाहिला, तरी इकडूनही दाक्षिणात्यांच्या अंगीं वरील विशेषणास विशेषतः पात्र होण्याची योग्यता दिसत नाहीं. कां कीं, इकडील प्रार्थनासमाज मात्र बेताबातानें चालले आहेत व तिकडचे भजक मंडळीनें गजबजून राहिले आहेत; इकडे कधीं काळीं एखादा पुनर्विवाह होतो आणि तिकडे पुनर्भूंची नेहमीं चढती कळा आहे; इकडे मात्र कांहीं बड्या लोकांनीं काढलेल्या एखाद्या देशहिताच्या कार्यांत त्यांचा कंबरबंद ढिला पडतो आणि तिकडे असा प्रकार बिलकुल दृष्टीस पडत नसून कोणच्याही कामाचा कोणी एकदा विडा उचलला कीं, फत्ते म्हणून समजावीच; असा कांहीं एक प्रकार दृष्टीस पडत नाहीं. तिकडे इंग्रेजी राज्य इकडच्यापेक्षां ८०।९० वर्षें अगोदर झालें असूनही नवीन सुधारणांच्या संबंधानें तिकडे म्हणण्यासारखें जास्त कांहींच झालेलें नाहीं. उलटें इकडेच सार्वजनिक सभा वगैरे कांहीं प्रकार तिकडच्याहून ज्यास्त आहेत. तेव्हां कोणत्याही तऱ्हेनें पाहत

वरील वचनाचें यथार्थत्व दृष्टीस पडत नाहीं. याप्रमाणेंच एकंदर देशाच्या संबंधानें जरी पाहिलें तरी त्याचीही स्थिति आजच इतकी निकृष्ट झाली आहेसें मला वाटत नाहीं, कीं कोणत्याही प्रकारचा सामाजिक उद्योग त्यांत चालूंच नये.

वरील उल्लेख हा सकृद्दर्शनीं बराच विलक्षण वाटण्यासारखा आहे, कां कीं प्रत्यक्ष अनुभव प्रायः त्याच्या विरुद्धच आहे. 'बांबे असोशियेशन' सारख्या मोठमोठ्या सभांपासून तों मुलांच्या लहानसान सभांपर्यंतही एकच बोभाट ऐकूं येतो, कीं काय असेल तें असो, सभा उत्पन्न झाली कीं पहिल्या प्रथम कांहीं दिवस ती बरीशी चालते; पण पुढें लवकरच तिचे हातपाय गळतात. ही गोष्ट वस्तुतः खरी आहे पण तिजवरून देशाच्या दौर्बल्याचेंच अनुमान काढावयास पाहिजे असें मला वाटत नाहीं. वरील स्थिति चोहोंकडे आढळण्याचीं कारणें माझ्या मतें फार निराळीं आहेत. तीं येणें प्रमाणें:—

(१) पहिलें मोठें कारण अगोदर हें होय कीं, सभा, समाज, मंडळ्या हे सर्व प्रकार परदेशीय लोकांचे असून इकडे त्यांची नुस्ती कोठें नक्कल होऊं लागली आहे. ह्मणजे एखादें लोककल्याणाचें काम हातीं घेऊन तें चालू करण्याकरतां सभा काढाव्या, नंतर व्यवस्थापकांच्या मंडळ्या, चिटणीस, खजिनदार वगैरेंच्या नेमणुका व्हाव्या इत्यादि प्रकार केवळ पाश्चात्यांच्या अनुकरणावरून इकडे आला आहे. इकडचा तो मूळचा नसल्यामुळें एतद्देशीयांच्या तो अझून अंगवळणीं पडला नाहीं. तेव्हां इकडच्या या नकला

मूळ अस्सलाची बरोबरी इतरांत कशा करतील ? नकल घटतां घटतां कालें करून ती कदाचित् पूर्णत्वाच्या दशेला येऊन पोंचेल. तेव्हां, आमच्या देशांत सभा चिरस्थायी होतील कीं नाहीं हें सध्यांच्या १०।१५ वर्षांच्या अनुभवावरून पाहतां उपयोगीं नाहीं. बराच काळ वाट पाहिल्यानंतर या गोष्टीचा निर्णय ठरणारा आहे. तों पर्यंत बऱ्याच नकला जरी वांया गेल्या तरी त्या व्यर्थ असें ह्मणतां उपयोगी नाहीं; कारण कोणत्याही कामांत वाकबगारी येण्यास पूर्वी अनेक वेळां प्रयत्न व्हावे लागतात. वास्तव, ज्या प्रमाणें यंत्र चांगलें चालू होण्यास त्यांतील निरनिराळ्या भागांची रचना यथास्थित होऊन त्यांचा व्यापार सुरळीत चाले इतकी स्थिति यावी लागते, त्याप्रमाणेंच मंडळ्या जरी स्थापल्या गेल्या, तरी त्यांचें काम हवें तसें चालण्यास, सारी मंडळी आपआपल्या कामांत पुरी माहितगार होऊन चांगली वाकबगार झालेली पाहिजे. पण हें होण्यास कालगतीची आवश्यकता आहे; ती दोन प्रकारांनीं. एक तर, सभांची सुधारणा होण्यास ह्मणजे त्यांचें काम कोणत्याही अमुक व्यवस्थेनें व कोणत्याही अमुक उपयांनीं नीट चालणार आहे हें समजण्यास पुष्कळ काळ गेला पाहिजे व पुष्कळ वेळां प्रयत्न झाले पाहिजेत. आणि दुसरें असें कीं, सभांच्या घटकावयवांच्या कार्यांही व्यापारांविषयीं अत्यंत दक्षता जी यावयाची तीही अल्प काळांत येणारी नव्हे. तेव्हां हें जें आपण पाश्चात्यांचें अनुकरण आरंभिलें आहे तें नुतनत्वास्तव अपूर्ण दृष्टीस पडतें, व अल्प काळांतच लयासही जातें हें सहजच आहे. यांत आश्चर्य करण्यासारखी किंवा खंत करण्यासारखी विशेष

गोष्ट नाहीं. अनभ्यस्त नाविकानें भरसमुद्रांत नौका ढकलली असतां तो इसापनीतींतल्या धनगराप्रमाणें कफल्लक होऊन माघारी आला तर आश्चर्य नव्हे; परद्वीपास जाऊन लागला तर आश्चर्य! यास्तव ज्यास पोहावयास शिकावयाचें असेल त्यानें निरंतर पाण्यांतच डुंबलें पाहिजे, पोहण्याची विद्या जमिनीवर शिकतां यावयाची नाहीं. त्या प्रमाणेंच आपल्या देशांत जर हे सभादि प्रकार सुरू करावयाचे असतील तर ते जितके उपस्थित होतील तितके चांगलेच. एक गृहस्थ नवा नवशानें पोहावयास निघून त्यानें गचाळी खाऊन वर आल्यावर असा निश्चय केला कीं, इतःपर पोहतां आल्याखेरीज पाण्यांत पाऊल ठेवावयाचें नाहीं, ह्यासारखें मात्र कोणीं मनांत आणूं नये.

तर, आपल्या देशांतील सभांच्या अल्पायुषीपणाचें वर सांगितलेलें एक मोठें कारण आहे. आतां दुसरें सांगतों. हें तर वरच्याहूनही प्रबळ आहे. सामान्यतः व्यवहारांत पाहतां असा क्रम दिसतो कीं, अगोदर कारण आणि मग कार्य; प्रथमतः एखाद्या कार्याविषयीं मनांत संकल्प आणि मग त्याविषयीं प्रवृत्ति. हल्लीं आपल्या देशांत हा क्रम विपरीत झालेला दृष्टीस पडतो. पहिल्यानें मंडळी निघते, आणि मग तिच्या कार्याविषयीं विचार होतो. आलीकडे सर्वांच्या मनांत असें वागूं लागलें आहे कीं, आपण कांहींना कांहीं तरी केलें पाहिजे, आपला देश फार निकृष्ट दशेस येऊन पोंचला आहे तर त्याची जेणें करून स्थिति सुधरेल असें कांहीं काम आपण पत्करलें पाहिजे. ही समजूत वस्तुतः पाहतां फार थोर आहे, व ती जितकी जितकी या देशांत वाढेल

तितका तितका त्याचा ऊर्जित काळ समीप आला असें ह्मणावयास हरकत नाहीं. उत्कृष्ट स्थिति व निकृष्ट स्थिति यांतील भेद स्वदेशहितबुद्धि व आत्महितबुद्धि यांच्या पलीकडे नाहीं. पण एवढें मात्र पाहिजे, कीं ही लोककल्याणाची इच्छा खरोखर हृदयांत वागली पाहिजे, ती केवळ जिव्हाग्रावर असून उपयोग नाहीं. पण हल्लीं चोहोंकडे पाहिलें तर सर्वतोमुख जें लोककल्याण झालें आहे तें पुष्कळ अंशीं 'फाल्गुने बालका इव' या न्यायास उपयोगी पडण्यासारखेंच आहे. लोककल्याणेच्छेंतून डौलाचा, लोकस्फीतीचा, आपमतलबाचा वगैरे अवांतर भाग काढून टाकला तर निव्वळ बाकी फार करून थोडीच आढळेल.मग अशी जेथें आजच्या घटकेस तयारी आहे तेथें सभांची चिरस्थायिता दृष्टीस पडत नाहीं यांत नवल कसचें?भातुकलींतल्या अन्नाच्या पुरठ्यानें गांवजेवण उठेल काय ? दिवाळींतल्या किल्ल्यांवरील दारूगोळा खऱ्याखुऱ्या लढाईंत कितीसा उपयोगी पडेल ? तर आमच्या देशांतील सभांची क्षणभंगुरता भंग पावण्यास, वरच्यासारखें तुटपुंजीचें भांडवल जाऊन, खरोखरीचें,अस्सल प्रतीचें,भांडवल देशांत पैदा झालें पाहिजेत. जर होईल तर आज जे शेंकडो उद्योग रडत कडत चालले आहेत ते एकदम जारी चालू होतील. दिव्यांत भरपूर तेल घातल्यावर मग त्याचा चांगला प्रकाश पडण्याबद्दल प्रार्थना करायाला नको हें उघड आहे.

आतां यापुढें तिसरें व चौथें ह्मणून जें कारण मी सांगणार आहें त्या दोहोंचा वस्तुतः वरील कारणांतच अंतर्भाव होण्याजोगा आहे. पण विषय परिस्फुट करण्याकरितां

तीं दोन्ही कारणें येथें निराळींच सांगतों.तिसरें कारण गेल्या खेपेस सभेंत निघून, त्यावर कांहीं चर्चा झालीच आहे; तें 'लहानथोरपणाचा विचार' हें होय. ह्मणजे,वयानें, योग्यतेनें वगैरे जो लहान व थोर हा भेद होतो तो सर्व सभाजनांचें एकमत होण्यास प्रतिबंधक होऊन सभा नीट न चालण्यास व त्या मोडण्यास कारण होतो. हा वयोभेद व अधिकार-भेद सध्यांच्या स्थितींत तरी सभांस बऱ्याच अंशीं प्रतिकूळ आहे असें मला वाटतें. निरनिराळ्या वयांत अभिरुचि,हौस, मनाचे कल, हीं सर्व निरनिराळीं असतात हें उघडच आहे; त्या प्रमाणेंच लहान पदवीच्या लोकांचा व मोठ्या पदवीच्या लोकांचा अगदीं एकोपा होऊन जावा हें ही सध्यांच्या स्थितीस मला दुर्घटच वाटतें. ज्या काळीं लोककल्याणाची वृत्ति आपल्या अंतःकरणांत इतकी बाणून जाईल, कीं 'ज्ञानेश्वरीं'तील वर्णनाप्रमाणें—

"आपपर जया नाहीं । चैतन्या जैसें ॥"

इतक्या स्थितीला आपण पोंचूं त्या वेळीं वरील भेदाभेद अगदीं नष्ट होऊन जातील हें स्पष्टच आहे; पण तों पर्यंत वरच्या सारखा भिन्न भाव हा सभेंत जितका थोडा असेल तितका तो तिच्या स्थैर्यास व चिरंजीवित्वास अनुकूल आहे असें माझें मत आहे.

---

[ सत्यशोधक ता. ९ मार्च १८७९. ]

चौथें कारण, स्वार्थबुद्धि, अधीरपणा, मत्सर इत्यादि वृत्ति होत. एतद्देशीय सभांत या अशा दृष्टीस पडतात कीं, एखादा उद्योग आरंभून तो अंमळ बरासा चालण्याचा

संभव दिसला व त्याची यत्किंचित् ही फलद्रूपता दृष्टीस पडली कीं सभाजनांच्या वैमनस्यास आरंभ होतो. ज्याला त्याला वाटूं लागतें कीं, माझ्या श्रमांप्रमाणें व योग्यतेप्रमाणें मला फायदा होत नाहीं.अशी बुद्धि उत्पन्न होऊन पेरलेल्या दाण्यास अंकुर आला न आला किंवा कणीस धरलें न धरलें तोंच त्यावर साऱ्यांची झडप पडते. हा अंकुर व कणीस हे द्रव्यलाभाच्या संबंधानेंच घ्यावयाला नको. नुसता मान व लौकिक हीं दोन सुद्धां वरील स्पर्धेस व स्वार्थबुद्धीस जागृत करतात. मग असा प्रकार उत्पन्न झाल्यावर मूळ उद्योग कोणत्या प्रकारें चालेल हें कोणासही सांगावयास नकोच.

या प्रमाणें वर जीं चार कारणें सांगितलीं, त्यांवरून एतद्देशीय सभा व मंडळ्या यांची सांप्रत जी स्थिति आढळते तिची उपपत्ति बहुशः होईल असें मला वाटतें. आतां वरील विवेचनाच्या पुष्टयर्थ कांहीं मंडळ्यांची हकीगत येथें सांगतों. साऱ्या महाराष्ट्रांत लोककल्याणाची व सार्वजनिक कामांची गडबड पुण्यास फार आहे हें सर्वांस मशहूर आहेच. तर तेथीलच कांहीं उदाहरणें दाखवितों, म्हणजे आमच्या लोकांतील आलीकडील मंडळ्या कशा काय चालतात व त्यांचे उत्कर्षापकर्ष कोणकोणत्या कारणांवरून होतात हें बरेंच लक्षांत येईल.

पुण्यास सन १८७१ सालीं 'डेक्कन कॉलेज क्लब' म्हणजे दक्षिण विद्यालयांतील मंडळीचा मेळा अशी एक सभा निघाली; ही अद्याप चालू आहे. हिचा उद्देश असा आहे कीं, दक्षिण विद्यालयीन मंडळीचा, म्हणजे अगदीं पहिल्या-

पासून तों आजतागाईत सदरील विद्यालयांत जितकी म्हणून मंडळी शिकून तयार झाली, तिचा गुरुबंधुत्वाच्या नात्यानें एकोपा असावा. या उद्देशास अनुसरून वरील सालीं जेव्हां ही मंडळी स्थापित झाली तेव्हां पहिल्याच समारंभाला सुमारें ७८ मंडळी गोळा झाली. त्या वेळेस सभेचें नामाभिधान वगैरे सर्व कांहीं होऊन, पहिलाच समारंभ, तेव्हां सोंगटच्या बुदबळांचे वगैरे डाव, नंतर चाहा, काफी, सरबत, फळफळावळ वगैरे खाद्यपेयांचें सेवन व शेवटीं त्या सालीं बसविलेल्या वेणीसंहार नाटकाच्या दोन तीन अंकांचा प्रयोग, इतकें सर्व होऊन सभेचें विसर्जन झालें. दुसऱ्या सालीं मंडळी सुमारें ६०च जमली. या वेळेस दुपारीं पक्वान्नी जेवणाचा बेत होऊन नंतर संध्याकाळपर्यंत कांहीं भाषणें, कांहीं खेळ वगैरे प्रकार झाले. तिसऱ्या सालाला वरच्याहूनही मजला खचली. 'नुसत्या एक वेळच्या जेवणाला १॥ रुपया कोण देतो? तेथें जाऊन जेवण्यांत विशेष तें काय? निबंध, व्याख्यान वगैरे विद्वत्समाजास उचित जे प्रकार ते तेथें बिलकुल होत नाहींत,' वगैरे आक्षेप निघाले. व ते काढणारी कित्येक मंडळी वरील क्लबामध्यें न येतां दुसऱ्यांचाही बुद्धिभेद करूं लागली. याप्रमाणें होतां होतां चौथ्या पांचव्या समारंभाला सुमारें वीस पंचविसांपर्यंत सभासदांची संख्या येऊन, क्लब् कदाचित् दोन तीन सालांत मोडावा लागेल अशींही चिन्हें दिसूं लागलीं. पण तसें झालें नाहीं ही गोष्ट वेगळी. वरील वीस पंचवीस जी मंडळी राहिली ती अशी निवडक राहिली कीं, इतक्या मंडळीचा वर्षाच्या कांठीं एक दिवस जर एके ठिकाणीं मजा मारण्यांत जातो आहे, तर तितकेंही बस आहे, याहून अधिक

कोणताही उद्देश सिद्धीस न गेला तरी फिकीर नाहीं, असा तिचा निश्चय होता, या कारणानें शेवटपर्यंत क्लबाचा बचाव झाला. पण एवढा त्याचा पाया खंबीर राहिल्यामुळें सगळी इमारत पुनः हळुहळू सांवरली. असें होतां होतां गेले दोन समारंभ पहिल्या तोडीचे पुनः झाले व पुढचेही तसे होतील अशी आशा धरण्यास जागा झाली आहे.

या क्लबाच्या मागून दोन तीन वर्षांनीं अशीच दर एक महिन्यास भरणारी मंडळी पुण्यास निघाली होती. 'होती' याच शब्दावरून तिची पुढील हकीगत कळेल. क्लबचा उद्देश ज्याप्रमाणें दाक्षिण विद्यालयीन लोकांचा दृढ स्नेह करून देणें हा होता, त्याप्रमाणेंच याही मंडळीचा होता. भेद एवढाच कीं, क्लबामध्यें कालेज खेरीज कोणी यावयाचा नाहीं व या दुसऱ्या मंडळींत हवें त्यास येण्यास मुभा असे. महि-न्याची वर्गणी साहा आणे असून या वर्गणीप्रमाणेंच जेवणा-चाही बेत साधा असे. ही मंडळी सुमारें वर्षभर चालली-पहिल्या एक दोन खेपेस देशकल्याणाच्या गोष्टी निघाल्या, व शहरांतील दरएक आळीस एक एक सार्वजनिक सभा असावी असा विचार ठरला; पण पुढें या प्रकरणीं सर्व बोलणें लवकरच राहून केवळ चार मंडळीनें एके ठिकाणीं बसून जेवावें व गप्पा माराव्या येवढेंच स्वरूप सदरील मंडळीचें झालें. असें होतां होतां कांहीं महिन्यांनीं ही मंडळी जशाची तशी नाहींशी झाली! म्हणजे शेवटली सभा भरवून किंवा सर्वांकडे जाहिरात वगैरे पाठवून मंडळी बंद झाल्या-बद्दलही कोणास कळविण्यांत आलें नाहीं.

वरील दोहोंप्रमाणेंच तिसऱ्याही एका मंडळीची हकीग-

त येथें सांगतों. ही मंडळी ' नेटिव क्रिकेट क्लब ' ह्मणजे एतद्देशीय लोकांची खेळण्याची मंडळी ही होय. ही सन १८७३ सालापासून आजपर्यंत चालली आहे. एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर व कलेक्टर यांच्या आफिसांतल्या कारकून वगैरे मंडळीनें एके ठिकाणीं जमून,ही वरील सालीं काढली. हिचा उद्देश चेंडूनें खेळण्याचाच फक्त आहे. नदीच्या पलीकडच्या बाजूस एक जागा खेळण्यापुरती घेतली आहे, तेथें ही मंडळी दर आदितवारीं सुमारें चार साडेचार वाजतां जमते, नंतर तास दीड तास खेळ होऊन, कांहीं थोडा फराळ होऊन संध्याकाळीं सर्व परत येतात. हिची वर्गणी चार आणे आहे. वर्षाच्या अखेरीस रिपोर्ट वाचतात व एक मेजवानी होत असते. या मंडळीच्या खाजिन्यांत मी इकडे आलों तेव्हां ५० रु. शिल्लक होते.

वरील तिन्ही हकीगती आपल्या सभेस चांगल्या उपयोगाच्या आहेत. कांकीं, पहिल्या दोहोंचा स्नेहसंवर्धनाचा हेतु व तिसरीचा व्यायामाचा हेतु, हे दोन्ही प्रस्तुत सभेंत एकवट झालेले आहेत. आतां या तिन्ही मंडळ्यांचे हेतु कितपत सिद्धीस गेले व कितपत सिद्धीस गेले नाहींत, व या सिद्धीस व असिद्धीस कोणत्या गोष्टी कारणभूत झाल्या याविषयीं कांहीं विचार सभेस सादर करतों.

पहिला जो स्नेहसंवर्धनाचा हेतु, तो पहिल्या दोन सभांनीं कितपत सिद्धीस गेला हें जर पाहिलें तर तो बहुधा मुळींच सिद्धीस गेला नाहीं. असें ह्मणणें भाग आहे. नुसत्या तोंडओळखीखेरीज व हे अमुक अमुक एवढें समजण्याच्या पलीकडे वरील क्लबापासून कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं.

ळ्बाच्या सभासदांपैकीं कोणास जर विचारलें, कीं या वार्षिक समारंभास तुह्मी आज आठ वेळां गलों, तर तुमच्या गुरुबंधूंत आणखी भर कितीशी पडली? तर बहुधा 'मुळींच नाहीं' हेंच उत्तर सर्वांस द्यावें लागेल. या मेळ्याच्या दिवशींच्या साऱ्या कृत्यांतही हाच प्रकार दृष्टीस पडतो. खेळ सुरू झाले तरी दर एक डावा भोंवताली मिळालेली मंडळी पाहिली तरी पूर्वीच्याच ओळखीची. जेवणाच्या वेळेस सोंवळीं नेसून पाटाकडे मंडळी चालली तरी जो तो आपआपल्या मेळ्यांत जावयाचा व या प्रमाणेंच शेवटीं परत जाण्याच्या वेळेस ही सर्व जण आपआपल्या जुटींत मिसळून घरोघर जावयाचे. विद्यालय हें इंग्रज लोक मातृस्थानीं कल्पितात, तेव्हां विद्यालयीन मंडळी ही सर्व एका आईचीं लेकरें झालीं. मग अशा लेकरांचा जर इतपत एकोपा, तर मग, दुसरी जी मासिक सभा सांगितली तींतील मंडळीचा तर परस्पर कितपत स्नेहभाव वृद्धिंगत होण्याचा संभव आहे हें सहज कळेलच. तर या प्रमाणें दोन्ही सभांचा मुख्य हेतु जो एकीकरण करण्याचा तो, बिलकूल सिद्धीस गेला नाहीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां असें होण्याचें कारण काय, हें जर पाहिलें तर तेंही सर्वांस सहज दिसणारें आहे. समुद्रकांठीं गेलें आणि मूठभर वाळू हातांत घेतली, तर तेवढ्या घेण्यानें वाळूचे कण एकवटतील काय? जे मनुष्य परस्परांशीं अत्यंत अपरिचित, ज्यांची विद्या निराळी, रुचि निराळ्या, धंदे निराळे, वयें निराळीं, त्यांणीं वर्षांतून एकदा एके ठिकाणीं जमून भोजन केलें ह्मणजे त्यांचा स्नेह तो कसा व्हावा? खाणावळींत

किंवा बाजारांत कितीसे स्नेहसंबंध जडतात ? तर, केवळ एकत्र भोजन केल्यानें किंवा आह्मीं एका जागीं शिकलों एवढें मनांत आणल्यानें नवे स्नेह जडतील किंवा जुने विशेष दृढ होतील या दोन्ही कल्पना पुष्कळ अंशीं भासात्मकच होत. डेक्कन कॉलेजच्या मंडळीनें दोन तीन वेळां निबंधांचे विषय नेमून बक्षिसें ही ठरविलीं होतीं; कीं तेणेंकरून सभेंतील लोकांस उत्तेजन यावें व क्लब हा केवळ मौजे खातरच केला आहे असें नाहीं असें सर्वांस वाटावें. पण हा प्रयत्नही व्यर्थच गेला. शंभर शंभर दोन दोनशा कोसां वरून थकून भागून चार दिवस विश्रांति घेण्याकरितां जे लोक पुण्यांत येतात ते खिशांत निबंध घालून फारच थोडे येणार आहेत. तेव्हां वरील बक्षिसें हीं सर्व वांयाच गेलीं. नाहीं ह्मणायाला एकदा मात्र कोणीं दूरच्या गृहस्थानें 'एतद्देशीय लोकांची गृहस्थिति' या विषयावर एक निबंध लिहून पाठवला होता. त्यास द्यावयाचें ह्मणून ४० का ६० रुपयांचें एक बक्षीस दिलें. बाकी आजपर्यंत सदरील क्लब जो चालला आहे तो पुण्यासारख्या शहरांत एखाद्या शान-दार हवाशीर बागेंत चार घटका विद्वत्समुदाय दृष्टीस पडतो व एका ठिकाणीं बहुतेक मित्रमंडळी दृष्टीस पडते एवढ्याच संबंधानें चालला आहे. या पेक्षां विद्यावृद्धीचे आणि लोककल्याणाचे बेत जे आजपर्यंत चालू झाले ते लयास गेले, व पुनः सुरू केले असतां ही बहुधा तोच प्रकार होईल असें भाकित केलें असतां चुकी होणार नाहीं.

तिसरा 'क्रिकेट क्लब' जो सांगितला, त्याचा हेतु फक्त शरीर व्यायामाचा असल्यामुळें व जमणारी मंडळीही

बहुतेक एके ठिकाणचीच असल्यामुळें तो बऱ्याच प्रकारें सिद्धीस जात आहे. त्यांतील कांहीं मंडळी खेळण्यास क्वचितच येणारी आहे खरी, तरी वार्षिक समारंभाच्या दिवशीं तरी येण्यास व महिन्याची वर्गणी भरण्यास आळस करीत नाहीं. बाकीची तर दर आदितवारीं बहुतकरून जमतेच. कोणी ऊगदीं वेळेस जरी नाहीं आला तरी अगदीं शेवटीं तरी तिकडून फेरी करण्यास होईल तितक्यांत हयगय करीत नाहीं. खेळण्याची जागा बरीच लांब असतां व एकंदर सामान इतक्या लांब न्यायाचें व आणावयाचें इतकी दगदग असतां ज्यापक्षीं आज पांच साहा वर्षे वरील क्लब चालला आहे त्यापक्षीं तो चालण्याचीं तशींच कांहीं कारणें असलीं पाहिजेत. हीं माझ्या मतें पुढील होत. एक तर चेंडूदांडूनें खेळणें ही गोष्ट नवीनच या देशांत आली असूनही तिचा जम बसण्यास कांहीं श्रम पाहिजेत व मोठें शाहाणपण पाहिजे असें नाहीं; दुसरें हें कीं, आठा दिवसांनीं कोसा अर्धा कोसाची रपेट व चांगला व्यायाम होणें या दोन्ही गोष्टी शरीरप्रकृतीस हितावह असून त्यांचा अनुभव तेव्हांच येणारा आहे. तिसरी गोष्ट, वरील मंडळी वयानें, योग्यतेनें वगैरे सर्व गोष्टींनीं सामान्यतः पाहातां सारखी असल्यामुळें, बोलण्या चालण्यास, थट्टा मस्करी करण्यास वगैरे कोणाची कोणाला आडकाठी राहात नाहीं; आणि चवथें कलम हें कीं, क्लबाची चिटणिशी करण्यांत किंवा खजिनदारी पत्करण्यांत कांहीं मोठी प्रतिष्ठेची बाब नसल्यामुळें व क्लबाचे उत्पन्न होऊन त्याच्या विभागाबद्दलही कोणाची कुरबुर होण्याचा बिलकुल संबंध नसल्यामुळें

वैमनस्यास वगैरे जागाच राहात नाहीं. तेव्हां सामान्यतः सभा चालण्यास ज्या अडचणी येतात त्या वरील मंडळीच्या ठिकाणीं उत्पन्न होण्यासारख्या नसल्यामुळें ती अद्याप चालूं आहे.

तर, याप्रमाणें वरील तिन्ही सभांची हकीगत आहे. हिजवरून आरंभीं केलेल्या विवेचनास बरीच पुष्टि येते असें मला वाटतें. सदरील विषय चांगला विचारक्षम आहे, तेव्हां याजवर पुष्कळ ऊहापोह होण्यासारखा आहे हें उघडच आहे. तूर्त मला जे चार विचार सुचले ते सभाजनांस प्रदर्शित केले आहेत, तर आतां त्यांची परवानगी घेऊन मी आपलें भाषण पुरें करतों.

---

## पुणें येथील चित्रशाळा.

या कारखान्यांत तसबिरा कशा निघतात आणि तेथील लोकांची आपापल्या कामांत कशी हुषारी आहे, याविषयींचे दाखले पाहणें असतील तर विविधज्ञानविस्तार ( पुस्तक १३ अंक ३ ह्मणजे मार्च सन १८८१ ) यांतील श्रीगणपतीचे तसबिरीविषयींचा लेख पहावा; किंवा सुबोधपत्रिका ( पुस्तक ९ अंक ३० ह्मणजे तारिख ११ सप्टेंबर सन १८८१ ) यांतील रामपंचायतनादि तसबिरींविषयींचा इंग्रेजी लेख पहावा. ते लेख येथें उतरून घेण्याची आह्मांस बिलकुल आवश्यकता दिसत नाहीं. कारण चित्रशाळेच्या बाल्यावस्थेंत कित्येकांनीं आह्मांस दूषणें दिलीं होतीं त्यांबद्दल जर आह्मीं कधींच खंती केली नाहीं,

व त्या फाकरवास भिऊन अगदींच डगमगलों नाहीं, तर वरच्यासारख्या सर्टिफिकिटांनीं तरी आह्मीं येवढी धन्यता कशाला मानावी? आमच्या उद्योगाची चहा आमच्या देशबांधवांत होऊं लागली आहे याचें हें दर्शक समजून वरच्यासारख्या लेखांचें आह्मी अभिनंदन करतोंच; पण आमच्या लोकांत अद्याप चित्रकलेचें मार्मिक ज्ञान व तिज-पासून होणारा अवर्णनीय आनंद यांची वार्ता दूरच आहे असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. याविषयीं प्रमाण पाहण्यास दूर जावयास नको. गेल्या वर्षी निवर्तलेला प्रसिद्ध कारागीर भिवा सुतार याचीं कामें आमच्या विद्वान ह्मणविणाऱ्या मंडळी पैकीं तरी कितीकांना माहीत असतील बरें? फार कशाला, त्याचें नांव कितीकांना नुसतें ऐकून तरी माहीत असेल? मा तेथून ति तसबिरा सन १८७८ सालीं येथोंवा निदान एकादें घोडें तिसऱ्या मजल्यावर मांडल्या होत्या हीच आज घटकेल भर ही डरेल तर शपथ! 'या काय तना! चला पाहिल्या!' असें ह्मणून आम कीं, वरील स लागलीच खालीं खपलें मांजर किंवा अमतरी त्यांक पाहायाला जावयाची! तेच आमचे माजी नेकर्नो कितपत हेब सर रिचर्ड टेंपल आले, त्यांस वरील कारागिरा अप्रातिम कृतींनीं तेथें चार घटका खोळंबविलें. हेंच लौकिक रसिकतेचें मान या शहरांत डोल्यांच्या रात्रीं ही दृष्टोत्पत्तीस येत असतें. प्रेक्षकांची दाटी आणि दुल्ला जारीनें कोठें चालावा?—तर जेथें आरास खूप केली असेल व हांडीला हांडी लागून गेली असेल तेथें! एरवी भिल्लिणीचा 'तीर

लागून जाऊन' विव्हळ होणारा बिचारा प्रेक्षक एखादाच ! !

आह्मांस कित्येकांकडून अशा सूचना येतात कीं हीं पंचायतनें तुह्मी काढीत बसतां, त्यापेक्षां ऐतिहासिक पुरुषांच्या तजविरा किंवा बोरघाटांतले, महाबळेश्वरावरचे वगैरे देखावे तुह्मी कां काढीत नाहीं? राम, शिव, गणपति, देवी यांचीं चित्रें आज हजारो वर्षें लोकांमध्यें आहेतच; तर ही नवी रसिकता लावून देण्याचा उद्योग तुह्मीं करावा कीं नाहीं? खरें आहे; पण वरील सूचना करणारांस आह्मी असें विचारतों कीं उद्यां आह्मी हैदर अलीची मोठी तजवीर तयार केली, किंवा एलफिनस्टन पॉइंट पासून दिसणाऱ्या ...ऱ्याचें चित्र तयार केलें, तर घेणारी मंडळी कितीक पुणि-क ? पैसेवाले बडे बडे विद्वान यांच्याकडे या कारखान्यांत तस... तर्की व्याख्यानें मिळतील, पण तेथील लोकांची आपाप... तो सुटायाचा नाहीं. आविद्वानांकडे याविषयींचे दाखले पा...ण येथपासून त्यांच्यापाशीं पाढा वाचा, ( पुस्तक १३ अंक ६ पानीं याप्रमाणें घटकाभर उरस्फोड क- श्रीगणपतीचे त आणि इतकेंही करून हैदरनाइकासारख्या सुबोधपत्रिक...ड्याला घरांत बाळगून किंवा दऱ्याखोऱ्यांचीं चित्रें सव्टेंबदळ ठेवून पुनः प्रयोजन तें काय? युरोपखंडांत लोकशिक्षण फार दिवस सुरू असल्यामुळें इतिहासाची माहिती नाहीं असा मनुष्य थोडा; व डोंगर, नद्या, अरण्यें इत्यादिकांच्या दर्शनेंकरून होणारा प्रत्यक्ष व चित्र-आनंद, द्वारा अनुभविण्याचा एकंदर पुष्कळ लोकांस शौक, पण त्यांपैकीं येथें काय आहे? पेशव्यांची नुसती वंशावळ तरी

कितीशा मंडळीला बिनचूक येईल कोण जाणे! आणि त्यांतून वनश्रीची गोष्ट तर बोलूंच नका—

देखे प्रचंड महागिरी। विशाळ पर्वताचिया दरी।
जळें तुंबलीं सरितासरीं। समुद्रतुल्य अगाध॥
नाना वृक्षांचीं अचाट। डांगें लागलीं घनदाट।
माजीं निर्झरोदकांचे पाट। सैरावैरा धावती॥
माथां उचलूनी दिनकर। जयें रक्षिला अंधकार।
माजीं श्वापदगणांचे भार। सुखात्रले सुखवस्ती॥
नदी मालिनी पवित्रजीवनी। वाहे जैशी देवतटिनी।
तरंगलिंगें सुफेनसुमनीं। सुपूजित शोभती॥

या 'कविवर'—कृत वर्णनाची कितीकांनीं प्रतीति घेतली असेल बरें? बहुतेक मंडळीची रसिकता पाहिली तर 'वाचनपाठमालें' तील गोविंदाच्याच बरोबरीची आढळेल तो जसा आपल्या गुरूजीस ह्मणाला कीं, "मी तेथून ति तका हिंडलों, पण एक मनुष्य किंवा निदान एकादें घोडें तरी मला भेटलें असेल तर शपथ!" हीच आज घटकेल आमच्या देशांतली स्थिति आहे!

असो; तर सरते शेवटीं येवढेंच सांगतों कीं, वरील स गोष्टींचा समावेश जरी आह्मांस कर्तव्य आहे, तरी त्यांक तुर्त लक्ष देतां येत नाहीं. बाकी आमची तयारी कितपत आहे हें लक्षांत येण्याकरितां आमच्या संग्रहीं जतन करून ठेविलेल्या ऐतिहासिक मूर्तींची संख्या किती आहे ती येथें दाखल करतोंः—

# ऐतिहासिक तजबिरींचीं नांवें.

१ जिजाबाई साहेब ( शिवाजीची आई )
२ शिवाजी महाराज.
३ संभाजी महाराज.
४ बोवासाहेब महाराज ( सातारकर. )
५ अप्पासाहेब महाराज ( किता )
६ भाऊसाहेब महाराज ( किता )
७ थोरले बाजीराव पेशवे.
८ नानासाहेब पेशवे.
९ थोरले माधवराव पेशवे.
१० राघोबा दादा.
११ सदाशिवराव भाऊ.
१२ नारायणराव पेशवे.
१३ सवाई माधवराव पेशवे.
१४ धाकटे बाजीराव.
१५ यशोदाबाई.
१६ नानाफडनवीस.
१७ बापू गोखले.
१८ हरीपंत फडके.
१९ महादजी शिंदे.
२० मल्हारराव होळकर.
२१ चतरशिंग ठोके.
२२ महमदअल्ली पादशाहा.
२३ औरंगजेब पादशाहा.

२४ अलमगीर पादशाहा.
२५ अली अदलशाहा पादशाहा.
२६ जुल्पिकारखां.
२७ शाहाजादा पादशाहा.
२८ शाहा अकबर पादशाहा (दिल्लीवाले)
२९ शाहा अलम पादशाहा ( कित्ता )
३० शिकंदरशाहा बहादूर ( हैदराबादवाले )
३१ चंदुलाल महाराज ( कित्ता )
३२ मुनिरुलमुलख बाहादूर ( कित्ता )
३३ महमद बेद्रुदिन शमसुलउमरा ( कित्ता )
३४ शमसुल उमरा बहादूर ( कित्ता )
३५ निजामअली ( कित्ता )
३६ मश्रुलमुलुक दिवाण ( कित्ता )
३७ गिरधरलाल कवि.
३८ एकतानखां कवि.
३९ मौलवी गवई.
४० हैदर नाईक ( श्रीरंगपट्टणवाले )
४१ टिप्पु सुलतान. ( कित्ता )
४२ नासर उद्दवला.
४३ निजाम उलमुल्क.
४४ अफजल उद्दवला.
४५ शिकंदर जाहा पोलादजंग.
४६ निजामअल्लीखां.
४७ नासरीजंग.
४८ दोस्त महमद ( काबुलचे सुलतान )

[illegible]. संग्राम[illegible]. महाराणा.
६० जवानसिंग राणा.
६१ भीमसिंग राणा ( उदेपुरकर. )
६२ जगतसिंग राणा ( कित्ता. )
६३ राणा अमरसिंग.

समात.